टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांच्या

विद्यावाचस्पती पदवीसाठी सादर केलेला प्रबंध

# “वृत्तपत्रांकडून वाचकांच्या बदलत्या अपेक्षा”

## तात्विक आणि सामाजिकशास्त्र विद्याशाखा
## वृत्तपत्रविद्या विभाग


*** संशोधक ***

माधुरी गोपाळ तानवडे

*** मार्गदर्शक ***

मा. डॉ. दीपक टिळक

कुलगुरु

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे


मे २०१३

# प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापूर्वक निवेदन करते की 'वृत्तपत्रांकडून वाचकांच्या बदलत्या अपेक्षा' या प्रबंधाचे संशोधन व लेखन मी स्वत: केले आहे. सदर प्रबंध या पूर्वी कोणत्याही विद्यापिठीय स्तरावर पदवी व पदविका मिळविण्यासाठी सादर केलेला नाही.

ठिकाण- पुणे

दिनांक-

**संशोधक**

**प्रा. माधुरी गोपाळ तानवडे**

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की प्रा. माधुरी गोपाळ तानवडे यांनी 'वृत्तपत्रांकडून वाचकांच्या बदलत्या अपेक्षा' या विषयावरील विद्यावाचस्पती पदवीसाठी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे यांना सादर केलेला प्रबंधाचे संशोधन स्वतः माझे मार्गदर्शनाखाली केले आहे. याच विषयावरील लेखन वा संशोधन इतर कोणत्याही विद्यापीठात कोणत्याही पदवी वा पदविकेसाठी सादर केलेले नाही.

ठिकाण पुणे

दिनांक -

**मार्गदर्शक**

**डॉ. दीपक टिळक**

कुलगुरू.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

# ऋणनिर्देश

'संकल्प व सिध्दी यात महदंतर असते' असे म्हणतात याचा प्रत्यय प्रस्तुत प्रबंध लिहिताना आला. 'वृत्तपत्रांकडून वाचकांच्या बदलत्या अपेक्षा' या विषयावर प्रबंध लिहण्यासाठी मोठ्या उत्साहाने सुरुवात केली पण अडचणीचा ससेमिरा अचानक सुरू झाला. यातून मला नैतिक पाठबळ देऊन प्रभावी मार्गदर्शन करण्याचे काम माझे आदरणीय मार्गदर्शक डॉ. दीपक टिळक यांनी केले याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

प्रबंध लेखन करताना न कंटाळता विविध संदर्भ ग्रंथ उपलब्ध करुन देऊन मोलाचे सहकार्य करण्याचे काम आमच्या ग्रंथपाल सौ. सुनिता शिंदे, 'केसरी' ग्रंथालय कर्मचारी, प्रसाद ग्रंथ वितरण याची मी आभारी आहे.

प्रत्यक्ष प्रबंध लेखनात लिखाणाचे काम अखंड करण्यात ज्यांचा सिंहाचा वाटा आहे. ते माझे पति श्री. गोपाळ ग. कुलकर्णी यांची मी उतराई होऊ शकत नाही. याच बरोबर संदर्भ संकलनात खारुटीची भूमिका करणारी माझी मुलं चि. शाल्मली व ऋत्विज यांनाही याचे श्रेय दिले पाहिजे. मी दिलेल्या प्रश्नावल्या ज्या वाचक, विद्यार्थी, संपादक, एजंट व वार्ताहरांनी वेळेत भरून दिल्या त्या सर्वांचे मी आभार मानते.

या प्रबंधाच्या कॉम्प्युटर टायपिंगचे काम वेळोवेळी करून देण्याचे काम सौ. पी. पी. भोसेकर, सौ. करमरकर, श्री. शिशिर कुलकर्णी यांनी केले. तसेच अंतिम टप्प्यातील टायपिंग, बाईंडिंग इ. कामाचा महत्त्वाचा वाटा श्री. हेमंत सावंत, श्री निवांत सावंत या बंधुद्वयांनी उचलला या बद्दल मी त्यांची ऋणी आहे. अत्यंत कमी वेळात टायपिंगचे काम करुन दिल्याबद्दल श्री. अनिल मोहिते यांचे आभार मानते. प्रबंधात घालण्यासाठी विषयानुरूप चित्रे काढून देण्याचे काम चित्रकार श्री. विजय शिंदे यांनी केले त्यांचे ऋण मी मानते.

या लेखनाच्या वाटचालीत केसरीतील श्री. व सौ. पेशवे, सौ. गाडगीळ मॅडम व इतर कर्मचारी वर्ग, तरुण भारतचे संपादक श्री.मंगेश मंत्री, लोकमत, सकाळ पुढारीतील कर्मचारी वर्ग यांचेही मौलिक सहकार्य लाभले. यात उपयुक्त सूचना देऊन मार्गदर्शन करणारे श्री. एस के. कुलकर्णी, गीताली टिळक व श्री. अशोक खोत सर याची मी ऋणी आहे. यावेळी घेतलेल्या विविध तज्ज्ञाच्या मुलाखतीचे छायाचित्रण करणाऱ्या श्री. गणेश बरगाले, चि. ऋत्विज कुलकर्णी यांचीही मी आभारी आहे.

या व्यतिरिक्त मला प्रोत्साहन देणारे माझे प्राचार्य डॉ. दीपा देशपांडे, माझे प्राध्यापक सहकारी श्री. अशोक खोत सर, माझे नातेवाईक याचेही मी आभार मानते. अनवधानाने यासाठी सहकार्य करणाऱ्याचे नाव राहून गेले असेल त्याचेही मी ऋण व्यक्त करते.

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | शीर्षक | पान क्र. |
|---|---|---|
| १ | मुखपृष्ठ | I |
| २ | प्रतिज्ञापत्र | II |
| ३ | मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र | III |
| ४ | ऋणनिर्देश | IV |
| ५ | अनुक्रमणिका | V |
| **प्रकरण पहिले - वृत्तपत्र पार्श्वभूमी व संकल्पना पान क्र.१ ते ३७** | | |
| १.१ | प्रस्तावना | १ |
| १.२ | वृत्तपत्र संकल्पना | २ |
| १.३ | वृत्तपत्राचा इतिहास | ९ |
| १.४ | पूर्वीच्या वृत्तपत्राचा हेतू व उद्देश | १४ |
| १.५ | स्वातंत्र्यपूर्व काळातील वृत्तपत्रांचे उद्देश व कार्य | १९ |
| १.६ | स्वातंत्र्योत्तर काळातील वृत्तपत्रांचे उद्देश व कार्य | २६ |
| १.७ | वृत्तपत्रांच्या बदलत्या भूमिका | ३० |
| १.८ | समारोप | ३५ |
| **प्रकरण दुसरे - स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील वृत्तपत्रे, वाचक व त्यांच्या अपेक्षा पान क्र. ३८ ते ८२** | | |
| २.१ | प्रस्तावना | ३८ |
| २.२ | वृत्तपत्र व वाचकाचे नाते | ३८ |
| २.३ | पूर्वीचा वाचकवर्ग - त्याच्या अपेक्षा | ४५ |
| २.४ | स्वातंत्र्यपूर्वकालीन वृत्तपत्रातील विषय, बातम्यांचे स्वरुप | ४८ |

| अ. क्र. | शीर्षक | पान क्र. |
| --- | --- | --- |
| २.५ | संपादकांच्या भूमिका- प्रबोधन व जागृती | ५० |
| २.६ | संपादक व वाचकाचे नाते - न्यायाधिशाची भूमिका | ५२ |
| २.७ | वाचकाचा स्तर व त्याची आवड | ५४ |
| २.८ | स्वातंत्र्योत्तर काळातील वृत्तपत्रे | ५७ |
| २.९ | २१ व्या शतकातील वृत्तपत्रातील बदल | ६२ |
| २.१० | वाचक वर्गाच्या बदलत्या भूमिका व अभिरुची | ७१ |
| २.११ | वाचक वर्गाचे स्तर | ७५ |
| | २.११.१ विविध वयोगट | ७६ |
| | २.११.२ विविध व्यावसायिक | ७८ |
| २.१२ | समारोप | ८२ |
| **प्रकरण तिसरे - गृहितके (Hypothesis) पान क्र.८३ ते १५३** | | |
| ३.१ | प्रस्तावना | ८३ |
| ३.२ | संशोधन विषयाची ओळख | ८३ |
| ३.३ | संशोधनाची उद्दिष्टे | ८४ |
| ३.४ | संशोधनाची गरज व महत्व | ८५ |
| ३.५ | संशोधनाची व्याप्ती व मर्यादा | ८६ |
| ३.६ | गृहितके | ८६ |
| ३.७ | संशोधनाची कार्यपध्दती | ८७ |
| ३.८ | संशोधनाची साधने | ८८ |
| ३.९ | नमुना निवड | १ |
| ३.१० | प्रश्नावल्यांचे स्वरुप | ९१ |
| ३.११ | संशोधनाची कार्यवाही | ९३ |
| ३.१२ | माहितीचे पृथक्करण व विश्लेषण | ९४ |

| अ. क्र. | शीर्षक | पान क्र. |
|---|---|---|
| ३.१३ | माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन | ९५ |
| | ३.१३.१ सर्वसामान्य वाचकांच्या प्रश्नावलीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन | ९६ |
| | ३.१३.२ वृत्तसंपादक व कार्यकारी संपादक यांच्या प्रश्नावलीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन | १११ |
| | ३.१३.३ विद्यार्थी प्रश्नावलीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन | १२९ |
| | ३.१३.४ शहरी व ग्रामीण वार्ताहरांच्या प्रश्नावलीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन | १३६ |
| | ३.१३.५ वृत्तपत्र एजंट व विक्रेते यांच्या प्रश्नावलीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन | १४२ |
| ३.१४ | सारांश | १५२ |
| ३.१५ | समारोप | १५३ |
| | **प्रकरण चौथे- निष्कर्ष व शिफारशी पान क्र.१५४ ते १७०** | |
| ४.१ | प्रस्तावना | १५४ |
| ४.२ | सारांश | १५४ |
| ४.३ | निष्कर्ष | १५५ |
| ४.४ | शिफारशी | १६७ |
| ४.५ | उपसंहार | १६९ |
| | **प्रकरण पाचवे - संदर्भ ग्रंथांचे पुनरावलोकन पान क्र.१७१ ते १७७** | |
| | **संदर्भ ग्रंथ सूची** | |
| | **परिशिष्टे** | |

## प्रकरण पहिले

# वृत्तपत्र पार्श्वभूमी

# व

# संकल्पना

# प्रकरण १ ले

# वृत्तपत्र पार्श्वभूमी व संकल्पना

१.१ प्रस्तावना

१.२ वृत्तपत्र संकल्पना

१.३ वृत्तपत्राचा इतिहास

१.४ पूर्वीच्या वृत्तपत्राचा हेतू व उद्देश

१.५ स्वातंत्र्यपूर्व काळातील वृत्तपत्रांचे उद्देश व कार्य

१.६ स्वातंत्र्योत्तर काळातील वृत्तपत्रांचे उद्देश व कार्य

१.७ वृत्तपत्रांच्या बदलत्या भूमिका

१.८ समारोप

## १.१ प्रस्तावना –

मानवी जीवनात वृत्तपत्रांचे स्थान अनन्यसाधारण आहे. लोकशाहीचा महत्वाचा चौथा आधारस्तंभ म्हणून त्याच्याकडे पाहिले जाते. वृत्तपत्र ही संकल्पना नेमकी कोठून कशी आली ? तिची व्याप्ती, तिचा अर्थ, पूर्वीची वृत्तपत्र कशी होती. त्यांचा हेतू काय होता ? त्यांचे कार्य समाजासाठी कसे उपयुक्त ठरले. स्वातंत्र्यपूर्व काळातील वृत्तपत्रे, स्वातंत्र्योत्तर काळातील वृत्तपत्र त्यांचा हेतू काय होता. त्यांचा उद्देश, त्यांची भूमिका व वृत्तपत्राचा इतिहास या सा-या गोष्टींचा विचार आपण येथे प्रस्तुत प्रकरणात करणार आहोत.

मराठी वृत्तपत्र सृष्टीची आजची स्थिती म्हणावी तितकी स्पृहणीय नसली तरी तिचा इतिहास मात्र उद्‌बोधक व रंजक आहे. मराठी वृत्तपत्राचा श्रीगणेशा भारतात झाल्यानंतर तब्बल ५० वर्षानी पहिले मराठी वृत्तपत्र १८३२ साली सुरु झाले. इंग्रजी वृत्तपत्रे चांगली तीस पस्तीस वर्षे रुळल्यानंतर त्यांच्या अनुकरणातुन मराठी वृत्तपत्र व्यवसाय सुरु झाला तोही इंग्रजीतुनच. ब्रिटीश सत्ता सुस्थिर झाल्यानंतर शिक्षणामुळे नव्या पाश्चात्य ज्ञान-विज्ञानाचा परिचय होवून भारतीयांना एक नवे विश्व खुले झाले. एका बाजुला नव्या ज्ञान विश्वाचा परिचय व दुस-या बाजुला नव्या राजवटीमुळे नव्या कल्पना विचारात परिवर्तन अशा दुहेरी मन्वंतरात आपला समाज घडू लागला.

ब्रिटीशपूर्व काळात जी आंदोलने झाली त्यामुळे राजकीय परिस्थिती सतत अस्थिर राहिली. मराठयांच्या हातात हिंदवी राजकारणाची सूत्रे आल्याने काही व्यक्तिंचे जीवन बदलले. पण सामाजिक जीवनात काहीच बदल झाला नाही. जुनी चाकोरी व वैचारिक चौकट यात लाखों लोकांचे (ग्रामीण) जीवन बंदिस्त राहिले. समाजरचना बदलली नाही. इंग्रज राजवट येईपर्यंत जातीधर्माचा पगडा कायम होता. भारतीय तत्वज्ञानानेही वैयक्तिक कल्याणाला महत्व दिल्याने समाजाला त्यात स्थान नव्हते परिणामी एवढया राजकीय घडामोडींचा पडसाद समाजाच्या विचारावर उमटला नाही. लोकांत सामाजिक कर्तव्याची निष्ठा निर्माण झाली नाही.

कुलप्रतिष्ठा जातीनिष्ठता व वतनाचा अभिमान या मध्ययुगीन कल्पनातच लोक गुरफटले होते. त्यामुळे इंग्रजांनी सत्ता घेतल्याचे फारसे सोयरसुतक लोकांना वाटले नाही. सामाजिक गंडांतर किंवा राष्ट्रीय मानहानीची खंत कोणालाच वाटली नाही. समाजसंस्था ईश्वरनिर्मित आहे.

या समजुतीमुळे सामाजिक प्रगतीला हातभार लावला पाहिजे ही जाणीव कुणातच नव्हती. ऐहिकापेक्षा पारलौकिक जीवनाला महत्व दिल्याने सामाजिक दु:खापेक्षा व्यक्तिगत मोक्ष महत्वाचा ठरला. संतानी व्यक्तिगत अंतर्मुखतेस प्राधान्य दिल्याने पाश्चात्यांच्या आगमनामुळे झालेल्या सुधारणांकडे कोणी औत्सुक्याने पाहिले नाही. सामाजिक जीवनाचा अभाव व ज्ञानाविषयी अनौत्सुक्य यामुळे आपल्याकडे वृत्तपत्रासारखी साधने येण्यास ब्रिटीश सत्तेची वाट पहावी लागली.

अर्थात माणसामाणसात दळणवळण नव्हते, बातम्यांची देवाणघेवाण नव्हती असे नाही फक्त त्यांचे स्वरुप मर्यादित व व्यक्तिगत होते. बातम्या तोंडी, खाजगी व सरकारी पत्रव्यवहाराद्वारा सार्वजनिक ठिकाणी पत्रके लावुन वा दवंडी पिटवुन त्या लोकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला जात असे. मात्र असा प्रसार मर्यादितच राही. आपल्याकडे वृत्तपत्र संकल्पना नेमकी कोठून आली ? वरील परिस्थिती त्याला कारणीभुत कशी झाली ? याचा सविस्तर उहापोह करुन या वृत्तपत्रांकडून वाचकांच्या अपेक्षा कोणत्या होत्या व त्या बदलत कशा गेल्या हे आपण पाहणार आहोत.

## १.२ वृत्तपत्र संकल्पना :-

कुतुहल, औत्सुक्य व सुरक्षितता या माणसाच्या सहजप्रवृत्ती आहेत. आपल्या भोवतालच्या माणसांविषयी त्याला जिज्ञासा असते. येणा-या संकटापासून दुर राहण्याची सावधता बाळगताना त्याविषयी आवश्यक ती माहिती मिळवण्याची वृत्तीही त्याच्यापाशी आढळते ही माहिती म्हणजे बातमीचे बालरुपच होते. माणसाच्या चौकसपणातुनच वृत्तपत्राची संकल्पना साकार झाली.

समुहभावनेतुन, एकत्र राहण्याच्या संघटनवृत्तीतुन हे चौकसपण वाढले हे ग्रीक, रोमन इतिहासात आढळते. त्या काळी कारागिराने एखादी लोकोपयोगी वस्तु तयार केली की तिची माहिती लोकांना देण्यासाठी ग्रीक व रोमन लोक माहितीचे फलक चव्हाटयावर उभे करत.

गावातील महत्वाच्या घडामोडींची माहिती दवंडी पिटवून देण्याची प्रथा तेंव्हापासून आजही प्रचलित आहे. झाडावर ढोल बांधुन व कर्णे वापरुन त्याच्या आवाजाने लोकांना सुचना देण्याची पध्दत महाराष्ट्रात इतिहासकाळात होती मशिदीत बांग देण्याची पध्दतही अशीच सुरु झाली.

युरोपात लोकांना एकत्र करण्यासाठी चर्चच्या घंटा विशिष्ठ पध्दतीने वाजवल्या जात. दुस-या महायुध्दाच्या काळात भोंगा वाजवुन धोक्याचा इशारा देण्याची प्रथा होती ती आजही चालु आहे.[१] एखादी अघटित घटना, लोकांच्या आस्थेची गोष्ट प्रथम जाहिर करणे म्हणजे वृत्त, न्युज होय. समाजाच्या प्राथमिक अवस्थेतही त्याची ही बातमी काढण्याची उत्सुकता जाणवते. माणसेच काय पशुपक्षातही विशिष्ठ आवाज काढून असे इशारे देण्याची प्रवृत्ती असते 'वार्ता कौतुकवती' असे म्हणुनच म्हंटले आहे. मानवी समाज संघटीत झाला. त्याला स्थैर्य मिळाले प्रजा व राजा असे नाते निर्माण झाले. प्रजेच्या व्यथा, अडचणी सत्तास्पर्धेत असणा-यांच्या हालचाली यांचा सुगावा काढण्यासाठी हेरगिरीची गरज निर्माण झाली. देशोदेशीच्या गुप्त बातम्या गोळा करणारे हेर हे राजाचे डोळेच मानले जावु लागले. राजकारणा बरोबर व्यापारी घडामोडींच्या बातम्या मिळवण्याची गरज निर्माण झाली त्याकाळी महत्वाच्या व्यापारी केंद्रात स्वतःचे बातमीदार ठेवले जावु लागले. बातमी सांगणा-या व्यक्तिवरुन त्याची विश्‍वसनीयता ठरवली गेली. 'हे बाजारी वर्तमान, हे सावकारी वर्तमान,' हे ऐकिव वर्तमान' असा त्याचा उल्लेख केला जाई.

यादृष्टीने ग्रीस देशातील प्राचीन रंगभुमी महत्वाची ठरली. एखादी गोष्ट लोकांच्या मनावर ठसवण्यासाठी ते अभिनयाने, पोवाडयाने ठसवीत.अशा नाटकातुनच ब-याच वेळा ताजी बातमी व त्यावरची टिका असे. यामुळेच वृत्तपत्राचे आदयपीठ म्हणुन ग्रीस रंगभुमीचा सन्मान केला गेला. रोमन साम्राज्यात बातम्या देणारी पत्रके लावत. ज्युलीअस सीझरच्या कारकिर्दीतली 'ॲक्टा डायरना' (घोषणापत्रके) ही वृत्तपत्रांची प्राथमिक आवृत्तीच होती. त्यात बातमी लेखकाने गोळा केलेली माहिती असे.

इंग्लंडमध्ये न्युज लेटर्स असत. ते वृत्तपत्रांचे पुर्वरुपच होते. त्यात अमीर उमरावांच्या दूतांनी परदेशातून आणलेल्या महत्वाच्या बातम्या असत. हे दूत अत्यंत चतुराईने बातम्या मिळवुन त्या रंगवुन सांगत. सर्वसामान्य लोकांनाही यात रुची असे. मध्ययुगात युरोपातील अमीर उमरावांना दूरदूरच्या जत्रांना जाताना वर्षाच्या खरेदीबरोबर गरमागरम बातम्या ऐकण्याची आवड असे. यातुनच वृत्तपत्र संकल्पनेचा जन्म झाला असे म्हणण्यास वावगे ठरणार नाही.

---

**टिप** १. मराठी वृत्तपत्राचा इतिहास. रा.के.लेले कॉन्टि. पुणे

युरोपात मुद्रणकलेचा उदय पंधराव्या शतकात झाला. हस्तलिखित बातमीपत्रे छापील स्वरुपात आली. दुमडलेल्या चौकोनी हॅण्डबिलाच्या स्वरुपात ती असत. फेरीवाले ती रस्त्यात विकत. त्यातील बातम्या ओरडून जाहीर करत. यात लढाया,राजे लोकांच्या हालचाली अशा बातम्या असत. इंग्लंडने बातमीपत्रांची पध्दत हॉलंडकडून घेतली. हे कोरंट (CORANTO) व गॅझेट म्हणजेच वृत्तपत्राची कुमारावस्था होती. कोरंट म्हणजेच संकलित वृत्त वा बातम्या.

इटलीत सोळाव्या शतकात युध्दविषयक बातमीपत्रे सार्वजनिक ठिकाणी लावुन ठेवत ती मिळवण्यासाठी गॅझेटा हे नाणे दयावे लागे. त्यावरुन या वृत्तपत्रास गॅझेट असे नांव मिळाले असावे. हॉलंडमधील ही बातमीपत्रे 'नॅथेनिअल बटर' हा विक्रेता करे. थर्टी इअर्स वॉर या युध्दवार्तामुळे इंग्लडमध्ये बातमीपत्रांची मागणी वाढली तेंव्हा इंग्लंडमध्येच बातमीपत्र निघु लागले. (सन १६२१) वृत्तपत्र संकल्पनेचा हा आरंभ होता. अर्थात पाश्चात्य देशातल्या या घडामोडी पाहताना आपल्या देशाकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही कारण वृत्तपत्रांची ही संकल्पना याहीपुर्वी आमच्या संस्कृतीत रुजली होती. ही परंपरा अगदी वेदकाळापर्यंत मागे नेता येते. पुर्वी याज्ञवल्क, वशिष्ठ मुनींच्या आश्रमात आपल्या खास शिष्यांकडून परस्परांची खुशाली कळवली जाई. महाभारतात रणांगणावर चाललेल्या कौरव पांडवांच्या युध्दाचा वृत्तांत कथन करणारा संजय हा वार्ताहरच होता. ज्ञानेश्वरांच्या काळात ज्ञानेश्वरांच्या चमत्त्काराच्या कथा चांगदेवाना त्यांच्या बातमीदार शिष्यांकडून समजत. याही आधीचे सांगायचे तर देवलोकात पृथ्वी व पाताळातल्या सर्व बातम्या पोहचवणारे नारद हे पहिले पत्रकार होत असे म्हंटले आहे. उत्तरप्रदेशचे एक जुने नेते संपुर्णानंद यांचे उद्गार याबाबतीत पाहण्याजोगे आहेत. ते म्हणतात, ''भूतकाळी विलिन झालेल्या वृत्तप्रसारक संस्थेसारख्या महर्षी नारदांना पत्रकारांनी आपला आदयगुरु मानावे ही हसण्यावारी नेण्यासारखी गोष्ट नाही. सामान्य वहनपध्दती सोडून हे महाराज अंतरिक्षातही भ्रमण करीत आणि एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी वार्तांचा झपाटयाने प्रसार करीत. ते प्रखर प्रचारक होते. शौर्य, शील व आत्मसमर्पणाची उदाहरणे ते दिगंतापर्यंत पसरवित असत. त्यांच्या सा-या कार्यामागे निश्चित हेतु असे सदगुणांची किर्ती वाढवावी, विपत्ती व दुहीचा नाश करावा यापेक्षा अधिकाधिक उत्तम कार्य दुसरे असुच शकणार नाही. या अनन्य सत्यनिष्ठेच्या कसोटीवर आपली बरीचशी वृत्तपत्रे हिणकस ठरतील.''

प्राचीन भारतीय राजनीतिवरील एक ग्रंथ 'कौटिलीय अर्थशास्त्र' यातही शासनयंत्रणेतले अधिकारी समाहर्ता व संनिधाता हे महत्वाचे वार्ताहर असत. त्यात कापहिक, उदास्थित, गृहपतिक व्यंजन, वैदेहक व्यंजन, तापस व्यंजन हे पाच स्थायी व सत्री,तीक्ष्ण, रसद आणि भिक्षुक हे सतत फिरणारे असे नऊ गूढ पुरुष सांगितले आहेत.[१] हे गूढ पुरुष म्हणजेच वार्ताहर.

शिवाजी महाराजांच्या पदरीही असे खास हेर होते. बातम्या काढण्यासाठी भाटांचाही उपयोग केला जाई. मोगल बादशहाच्या कारकिर्दीत बातम्या मिळवायचे काम अधिक व्यवस्थित होवू लागले. बातमी लिहणे हे एक स्वतंत्र कामच झाले. प्रत्येक सुभ्यात स्वतंत्र बातमीदार असे त्यांना वाकीआनवीस म्हणत. सुभ्यातील महत्त्वाच्या घटना राजधानीत लेखी कळवण्याचे काम तो करे. प्रांतातील अधिकारीही त्यांना वचकून असत. काही वेळा त्यांचे अधिका-यांचे मेतकुट जमे. अशा वेळी 'खुपियानवीस' हे गुप्त बातमीदार नेमले जात.

अर्थात प्रत्येक वेळी या बातम्या ख-या असत असे नाही. खुपदा हेरांना पैसे चारुन खोटया बातम्या पोहोचवल्या जात. औरंगजेबाच्या दक्षिण पराभवाला या विपर्यस्त बातम्याच कारण होत्या असे जॉन फायर याने म्हटले आहे. व्यापारी पेढयाही अशा राजकीय व व्यापारी घडामोडींच्या बातम्या मिळवण्यासाठी प्रयत्नरत असत. या वार्ताहरांना ' गुमास्ते' म्हटले जाई. यावरुनच हिंदी उर्दुत वर्तमानपत्राला ' अखबार ' म्हटले गेले आहे.

गावच्या धर्मशाळेत येवून उतरणारा फिरस्ता प्रवासी हाच सामान्य लोकांचा बातमीदार असे. त्याच्याकडून बातमीचा मौखिक प्रसार होत असे. सर्वसामान्य लोकांना बातमी पुरवण्यासाठी खाजगी अखबारही प्रसृत केले जात. अर्थात ही बातमीपत्रे हस्तलिखित स्वरुपात असत. मुद्रित वृत्तपत्रे निघू लागल्यावरही ही हस्तलिखित बातमीपत्र काही काळ चालू होती. मराठयांच्या सत्तेत नाना फडणवीसाच्या बातमीदारांचे काम अत्यंत मौलिक होते. त्यांनी हेर म्हणून कुणबीणी, आचारी, सेवेकरी, विधवा इत्यादी पेशातील लोक नेमले होते. या हेरांना 'नजरबाज' म्हणत.[२] या स्त्रीवार्ताहरात माळीणीला विशेष महत्व असे.

---

(१) **टिप –** १.' प्राचीन भारतीय राजनीति' कंगले र.प. पान. ९१-९३ मुंबई

२. 'नाना फडणवीसांचे चरित्र' खरे वासुदेव शास्त्री पान नं. १७१-१७२

'' नराणां नापितो धूर्तः पक्षिणां चैव वायसः।

चतुष्पदा शृगालस्तु स्त्रीणां धुर्ता च मालिनी ।।''[१]

हा श्लोक बोलका आहे.

वरील सर्व विवेचनावरुन वृत्तपत्र ही संकल्पना किती जुनी आहे व ती कशी आली याचा उलगडा होतो. सम्राट अशोकाने शिलालेखावर लिहलेले संदेश हेही वृत्तपत्राच्या संकल्पनेचे मूळ होते. रामदास स्वामी, चक्रधर यांनी आपल्या देशभ्रमणातुन केलेले तत्कालीन समाजाचे वर्णन म्हणजे वृत्तपत्राचा एक अवतारच होय.

यावरुन एकूण वृत्तपत्र ही संकल्पना किती प्राचीन आहे.[२] याची कल्पना येते. वृत्तपत्र ही संकल्पना अलीकडच्या भाषेत स्पष्ट करायची झाली तर पुढीलप्रमाणे करता येईल.

- **रिचर्ड क्रीचफिल्ड –** '' बातमी म्हणजे रोजचे गदय, हे गदय ज्यात संकलित रुपात दिले जाते ते वृत्तपत्र होय.''
- **चार्ल्स ए डॅना (न्युयॉर्कसन) –** लोकांना बोलायला लावेल असे सर्व काही ज्यात आहे ते वृत्तपत्र होय.
- **जॉन चान्सलर –** संघर्ष आणि बदल याचा कालक्रमगणिकेनुसारचा वृत्तांताचा साठा. एन. बी. सी. न्यूज.
- **डॉ. विल्यम रिव्हर्स –** लोकांना रुचि आहे अशा घटना तथ्य वा मतांचे समयोचित निवेदन म्हणजे वृत्त अशी वृत्ते ज्यात असतात ते वृत्तपत्र होय.

(न्युज इज टाइमली रिपोर्ट ऑफ इव्हेंट, फॅक्ट ऑर ओपिनिअनस दॅट इंटरेस्ट अ सिग्निफिकंट नंबर ऑफ पीपल)

---

**टिप –** १. चाणक्य नीती भाग ३ - श्री. स.ह. जोशी, राजेश प्रकाशन पुणे पान. ३३, श्लोक २१ अ. ५ वा.

२. वृत्तसंकलन लेखन आणि संपादन-प्रा. देवेंद्र विसपुते, प्रतिक्षा प्रकाशन उदगीर पान १५,१६.

News is timely report of event, facts or opinions that interest a significant number of people.

- **मॅचेस्टर गार्डीयन –** ''आधी माहित नसणा-या अत्याधिक लोकांच्या तत्काळ आवडीच्या नाविन्यपूर्वी व धक्कादायक घटनांची प्रारंभिक उद्घोषणा ज्यात असते ते वृत्तपत्र.''

- **प्रा. क्लिंटन आर. बुश –** ज्यात बातमीच्या रुपात उत्तेजक सुचना असतात त्याने एखादयाला संतोष व उत्तेजना प्राप्त होते.

- **विल्यम माल्सवार्ड –** कोणत्याही वेळी घडणा-या महत्त्वपूर्ण घटनांचे यथातथ्य व निःपक्षपाती विवेचन ज्यात असते व त्यात वाचकांची अभिरुचीही असते.

- **मॅन्सफिल्ड –** घटना म्हणजे बातमी नव्हे घटनेचे विवेचन त्यात हवे. ज्यांनी ती घटना पाहिली नाही त्यांच्यासाठी केलेले विवेचनात्मक संकलन.

- **जोसेफ पुलित्झर –** नवनिर्मित्व, भिन्नतत्वदर्शक, अद्भूतरम्य, थरारक, असामान्य, विलक्षण, प्रासंगिक, चमत्कारीक, विनोदी, विषम व बोलण्यासाठी समयोचित अशा गोष्टींचे संकलन ज्यात असते ते वृत्तपत्र होय.

- **Josef Pulitzer -** Every issue of the paper presented an opportunity and a duty to say something courageous and true; to rise above the mediocre and conventional; to say something that will command the respect of the intelligent, the educated the independant part of the community; to rise above fear of partisanship and fear of popular prejudice.

- **इन्द्र विदयावाचस्पती –** पत्रकारितेला पाचवा वेद मानून तिच्याद्वारा ज्ञानविज्ञान संबंधी ज्ञान होवून बुध्दीचा विकास होतो हे काम करते ते वृत्तपत्र होय.

- **महात्मा गांधी –** पत्रकारितेच्या माध्यमातून जनसेवा करण्याचे साधन म्हणजे वृत्तपत्र होय.

- **डब्लु वी स्टिड –** वृत्तपत्र हे पत्रकारितेतुन जनसेवा करण्याची कला आहे.

- **सी. जी. मुलर –** पत्रकारितेचा संबंध थेट ज्ञानाशी आहे. वृत्तपत्र व्यवसायाच्या द्वारा तथ्यप्राप्ती त्यांचे काळजीपूर्वक मुल्यांकन व यथायोग्य सम्यक प्रसारण अपेक्षित आहे. असे सांगतात.

-  **जवाहरलाल नेहरु :–** वृत्तपत्र हे काळाचा आरसा व सुर्य आहे.

-  **न्यू वेबस्टर शब्दकोश –** ज्यात सामाजिक घटनांचे प्रकाशन संपादन व लेखन असते त्याला वृत्तपत्र म्हणतात.

-  **डॉ. कृष्णबिहारी मिश्र –** आपला समाज व आपले संबंध यांच्याबाबतीत लिहले जाते ते वृत्तपत्र.

-  **डॉ. अर्जुन तिवारी –** काळ व समाजाबाबत सजग उत्तम नागरिकांना कर्तव्याचा बोध करुन देणारी कला, मंगलत्वाचा प्रकाश देणारी शुभनजर, समत्वदृष्टी देण्यासाठी ज्यात सम्यक ज्ञान प्रकाशित केले जाते, सत्य शिव व सौंदर्याचा जयघोष केला जातो त्याला वृत्तपत्र म्हणतात.

-  **डॉ. भवर सुराणा –** सर्व तात्कालिन घटना व समस्यांचे योग्य व निष्पक्ष विवेचन वाचकांपर्यंत ज्यातून प्रसृत करुन जनजागरणाचे काम केले जाते ते वृत्तपत्र.

-  Chambers University – ज्यात लोकांसाठी लिहले जाते ते.

-  **डॉ. रामचंद्र तिवारी –** राष्ट्रीय लोकजागृती करण्याचे साधन.

-  **प्रकाशचंद्र भुवालपुरी –** समाजकल्याणासाठी केलेले समयोजित लेखन,प्रकाशन म्हणजे, वृत्तपत्र.[१]

-  Robert E Park – The newspaper has a history, but it has, likewise a natural history. The press, as it exists, is not, as our moralists sometimes seem to assume the willful product of any little group of living men, on the contrary, it is the outcome of a historic process.

-  Lincoln Steffens – The magnitude of financial operations of the newspapers is turning journalism upside down.

---

**टिप –** (१) पत्रकारिता के विविध आयाम - डॉ. गोविंद प्रसाद, अनुपम पाण्डेय - डिस्कव्हरी पब्लिशिंग हाउस, दिल्ली पान २,३.

E.N. Godkin - The reson why such journals (yellow journalism) lie is that it pays to tie, or in other words, this is the very reason for which they are silly and scandalous and indecent they supply a want of demoralized public. (१)

वृत्तपत्र हा समाजाचा आरसा आहे ते सहजसुलभ रेकॉर्ड आहे ते सामान्य माणसाला विकत घेता येते.

वृत्तपत्राच्या संकल्पनेचा हा अर्थ अशा विविध प्रकारांनी लावला गेला आहे. अगदी थोडक्यात सांगायचे तर ज्यात वृत्ताला अधिक महत्व असते त्याला वृत्तपत्र म्हणतात. असे म्हणावे लागले. वृत्तपत्र ही संकल्पना समजुन घेतल्यावर एक गोष्ट जाणवते ती म्हणजे वृत्तपत्रात वृत्त या संकल्पनेबरोबर अन्य गोष्टीनांही महत्त्व असते. या सर्व गोष्टी आपण पुढील प्रकरणात पाहणार आहोत तरीही इथे एवढा आर्वजुन उल्लेख केला पाहिजे तो म्हणजे वृत्तपत्राची व्याप्ती केवळ वृत्तापुरती मर्यादित न राहता त्यात अन्य सदरांना व विषयानाही स्थान असते. अशी सर्वसमावेशक व व्यापक दृष्टी ठेवणारे वृत्तपत्रच यशस्वी ठरते.

## १.३ वृत्तपत्रांचा इतिहास :-

मराठी वृत्तपत्र सृष्टीची आजची स्थिती हवी तेवढी स्पृहणीय व अपेक्षेइतकी प्रगत नसली तरी तिचा दिडशे वर्षाचा इतिहास उद्‌बोधक व रंजक आहे. पहिले मराठी वृत्तपत्र १८३२ साली सुरु झाले. त्यापूर्वी भारतात वृत्तपत्राचा श्रीगणेशा होवून पन्नास वर्षे लोटली होती. इंग्रजी वृत्तपत्रे तीस पस्तीस वर्षे रुळल्यावर भारतीय भाषेतील वृत्तपत्रे उदयास आली. भारतीयांनी इंग्रजांच्या अनुकरणातून पत्रव्यवसाय सुरु केला तो ही इंग्रजी भाषेतुनच. पाश्चात्य ज्ञानाची ओळख होवून एक नवे ज्ञानविश्व लोकांना खुले झाले. नव्या राजवटीने नवे स्थित्यंतर घडवून आणले. पूर्वी एकमेकांना संदेश देण्यासाठी झाडांवर ढोल बांधून दवंडी पिटवून, भोंगा वाजवून लोकांना ती गोष्ट सांगितली जाई. तसेच सत्ताधा-यांना प्रजेच्या हालचालींची माहिती घेण्यासाठी हेरखात्याची गरज भासू लागली. यातूनच बातम्या देणे हे वर्तमानपत्रांचे प्रमुख

---

**टिप -** (१) पत्रकारिता प्रशिक्षण एवं प्रेस विधी - डॉ. सुजाता वर्मा, आशिष प्रकाशन, कानपुर पान १७९.

कार्य सुरु झाले. ज्युलीअस सीझरच्या कारकिर्दीतली ''अॅक्टाडायरना'' ही घोषणापत्रके, इंग्लडमधील न्युज लेटर्स, युरोपातील कोरंट व गॅझेट ही सगळी वृत्तपत्रांची पूर्वरुपेच आहेत.

वाकिआनवीस, खुपिआनवीस अशा हेरांबरोबर व्यापारी बातम्या पुरवणारे अखबार देखील वर्तमानपत्राचीच रुपे होत. १८५७ पर्यंत अशी हस्तलिखित बातमीपत्रे चालू होती. त्यांना ''अखबारनवीस'' किंवा नजरबाज म्हणत.

**त्याकाळच्या बातमीपत्राचे स्वरुप पुढीलप्रमाणे असे :-**

आषाढ शु.३ शुक्रवारी छ. जिल्कादी गारपीराचे नजीक सरकारचे थोरले डेरे अठरागजी होते. (ते) व आणखी दोन - तीन डेरे दिले व मंडप सभोवती बाडे देउन फर्मानबूस जागा केली. थोरल्या डे-यात मसनद घालून त्याजवर पादशहा यांनी पोषाक दिला तो व मोर्चेल व खाज ठेवून अगोदर शिंदे तेथे येउन तयारी करुन नंतर श्रीमंताची स्वारी अंबारीतुन उतरुन आत गेले. मुत्सद्दी मंडळी व कारभारी समागमे गेले. मानकरी वगैरे सरदार फार करुन घोडयावरच होते. श्रीमंत उभेच होते. एक घटकाभर उभे होते. एक फारशी पत्र वाचून दाखवले. नंतर मसनदीस कुर्निसात करुन उभेच होते. नंतर पोषाक घ्यावयास मागे डेरा दिला होता. त्यात बिचोवा होता. त्यात पोषाक करुन बाहेर आले. ते समयी एक मोर्चेल शिंदे व एक मोर्चेल राजश्री हरिपंत तात्या वारीत होते. नंतर मसनदीजवळ येवुन फिरोन कुर्निसात करुन मसनदीपासुन अंत-यावर बसले. मोर्चेल शिंदे यांनी आप्पा बळवंत याजवळ दिले व तात्यांनी बाबा फडके याजवळ दिले. त्यांनी अर्धघटका धरुन नंतर सखोपंत साने याजवळ आपांनी दिले. फरमान पारसनीय यांनी वाचुन दाखविले. त्यात मजकूर जे गुलाम कादर याने लबाडी केली. त्याचे पारिपत्य पाटीलबाबांनी केले व दौलतीचा बंदोबस्त केला. याजकरिता तुम्हांस हे पद दिले असे भाव आहेत. [१]

वास्तविक बातमी हवी असणा-यांची संख्या खुप होती. पण त्यासाठी साधने तोटकी होती. मुद्रणकलेचा प्रसार झाल्यामुळे वृत्तपत्रे वाढू लागली. सोळाव्या शतकात त्यांचा उगम झाला तरी त्यांचा सार्वत्रिक प्रसार होण्यास एकोणवीसाव्या शतकाचे तिसरे दशक उगवावे लागले. वृत्तपत्राची गरज भासावी अशी स्थिती हिंदुस्थानात नव्हती वृत्तपत्रांच्या उदयाला जे सार्वजनिक जीवन हवे त्याचाच येथे

---

**टिप –** (१) ऐतिहासिक लेखसंग्रह पृ. ४५८४ ते ४५८६ 'पटवर्धनी दप्तर'.

अभाव होता. इंग्रजी सत्तेनंतर ही परिस्थिती बदलली जनतेत सामाजिक व राष्ट्रीय भावनेचा अभाव असल्यानेच वृत्तपत्र अस्तित्वात यायला विलंब लागला. इंग्रजांच्या राजवटीने जनतेला एकछत्री अंमल, दळणवळणाची साधने कायदा सुव्यवस्था इ. गोष्टीचा परिचय झाला. नवे सार्वजनिक जीवन सुरु झाले. यातुनच वृत्तपत्राचा उदय झाला.

भारतात सुरुवातीची चाळीस वर्षे इंग्रजी वृत्तपत्रेच अस्तित्वात होती. इंग्रजांच्या हाती जेथे सत्ता आली त्या बंगालमध्ये पहिले वृत्तपत्र निघाले. इंग्रजांच्या वसाहतीत आतील बातम्या बाहेर पडू देत नसत. ईस्ट इंडिया कंपनीने १६७४ मध्ये मुंबईत छापखाना सुरु केला. मात्र वृत्तपत्रासाठी याचा उपयोग करावा हे कोणाच्या ध्यानी आले नाही. युरोपातून आलेल्या इंग्रजांना येथे वृत्तपत्रे उपलब्ध होत नसत. इंग्लंडमध्ये वृत्तपत्रांना प्रभावी शक्ती मानले गेले. आपणही वृत्तपत्राचा वापर केला पाहिजे ही जाणीव त्यांना झाली म्हणून कंपनीच्या नोकरांनी पुढाकार घेवून वृत्तपत्रे काढण्याचा निर्णय घेतला. विल्यम बोल्टसच्या पाठोपाठ जेम्स ऑगस्ट हिकी याने ''बेंगाल गॅझेट'' सुरु केले. (१७८०) यालाच ''कलकत्ता जर्नल ॲडव्हरटायझर'' म्हटले गेले. त्याचे अनुकरण कलकत्त्यात झाले शिवाय मुंबई, मद्रास येथे झाले. पीटर रीड दी मोसिन्फ यांनी इंडिया गॅझेट (१७८०) सुरु केले. कलकत्ता गॅझेट, (१७८४) बेंगाल जर्नल (१७८५), कलकत्ता अम्युझमेंट, कलकत्ता क्रॉनिकल ही पत्रे सुरु झाली.

रिचर्ड जॉनस्टन यांनी मद्रास कुरिअर सुरु केले यातूनच विकली मद्रास गॅझेट हे पत्र सुरु झाले. हाम्फीज याने 'इंडिया हॅरॉल्ड' हे पत्र काढण्याचा प्रयत्न केला. मुंबईतले पहिले वृत्तपत्र 'बॉम्बे हेरॉल्ड' १७८९ मध्ये निघाले. बॉम्बे गॅझेट, बॉम्बे कुरिअर या पत्राचे बॉम्बे टाइम्स मध्ये रुपांतर झाले. मात्र ही सारी पत्रे इंग्रजसमाजापुरती मर्यादित होती. मुठभर सुशिक्षित वाचक वर्गाला आवडेल असाच मजकूर यात असे. बंकिम हॅम याने कलकत्ता जरनल हे पत्र सुरु केले. यानंतर सर चार्लस मटकॉफ याने वृत्तपत्रांना स्वातंत्र्य बहाल करुन त्यांचा विकासाचा मार्ग मोकळा केला.

गंगाधर भट्टाचार्य यांच्या बेगॉल गॅझेटने भारतीय वृत्तपत्राची सुरुवात झाली. श्रीरामपूरच्या मिशन-यांनी भारतीय भाषेत पत्र काढण्याचा प्रयत्न केला. 'समाचार दर्पण' हे बंगालीतील पहिले वृत्तपत्र निघाले. 'समाचार चंद्रीका', 'संवाद कौमुदी' मिरात-उल-अखबार (राजाराम मोहन रॉय) अशी वृत्तपत्रे निघाली. उर्दू अखबार हे पत्र मौलाना बाकीर यांनी काढले. सय्यद महमंद यांचे सय्यद उल्ल अखबार, उर्दू गाईड ही पत्रे तर मद्रासला 'जमे-उल अखबार', मुंबईत 'बंबई हरकारा', 'खादिम ए हिंद' ही दैनिके आली.

मुन्शी अली खान यांनी ‘झुबरत उल अखबार’ जुगल किशोर शुक्ल यांचे ‘उदन्त मार्तंड’, ‘प्रजामित्र’ सुरु झाले. हिंदी भाषी प्रदेशातले पहिले वृत्तपत्र ‘बनारस अखबार’ सुरु झाले. सितारे हिंद, आज (बाबुराव पराडकर), नयी दुनिया, हिन्दोस्तान, व्यंकटेश समाचार, कन्नड समाचार, वृद्ध पितामह, मुंबईना समाचार, समाचार दर्पण अशा अनेक पत्रांचा उल्लेख करावा लागतो. मराठीतील पहिले पत्र म्हणून जांभेकरांच्या ‘दर्पण’ ला मान दिला जातो. त्याआधी ‘मुंबापूर वर्तमान’ हे मराठी वृत्तपत्र १८२८ होते. [१] पण ख-या अर्थाने मराठी वृत्तपत्रांनी ‘दर्पण’ ला मान दिला.

यापाठोपाठ मुंबई अखबारचा उल्लेख करावा लागतो. अखबार बंद पडताच भाऊ महाजन कुंटे यांनी ‘प्रभाकर’सुरु केले.त्यांनीच ‘धुमकेतू’ साप्ताहिक सुरु केले. यानंतर चिरंजीव वीरेश्वर उर्फ तात्या छत्रे यांनी ज्ञानसिंधू सुरु केले. अरुणोदय नावाचे पत्रही ते चालवत होते. छत्रे यांनीच ज्ञानप्रकाश सुरु केले (१८४९) हेन्री वेलंटाईन, सावरकर, सुमंत करंदीकर रेव्ह. टिळक हे यांचे संपादक होते. काकासाहेब लिमये यांनी ज्ञानप्रकाश मध्ये चौफेर, बातम्या, काव्यशास्त्र, विनोद, लेखमाला या गोष्टी आणल्या. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी विचारलहरी या पत्रातून मिशनरी प्रचाराला प्रतिवाद केला. लक्ष्मणशास्त्री हळबे व केशवशास्त्री गाडगीळ यांनी वर्तमानदिपिका हे पत्र काढले. यापाठोपाठ धुमकेतू, सद्धर्मदिपिका (बापू शेठ), जगन्मित्र, दंभहारक, प्रबोधचंद्रोदय, नित्यसारसंग्रह,ज्ञानसागर (नारायण मोरव), तमांतक, हिंदू हितेच्छू, ज्ञानदर्शन, ज्ञानवर्धक अशी वृत्तपत्रे अस्तित्वात आली. कोल्हापुरात ज्ञानप्रसारक व वर्तमानसंग्रह ही वृत्तपत्रे, परशु हे वृत्तपत्र जमखंडीत सुरु झाले. साता-यात शुभसुचक, शुभचिंतक, बोधामृत ही पत्रे रामचंद्र चितळे चालवित होते. वासुदेव मुळे हे पुर्ण चंद्रोदय चालवित होते. ब्रिटीश सत्तेनंतर महाराष्ट्रात जे विचारमंथन झाले त्यातुन इंदुप्रकाश निघाले. विष्णुशास्त्री पंडित हे त्याचे चालक होते. त्यावेळी बडोदयात सयाजी विजय, इंदू ऑफ बॉम्बे, लोकमान्य (दत्तात्रय सावरकर) ही पत्रेही होती. इंदू प्रकाश नंतर विश्वनाथ मंडलिक यांनी ‘नेटिव्ह ओपिनिअन’, ‘गुजरात मित्र’ सुरु केले. १८६७ मध्ये ‘सुबोधपत्रिका’ सुरु झाली. १८६६ ला काशिनाथ फडके यांनी ‘अरुणोदय’ ची स्थापना केली. गोपाळ दामक यांनी ‘हिंदू पंच’ सुरु केले. पाठोपाठ अवधपंच, दिल्लीपंच, पंजाबपंच ही पत्रे सुरु झाली. महादेव बल्लाळ नामजोशी यांचे ‘किरण’ निर्भिडतेमुळे गाजले. केसरीबरोबर ‘डेक्कन स्टार’ हे पत्र निघुन ‘मराठा’ मध्ये समाविष्ठ केले गेले. ‘दीनबंधू’ हे बहुजन समाजासाठी काढले गेले. कृष्णराव भालेकरांनी दीनबंधुला

---

**टिप –** (१) ‘पहिले मराठी वर्तमानपत्र ’ नवभारत ‘जुलै १९५१’ पृष्ठ ४०.

नावारुपास आणले. याचवेळी चंद्रप्रकाश, सत्यमित्र, मुंबई आर्यपत्रिका, शेतक-यांचा कैवारी (आवटे, दामोदर यंदे) सयाजी विजय ही पत्रेही सुरु झाली. पुण्यात ज्ञानचक्षु, विज्ञानसुधा, सुज्ञानबोधक, दक्षिणतारा,कष्टविलासिनी अशी पत्रे काढली गेली. नानासाहेब फडणीस यांचे प्रबोधचंद्रिका, खानदेश वैभव, साता-याचे शुभसुचक, बहुरुपी सोलापुरचे कल्पतरु व आनंदवृत्त, व-हाड समाचार, अकोल्याचे वैदर्भ अशी अनेक वृत्तपत्रे उल्लेखनीय ठरली १८८१ मध्ये केसरी व मराठा यांनी एक स्वतंत्र युग निर्माण केले. १९०१ ते १९२० हा कालखंड टिळकयुग म्हणून ओळखला गेला. याचकाळात 'सुधारक' क्रांतिकारी ठरले. केसरीतील परखड लेखामुळे टिळकांवर राजद्रोहाचा खटला भरला गेला. मासिक मनोरंजन, चित्रमय जगत, ज्ञानमित्र, कृषिकर्म, विविध ज्ञानविस्तार (गुंजीकर) या मासिकाबरोबर देशसेवक (१९०२)नागपुर,वैदर्भ, व-हाड समाचार(१९०२),खानदेश समाचार धुळे, मुमुक्षु, जगतवृत्त, प्रगति, विजयी मराठा १९०७, भाला, या वृत्तपत्रांनी महाराष्ट्र गाजवला. केसरीप्रमाणे 'काळ' हे ही प्रभावी ठरले. १९०५ नंतर राष्ट्रमत, भाला, अरुणोदय, स्वराज्य ही वृत्तपत्रे ब्रिटीशांनी बंद पाडली.

स्वातंत्र्ययुद्धाच्या काळात संदेश, इंडियन एक्सप्रेस, हिंदूस्तान टाइम्स, दिल्ली(१९२३) फ्री प्रेस जरनल मुंबई १९३३, हिंदूस्तान स्टँडर्ड, कलकत्ता (१९३७) डेक्कन हेरॉल्ड बंगलोर ही वृत्तपत्रे सुस्थापित ठरली. टाइम्स ऑफ इंडिया, लोकसत्ता, मुंबई, नवभारत टाईम्स, नवी दिल्ली, कृष्णाजी खाडीलकरांचे लोकमान्य, नवा काळ, तटणीस यांचे विविध वृत्त, केशव ठाकरे यांचे प्रबोधन ही वृत्तपत्रे उल्लेखनीय ठरली.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये मुद्रणस्वातंत्र्य आले स्वातंत्र्यप्राप्ती हा हेतु संपला नवे विचार नवे प्रश्न आले. भांडवलदार कंपन्या या क्षेत्रात येवु लागल्या. लोकसत्ता (गोएंका गट) महाराष्ट्र टाईम्स, नवशक्ती ही मराठी वृत्तपत्रे आली. मराठा (अत्रे), शिवनेर, (बावळे) सकाळ, प्रभात, तरुण भारत, विशाल सहयाद्री अशी दैनिके निघाली. कोल्हापुरात पुढारी सुरु झाला . नवे तंत्रज्ञान आले प्रगती, जीनविजय, (लठ्ठे) विश्वबंधु, कैवारी, तेज, तरुण मराठा, अखंड भारत, सत्यवादी, सेवक अशी अनेक पत्रे निघाली त्यांनी समाजपरिवर्तनाचे महत्वाचे कार्य केले. सध्या जनसारथी, रॉकेट , दक्षिण महाराष्ट्र साहित्यपत्रिका, भारतभुषण, बहिरजी, युगसंदेश, लोकध्वज संयुक्त महाराष्ट्र, नोकरी संदर्भ (सर्व कोल्हापूर) दैनिक वार्ताहर, महासत्ता, जनप्रवास , पोलीस टाईम्स, (इचलकरंजी) दैनिक, पुढारी, बेळगांव, प्रतोद इस्लामपुर, विटा वृत्त लोकबंधु, भारतमित्र, सत्यप्रकाश, देशसेवक, विचारी भारत अशी अनेक वृत्तपत्रे कार्यरत आहेत. टिळकांचे दक्षिण महाराष्ट्र, खराडे यांचे ललकार, कुंभोजकरांचे अग्रदुत,

दिनानाथ भोसलेंचे राष्ट्रशक्ती, नवसंदेश, गजशक्ती, भोकरे यांचे जनप्रवास, प्रभातदर्शन, बिझनेस एक्सप्रेस, विजयंत, शिवस्फूर्ती, मिरजेचे मराठा साप्ताहिक, किसान, प्रतिध्वनी सत्यदूत अशा अनेक वृत्तपत्रांचा आवर्जुन उल्लेख करावा लागेल.[१]

सातारा, सोलापूर जिल्हयातही अनेक प्रतिथयश वृत्तपत्रे प्रबोधनाचे काम करीत आहेत.

## १.४ पुर्वीच्या वृत्तपत्रांचा हेतु व उद्देश :-

मराठी वृत्तपत्रांची सुरुवात कशी झाली ? याची चर्चा केल्यावर आपल्याला जाणवले की पेशवाई संपुन ब्रिटिशांचा झेंडा शनिवार वाडयावर फडकु लागल्यानंतर चौदा वर्षानी वृत्तपत्र सुरु झाले. पेशव्यांच्या काळात वृत्तपत्रे नव्हती ती असती तर पानिपतच्या युध्दाची रसाळ वर्णने, बाजीराव मस्तानी प्रकरण, नारायणरावांचा वध, राघोबादादांच्या कुटील कारवाया सर्वांना चवीने वाचायला मिळाल्या असल्या. रामशास्त्रीच्या स्पेशल मुलाखती प्रसिध्द झाल्या असत्या. लोकप्रबोधन, मनोरंजन व टाईमपास म्हणून त्यांचे तेव्हाच बस्तान बसले असते. कदाचित मराठी राज्य ब्रिटीशांच्या ताब्यात गेले नसते. पेशवाई बुडाली नसती.

महाराष्ट्रात नसली तरी त्या काळात युरोपात वृत्तपत्रे होती. पहिल्या चार्ल्सच्या शिरच्छेदाची बातमी (१६४९) तत्कालीन वॉलपेपर्समधून प्रसिद्ध झाली होती. १९६६ ते १९७६ च्या काळात वॉलपेपर हे सर्वात प्रभावी वृत्तपत्रीय माध्यम होते. १६ व्या शतकात छपाईचा शोध लागला. तेव्हापासून वृत्तपत्र माध्यमाचा तांत्रिक, वैचारिक विकास होत गेला. महाराष्ट्रात तो आला १८३२ साली महाराष्ट्रातली पत्रकारिता जन्मली ती प्रबोधनासाठीच करमणुकीसाठी नाही. त्या काळीच लेखन वाचन कला फक्त सवर्णा पुरतीच मर्यादित होती त्यामुळे लिहीणारे - वाचणारे एकमेकांच्या प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष परिचयातले असत. त्यामुळे त्याकाळच्या पत्रकारितेला मास मिडीया म्हणणे योग्य होणार नाही. एखादया क्लबचे मेंबर असावे त्याप्रमाणे लोक 'दर्पण', ' लोकहित' वाचत. त्यामुळे खप, वितरण, विस्तार, वाचक, प्रतिक्रिया, जाहिराती, वार्ताहर, कर्मचारी, उपसंपादक या गोष्टींचा प्रश्नच नव्हता. एखादं दुसरा उत्साही तरुण समाजसेवेच्या भावनेतून अंतरिक तळमळीतून छपाई माध्यमाच्या कुतूहलातुन, काहीतरी वेगळे करण्याच्या

---

१. सांगली आणि सांगलीकर - श्री. अविनाश टिळक २००१ सांगली.

प्रेरणेतून अनियतकालिके सुरु करु लागले व यातुन मराठी पत्रकारिता जन्मली. स्वतः लोकमान्य टिळक वृत्तपत्रीय लिखाणाबाबत म्हणतात, ''सरकारच्या आवडीनिवडीकरीता काही आम्ही पत्रे काढली नाहीत व सरकारवर कडक टीका केल्याने त्यांचा रोष आमच्यावर झाला तर त्याची आम्हास पर्वाही नाही. सरकारी जुलमी राज्यपद्धतीवर जर टीका करावयाची नाही तर वर्तमानपत्र काढावे कशाला ? राज्यकर्त्यास गोड न वाटली तरी कडू न वाटेल अशा त-हेचे लेख लिहण्याची पूर्वीची पद्धत होती, पण ती वेळ आता गेली. लोकांत जागृती,कळकळ व संघशक्ती उत्पन्न करणे हेच वर्तमान पत्रकार या दृष्टीने आम्ही आमचे प्रमुख कर्तव्य समजतो. आम्ही केसरीत लेख लिहतो ते केवळ राज्यकर्त्याकरिता नसुन आमच्या मनातले विचार, तळमळ, जळफळ सर्व मराठी वाचकाच्या मनात उतरावी एवढया करिताच आहे व आमच्या लेखाचा जर परिणाम होत नसला तर आमचे श्रम फुकट गेले असे समजू , 'किंकवेस्तेन काव्येन किं कांडेन धनुष्यतः । परस्य हृदये लग्न न धुर्ण यति यच्छिद्रः' अशी जी एक संस्कृत उक्ती आहे तीच वर्तमान पत्रासही लागु आहे. '' (१)

प्रबोधनातून सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय जागृती हेच या चळवळया पत्रकारांचे उद्दिष्ट होते. यातुनच प्रक्षोभ निर्माण होवून स्वातंत्र्यलढा उभा राहिला. त्या स्वातंत्र्यलढयात विविध प्रकारच्या विचारसरण्या होत्या. (जहाल, मवाळ) तरी देश स्वतंत्र झाला पाहिजे हीच मुख्य भावना होती. त्यांचे मुख्य माध्यम पत्रकारिता हे होते. त्यामुळे एकूणच मराठी वृत्तपत्राची वाटचाल व विस्तार भारतीय स्वातंत्र्य चळवळीशी तिच्या ध्येयआदर्शाशी बांधला गेला आहे. या पत्रकारितेत वृत्तपत्र चालवणारे, सुरु करणारे, लिहणारे व वाचणारे एकाच ध्येय आणि मानसिक प्रवाहातले होते. वृत्तपत्रांची मालकी कुणा, भांडवलदाराची नव्हती. संपादक कर्मचारी यांचे व्यावसायिकरण झाले नव्हते. नफा मिळवणे हा त्यांचा उद्देश नव्हता. तर वृत्तपत्र किती खपले ? यावरुन स्वातंत्र्यलढयाचे विचार कितीजणांपर्यत पोहचले ते समजत असे.

खपाचे आकडे व जाहिराती याचे व्यापारी सख्य तेव्हा नव्हते. वृत्तपत्र खपवण्यासाठी कुठल्या युक्त्या, प्रयुक्त्या वा जाहिरातींचा बाजार नव्हता. लोकहित, केसरी, मराठा, सुधारक,

---

**टिप –** (१) केसरी अग्रलेख १९०२ - अग्रलेखकार लो. टिळक डॉ. विश्वास मेहंदळे मराठी वृत्तपत्रांचा इतिहास पान ३०६ रा. क. लेले. कॉन्टि पुणे .

काळ ही वृत्तपत्रे ध्येयनिष्ठ होती. स्वतः दर्पणकारांनी आपले उद्दिष्ट सांगताना म्हटले आहे की, ''नव्या ज्ञानाचा, पाश्चात्य विद्यांचा लोकांना परिचय व्हावा.  त्यांचा अभ्यास व्हावा व त्याद्वारा देशाची समृद्धी व लोकांचे कल्याण साधावे. मनोरंजन करणे, चालते काळाची वर्तमाने कळवणे आणि योग्यतेस येण्याचा मार्ग दाखवणे. या गोष्टीची दर्पण छापणा-यास मोठी उत्कंठा आहे.'' विसाव्या शतकात त्यांचे व्यावसायिकरण झाले. परंतु १८३२ ते १९३२ या शतकातील पत्रकारितेचा विचार करता त्यात प्रबोधन व राजकीय असंतोष हे दोनच प्रवाह सापडतात. केसरीनंतर पाच वर्षांतच इंडियन नॅशनल कॉंग्रेसची स्थापना झाली. केसरीसारखी अनेक स्फुलिंगे एकत्र येवून ती झाली होती.

स्वातंत्र्यपुर्व काळातील भारत एक वेगळीच राजकीय संरचना होती. तीही बदलली. १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाचा प्रसार सबंध हिंदुस्थानात झाला नव्हता. सारी जनता त्यात सहभागी नव्हती. या युद्धानंतरच्या राणीच्या जाहिरनाम्याने ब्रिटीश इंडियाला राजकिय आकार आला.

इंडियन नॅशनल कॉंग्रेसने संस्थानांचा वेगळा विचार केल्याने १९ व्या शतकाच्या अखेरी व विसाव्या शतकारंभी एक पत्रकारिता होती ब्रिटीश इंडियातली आणि दुसरी संस्थानांमधली. सर्वच संस्थांनातील जनता त्याच्या राजाच्या विरोधात होती असे नाही.  एकूण कॉंग्रेस स्थापनेने महाराष्ट्रात स्वातंत्र्यभावनेचे मुळ धरले होते. लोकमान्य टिळकांनी याला खतपाणी घातले. बंगाल व पंजाबची साथ लाभली. केसरीतून टिळकांनी आपला एक वेगळा दबदबा निर्माण केला. कोणतीही आधुनिक सुविधा नसतानाही लोकमान्य टिळकांचा हरएक शब्द अवघ्या देशभरातील माणसांपर्यत पोहचत होता. हेच या पत्रकारितेचे यश होते. ज्ञानप्रकाश वृत्तपत्रातले त्यांचे उद्दिष्ट यादृष्टीने बोलके आहे. याचा एक वाचक म्हणतो, तुम्ही पत्र काढता परंतु याचा उपयोग बहुतास कळत नाही. जे मोठे मोठे म्हणवितात व आपले ठिकाणी गर्व करुन आहेत त्यास देखिल असे वाटते हा रिकामा उदयोग आहे. पण तुमच्यावाटचे मी बोलतो. बातमीपत्राचे उपयोग फार आहेत. आपले लोकांमध्ये तर कोणास बातमी मुळीच कळत नाही. ज्यास आपला आपला विचार दिसतो. ज्याची त्याची नजर आपल्या घरापुरती असते. पुढे काही कळत नाही. याजमुळे हे लोक पुढे सरकत नाहीत. मजुरी करणे हे फारसे शहाणपण नाही. शहाणपण म्हणजे कोठे काय आहे हे

पहाणे. सर्व देशांवर व जगावर नजर ठेवणे. माहितगारी करणे याचे नाव शहाणपण. याजकरता आम्ही या लोकांची प्रार्थना करतो की, तुम्ही इतके दिवस सुस्तिने राहिलेत. याची फळे भोगता. परंतु अजुन तरी तुमची नजर दुरवर जाउ दया विदया करा. वर्तमानपत्रादिक वाचत जा म्हणजे तुम्हांस बहुतकरुन माहिती होईल. [१]

भारतीय राजकारणातले सर्व विचारप्रवाह मराठी भुमीत रुजवण्याचे कार्य या पत्रकारितेने केले. लोकमान्य टिळकांचा जहाल स्वराज्यवाद, गोखल्यांचे मवाळ विचार, सावरकरांचा प्रखर राष्ट्रवाद, हिंदुत्ववाद, कॉम्रेड डांग्याचा समाजवाद, न्यायमुर्ती रानडेचा तत्वविचार, आगरकरांचा सुधारणावाद, गांधीचा सर्वोदयवाद, डॉ. कर्वे यांचे परिवार नियोजनाचे कार्य, मराठी भूमीत पसरवण्याचे ध्येय त्यांच्यापुढे होते. त्यासाठी त्यांनी वृत्तपत्रासारखे प्रभावी माध्यम वापरले. मराठी पत्रकारितेला वैचारिकतेचे एक परिमाण मिळवून दिले. वैचारिक संघर्षाचे  स्वातंत्र्यचळवळीचे निशाण दिर्घकाळ फडकवत ठेवले.

स्वातंत्र्यपूर्व काळातील वृत्तपत्रांनी फार मौलिक कार्य पार पाडले. [२] (या वृत्तपत्रांची नावे व सविस्तर माहिती परिशिष्टात दिली आहे.)

ब्रिटीशांच्या जाचक निर्बंधाना न जुमानता त्यांनी जनजागृतीचे कार्य केले. ब्रिटीशांनी केलेल्या आर्थिक शोषणाचे, शेतक-यांच्या पिळवणूकीचे, कामगारांवरील अन्यायाचे, दुष्काळातील गलथानपणाचे व ब्रिटीशांच्या वर्णव्देषी धोरणाचे विदारक चित्र त्यांनी जनतेसमोर मांडले. यातुन लोकांत राष्ट्रवादाची भावना जागृत केली ब्रिटीशांना देशातुन हाकलून दयावे असे मानणारे गट निर्माण केले. राजकीय व सामाजिक जागृती करुन समाजाला डोळस बनवण्याचे कार्य त्यांनी केले. स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्वांचा प्रसार केला राष्ट्रीय भावना वाढवण्याचे काम केले.

'बेंगॉल गॅझेट' हे भारतातले पहिले वृत्तपत्र जेम्स ऑगस्ट हिकी याने सुरु केल्याने याला हिकीज गॅझेट म्हटले जाते. मात्र समाचार 'दर्पण' (१८१८) हे बंगाली साप्ताहिक हेच भारतीय

---

**टिप –** १ ज्ञानप्रकाश ५ मार्च १८४९

(२) मराठी वृत्तपत्रांचा इतिहास - रा. क. लेले कॉन्टि प्रकाशन पुणे.

भाषेतले पहिले वृत्तपत्र होय. या साप्ताहिकाने ख्रिश्चन धर्मप्रसाराबरोबर सामाजिक हित जपले. १८२१ मधल्या समाचार चंद्रिका या वृत्तपत्राने हिंदू धर्मप्रसार केला. राजाराम मोहन रॉय यांचे संवादकौमुदी अंधश्रद्धा व अनिष्ट चालीरिती विरुद्ध लढू लागले. मौलाना बाकीर यांचे उर्दू अखबार (१८३६) दादाभाई नौरोजींचे 'रास्तगोफ्तार'(१८५१), ईश्वरचंद्र विदयासागरांचे ओमप्रकाश (१८५८), अमृतबझारपत्रिका (१८६१) या सा-याच वृत्तपत्रांनी राष्ट्रप्रेम, सरकारवर कठोर टिका हेच उद्दिष्ट ठेवले. याच ध्येयाने बिपिनचंद्र पाल यांचे 'न्यु इंडिया, लाला लजपतरायांचे 'यंग इंडिया', अरविंद घोषांचे 'वंदे मातरम्' ही अनुक्रमे साप्ताहिक, नियतकालिक व दैनिके निघाली. जांभेकरांनी समाजातील अंधश्रद्धा दूर करुन नवीन ज्ञानाची, पाश्चात्य विदयांची ओळख लोकांना करुन दयावी हा हेतू ठेवला होता.

भाऊ महाजन व कुंटे यांच्या प्रभाकराने भारतीय संस्कृतीचा अभिमान, पाश्चात्य व पौर्वात्य संस्कृतीचा समन्वय, फ्रेंच राज्यक्रांतीच्या इतिहासातुन लोकजागृती या गोष्टी केल्या. लोकहितवादी उर्फ गोपाळ हरी देशमुखांची शतपत्रे यांनीच प्रकाशित केली. विष्णुशास्त्री पंडितांचे इंदुप्रकाश समाजसुधारणेसाठी काढले गेले. त्याने राष्ट्रीय जागृती केली. विष्णुशास्त्री चिपळूणकर, गोपाळ आगरकर, लो.टिळक यांनी केसरी व मराठा मधुन सरकारवर टिकास्त्र सोडले. सामाजिक सुधारणांचा पुरस्कार केला. लोकांच्यात राष्ट्रवाद व स्वातंत्र्यप्रेम पसरवण्याचे महत्वाचे कार्य केले.

ॲक्टा डायरनापासुन केसरी, मराठा पर्यंत जवळजवळ दोनशे वृत्तपत्रे झाली. या वृत्तपत्रांचे आशय, विषय वेगळे असले तरी त्यांनी लोकजागृतीचे मोलाचे काम केले. केसरी व मराठा बरोबरच परांजपे यांचा 'काळ', विनायक भाटेंचा 'गुराखी', श्री ओगले यांचा 'देशसेवक', भोपटकरांचा 'भाला', दामलेंचा 'राष्ट्रमत', हरि भागवतांचा 'वंदे मातरम्' सुरु झाली अर्थात या सर्व वृत्तपत्रांचा हेतु एकच होता. ही सर्व एकाच ध्येयाने प्रेरित झाली होती.

- पुर्वीची वृत्तपत्रे एका विशिष्ठ हेतुने निघाली असली तरी लोकप्रबोधन व लोकरंजन धर्मप्रसार यापलिकडे त्यांचा व्यापक हेतु होता असे नाही. पुर्वीच्या वृत्तपत्राचे स्वरुप व उद्देश बघता कांही गोष्टी प्रकर्षाने जाणवतात त्या अशा--

- त्याकाळी वृत्तपत्र व्यवसायाचे आकर्षण फारसे  विलोभनीय नव्हते. पदरच्या भाकरी खावुन करायचा एक धंदा यादृष्टीने या व्यवसायाकडे पाहिले जाई. [१]
- निर्वाहाचे प्रतिष्ठित साधन म्हणुन या व्यवसायाकडे कुणी पाहत नव्हते
- गुप्त बातम्या, सरकारी अधिसुचना, आज्ञा, ठराव, कंपनीच्या व्यापाराची माहिती, शासकीय बातम्या इंग्लंड पार्लमेंटमधील चर्चा, परदेशी बातम्या, धर्मप्रसार, हिंदू धर्माविषयी चर्चा, अंधश्रध्दा रुढीवर चर्चा हे विषय प्रामुख्याने चर्चिले  जात.
- विरेश्वर छत्रे यांच्या अरुणोदय या पत्राची एक प्रत सरकार विकत घेत असल्याचा उल्लेख आढळतो. (जी.डी.vol - ६१ of पान -११)
- वृत्तपत्र व्यवसायाला म्हणावी तशी प्रतिष्ठा प्राप्त झाली नव्हती.
- स्वातंत्र्यापुर्वीची वृत्तपत्रे एका विशिष्ठ हेतुने निघाली असली तरी लोकप्रबोधन, लोकरंजन, धर्मप्रसार व स्वातंत्र्यप्रेरणा यापलिकडे व्यापक हेतु त्यांनी ठेवला नव्हता.

## १.५ स्वातंत्र्यपूर्व काळातल्या वृत्तपत्रांचा उद्देश व कार्य :-

पूर्वीच्या वृत्तपत्रांचे स्वरुप अगदी बालिश असले तरी इंग्रजांच्या आगमनानंतर ज्ञानाची क्षितीजे खुली होताच समाजातील विचारवंताना एक नवी दृष्टी लाभली. वृत्तपत्रांचा हेतु केवळ माहिती पुरवणे हा नसुन त्या माध्यमातुन सामाजिक परिवर्तन, वैचारिक क्रांति घडवणे हा होता. परसत्तेविरुध्द जनशक्ती जागृत करण्याचे काम करावे लागल्याने त्यात एक प्रखरता तेजस्वीपणा होता. त्यात संघर्षाच्या ठिणग्या होत्या. लोकमान्य टिळकांच्याच भाषेत सांगायचे झाले तर, 'गुळगळीत  कागदावर रंगीबेरंगी बुळबुळीत मजकुर छापुन लोकांचे रंजन करणे हे वृत्तपत्रांचे मुख्य कर्तव्य नव्हे.' [२]

परुळेकरानी ज्या वृत्तपत्राची व पत्रकाराची बुध्दी जागती आहे तो खरा पत्रकार असे सांगितले


---

**टिप –** १) ज्ञानप्रकाश ५ मार्च १८४९  -  मराठी वृत्तपत्रांचा इतिहास - रा.के.लेले पान नं.१००


कॉन्टि. प्रकाशन पुणे

२) केसरीतील निवडक निबंधक  - संपादक  - गो.ग.आगरकर, पुणे, (१८८८)

## स्वातंत्र्यपूर्व काळातील वृत्तपत्रे :-




## स्वातंत्र्योत्तर काळातील वृत्तपत्रे :-



एक दिवसाचा जगाचा इतिहास त्यात असला पाहिजे. आगरकरांनीही वृत्तपत्रांचा हेतु स्पष्ट शब्दात सांगितला आहे,'' वृत्तपत्रांचा मुख्यतः दोन प्रकारांनी मोठा उपयोग असतो. एक हा की ज्यांनी आपले काम निःपक्षपातीपणे, निर्भिडपणे बजावले असता सरकारी अधिका-यांवर दबदबा राहतो. रस्तोरस्ती दिवे लावले असल्याने, पोलीसांची गस्त सारखी फिरत असल्याने जो उपयोग होतो. तो त्या - त्या जागी वृत्तपत्रकर्त्याची लेखणी सदोदीत चालु असल्याने होत असतो - लोकमान्य टिळक ४ जानेवारी १८८१.

स्वातंत्र्यपूर्व काळातल्या वृत्तपत्रांचा हेतु निराळा होता. त्याकाळी या व्यवसायाकडे लष्कराच्या भाकरी भाजायचा धंदा म्हणुन पाहिले जाई.

- स्वातंत्र्योत्सुक भारतीयांच्या भावनांचे प्रकटीकरण व आकांक्षाचे चित्रण करणे हा उद्देश असल्याने सरकारच्या वक्रदृष्टीचा धोका सतत असे त्याला टक्कर देवुन हे कार्य असिधाराव्रताप्रमाणे चालु ठेवणे.

- निर्वाहाचे प्रतिष्ठित साधन म्हणुन त्या व्यवसायाकडे पाहिले जात नव्हते. सामाजिक व राजकीय कार्याच्या आंतरिक तळमळीपोटी माणसे याकडे वळत.

- लढावु वृत्ती, देश व समाजहिताची तळमळ, अन्यायाविरुध्द ऊसळणारी मनोवृत्ती असणारी वृत्ती अशी व्यक्तीच याकडे वळू शकत असे.

- राजकीय व सामाजिक कल्याणकार्याचे साधन म्हणुन याकडे पाहत. त्यामुळे हा व्यवसाय करणा-या व्यक्तीला बहुधा उपहासाला व टिकेला तोंड दयावे लागे. 'अरे, कसली दुर्बुध्दी सुचली तुला' हे ऐकावे लागे मात्र या माणसांचा निर्धार पक्का असे त्या काळात पत्रकरिता व राजनीति या एकाच नाण्याच्या दोन बाजु होत्या. त्या काळात पत्रकारिता हा धर्म (मिशन) मानुन वृत्तपत्रे काढली जात. लोकांमध्ये स्वातंत्र्याचे प्रेम निर्माण करणे, अन्यायाबद्दलची चीड वाढवणे हे त्यांचे ध्येय असे.

- इंग्रजांच्या सत्तेबद्दल लोकांमध्ये तीव्र असंतोष पसरवणे इंग्रजांच्या अन्यायाच्या कथा लोकांसमोर आणुन त्याच्या ढोंगी भुमिकेचा पर्दापाश करणे.

- देशप्रेम, बंधुता, देशाभिमान, खरे शहाणपण लोकांना देणे अंधश्रध्दा, जुन्या अनिष्ट रुढी विरुध्द जनमत तयार करुन विविध सामाजिक प्रश्न ऐरणीवर आणुन स्थित्यंतर घडवणे.

अशा विविध हेतुने स्वातंत्र्यपुर्व कालीन वृत्तपत्रे आपले कार्य करीत होती.

' जे जे जनास मानेना । ते ते जनहि मानेना । '
आपण एकला जन माना । सृष्टीमध्ये ।।
म्हणोनि सांगाती असावे । मानत मानत शिकवावे
हळूहळू सेवटा न्यावे । विवेकाने ।।[१]
समर्थाचे उद्गारच त्या पत्रकारितेचे उद्दीष्ट होते

टिळकांच्या भाषेत सांगायचे तर -

स्थिति नो रे दध्या : क्षणमपि मदांधेक्षण सखे ।
गजश्रेणीनाथ त्वमहि जटिलाया वनभुवि ।
असौ कुंभिभ्रांत्या खरनखर विद्रावितमहा : ।
गुरुम्रावग्राम : स्वपिति गिरिगर्भे हरिपति : ।। (जगन्नाथराय)

आगरकरांनीही आपले उद्दिष्ट सांगताना म्हंटले आहे. 'स्वभुमीत, स्वलोकात, स्वधर्मात, स्वाचारात राहून अविचारी अज्ञान देशबांधवांच्या निंदेस वा छळास न भिता कधी भांडून, कधी युक्तीवाद करुन, कधी लाडीगोडी लावुन वा सामर्थ्य असल्यास कधी दटावुन त्यांची सुधारणा करणे यातच खरी देशप्रिती, खरी बंधुता, खरा देशाभिमान आहे. खरे शहाणपण व खरा पुरुषार्थ आहे -- आमच्या समाजव्यवस्थेत अनेक दोषस्थळे दिसणार आहेत. ही दोषस्थळे वारंवार लोकांच्या नजरेत आणावी ती दूर करण्यास उपाय सुचवावे आणि युरोपिय सुधारणेत अनुकरण करण्यासारखे काय आहे ते पुन:पुन्हा दाखवावे यास्तव हे पत्र काढले आहे. [२]

---

१) समर्थ रामदासांची पत्रकारिता - श्री गजानन शंकर खोले पान नं. २८, २९ हर्षद प्रकाशन पुणे १९८१

२) गुलामांचे राष्ट्र - लेख आगरकर वाड.मय संपादक म.ग.नातु दि.य.देशपांडे खंड १ मुंबई १९८४ सुधारक २७ जून १८९२

याही पुढे जाऊन आगरकर म्हणतात, ''ज्या तत्वांचे अवलंबन केल्यामुळे इतर राष्ट्रे अधिकाधिक सुधारत चालली आहेत त्या तत्वांचा अंगीकार करण्यास आम्ही आनंदाने तयार झाले पाहिजे. ती तत्वे हा 'सुधारक' महाराष्ट्र लोकांपुढे वारंवार आणील

असे करण्यास त्यास ---------- लोकमतांविरुद्ध बरेच जावे लागणार ---------- पण त्याची तो पर्वा करित नाही -------------- क्षुद्र लोकांच्या अवकृपेला, रागाला किंवा उपहास्यतेला यत्किंचित न भिता आपल्या मनास योग्य वाटेल ते लिहावे, बोलावे व सांगावे हेच त्यास उचित होय, त्याच्या अशा वर्तमानातच जगाचे हित आणि त्याच्या जन्माची सार्थकता आहे.''[१]

ब्रिटीशांना हाकलणे हे आदय कर्तव्य मानून या सा-याच वृत्तपत्रांनी महत्त्वाचे कार्य पार पाडले. थोडक्यात स्वातंत्र्यपुर्वकालीन वृत्तपत्रे पुढील हेतूनी प्रेरित झाली होती.

१) जेणेकरुन समाजाचे व्यापार सुरळीत चालण्यास मदत होईल असे लोकमत जागृत करणे व जो कोणी या कामी व्यत्यय आणेल त्याचे स्वरुपाविष्करण करुन वेळीच बंदोबस्त करणे हे वृत्तपत्राचे मुख्य कर्तव्य आहे.

२) गुळगुळीत कागदावर बुळबुळीत मजकूर छापून लोकांचे रंजन करण्यापेक्षा त्यांच्यात स्वातंत्र्यनिष्ठा निर्माण करणे.

३) सरकारच्या आवडीकरिता आम्ही पत्रे काढली नाहीत व सरकारवर कडक टिका केल्याने त्याचा रोष झाला तर आम्हाला त्याची पर्वाही नाही. सरकारच्या जुलमी राज्यपध्दतीवर टिका करायची नाही व ती पद्धत लोकांस, राज्यकर्त्यास जाचेल असे निर्भिडपणे म्हणायचे नाही तर वृत्तपत्र काढावे तरी कशाला ?[२]

४) आम्ही केसरीत जे लेख लिहित असतो ते केवळ राज्यकर्त्यांकरिता नसून आमच्या मनातले विचार. आमच्या मनातली तळमळ, जळफळ सर्व मराठी वाचकांच्या मनात उतरावी एवढयाच

---

**टिप –** (१) सुधारक काढण्याचा हेतू - आगरकर दर्शन - कमळाबाई भिडे, मॉडर्न बुक डेपो, पुणे पान ७२, ७३

(२) अग्रलेखकार लोकमान्य टिळक, डॉ. विश्वास मेंहदळे केसरी मराठा ट्रस्ट पुणे..

करिता आहेत. आमच्या लेखाचा परिणाम होत नसला तर आमचे श्रम फुकट गेले असे आम्ही समजू. ना. गोखले यांनी आपली वृत्तपत्राविषयीची भूमिका स्पष्ट करताना एका भाषणात म्हटले आहे की,

I may say that the duty of Indian newspapers in these days is threefold. In the first place they have to subject, individual acts and measures of Administration to well informed and vigilant criticism and this criticism should be frank and independent on one hand and framed in the spirit of responsibility and with the proper appreciation of the difficulties of the rulers on the other'' (1).

'भाला' कार भोपटकरांनी ही ''जहाल तितुका मेळवावा । लोकमान्य पंथ वाढवावा ।'' हा हेतू स्पष्ट सांगितला आहे.

'परश्रु' या वृत्तपत्राचा हेतू सांगताना म्हटले आहे, या वर्तमानपत्रात मुख्यत्वेकरुन नीती आणि ज्ञान कलाकौशल्य ज्यांच्यामागे काही लोक ऐश्वर्य पावले आणि प्रख्यातीस आले असे विषय देशोदेशीची म्हणजे मुंबई, मद्रास, कलकत्ता विलायत इ. राज्य व उदयोग संबंधी वर्तमाने या दौलतीतील सरकारचे सहीनिशी जाहिराती, कामगारांच्या वर्गावर्गी आणि अदालतीचे निवाडे या गोष्टी प्रसिद्ध केल्या जातील. (२)

वृत्तवैभव या पत्राचा हेतू -

बाणा सोडू नको, भिडा धरु नको, लालूच पाहू नको ।

हांजीहांजी नको, ख-या भिउ नको, मर्मास भेदू नको ।

स्वार्थार्थी जनपक्षपात धरुनी कोणास गांजू नको ।

तेंणें एडिटरा तुला सुयश बा लादूनी लागे टिको ।

---

**टिप :-**

(१) न. र. फाटक, ना. गो. कृ. गोखले यांचे संपादकत्व विविधज्ञान विस्तार, वर्ष ५७ अंक २ पृ.६३, फेब्रु (१९२६)

(२) पुढारीकार ग. गो. जाधव गौरवग्रंथ संपा. एस. एस. भोसले. कोल्हापुर १९८२.

(वि.द.घाटे, 'दिवस असे होते' मुंबई १९६१ पान ९-११)

'इंदुप्रकाश' नवमताची व नवविचारांची खळबळ उडवून देण्याच्या हेतुने सुरु झाले. नामजोशी यांनी किराणा या पत्राचे हेतूकथन करताना म्हटले होते, ''आमचे बातमीदारास सूचना आहे की, कोणतीही धास्ती न बाळगता आजपर्यंत ख-या बातम्या पाठवून जी मदत केली त्याप्रमाणे पुढेही करण्यास मागेपुढे पाहू नये......... सरकारचे कायदे कितीही कडक असले तरी ख-यास भिती नाही हे पूर्ण लक्षात ठेवून वागले पाहिजे.'' 'दीनबंधू' या वृत्तपत्राचा हेतू असाच बहुजन समाजासाठी निर्भिडपणे विचार मांडण्याचा होता. समाजाच्या मतप्रचाराचे व शिक्षणप्रचाराचे काम करणे हा त्याचा उद्देश होता.

'सुबोधबंधू' या ब-हाणपूर येथे सुरु झालेल्या लक्ष्मण जोशी यांच्या वृत्तपत्राचे हेतूदर्शक ब्रीदवाक्य बघण्यासारखे आहे. ते म्हणतात -

निन्दन्तु नीतिनिपुणाः यदि वा स्तुवन्त।

लक्ष्मीः समाविशतु गच्छतु वा यथेष्टम् ।।

अदयैव वा मरणमस्तु युगान्तरे वा ।

न्याय्यात पथः प्रविचरन्ति पदं न धीराः ।।

याचबरोबर लोकांना सज्ञान करावे, त्यांना त्यांच्या सामाजिक व राजकीय हक्कांची जाणिव करुन द्यावी, राजकर्त्यांच्या कानावर लोकांची गा-हाणी घालून राज्यकारभारातील दोषाकडे व उणिवाकडे लक्ष वेधावे. मराठा या पत्राने लोकांच्या राष्ट्रीय भावनांना इंग्रजीतून तोंड फोडण्याचा हेतू सांगताना म्हटले होते -

''Our true primary duty will be to interprete, petition and instruct and advocacy may be said to form the second part of our real work.''

(केसरी मराठा वृत्तपत्रांचे कार्य, लेख 'गावकरी')

केसरीच्या हेतुबद्दल टिळक लिहतात, ''नवे विचार आणि नव्या गोष्टी लोकांना सांगताना त्यांना केवळ मुर्ख न मानता युक्तीने नव्या जुन्याचा मेळ घातला पाहिजे. केवळ इंग्रजी शिकलेल्या

लोकांच्यावर भिस्त न ठेवता समाजाचे हिताहित ठरवताना मोठया वाचक वर्गाच्या समजुती धरल्या पाहिजेत इतकेच नव्हे तर योग्य असतील त्यांचे समर्थन केले पाहिजे अशा रितीने वागण्याचा केसरीकरांचा संकल्प आहे''. याहीपुढे ते म्हणतात, ''आम्हास कोणाचे राज्य घ्यावयाचे नाही तर आमच्या लोकांची स्थिती सुधारण्याकरिता हल्लीच्या राज्यछत्राखालीच त्यांना तयार करावयाचे आहे व हा जोपर्यंत आमचा हेतू आहे तोपर्यंत आम्हांस कोणासही भिण्याचे कारण नाही''. केसरीचा जन्म झाला तो लिटनसाहेबांच्या कारकीर्दीत. मुद्रणस्वातंत्र्याचा कायदा झाला त्यावेळी राज्यकर्त्यास गोडगोड न वाटले तरी कडू न वाटेल अशा त-हेने लेख लिहिण्याची पुर्वी पद्धती होती. पण तिची वेळ आता गेली. लोकांत जागृती, कळकळ व संघशक्ती उत्पन्न करणे हे वर्तमानपत्रकार यादृष्टीने आमचे मुख्यकर्तव्य आम्ही समजतो. आम्ही केसरीत जे लेख लिहितो ते केवळ राज्यकर्त्यांकरिता नसुन आमच्या मनातले विचार, आमच्या मनातली तळमळ, किंवा जळफळ सर्व मराठी वाचकांच्या मनात उतरावी एवढयाकरिताच आहेत व आमच्या लेखाचा जर असा परिणाम होत नसला तर आमचे श्रम फुकट गेले असे आम्ही समजू. ''किंकवेस्तेन काव्येन कि कांडेन धनुष्यतः। परस्य लग्न न घूर्णयति यच्छिद्रः।'' अशी जी एक संस्कृत उक्ती आहे. तीच वर्तमानपत्रास लागु आहे.[१]

एकंदरीत स्वातंत्र्यपूर्वकाळातल्या वृत्तपत्रांचे हेतू, उद्देश व कार्याचा आढावा घेतला तर ही सर्व वृत्तपत्रे एकाच प्रेरणेतून निघाली होती हे जाणवते त्यांचे रुप वेगळे असले तरी त्याचा हेतु मात्र एकच होता. व त्यांच्या कार्याची दिशाही एकच होती हे जाणवते. त्यांनी केलेल्या कार्याचे पैलु पहायचे तर ते पुढीलप्रमाणे जाणवतात.

१) राष्ट्रभक्तीचा प्रसार

२) नवशिक्षणाचा प्रसार

३) अंधश्रध्दा निर्मुलन

४) स्वातंत्र्यप्रेम

५) अज्ञान निर्मुलन

६) परसत्तेविरुध्द संघर्ष

७) सामाजिक सुधारणा

८) जागतिक हालचालींचा आढावा

---

**टिप :–** (१)केसरी अग्रलेख १९०२- अग्रलेखकार लो.टिळक - डॉ.विश्वास मेहेंदळे - मराठी वृत्तपत्रांचा इतिहास पान ३०६ - रा.के.लेले - कॉन्टि पुणे.

९)	नवीन संशोधनाची माहिती १०)	सांस्कृतिक घटनांचा उहापोह

## १.६ स्वातंत्र्योत्तर काळातील वृत्तपत्रांचे उद्देश व कार्य :-

स्वातंत्र्योत्तर काळातील वृत्तपत्रे एका वेगळया वातावरणात आली. पुर्वीचा एककल्लीपणा, एकध्येयवाद जावून तिच्या उद्दिष्टे, ध्येये, हेतू व स्वरुपात वैविध्यता आली स्वातंत्र्य मिळाले सामाजिक जाणिवा रुंदावल्या. स्वातंत्र्यपूर्व पत्रकारीतेला तिचा असा एक निश्चित ध्येयमार्ग होता. स्वातंत्र्य व लोकजागृतीसाठी झटणे हे त्यांचे ध्येय होते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र या ध्येयाची गरज उरली नाही. स्वातंत्र्यापूर्वी पत्रकारीतेला धंदा किंवा पेशा मानत नव्हते. ते एक मिशन मानत होते. राजनेता सांगे तसे ते वागत होते. लोकमत घडवण्यात वृत्तपत्रांचा मोठा वाटा होता. तसेच अन्याया विरुध्द सर्वसामान्यांचा आवाज सत्तारुढापर्यंत पोहचवण्याचे ते एकमेव साधन होते पण स्वातंत्र्यानंतर परिस्थिती बदलली वृत्तपत्रांना सत्तेच्या भाकरीचा एक तुकडा हवासा वाटू लागला. [१]

कारण स्वातंत्र्यलढाईत त्यांची भुमिका ही महत्वाची होती. ते या राजनेत्यांच्या बरोबरीचे स्थान मिळवु पाहत होते. बरीच वृत्तपत्रे अशी आहेत की ज्यांना राजनीति राजकीय परिवर्तन व नेत्यांमध्ये जास्त रस आहे. वास्तविक स्वातंत्र्यानंतरच्या सुरवातीच्या वीस-बावीस वर्षात पत्रकारितेने राजकारणापेक्षा देशाच्या विकासाकडे अधिक लक्ष दयावे असा आग्रह धरला जात होता. कितीतरी लोकांची याला सहमती होती. विनोबाजींचाही हाच आग्रह होता.

गणेश शंकर विदयार्थी म्हणतात - 'जिन लोगों' ने पत्रकारिता के पवित्र कार्य को अपना काम बना रखा है उनमें बहुत कम ऐसे लोग है जो अपने चित्त को इस बात पर विचार करने का अवसर देते है की हमें सच्चाई की लाज रखनी चाहिए, केवल अपनी मख्खन रोटी के लिए दिनभर कई रंग बदलना ठिक नही । इस देश में भी दुर्भाग्यसे समाचार पत्र और पत्रकारोंका यही मार्ग बनता जा रहा है --- यहाँ भी अब बहोतसे समाचारपत्र सर्वसाधारण के कल्याण के लिए नही रहे। सर्वसाधारण उनके प्रयोग की वस्तु बने जा रहे है । [२]

---

**टिप :-** १) मिडीयाँ के पचास वर्ष - प्रेमचंद पातंजली - राधा पब्लि. पान . २५

२) 'आधुनिक पत्रकारिता एक नजर' - बेलारानी शर्मा - अध्याय ९ पान - १४३

आज पत्रकारिता अधिकतर लक्ष राजकारणावर देताना दिसते परिणामी देशाच्या प्रगतीची चर्चा करण्यापेक्षा राजकारणातच ही वृत्तपत्रे रमली. (एखादा अपवाद वगळता) आजकाल जो संपादक राजकारणावर उत्तम लिहतो जो बातमीदार राजकीय बातम्या देतो त्याचीच चलती असलेली दिसते. पत्रकारितेने राजकारणाला अवास्तव महत्व दिल्यानेच आज ही स्थिती निर्माण झाली आहे. राजकारणाचे हे वर्चस्व इंग्रजीतच नव्हे, हिंदी. मराठी, गुजराती वृत्तपत्रातही असल्याचे दिसते. राजकारणावर पकड कायम ठेवण्यासारखे काम वृत्तपत्रांनी केले आहे. हे खरे असले तरी राजकारणाशिवाय अनेक विकासाचे विषय आहेत हे वृत्तपत्रांनी विसरुन चालणार नाही. वृत्तपत्रांची ही ऐतिहासिक भुमिका क्षणभर बाजुला ठेवली तर समाजातील त्यांची ओळख छिन्नविछिन्न होईल.

वृत्तपत्रांना हे समजले नाही ही या एकांगी दृष्टीमुळे त्यांनाच अडचणीत यावे लागले राजनीतित रस घेतल्याने पत्रकार स्वतःला कोणत्या ना कोणत्या राजकीय पार्टी वा नेत्याशी गुंतवून घेतात. संपादक, बातमीदार वृत्तपत्रांकडे पाहताना ते कोणत्या राजकीय पक्षाचे आहेत वा नेत्याचे आहेत हे पाहिले गेले. अर्थात हे परदेशातही होते ते अगदी उघडपणे. त्याच्या तुलनेत मराठी वृत्तपत्रे कमी आहेत. कारण स्वातंत्र्य आंदोलनात वृत्तपत्रांनी केलेली भुमिका यामागे आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात वृत्तपत्रे एकांगी झाली त्याच्यात अनेक विकृती निर्माण झाल्या वृत्तपत्रे एवढी संकुचित झाली की एखादया गावात बलात्कार, अग्निकांड, महापूर ही संकटे येत नाहीत तोपर्यंत त्याची वार्ता छापली जात नाही. [१]

एखादी चांगली घटना घडते आहे ते छापत नाहीत. वाचकांचा विचार करुन बातम्या छापल्या जात नाहीत. अर्थव्यवस्था,शेअर बाजार यांच्या बातम्या चांगली चांगली वृत्तपत्रेही छापत नव्हती. हर्षद मेहता प्रकरणापूर्वी फक्त शेअर बाजार व शेअर भाव छापत होते. १९९१ नंतर मात्र शेअरबाजार वृत्ते येऊ लागली. चांगली समाजधारणा होण्याकरता देशाच्या विभागाच्या प्रगतीचा ध्यास घेवुन वृत्तपत्रांनी लिहले. वृत्तपत्रे हे लोकमत घडविण्याचे साधन आहे. त्यातील

---

**टिप :-** १) बदलती पत्रकारीता गिरते मूल्य --- डॉ निशांत सिंह पान - १४

बातम्या लेख समाजाची दिशा बदलू शकतात हे वृत्तपत्रांनी लक्षात घेणे गरजेचे आहे. ते केवळ वृत्तपत्र नसून समाजप्रबोधन हे त्याचे ध्येय आहे हे विसरुन चालणार नाही.

खेळाच्या बातम्यानाही त्यात स्थान नव्हते एका पानावर कुठेतरी खेळाची बातमी असे त्यात जाहिरातीच अधिक असत टि.व्ही.मुळे मात्र खेळाच्या बातम्या, लाइव्ह बातम्यांना महत्व आले. वृत्तपत्र व राजकारण यांचे नाते असू नये असे नाही. कारण प्रत्येक नागरिकाने योग्य मतदान करुन योग्य व्यक्तीला निवडून दयावे यासाठी राजकारणाचे योग्य मार्गदर्शन करुन जनमत तयार करण्याचे काम वृत्तपत्रेच करतात. मात्र राजकीय घडामोडींना अधिक महत्व देवुन इतर गोष्टींकडे सोयीस्कर दुर्लक्ष करणे ही चूक ही वृत्तपत्रे करतात.

स्वातंत्र्योत्तर वृत्तपत्रे one dimensional बनली. राजकारणाबरोबर सामाजिक, सांस्कृतिक आयामांकडे लक्ष देण्याचे भान त्यांना राहिले नाही पूर्वीच्या वृत्तपत्राइतकी आशय-विषय समृध्दी व व्याप्ती त्यात राहिली नाही केवळ शेअर भाव न देता त्याचा अर्थव्यवस्थेवर व सामान्यांच्या राहणीवर काय परिणाम होते हे पाहणे गरजेचे आहे असे त्यांना वाटले नाही. राजकारणाला चिकटून राहिल्यामुळे ही वृत्तपत्रे प्रगती करु शकली नाहीत.

अर्थात स्वातंत्र्योत्तर वृत्तपत्रामध्ये केवळ दोषच होते असे नाही. स्वातंत्र्योत्तर काळातील वृत्तपत्रांचा जन व देशसेवेचा उद्देश क्षीण झाला. त्याचे ध्येय राष्ट्रीयतेच्या पुनर्निर्माणासाठी तत्व मांडणे हे आले. देशाचा आर्थिक विकास, समाजाचे आधुनिकीकरण आणि प्राचीन सनातन विचाराचे आधुनिक विचारात परिवर्तन करणे, देशाचा आर्थिक विकास साधणे यावर लक्ष केंद्रित झाले. ही वृत्तपत्रे दोष व गुणांनी युक्त होती. त्यांच्या कांही जमेच्या बाजूही नाकारुन चालणार नाही. या काळात वृत्तपत्रांचा विकास व प्रचार झपाटयाने झाला. प्रारंभी विकासाकडे वाटचाल, स्वातंत्र्याची भावना व अभिव्यक्ती स्वातंत्र्य या भावना प्रबळ होत्या.

लेखन व अभिव्यक्ती स्वातंत्र्यातुन अनेक वृत्तपत्रांचा जन्म झाला. स्वातंत्र्यूपर्व वृत्तपत्रे ही मतपत्रे होती. ते स्वरुप बदलले नवे विचार येवु लागले या वृत्तपत्रांनी कांही चांगल्या गोष्टी आपणास दिल्या त्या म्हणजे -

१) साहित्यिक अभिरुचीचा विकास. जरी ही वृत्तपत्रे व्यावसायिकतेकडे वळु लागली होती तरी त्यांनी साहित्यिक विकासाला हातभार लावला.

२)	कथा, कविता, लेख, ललित निबंध यांना स्थान दिले.

३)	हळुहळु ती सांस्कृतिक मुल्यांना महत्व देवू लागली.

४)	पुस्तक परिक्षणासारखी सदरे नव्याने आली.

५)	लोकमानसात परिवर्तन करुन लोकांत साहित्याची आवड निर्माण करण्याचे काम त्यांनी केले.

६)	सामाजिक जीवनाचे नवे भान दिले.

७)	संस्कृतीचे बाहय आक्रमणापासुन संरक्षण करुन तिला सजवून राष्ट्रीय जीवनाचे महत्वाचे अंग बनवण्याचा प्रयत्न केला. शिल्पकला, साहित्य नृत्य संगीत, योग व अध्यात्म यांना प्राधान्य दिले.

८)	सांस्कृतिक अभिरुचीचा विकास केला. धर्म, नीती, खेळ, मनोरंजन यांना स्थान दिले.

९)	विज्ञान व बौध्दिक प्रगतीला हातभार लावला.

१०)	नैतिक व धार्मिक मुल्यांना प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली.

११)	लोकभाषेचा वापर सुरु करुन सोपी व सुलभ सुबोध भाषा आणली.

१२)	रोचक, सरस, कुतुहलपुर्ण भाषाशैलीचा वापर सुरु केला.

१३)	संस्कृती, धर्म, चिंतन, भाषासाहित्य, शैली, विज्ञान, विडंबन यांना महत्व दिले.

१४)	समाजात अंतर्बाहय क्रांती घडवून आणली.

१५)	मानवाच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगिण विकास करण्यास मदत केली.

१६)	समाजात नवा उन्मेष, जागृती चेतना निर्माण केली.

१७)	स्वाभिमान, आत्मसंरक्षणाचा भाव, स्वतःच्या अस्तित्वाचा शोध, बौध्दिक क्षमतेचा विकास घडवून आणला.

१८)	सामान्य  माणसातही वैचारिक जागृती निर्माण केली.

१९) जनजागरण, सुधारणा, समता, बंधुता, स्वातंत्र्य, उन्मुक्तता यांची शिकवण दिली.[१]

२०) मानवी संबंध दृढ करण्यास प्राधान्य देवुन तसे प्रयत्न केले.

२१) समाजातील दुष्ट परंपराविरुध्द लढा दिला. (हुंडा, विधवा केशवपन, जरठकुमारी विवाह)

२२) अंधश्रध्दा, पारंपारिक रुढी इ. लोकांच्या समस्यांचे विवेचन केले.

२३) सामाजिक सुधारणात मौलिक योगदान दिले.

२४) वृत्तपत्रांना नियमित रुप प्राप्त करुन दिले.

२५) उत्कृष्ट छपाई, रंगीत चित्रे यांच्या वापराने आकर्षकता प्राप्त करुन दिली.

२६) रोजगार, व्यापार यासंबंधीची वृत्ते छापुन युवा वर्गाला उपजीविकेचे साधन शोधण्यास साधन शोधुन दिले.

या सर्व चांगल्या गोष्टी स्वातंत्र्योत्तर वृत्तपत्रांनी दिल्या. मासिक समाचार (कराची) रवीकिरण, पुणे समाचार, प्रताप, सकाळ, स्वातंत्र्य, तरुण भारत, सांज तरुण भारत, प्रभात, तेज त्रिकाळ, स्वराज्य, नवशक्ती, भारत ज्योती, नवभारत, लोकशक्ती, कैवारी, पुढारी, लोकसत्ता, मराठा, सांज मराठा, संचार, गोमंतक, राष्ट्रमत, नवप्रभा महाराष्ट्र टाईम्स, श्रमिक, लोकमत अशी अनेक वृत्तपत्रे उदाहरणादाखल देता येतील.

## १.७ वृत्तपत्रांच्या बदलत्या भुमिका :-

- पुर्वीची वृत्तपत्रे स्वातंत्र्य व देशभक्तीच्या भावनेने झपाटली गेली होती पण आत्ताची वृत्तपत्रे देशभक्तीच्या भावनेने पूर्वीइतकी भारावलेली दिसत नाहीत.

- वृत्तपत्राकडे एक धंदा म्हणुन पाहण्याची दृष्टी आल्याने त्याचे व्यावसायिकीकरण झाले.[१]

---

**टिप :-** १) पत्रकारिताका अवलोकन - एन. सी. पंत राधा पब्लि. दिल्ली पान. ९९

२) पत्रकारिता के विविध आयाम डॉ गोविंदप्रसाद अनुपम पाण्डेय
डिस्कव्हरी पब्लि. हाउस नवी दिल्ली पान नं. १७, १८

- लोकशिक्षण व लोकजागृती करीत असताना व्यक्ति, संस्था वा पक्ष यांची प्रतिमा तयार करण्याचे कार्य वृत्तपत्रे करु लागली.
- वृत्त देतानाच त्याबद्दलचा वृत्तपत्राचा दृष्टीकोन, विचार प्रकट होताना दिसतो यालाच बातमीचा कल (टोन/अँगल) म्हणतात अशी अन्वयार्थक पत्रकारिता आली.
- एखादया विषयाचा सांगोपांग शोध घेवुन त्याचा अर्थ लावणारी शोधपत्रकारिता सुरु झाली.
- वृत्तपत्र हे समाजप्रबोधनाचे साधन न राहता तो एक कंझ्युमर प्रॉडक्ट झाला.
- राजकीय बातम्यांशिवाय जीवनाच्या इतर अंगाविषयी वृत्तपत्रात मजकूर देता येतो ही कल्पना आली यातून विकास पत्रकारितेचा जन्म झाला.
- आत्मपरिक्षण चर्चा व व्यावसायिक टिकात्मक विचारमंथन सुरु झाले. व्यावसायिक मुल्यांचा विचार होवु लागला.
- माहिती, प्रबोधन जाहिरातीद्वारे सेवा, मनोरंजन यांना चालना मिळाली.
- वृत्तपत्र हे एक व्रत नसुन पैसे देणारा व्यवसाय आहे की भुमिका झाली.
- वृत्तपत्रांकडे समाजसेवा म्हणुन पाहणे संपुष्टात आले त्यामुळे या धंदयात उतरलेल्या भांडवलदारांचा पैसा गुंतवणुकीचा धंदा असे स्वरुप आल्याने त्यांच्या स्पर्धा, एकमेकावर मात करणे कांही विशिष्ट विषयांना अमाप प्रसिध्दी देणे तर कांही विषय योजनापूर्वक बाजूला सारणे अशी मनोवृत्ती वाढते आहे.
- वृत्तपत्र म्हणजे केवळ बातम्या देणे ही भूमिका संपून वेगवेगळी सदरे, पुरवण्या, शब्दकोडी, पंचांग, भविष्य, चित्रपट परिक्षणे, हवामान, विकासाच्या बातम्या, बाजारभाव, गुन्हेगारी वार्ता यांना वृत्तपत्रात स्थान दिले गेले.
- आकर्षक शीर्षके देणे, नवे शब्द व भाषिक प्रयोग करणे या गोष्टींना प्राधान्य दिले गेले.
- राजकारणाबरोबर शेती, व्यापार, उदयोग, सिनेमा, रंगीत मजकूर,ऑफसेटची आकर्षक छपाई व आकर्षक मांडणी, विविधता इ. मुळे त्याचे बाहयरुपही आकर्षक झाले.
- गुणात्मक वाढीपेक्षा संख्यात्मक वाढ व आर्थिक फायदयावर लक्ष केंद्रित केले गेले आहे.

आज ९७, ९८ टक्के वाचक असणा-या भाषिक वृत्तपत्रांना उपजीविका व अस्तित्वाचे प्रश्न सोडवणे ही मोठी समस्या झाली आहे. वृत्तपत्राच्या वाढत्या खपाबरोबर त्याचा वाढता खर्च वाचकाच्या वर्गणीतुन भरुन निघणे शक्य नसल्याने त्यांना जाहिरातदारांचा पाठिंबा घ्यावा लागतो. त्या जाहिरातदारांना भाषिक वृत्तपत्रांना जाहिराती पुरवण्याऐवजी इंग्रजी वृत्तपत्रांना पुरवण्याकडे अधिक रुची राहिली आहे. याचे कारणेदेखिल वृत्तपत्राचा खप किती यापेक्षा त्याचा वाचकवर्ग कोण आहे हे जाहिरातदाराच्या दृष्टीने महत्वाचे आहे. ज्याच्याजवळ वस्तु विकत घेण्याची क्षमता आहे. सतत कांहितरी खरेदी करण्याची इच्छा व क्रयशक्ती आहे असा हा वर्ग ज्या वर्तमानपत्रांचा ग्राहक, वाचक आहे. तोच वर्ग जाहिरातदारांच्या दृष्टीने महत्वाचा आहे त्यामुळे त्यांची संख्या कमी असली तरी बाजाराच्या दृष्टीने आवश्यक असल्याने व तो इंग्रजी वृत्तपत्रांच्या सानिध्यात अधिक असल्याने जाहिरातींचा अधिक लाभ इंग्रजी वृत्तपत्रांना झाला आहे. त्यामानाने भाषिक वृत्तपत्रांना आर्थिक स्थैर्य नाही त्यामुळे त्यांना कमी किंमतीत वृत्तपत्र देणे तोटयाचे ठरते. एका वृत्तपत्राला आठ रुपये खर्च येतो पण वाचकाला ते दोन रुपयात हवे असते. वरच्या सहा रुपयासाठी वृत्तपत्रांना जाहिरातीचा आश्रय घ्यावा लागतो. इंग्लंडमध्ये हवी ती किंमत मोजून वाचक वृत्तपत्र घेतो. याउलट आपली स्थिती आहे. मराठी वाचकाला 'सस्ते में सस्ता' माल हवा असतो. त्यामुळेच वृत्तपत्र जाहिरात आश्रयी ठरले. [१]

या सर्व बदलत्या भुमिकांमुळे वृत्तपत्राचे अंतर्बाहय रुप,दर्जा, स्थान बदलले आहे. तो आता धर्म राहिला नसुन नफा देणारी दुभती गाय व विशिष्ठ वर्गाची मक्तेदारी ठरला आहे. यातुनच लहान मासे मोठे मासे अशी वृत्ती निर्माण होते आहे. साखळी वृत्तपत्रे, गट वृत्तपत्रांची मक्तेदारी वाढते आहे. आता पुर्वीसारखी पदरमोड करुन धंदा करण्याची वृत्ती संपादकात व आपल्या जवळचे ज्ञान इतरांना देवुन शहाणे करण्याची उर्मी पोटतिडीक पत्रकारात नाही. आता पत्रकारही बिझनेसमन झाले आहेत. 'ज्यादा पगार तिकडे पसार ' अशा वृत्तीमुळे निष्ठा, प्रामाणिकपणा हा प्रकारच आता राहिलेला नाही परिणामी वृत्तपत्राच्या गुणवत्तेचा गेल्या दहा वर्षाचा आलेख वैचारिक व नैतिक अध:पतन दाखवणारा आहे, असे वाटू लागते.

---

१) माध्यम पत्रकारिता आणि आपण - श्रीपाद जोशी -कौस्तुभ प्रकाशन, नागपूर
पान नं. ४५ - ४६

आजच्या पत्रकारितेबद्दल श्री. जयदेव डोळे यांनी अतिशय मौलिक विचार मांडले आहेत. ते म्हणतात, 'फुकट हा तीन अक्षरी शब्द म्हणजे पत्रकारांचा जीव की प्राण, चित्रपट, नाटक, सर्कस, प्रदर्शन अशा ठिकाणी त्याला तिकीटे काढुन जाणे कमीपणाचे वाटते. कांही पत्रकार पैसे खातात बातमी छापण्याचे व न छापण्याचेही, गेल्या कांही वर्षात मराठी पत्रकारांमध्ये जातीय तट पडले आहेत. ब्राम्हण पत्रकार ब्राम्हणांना 'जागा' देतात तर दलित, ब्राम्हणेतर त्यांच्या बांधवांना प्रकाशात आणतात. यातुनच 'आपला माणुस' म्हणुन त्यांना वाचक विशेषण बहाल करतात. त्याची मजल किंगमेकर, सल्लागार, तज्ञ इथपर्यंत जाते. याच भुमिकेत वावरण्याचा नाद पत्रकाराला लागतो. आपण मंत्र्याचे किंगमेकर, खासदाराचे सल्लागार आहोत या भ्रमात ते राहू लागतात ही शोकांतिका आहे. [१]

एकूण अलिकडिल वृत्तपत्रामध्ये व्यावसायिक दृष्टीकोन वाढल्याने पत्रकारितेचे चारित्र हनन व पत्रकारांचे नैतिक पतन होत आहे. टी.आर.पी. वाढवण्याच्या नादात वृत्तपत्रे नैतिक मुल्य बदलताहेत. महानगरातील पत्रकार संवेदनहीन होत आहेत त्यांची नजर दुर्घटना व बलात्काराच्या बीभत्सतेवर असते. मानवी नात्यातील ऊब ते हरवत चालले आहेत. त्यात करुणा व कर्तव्य भावनेचा अभाव दिसतो आहे या बद्दल अच्युतानंद मिश्र यांचे उद्‌गार चिंतनीय आहेत.

ते म्हणतात 'पहले संपादक पत्रकारिता के प्रति प्रतिबध्द रहते थे लेकिन अब यह प्रतिबध्दता उनसे छिन ली गई है । या सुविधाओंके बदले उन्होंने स्वयं प्रतिबध्दताओंका परित्याग कर दिया है। पत्रकारिता में व्यावसायिकता की प्रवृत्ती मालिक के संपादक बनने के कारण तेज हुई और पत्रकारों या पत्रोंकी जो सामाजिक जिम्मेदारी थी, वह धीरे धीरे लाभ कमानेंकी प्रवृत्तिमें बदल गई। पिछले एक दशक में लाभ कमानेकी यह प्रवृत्ति तेजीसे उभरीं है । पहले अखबारोपर संपादकोंका अधिकार होता था । इसिलिए अखबार भी पाठकोंको केंद्र में रखकर निकाले जाते थे। संपादक एक संस्था था । यह माना जाता था की जिस तरह का अखबार वह निकालना चाहता है वह निकाले । संपादक अपने हिसाब सें प्लॅनिंग करता था । अपनी

---

**टिप :-** १) जयदेव डोळे - मराठी पत्रकाराची मनोवृत्ती - सत्याग्रही - फेब्रु. २००७

टिम बनाता था । धीरे धीरे यह प्रवृत्ती कम होती गई । और यहिसे शुरु हो गया 'संपादक नामक संस्थाका अवमूल्यन' ।'' [१]

आज वृत्तपत्रे केवळ फायदा देणारी मशीने झाली आहेत. शहरधार्जिणी वृत्तपत्रे ग्रामीण भागाला घातक ठरली आहेत. राष्ट्रीय वृत्तपत्रे चार महानगरे व मोजक्या शहरापुरती सिमित राहिली आहेत. ती एका विशिष्ट पक्षाची बाजू घेणारी आहेत या संदर्भात डॉ. निशान्त सिंह म्हणतात -

''भारत में विरोधी दल की खबरे या तो छापी ही नही जाती है । या फिर उन्हे तोड मरोडकर छापा जाता है । यह जो पक्षधरता है वह इंग्लैंड की राजनीतिक पक्षधरता से अलग किस्म की है, बहुत खतरनाक है। जो तथ्यों पर आप की राय है उसे भी आप पुरी प्रमुखता के साथ छाप सकते है । लेकिन तथ्य और राय में स्पष्ट विभाजन होना चाहिये । पाठकोंको पता होना चाहिये की वह तथ्य पढ रहा है या अखबार के विचार । आजकल हमारी यहाँ संपादकीय को खबरों की तरह लिखा जाता है और कुछ खबरे ऐसी होती है, जिन्हे संपादकीय की तरह लिखा जाता है । भारत जैसे अर्धशिक्षित देश में खबरो और संपादकीय का यह घालमेल काफी खतरनाक हो सकता है ।[२]

वृत्तपत्रांची विश्वसनीयता ही महत्वाची गोष्ट आहे परंतु राजकीय स्वार्थामुळे ही विश्वसनीयता संपली आहे सत्तेच्या निकट राहण्यात जे सुख आहे ते सुख मिळवण्यासाठी वृत्तपत्रे धडपडत आहेत अशी वृत्तपत्रे जनमत बनवण्यास व जनजागृती करण्यास असमर्थ झाली आहेत. वृत्तपत्रांनी राष्ट्रहित जपले पाहीजे. ते राष्ट्रहित ती विसरत चालली आहेत. सामाजिक ऐक्य टिकवण्याऐवजी सामाजिक द्वेष पसरवत चालली आहेत. अयोध्या प्रकरण, मिरज दंगल प्रकरण ही याची उदाहरणे आहेत.

---

१) 'बदलती पत्रकारिता गिरते मूल्य ' डॉ.- निशांत सिंह नमन प्रकाशन पान १७

२) बदलती पत्रकारिता गिरते मूल्य ' डॉ.- निशांत सिंह नमन प्रकाशन पान १७

वृत्तपत्रांच्या बदलत्या रुपाबद्दल डॉ. निशांत सिंह म्हणतात. ''हर अखबार और प्रत्येक न्यूज चॅनलमें कुछ लोग ऐसे जरुर मिल जाएँगे जो एक अच्छे ठेकेदार हो सकते है,श्रेष्ठ दलाल हो सकते है लेकीन पत्रकार कदापि नही हो सकते. लेकिन वे पत्रकार है। ऐसे लोगों से राष्ट्र के नवनिर्माण सामाजिक पुनर्रचना, धर्मनिरपेक्षता, निष्पक्षता--- और पत्रकारिताके मूल्यों की बात करना ही बेईमानी है । ''[१]

## १.८ समारोप :-

प्रस्तुत प्रकरणात आपण वृत्तपत्र संकल्पनेचा तसेच पूर्वीच्या वृत्तपत्राचा हेतू, उद्देश, स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील वृत्तपत्रे, भूमिका यांचा विचार केला यातून पुढील निष्कर्ष काढले.

१) स्वातंत्र्यपूर्व काळातील वृत्तपत्रे ध्येयनिष्ठ होती केसरी, सुधारक काळ, मराठा ही याची उदाहरणे आहेत. या वृत्तपत्रांचे संपादक हे मालक (प्रोप्रायटर) होते. ते कुणाचे चाकर नव्हते. आपले विचार हजारो लोकांच्या गळी उतरवणे हे त्यांचे ध्येय होते.

२) त्याकाळी या वृत्तपत्रांची आर्थिक स्थिती बेताची होती. प्रसंगी पदरमोड करुन वृत्तपत्र चालवावे लागे 'किरण' हे ना.म.जोशी चे पत्र आर्थिक गोष्टीमुळे बंद पडले. तसे 'अखबार' हे पत्रही आर्थिक परवडीमुळे बंद पडले. ज्ञानप्रकाश सारख्या वृत्तपत्रांना सुध्दा आर्थिक अडचणीला सामोरे जावे लागले त्यावेळचे अध्यक्ष (भारत सेवक समाज) पंडित हदयनाथ कुंझरु यांनी हेच कारण सांगितले. जानेवारी १९५१ मध्ये प्रसिध्द केलेल्या पत्रात त्यांनी म्हंटले होते. ''गेल्या चार-पाच वर्षात ज्ञानप्रकाशचा खप कमी होत गेला आणि तोटा वाढत गेला --- म्हणुन हे पत्र बंद करण्यावाचून आता दुसरा मार्ग नाही ------- पैसे वाचवण्यासाठी ज्ञानप्रकाश बंद करण्यात आला नसुन त्यावर होणारा खर्च हा एका उपयुक्त सार्वजनिक कामाच्या दृष्टीने निष्फळ आहे असे वाटल्याने तो बंद करण्यात आला आहे'' [२]

---

**टिप :-** १) बदलती पत्रकारिता गिरते मूल्य - डॉ. निशांत सिंह - नमन प्रकाशन

२) नवयुग ४ मार्च १९५१ लेख - प्र.के.अत्रे 'ज्ञानप्रकाशचा खून झाला' - मराठी वृत्तपत्र इतिहास पान नं. ९८

३)	या वृत्तपत्रांची ध्येये व धोरणे निश्चित होती. त्यांच्याजवळ सामाजिक दृष्टी होती. समाजाचे कल्याण साधणे, समाजात विचार प्रवर्तन करणे हा त्यांचा मुख्य उद्देश होता.

४)	स्वातंत्र्योत्तर काळात त्यांच्या ध्येयधोरणात बदल झाला.

५)	यंत्रयुगामुळे छपाईची पध्दत बदलली.

६)	स्वातंत्र्योत्तर काळातल्या वृत्तपत्रांच्या निष्ठा बदलल्या देशनिष्ठा जावून अर्थनिष्ठा वाढली.

७)	पूर्वी वृत्तपत्रे एखादया विशिष्ठ मताचा प्रसार करण्यासाठी होती.देशात काय चालले आहे हे जाणुन घेण्यासाठी पूर्वी वृत्तपत्राचे सामूहिक वाचन होई पण आता वाचकांना सॅटेलाईटच्या माध्यमातून दिसणा-या प्रसारमाध्यमांमुळे बसल्याजागी जगभरातील माहिति मिळू शकते. इंटरनेटद्वारा वसल्याठिकाणी जगात काय चालले आहे ते पाहू शकतात. साहजिकच त्यांना वृत्तपत्रातल्या बातम्यांपेक्षा वेगळे कांहीतरी हवे आहे. हे अलिकडील वृत्तपत्रांच्या ध्यानी आले.

८)	वृत्तपत्रे ही भांडवली व्यवसाय बनल्याने सामाजिक हिताचा प्रश्न दुय्यम ठरला. आर्थिक फायद्याला महत्व आले.

९)	तंत्रज्ञान बदलल्याने त्यात यांत्रिकता आली समाजसुधारणा हा त्यांचा आत्माच बदलला

१०)	आर्थिक स्थिती बदलली वृत्तपत्राकडे फायदेशीर धंदा म्हणुन पाहिले जावू लागले. आर्थिक धोरण बदलले. स्वार्थ वाढला व्यापारी दृष्टी वाढली. नफ्याचा विचार होवु लागला. भांडवली खर्च व रोजचा खर्च वाढला त्यामुळे ध्येये, तत्वे यांना तिलांजली देवुन आर्थिक फायदा हेच तत्व बनले.

११)	राष्ट्रभक्ती संपून सत्तेची पूजा सुरु झाली.

१२)	वृत्तपत्रांच्या संख्येत राक्षसी वाढ झाली उत्तम कमाईचा धंदा म्हणुन भांडवलदार, राजकारणी यात येवू लागले.

१३)	वृत्तपत्रांचा खप वाढण्यासाठी मागणी तसा पुरवठा हे धोरण झाले.

१४)	सकस विचार जावून निकृष्ठ विचाराची भारुडभरती झाली .

१५)	वृत्तपत्रांचे भवितव्य अधांतरी झाले.

१६)	हीन अभिरुची व नैतिकतेचे अध:पतन यामुळे एकंदर वृत्तपत्र व्यवसायाची वाटचाल अधोगतीकडे होताना दिसते आहे.

या वृत्तपत्रांनी केलेले कार्य मात्र लक्षात घेण्याजोगे आहे.

- परकीय गुलामगिरीविषयी जागृती केली.
- शिक्षण प्रसार केला.
- अन्यायाविरुध्द चीड निर्माण केली
- समाजात लढण्याची ताकद वाढवली
- स्वातंत्र्याची गोडी निर्माण केली.
- इंग्रजी भाषेतील ज्ञान व प्रगतीची कल्पना दिली.
- देशनिष्ठा व राष्ट्रप्रेम वाढविले.
- परदेशाचे वर्तमान लोकापर्यंत पोहचवले.
- जनकल्याणपर विचार प्रसारीत केले.
- समाजाला प्रगतीचा मार्ग दाखविला.
- सरकारवर वचक बसवला.
- रयतेची कोतवालकी केली.
- प्रजेची भूमिका सरकारपर्यंत पोहचवण्याचे काम केले.
- स्वातंत्र्याचा खरा अर्थ सांगितला.
- स्वदेश, स्वभाषा, स्वराज्य यांच्या रक्षणाचे महत्व पटवले.

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर वृत्तपत्रांचे कार्य वृत्तपत्राच्या बदलत्या भूमिका यांचा या प्रकरणात अभ्यास केला पुढील प्रकरणात आपण वृत्तपत्र व वाचकांचे नाते पूर्वीच्या वाचकांच्या अपेक्षा, वृत्तपत्रातले विषय, बातम्यांचे स्वरुप, संपादकाच्या भूमिका वाचकाचे असणारे नाते इत्यादी विषयावर चर्चा करणार आहोत.

## प्रकरण दुसरे

# स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील वृत्तपत्रे, वाचक व त्यांच्या अपेक्षा

# प्रकरण २ रे

# स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील वृत्तपत्रे, वाचक व त्यांच्या अपेक्षा

२.१ प्रस्तावना

२.२ वृत्तपत्र व वाचकाचे नाते

२.३ पूर्वीचा वाचकवर्ग - त्याच्या अपेक्षा

२.४ स्वातंत्र्यपूर्वकालीन वृत्तपत्रातील विषय, बातम्यांचे स्वरुप

२.५ संपादकांच्या भूमिका- प्रबोधन व जागृती

२.६ संपादक व वाचकाचे नाते - न्यायाधिशाची भूमिका

२.७ वाचकाचा स्तर व त्याची आवड

२.८ स्वातंत्र्योत्तर काळातील वृत्तपत्रे

२.९ २१ व्या शतकातील वृत्तपत्रातील बदल

२.१० वाचक वर्गाच्या बदलत्या भूमिका

२.११ वाचक वर्गाचे स्तर

    २.११.१ विविध वयोगट

    २.११.२ विविध व्यवसायिक

२.१२ समारोप

## २.१ प्रस्तावना –

पहिल्या प्रकरणात वृत्तपत्राची संकल्पना कशी व कुठून आली. पूर्वीच्या वृत्तपत्रांची निर्मिती होण्यास कोणती परिस्थिती कारणीभूत झाली. पूर्वीच्या वृत्तपत्रांचा हेतू काय होता, त्यांची भूमिका कोणती होती, त्यांनी कोणते महत्वाचे कार्य केले, स्वातंत्र्यपूर्व, स्वातंत्र्योत्तर व आजची पत्रकारिता यामध्ये कोणते मूलभूत फरक होते या सर्वांचा सविस्तर अभ्यास केला. प्रस्तुत प्रकरणात वृत्तपत्र या संकल्पनेचा अभ्यास करताना यातला प्रमुख घटक म्हणून संपादक, वार्ताहर यासोबत वाचकाचाही विचार करावा लागतो. या प्रकरणात आपण वृत्तपत्र व वाचकात कोणते नाते होते, पूर्वीचा वाचकवर्ग कसा होता, त्याच्या अपेक्षा, वृत्तपत्रातील विषय, बातम्यांचे स्वरूप, संपादकाच्या भुमिका, वाचकांशी असणारे नाते, वाचकाच्या आवडी यांची सविस्तर चर्चा करणार आहोत. या साऱ्या चर्चेवरून आपणांस या प्रक्रियेतील वाचकाचे अनन्यसाधारण महत्व दिसून येते.

## २.२ वृत्तपत्र व वाचकाचे नाते –

ज्ञानेश्वरांच्या भाषेत बोलायचे झाले तर 'वक्ता वक्ताचि नोहे श्रोतेविण' तसे 'वृत्तपत्र वृत्तपत्रचि नोहे वाचकेविण' असे म्हणावे लागेल. साहित्यात एकवेळ श्रोता नसण्याची भूमिका चालू शकते. भाषणात एकवेळ वक्ता नसला तरी ते 'स्वगत' आहे असे म्हणून चालू शकते पण वृत्तपत्रात एकही वाचक नसला तरी चालेल ही कल्पना चालू शकत नाही. कथा, कविता हे लेखन 'स्वांतसुखाय' 'आत्मसुखाय' स्वमन रिझविण्यासाठी लिहिली जाउ शकते पण वृत्तपत्र संपादकाच्या 'स्वांतसुखा' साठी काढू शकत नाही. या प्रक्रियेत वृत्तपत्रकाराइतकाच वाचकवर्गही महत्वाचा असतो. किंबहुना 'वाचकावाचून वृत्तपत्र' ही संकल्पनाच ठरू शकत नाही. 'वाचकाने वाचले तरच ते वाचते' हे विसरून चालणार नाही.

वृत्तपत्राने वाचकवर्ग डोळयापुढे ठेऊनच आपले लेखन केले पाहिजे. वृत्तपत्र व वाचक यांचे नाते परस्पर जिव्हाळाचे व विश्वासाचे असले पाहिजे. म्हणूनच आजही कोणताही वाचक अन्य मिडिया पेक्षा वृत्तपत्रात आलेल्या बातमीला अधिक महत्व देतो तिच्यावर विश्वास ठेवतो.वाचकानेही वृत्तपत्रावर विश्वास टाकला पाहिजे.बऱ्याचदा वाचक सहजपणे बोलून जातो की,''या वृत्तपत्रातील

बातमीवर अजिबात विश्वास ठेऊ नको,साले,काहीतरी फेकत असतात लेकाचे! '' हे उद्‌गार फार बोलके आहेत. एखाद्या संसर्गजन्य रोगाची साथ जशी झपाट्याने पसरते तशी ही अविश्वासाची भावना वाचकांमध्ये चटकन पसरते. याचा परिणाम त्या वृत्तपत्राच्या विश्वसनीयतेवर होतोच शिवाय त्याच्या प्रतिष्ठा व खपावरही होतो. केवळ या गोष्टीमुळे वृत्तपत्र बंद पडण्याची अनेक उदाहरणे आहेत. (प्रभातदर्शन)

वृत्तपत्र व वाचकाचे नातेसंबंध जिव्हाळ्याचे असले पाहिजेत. त्याला विविध पदर असले पाहिजेत. हे पदर असे असावेत. –

**अ) साहचर्य –** वृत्तपत्र व वाचकाला एखाद्या सहचाऱ्यासारखे वाटले पाहिजे. सहचाऱ्याच्या सुखदुःखात आपण सहभागी होतो. त्याच्या सहवासात रमतो. त्याच्याशी एकरूप होतो व तोही आपल्याशी असेच साहचर्य प्रस्थापित करतो तसे वृत्तपत्र व वाचकांचे परस्परसंबंध असले पाहिजेत. वाचकांची दुःखे, समस्या, आनंदाचे क्षण, त्याचे प्रश्न, आवडी निवडी याची दखल वृत्तपत्रांनी सहचाऱ्याच्या भूमिकेतून घेतली पाहिजे. तशा वृत्तपत्रांच्या प्रश्न, व्यथा वाचकांनी समजून घेतल्या पाहिजेत.

**ब) दृष्टा – दृश्य संबंध –** रसिक वाचकांची मानसिकता, त्याची आसक्ती, त्याच्या सौंदर्याची अपेक्षा या सर्वांची जाणीवपूर्वक दखल वृत्तपत्रांने घेतली पाहिजे. त्यानुसार त्याला त्याच्या आवडीचा मजकूर दिला पाहिजे. वाचकाला जे हवे ते त्यात हवे. असे असले तरी मागणी तसा पुरवठा या वृत्तीने त्याच्या हीन अभिरूचीची मात्र जोपासना करू नये. अशा वेळी त्याच्या या हीन अभिरूचीला त्याला न दुखावता आळा घालून योग्य वळण लावले पाहिजे.

**क) बिंब – प्रतिबिंब संबंध –** वाचकाच्या आवडीनिवडी, अपेक्षा, विचार आचार या साऱ्याचे प्रत्यक्ष -अप्रत्यक्ष प्रतिबिंब वृत्तपत्रात सतत उमटत असते. व वृत्तपत्रातील लेखनाचे पडसाद वाचकांच्या मनात प्रतिबिंबीत होत असतात. स्वातंत्र्य लढ्यातील वृत्तपत्राने क्रांतीचे विचार प्रतिबिंबीत करण्याचे केलेले कार्य आपल्या समोर आहेच. बऱ्याचदा वृत्तपत्रातील विचार वाचताना आपण म्हणून जातो,''एकदम परफेक्ट, मला हेच म्हणायचे होते.''

**ड) माता बालक संबंध –** लहानपणी जशी आई 'असं करू नको, तसं करू नको' नाहीतर हे होईल असे सांगून शिकवित असते. पण हे शिकविण्यात दहशत, दटावणी, क्रूरता, आज्ञा किंवा प्रभूत्व गाजविण्याचा भाव नसतो. त्यात मायेचे आर्जव असते. विनंती असते. नम्रता असते. वृत्तपत्रांनी नव्या पिढीला सुधारण्याचे जे काम करायचे आहे ते याच भुमिकेतून करायचे आहे. बालक ही आईच्या आर्जवापुढे आपला दुराग्रह सोडते. वृत्तपत्र व वाचकातले हे नाते या पातळीवरचे असले पाहिजे.

**इ) भोक्ता–भोग्य संबंध** – वाचक हा वृत्तपत्राचा भोक्ता असतो.त्याला हव्या असणाऱ्या गोष्टी, विचार,रंजन, प्रबोधन – (भोग्य) वृत्तपत्रांनी त्याला द्यायचे असते. त्याची ज्ञानतृष्णा शमवायची असते. वैचारिक भूक भागवायची असते. कुटुंबात एकच वृत्तपत्र घेतले जाते. त्यातील सर्व घटकांना आपलेसे वाटेल असा ढाचा वृत्तपत्राचा असणे आवश्यक आहे.

**ई) उद्दीपक – उदीप्य संबंध –** वाचकाच्या मनात राष्ट्रप्रेम, सद्भिरूची, सौंदर्यनिष्ठा, देशभक्ती, विवेकबुद्धी, उद्दिपीत करून ती वाढविण्याचे, तिला चालना देण्याचे काम वृत्तपत्रांनी करावयाचे असते व वाचकाने वृत्तपत्रीय वाचनातून आपल्या सद्भावना उद्दिपीत करून त्यांची जोपासना करावयाची असते. एखादा चांगला वैचारिक लेख तरूण पिढीच्या मनात देशाविषयी प्रेम जागृत करू शकतो. मात्र एखादा धर्मावरचा लेख तरूणांना धर्मांध बनवून नवे दहशतवादी निर्माण करू शकतो. म्हणूनच नीरक्षीर विवेक बुद्धीने लेखन **करुन** वाचकाच्या सद्गुणांचे उद्दिपन करण्याचे काम वृत्तपत्राने केले पाहिजे.

**फ) शिक्षक – विद्यार्थी संबंध** – वृत्तपत्र हे एका अर्थाने शिक्षकाची भूमिका करत असते. समाजात घडणाऱ्या विविध घटनांच्या बातम्यातून, वृत्तलेख,अग्रलेख, विनोद, बोधकथा इ.सदरांच्या माध्यमातून ते वाचकांचे प्रबोधनच करत असते.वाचकही अपघाताच्या बातमीपासून वैचारिक लेखापर्यंत प्रत्येकातून प्रत्यक्षाप्रत्यक्ष कोणते ना कोणते शिक्षण घेत असतो.

**ग) प्रेरक – प्रेरित संबंध** – वृत्तपत्र हे प्रेरक असते स्वातंत्र्यपूर्वकाळातली वृत्तपत्रे हे याचे सुंदर उदाहरण आहे. वृत्तपत्रात येणाऱ्या विधायक बातम्या,लेख एक चांगली पिढी, समाज सुधारक,

नेता, नागरीक निर्माण करु शकतात. बाबा आमटेंच्यावरील लेख वाचून कितीतरी तरुणांनी महारोग्यांच्या सेवेचे व्रत घेतले. पूरग्रस्तांना मदत करणारी तरुण मंडळे याचे उत्तम उदाहरण आहेत. सांगलीतले 'विसावा चौक तरुण मंडळ' आष्टाचे 'फ्रेंडशिप मंडळ ' याची उत्तम उदाहरणे म्हणून सांगता येतील.

वाचक व वृत्तपत्र यांचे नाते अशा विविध पातळीवर नटलेले असते. एकूण काय तर

☆ हे संबंध मित्रत्वाचे हवेत.

☆ जिव्हाळ्याचे हवेत,

☆ विश्वसनियतेच्या पातळीवर दृढावलेले हवेत.

☆ पारदर्शक हवेत.

नाहीतर वृत्तपत्र व वाचकातला विसंवाद, बेबनाव, अविश्वास दोघांनाही अध:पतनाकडे नेतो. दोघेही एकमेकांवर कुरघोडी करू पाहतात. परस्परांना फसवू पाहतात. एक गंमतशीर उदाहरण फार बोलके आहे. मध्यंतरी एका वृत्तपत्राच्या लोकप्रियतेचा सर्व्हे घेण्यासाठी काही मुली आल्या. त्यांनी विचारलेल्या बहुतेक प्रश्नांना 'क्ष' कुटुंबातील व्यक्तीने खोटीच उत्तरे दिली. त्यांचाच पेपर चांगला म्हणून सांगितले नि त्यांनी पाठ वळताच ''कोण वाचणार यांचा भिकार पेपर ?''अशी प्रतिक्रिया उमटवली. याउलट काही कुटुंबांना एका वृत्तपत्राच्या कार्यालयातून फोन आला, ''आम्ही तुम्हांला हा संपूर्ण आठवडा आमचे वृत्तपत्र मोफत पाठवित आहोत. आपण वाचून आपला अभिप्राय नोंदवावा '' त्यांनी फोन नंबरही दिला. पण या घटनेला वर्ष झाले त्यांचा पेपर आला नाही की त्यांनी फोन उचलला नाही. या दोन्ही घटना बोलक्या आहेत. दोघांमध्येही अविश्वासाची एक अदृश्य भिंत उभी आहे.

ही अविश्वासाची भावना जोपर्यंत आहे तोपर्यंत दोघांचेही कल्याण साधणार नाही. पर्यायाने देशाचे कल्याणही. यासाठी वृत्तपत्रांनी काही गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत. त्या म्हणजे --

- वृत्तपत्राने वाचकाभिमुख बनण्याचा प्रयत्न करावा.
- मात्र वाचकाच्या अधीन जाउ नये.

- वाचकामध्ये सद्भिरुची निर्माण करण्याचे काम करावे.
- वाचकाच्या व्यक्तिमत्वाला विधायक वळण लावायचा प्रयत्न करावा.
- वाचकाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी त्याला ज्ञानाची द्वारे मोकळी करण्याची पराकाष्ठा करावी.
- मराठी संत कवी दासोपंताप्रमाणे 'न पाहे श्रोत्यांचे(वाचकांचे)वदन' अशी 'who care' ची बेफिकीर भूमिका ठेऊन 'मी म्हणेन ती पूर्व' असे वागू नये.
- वाचकाभिमुखता व आत्मस्वाधीनता याचा योग्य मेळ घालावा सुवर्णमध्य साधावा.

या बरोबर वाचकानेही काही गोष्टींचे पथ्य पाळावे.

- वृत्तपत्र मागणी तसा पुरवठा करणारे असले तरी आपण 'रास्त' मागणी करावी.
- अश्लील, असभ्य, खोट्या, अतिरंजित मजकूरावर वेळीच अंकुश लावावा.
- त्यातील मजकुराची विश्वसनीयता तपासून पहावी.
- नीरक्षीरविवेक बुध्दीने त्यातले चांगले ते घ्यावे.मध्यंतरी एका लहान मुलाच्या अपहरणाचे वृत्त वाचून एका सधन कुटुंबातील मुलाने 'हिरो होंडा' घेण्यासाठी एका मुलाचे अपहरण केले. प्रतिष्ठित घराण्यातल्या पापभीरु मुलाने केलेले कृत्य पाहून सर्वांनी तोंडात बोटे घातली,''कुठुनही अवदसा सुचली ?'' असे विचारणाऱ्या त्याच्या वडीलांना त्याच्या खिशात अशा टाइपच्या बातम्यांची कात्रणे मिळाली.
- वाचकाने वृत्तपत्राकडून अवास्तव अपेक्षा करु नयेत.

- एक ग्राहक व दुकानदार असे व्यवहारी नाते ठेवू नये. बऱ्याचदा वाचक वृत्तपत्राना 'माल' असे संबोधतात. ''अमुक वृत्तपत्र कशाला घेतोस ? सगळा रद्दी माल असतो त्यात!'' हे उद्गार मनाला क्लेष देतात.

वृत्तपत्र आणि वाचक यांच्यात चांगला सूर जुळला तरच समाज प्रगती करू शकतो. नाहीतर चिखलातल्या रेड्यासारखी गत होते. या दोघांचे नाते परस्पर सन्मुख हवे. संस्कृतमधल्या एका सुभाषितात म्हटले आहे -

''शशिनाच निशा निशयाच शशी शशिनानिशयाच विभाती नभः

कविनाच विभु विभुनाच कवी कवीनाविभुनांच विभाती सभा ।। ''

याप्रमाणे वाचक व वृत्तपत्रांना परस्परांमुळे शोभा येते हे विसरून चालणार नाही.

एकूण वृत्तपत्रांनी वाचकाची अभिरूची विकसित करून त्याचे 'अभिमत' तयार करण्याचे व त्यातुन सुजाण, देशनिष्ठ नागरिकांची फळी निर्माण करण्याचे काम करायचे आहे तर वाचकांनी वृत्तपत्राच्या रूपात एक उच्च अभिरूची जोपासणारे, आदर्श, देशभक्तीचे प्रसार करणारे, ज्ञानदान देणारे व्यासपीठ निर्माण करायचे आहे व उभयतांनी देशोन्नतीच्या कार्यास हातभार लावायचा आहे.

जोसेफ वॉर्ड या पत्रकाराने तर स्पष्ट म्हटले आहे - ''तुमचे वृत्तपत्र विचार वा कृती यांच्या बाबतीत कोणाच्या अंकित होणार नाही याची मात्र काळजी घ्या. वृत्तपत्र हे जे लोक चालवतात त्यांचे नसते. वृत्तपत्राची मालकी ज्यांच्याकडे आहे त्यांचेही नसते. वृत्तपत्र हे जनतेचे असते. ती जनतेचा आवाज, त्यांची ढाल, त्यांच्या आकांक्षांची ग्वाही असते आणि ते स्वतंत्र ठेवण्यासाठी आपण स्वतंत्र, प्रामाणिक आणि निष्ठावान राहिले पाहिजे.''[१]

महात्मा गांधींनीही वाचकांना महत्व देणारे उद्दिष्ट सांगितले आहे. –

---

१. वृत्तसाधना - श्री. कर्णिक द्वा. भ. - प्रकरण ३ रे - पान क्र. ४५

''वृत्तपत्राचे एक उद्दिष्ट लोकभावना समजावून घेऊन त्यांना वाचा फोडणे व दुसरे लोकांमध्ये सद्‌भावना जागृत करणे, तिसरे लोकांमधील दोष निर्भिडपणे चव्हाट्यावर मांडणे.''[१]

वाचकांच्या विचारांना वळण देण्याचे कार्य आपल्याला करायचे आहे हे विसरून वृत्तपत्रे वाचकांना हवे ते देण्याचा प्रयत्न करतात. वाचकांचा विरोध न पत्करता 'मागणी तसा पुरवठा' करण्याकडे वृत्तपत्रांचा कल दिसतो. मात्र वाचकाच्या गुणांबरोबर त्याचे दोषही दाखवण्यास वृत्तपत्रांनी कचरू नये. १९४९ साली अमेरिकेत जी राष्ट्रीय परिषद भरली होती

त्यात एक संपादकीय लेखनामागील तत्वाबद्दलचे मूलभूत निवेदन तयार केले होते.[२] त्यातला दुसरा नियम यादृष्टीने महत्वाचा वाटतो. –

☆ वस्तुस्थितीच्या आधारे वस्तुनिष्ठ निष्कर्ष काढावे. पुराव्यांचा त्याला आधार द्यावा व जास्तीत जास्त लोकांच्या कल्पनांचा विचार करावा.

वाचकातील उणीवा, त्याचा स्वार्थ, त्याचे अज्ञान, त्यांचे पूर्वग्रह यांचे प्रतिबिंब वृत्तपत्रात उमटणारच तरीही समाजहिताच्या दृष्टीने तीन उद्दिष्ट्ये लक्षात ठेवावी. –

१) स्वार्थात थोडी सामाजिक जाणीव आणणे.

२) अज्ञानात थोडी ज्ञानाची भर घालणे.

३) पूर्वग्रहाच्या जागी थोडी समजूत आणणे.

वाचकवर्ग लक्षात घेउन वृत्तपत्रांनी त्यांच्या आवडीची सदरे द्यावीत. वाचकांना निरागस आनंद देणे हेच वृत्तपत्रांचे ध्येय असले पाहिजे. वाचकांच्या आशा - आकांक्षाना जो संपादक वाचा फोडतो त्याचे वृत्तपत्र समाजमनाची पकड घेते.

---

१. वृत्तसाधना - श्री. कर्णिक द्वा. भ. - प्रकरण ३ रे - पान क्र. ४५

२. वृत्तसाधना - श्री. कर्णिक द्वा. भ. - प्रकरण ३ रे - पान क्र. ५१

वृत्तपत्र व वाचक यांच्या नात्याचा विस्तृत उहापोह केल्यानंतर या वाचकाच्या वृत्तपत्राकडून येणाऱ्या अपेक्षांचा विचार करावा लागतो.

## २.३ पूर्वीचा वाचकवर्ग व त्याच्या अपेक्षा -

स्वातंत्र्यप्राप्तीपूर्व कालातील वृत्तपत्राचां वाचकवर्ग हा एका विशिष्ट जाती-गटाचा होता. इंग्रजी ज्ञानाने सज्ञान झालेले मूठभर लोक याचे वाचक होते. याकाळची सामाजिक परिस्थिती पाहिली की त्यावेळचा वाचकवर्ग कसा होता याची कल्पना येईल. त्याकाळात लोक अस्तिकता व नास्तिकता या दोन्हीमध्ये दोलायमान स्थितीत लटकत होते. अधिभौतिकतेमुळे अध्यात्मिक जीवन विस्कळीत झाले होते. मुठभर लोक इंग्रजी शिकले होते. ते हक्सले, मिल व स्पेन्सरचे अनुयायी झाले होते. परंतु त्यांना आपल्या मौलिक साहित्याची जाण जेमतेमच होती. ते भूतकाळाचा तिरस्कार करत होते व त्यांचा भविष्यावर विश्वास नव्हता. ते आंधळेपणाने इंग्रजांच्या रितीरिवाजांची नक्कल / अनुकरण करत होते. आपल्या कलेचा विनाश करून इंग्रजी वस्तूंनी घर सजवत होते. राष्ट्रीय भावनेच्या जोशाचा त्यांच्यात लवलेशही नव्हता. राष्ट्रजीवनाची गती सांगणारी एकही कृती त्यांच्यात नव्हती. जणू काही त्यांच्या हदयाची स्पंदने मृतवत झाली होती. देशाची स्थिती अतिशय शोचनीय झाली होती. दुष्काळसदृष्य स्थिती, साथीचे रोग, शेतकऱ्यांची दुरावस्था या समस्या दिवसेंदिवस वाढतच होत्या. एकीकडे अशी दयनीय स्थिती तर दुसरीकडे स्वातंत्र्यचळवळीचे वारे वाहू लागले होते.

अशा स्थितीत मूठभर ब्राम्हण समाजाशिवाय वृत्तपत्र वाचायचा प्रपंच कोण करणार ? अशा वाचकांना फटकारून त्यांच्या या स्थितीबद्दल दुःख व्यक्त करताना 'उदन्त मार्तंड' च्या संपादकांनी लिहिले आहे. –

''शुद्र चाकरी आदी नीच काम करते है उन्हे पढाई लिखाई आदि से मतलब नही । कायस्थ, फारशी, उर्दू पढा करते है और वैश्य अक्षर समूह सीखकर बही खाता करते है, खत्री बजाजी आदि करते है, पढते लिखते नही । ब्राम्हणोंने तो कलियुगी ब्राम्हण बनकर पठन पाठन को तिलांजली दे रखी है । फिर हिंदी का समाचार पत्र कौन पढे और खरीदे ?''[१]

---

१. मीडियाके पचास वर्ष - प्रेमचंद पतंजलि (संपा.) पृष्ठ क्र. ११ राधा पब्लि. दिल्ली.

एकूण वृत्तपत्र वाचकांची स्थिती शोचनीयच होती हे वाचक –

- एका विशिष्ट चाकोरीतच जगणारे
- जातीधर्माचा, वर्णव्यवस्थेचा पगडा मनावर असणारे
- अध्यात्म, मोक्ष, स्वर्ग, जन्म, पुनर्जन्म या कल्पनेत गुरफटलेले
- नव्या ज्ञानाबद्दल ओढ वा उत्सुकता नसलेले (सनातनी वृत्तीचे)
- सामाजिक व राष्ट्रीय भावना नसलेले
- आर्थिक व राजकीय परीस्थितीत अस्थिरता असलेले
- राष्ट्रीयत्वाचा अभाव असलेले
- अस्थिर सामाजिक जीवन जगणारे
- अंधश्रध्दा, अज्ञान यांच्या भाराखाली वावरणारे
- अडाणी, सनातनी वृत्तीचे
- रूढी परंपरा व अंधधर्मभक्तींचा फैलाव असलेले
- नोकरशाहीत अभिमान बाळगणारे
- गरीबी, दारिद्रय, उपासमार यांनी ग्रासलेले
- मोजकेच वाचक सुशिक्षित, पाश्चात्य संस्कृतीची छाप असलेले
- स्वतःची अशी जीवन परंपरा नसलेले
- इंग्रजांच्या सत्ताक्रमणाबद्दल फारसे सोयरसुतक नसलेले असे होते.

परिणामी पेपर घेऊन तो वाचावा व क्रांतीचे विचार घ्यावेत असे वाटणारे लोक हाताच्या बोटावर मोजण्याइतके होते.

कृष्णराव भालेकरांनी ' दिनबंधू' वृत्तपत्र काढताना म्हटले आहे - ''आजपर्यंत उच्चविद्याविभूषित, सुसंस्कृत मंडळींनी जी वृत्तपत्रे चालविली त्यात त्यांनी बहुजन – हरिजन – शेतकरी – शेतमजूर – शेतमजूर स्त्रिया, मुले, गिरीजन, आदिवासी यांचा विचार केला नाही.''[१]

महात्मा फुले या पत्रात म्हणतात – ''एकंदर सर्व भट वर्तमानपत्र कर्त्यांची आणि क्षुद्र, अतिशुद्रांची जन्मातून एकदासुद्धा अशा कामी गाठ पडत नाही. त्यातून अतिशुद्रास तर वर्तमानपत्र म्हणजे काय? कोल्हा, कुत्रा का माकड हे समजत नाही. तर मग अशा अनोळखी अतिशुद्रांची मने या सर्व सोवळ्या वर्तमानपत्रात कोठून कशी कळणार? ''

हे उद्‌गार तत्कालिन वाचकाच्या स्थितीचे निदर्शक आहेत.

या वाचकांच्या अपेक्षा काय असणार? किमान अपेक्षा असणाऱ्या या पूर्वीच्या वाचकवर्गाच्या अपेक्षा एवढ्याच होत्या की –

१) इंग्रजी ज्ञानाचा परिचय व्हावा.

२) इंग्रजी आक्रमणापासून मराठी संस्कृतीचा बचाव करणे.

३) अंधश्रद्धा, अज्ञानात पिचणाऱ्या लोकांना नवा दृष्टीकोन मिळावा.

४) शेतकरी, कामकरी, आदिवासी यांची स्थिती पालटावी.

५) वैचारिक क्रांती होऊन स्वातंत्र्य मिळावे.

६) वैचारिक, मानसिक, राजकीय गुलामगिरीतून मुक्तता.

७) वृत्तपत्रांनी सामान्यांची दुःखे वेशीवर टांगून त्याची स्थिती सुधारावी, स्वातंत्र्यलढ्यास चालना द्यावी.

८) स्वदेश, स्वभाषा, स्वहित व स्वदेशी यांचा प्रसार करावा.

तत्कालिन वाचक व वाचकांच्या अपेक्षा पाहिल्यानंतर त्याकाळातील वृत्तपत्रांचे विषय कोणते होते याचा विचार करणे गरजेचे ठरते.

## २.४ स्वातंत्र्यपूर्वकालिन वृत्तपत्रातील विषय, बातम्यांचे स्वरूप –

स्वातंत्र्यपूर्वकालिन वृत्तपत्रे ही एका निश्चित ध्येयाने प्रेरित होऊन निघाली होती. इंग्रजी शिक्षणाने सुज्ञ झालेल्या समाज धुरीणांना आपल्या देशबांधवांची स्थिती सुधारावी असे प्रामाणिकपणे वाटत होते. आपल्या अडाणी, अंधश्रद्धाळू समाजाला बहुआयामी इंग्रजी भाषेतील विविध विषय कळावेत. त्यांना जीवनाकडे पाहण्याचा एक नवा दृष्टीकोन मिळावा. त्यांच्या अंधश्रद्धा, जुने रीतीरिवाज सोडून त्यांनी नवे विचार आत्मसात करावेत असे त्यांना वाटे. म्हणून त्यांनी वृत्तपत्रात नवनवे विचार व अंधश्रद्धांवर, जुन्या रूढी परंपरांवर टीकेची झोड उठवली. क्रांतीचे विचार मांडले. एकीकडे इंग्रजी सत्तेची कृपा (ज्ञानाची भांडारे खुली) तर दुसरीकडे त्यांचे होणारे अन्याय अशा दुहेरी पातळीवर ते लेखन करत होते. लोकजागृतीच्या दृष्टीने नवे विचार मांडणे व त्याचवेळी इंग्रजी सत्तेबद्दलचा असंतोष पसरवणे हे काम वृत्तपत्रे करत होती.

गुलामगिरीविषयी चीड निर्माण करणे, स्वातंत्र्याबद्दलचे प्रेम वाढवणे या त्यांच्या अपेक्षा होत्या. त्याचबरोबर ब्रिटीश सरकारबद्दल असहकाराची बीजे रूजविणे या हेतुने या वूत्तपत्रांनी प्रामुख्याने पुढील विषय हाताळले. –

- प्रारंभीच्या काळात व्यापार विषयक बातम्या, युद्धवार्ता, गुप्त बातम्या, कंपनीच्या व्यापाराची माहिती, शासकीय बातम्या, सरकारी नोटीफिकेशन्स्.
- शासनावर टिका, इंग्लंड पार्लमेंटमधील चर्चा, परदेशी बातम्या, जाहिराती.
- सुधारणावादी विचार, कंपनी कायदा विरोध, लेखनस्वातंत्र्याचा पुरस्कार
- धर्मप्रसार, भारतीयांचे प्रबोधन, लोकजागृती
- जुन्या रूढी परंपरा, अनिष्ट चालींना विरोध, सामाजिक सुधारणांचा पुरस्कार

- हिंदू धर्माची बाजू मांडणे, सनातनी बाजू मांडणे.
- राष्ट्रभक्ती जागृती, स्वातंत्र्यसंग्राम
- इंग्रजांवर टीका, विरोध
- मनोरंजक गोष्टी, विविध बातम्या, कोडी, उखाणे, खेळ
- चित्रे, बोधकथा, कलाकौशल्य, सरकारी अधिकाऱ्यांच्या बदल्या, फोटोग्राफी, टेलीग्राफीवर माहिती.
- काव्यशास्त्र विनोद, नीतीज्ञानपर विषय, देशोदेशीची वर्तमाने
- वाचकांची पत्रे, विधवा विवाह, स्त्री शिक्षण, विनोद, व्यंगचित्रे, बाजारभाव, लोकहितवादींची शतपत्रे
- शेतकऱ्यांची गाऱ्हाणी, थोर लोकांची माहिती, चिपळूणकरांची निबंधमाला
- ह.ना. आपटेंच्या कादंबऱ्या

याशिवाय या वृत्तपत्रातील बातम्यांचे स्वरूप पुढीलप्रमाणे असे -

- गुप्त बातम्या
- व्यापारविषयक बातम्या, गुप्त वार्ता, लढाया, युद्धवार्ता
- सुभ्यातील महत्वाच्या घडामोडी, व्यापारी घडामोडी.
- कंपनीच्या व्यापाराच्या, हितवर्धक बातम्या
- शासकीय बातम्या, परदेशी बातम्या
- १८५७ च्या बंडाच्या बातम्या
- स्वतंत्र बातमीदाराकडून आलेल्या बातम्या, वर्तमान सार

- राजकीय घडामोडी, शिक्षण विषयक, सरकारी अधिकाऱ्यांच्या बदल्या, सामाजिक प्रश्न
- स्वदेशी  चळवळीचे वृत्त
- विलायतेतील वर्तमाने

पूर्वीच्या वृत्तपत्रातील विषय व बातम्यांचे स्वरुप पाहिल्यानंतर आणखी एक महत्वाची गोष्ट आपणांस लक्षात घ्यावी लागते ती म्हणजे यामध्ये असणारी संपादकाची भूमिका त्याकाळी इंग्रजी ज्ञानाने संपन्न झालेल्या उच्चविद्याविभूषित अशा ब्राम्हण वर्गातील विद्वानांनी संपादकपद भूषवलेले दिसते. गंगाधर भट्टाचार्य, राजाराम मोहन रॉय, जुगलकिशोर शुक्ल,पराडकर, राहुल बारपुते, पं.मदन मोहन मालवीय, बाळशास्त्री जांभेकर, भाऊ महाजन, तात्या छत्रे, काकासाहेब लिमये, चिपळूणकर, महादेव रानडे, लो. टिळक, **गो. ग.** आगरकर, ह.ना. आपटे, परांजपे अशी कितीतरी नावे सांगता येतील. या संपादकाच्या भूमिका त्या काळाच्या पार्श्वभूमीवर महत्वाच्या ठरल्या.

## २.५ संपादकाच्या भूमिका –

- प्रबोधन व जागृती
- देशासाठी त्यागाची भावना जनमानसात रुजवणे.
- आर्थिक लाभ दुय्यम मानून समाजपरिवर्तनासाठी प्रयत्न करणे.
- देशनिष्ठा, राष्ट्रनिष्ठा या भावना वाढीस लावणे.
- गुलामगिरीस विरोध करणे.
- ज्ञानाचा प्रसार करणे.
- सामाजिक सुधारणा करणे.
- सामाजिक समस्यांची चर्चा करुन समाज परिवर्तन घडवणे.
- सामान्यांच्या दु;खांना वाचा फोडणे.

- पत्रकारिता हे व्रत म्हणून निभावणे प्रसंगी तुरुंगवासाची ही तयारी ठेवणे.
- ब्रिटीश सत्तेच्या विरोधातली आपली मते परखडपणे मांडणे.
- सामाजिक विसंगतीवर टिका करणे.
- देशप्रेम वाढीस लावणे.
- सामाजिक प्रबोधन व वैचारिक जागृती करुन क्रांती घडवणे.
- स्वातंत्र्याची चळवळ वाढीस लावणे.
- मराठी संस्कृती, मराठी मन यांची जोपासना करणे.

संपादकाची भूमिका अशी व्यापक व चौफेर असली पाहिजे. 'संपादक त्याच्या चेहऱ्यापेक्षा त्याच्या लेखनाने ओळखला जातो' असे म्हणतात. ते सार्थ ठरले पाहिजे. संपादक हा ते पद लादलेला असला तर त्याला कशाचेच देणे घेणे नसते,'हाडाचा संपादक कधी विश्रांती घेत नाही.' करमणूक हा शब्द त्याच्या शब्दकोशात नसतो.पूर्ण मानवतावादी दृष्टीकोन,जनसामान्याविषयी तळमळ, प्रश्न समजून घेण्याची ताकद, बातमी जीव की प्राण मानणारा, अनुभवातून नाजूक प्रश्न सोडवणारा,आपल्या अधिकाराविषयी जाणीव या सर्व गुणांनी परिपूर्ण व्यक्तीच संपादकाची भूमिका समर्थपणे वठवू शकते. व्यवस्थापनाने त्याला दिलेल्या स्वातंत्र्याच्या चौकटी**चा** कुशलतेने जास्तीत जास्त वापर करून घेण्याचे कौशल्य त्याच्यात असावे लागते.

राजकीय पक्ष, गुन्हेगार, पोलिस, देशद्रोही संघटना, अवैध धंदेवाले,जाहिरातदार हे त्याच्या स्वातंत्र्याच्या मार्गातले अडथळे असतात.'टिकून राहणे 'हा त्याच्या कर्तृत्वाचा एक भाग ठरतो.स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटीश सरकारकडून संपादकाच्या विचार स्वातंत्र्यावर वरवंटा फिरवला जात असे. संपादकाच्या अंगी निडर वृत्ती असल्याने ब्रिटीशांपुढे मान झुकवत नसे. संपादक ताठ बाण्याचा हवा प्रसंगी आपले मत ठाम ठेवण्यासाठी तुरुंगवासही भोगण्याची

तयारी हवी. ''चांगल्या संपादकाचा एक पाय ऑफिसात व दुसरा पाय तुरुंगात असतो'' असे म्हंटले जाते ते खरेच आहे. लोकमान्य टिळक हे याचे उत्तम उदाहरण आहे.

आपल्या जबाबदारी व भूमिकेशी /मताशी ठाम असणारा,मानवतेशी दृढ नाते ठेवणारा, भाषेवर व बातमीवर प्रेम करणारा सहकाऱ्यांना योग्य मार्गदर्शन करणारा,लेखणीचे असिधारा व्रत अखंड चालवणारा अखंड उत्साह ठेवणारा, भाषेची उत्तम जाण असणारा, विभागाला विधायक दिशा देणारा,लोकहिताची तळमळ असणारा अशा विविध भूमिकांचे संगठन ज्याच्या व्यक्तीत्वात आहे असा संपादक श्रेष्ठ ठरतो. ब्रिटिशांच्या काळात अनेक संपादकांना एकेका शब्दाचे जाब दयावे लागले. १९७५ च्या आणीबाणीच्या काळातही आपल्या ठाम विचारापायी अनेक संपादकांना तुरुंगाची हवा खावी लागली. यापूर्वी १८७८ मध्ये ब्रिटिशांनी बंगाली भाषेतल्या 'आनंद बझार' पत्रिकेसाठी 'व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्ट' संमत करवून घेतला.

संपादक अशा बऱ्यावाईट घटनांचा साक्षीदार असतो. थोडक्यात संपादक हा बहुगुणी,बहुआयामी व्यक्तित्वाचा,हरहुन्नरी अवलिया असावा लागतो.सतत त्याला अष्टावधानी भूमिका पार पाडावी लागते. किंबहुना संपादकाचा दृष्टिकोन हा पूर्ण वृत्तपत्राचा दृष्टिकोन मानला जातो.

## २.६ संपादक व वाचकाचे नाते -- न्यायाधीशाची भूमिका :-

वास्तविक संपादक व वाचक यांचा प्रत्यक्ष समोरासमोर संबंध येत नाही तर वृत्तपत्रातील संपादकीय पानातून संपादक डोकावत असतो व वाचकाला भेटत असतो तर वाचकांचा पत्रव्यवहार, प्रतिक्रिया यांच्यामधून वाचक त्यांना भेटतो. या दोघांच्या नात्यात एकप्रकारची अलिखीत आचारसंहिताच लपलेली असते.

- संपादक हा सतत वाचकाच्या हिताची जाणीव ठेऊन आपले लेखन **किंवा** संपादन करीत असतो. वाचकाने आपल्या कल्याणाच्या उत्तदायित्वाची जबाबदारीच संपादकावर मोठ्या विश्वासाने टाकलेली असते.

- संपादक वाचकाच्या कल्याणाशी निगडीत प्रत्येक गोष्टीचे निर्भीडपणे विवेचन, स्पष्टीकरण व समर्थन करत असतो व संपादकाने केलेले विवेचन हे जनकल्याणासाठी असणार याची खात्री बाळगूनच वाचक ते वाचत असतो.

- संपादक जेंव्हा जनकल्याणाचा प्रश्न येतो तेंव्हा अन्य कोणतेही बंधन **किंवा** दडपण न मानता निर्भिडपणे आपली मते प्रस्तुत करत असतो व वाचक आपल्या कल्याणाबाबत निर्भिडपणे विचार मांडणाऱ्या संपादकाच्या पाठीशी ढाल बनून रहात असतो.

- जाणता संपादक हा वाचकांच्या बाबतीत पूर्ण ईमानदारी ठेऊन वागत असतो तर वाचकही ईमानी संपादकाशी कधी प्रतारणा करीत नाही.

- संपादक आपल्या बातम्या देताना वा मतप्रदर्शन करताना कसलाही पक्षपातीपणा करीत नाही उलट निःपक्षपाती भूमिकेतून त्या प्रस्तुत करीत असतो. वाचकालाही संपादकाच्या या निःपक्षपातीपणाबद्दल गाढ विश्वास असतो.

- संपादक आपल्या कामात नैतिकतेचे भान ठेऊन काम करीत असतो. कुणाही व्यक्तीच्या चारित्र्याला बाधा येईल असे लेखन तो करीत नाही. वाचकही संपादकाची नैतिकता तावून सुलाखून घेऊन मगच त्यावर विश्वास टाकतो.

- संपादक लोकांच्या अभिरूचीच्या चढउताराचे भान ठेऊनच लेखन करीत असतो. वाचकाची अभिरूची संपादकाच्या दर्जेदार लेखनातूनच घडत असते.

- घटना वरवर पाहणे, ऐकणे तेवढ्यापुरतेच ज्ञान न ठेवता संपादक कुठल्याही घटनेचे विश्लेषण करत असतो. तत्सदृष्य पूर्वीच्या घटना व चालू घटनांचा संबंध - फरक दाखवून त्याचा अन्वय लावण्याचा प्रयत्न करत असतो. त्याच घटना देशाबाहेर घडत असल्यास त्याचाही संबंध दाखवतो.

- संपादकीय लिखाण हे सर्वांसाठीच असते पण वाचक मात्र ते वाचतातच असे नाही. अग्रलेख, संपादकीय वाचणाऱ्या वाचकाचा एक विशिष्ट वर्ग असतो (प्राध्यापक, वकील, सरकारी कर्मचारी)

- एक विशिष्ट वाचकवर्ग केवळ संपादकीयाकरताच वृत्तपत्र घेत असतो. कारण त्यात सर्व महत्वाच्या बातम्यांचे सार समाविष्ट असते.

- संपादक स्वतःच्या अभिरूचीने लिहितो. स्वतःची परखड मते मांडताना वाचकांना काय वाटेल याचा विचार करीत नाही.

- त्याने अनिष्ट गोष्टीवर केलेली टीका वाचकाला रूचेल असे नाही. चांगल्याचे कौतुकही सर्वच वाचकांना रूचेल असे नाही.

- संपादक घटनांचे संदर्भ, बारकावे यांचे योग्य अर्थ लावत असतो. वाचकांना जे समजत नाही ते सांगण्याचे काम तो करतो. बऱ्याचदा वाचकाने लावलेले चुकीचे अर्थ अशा लेखामुळे सुधारतात.

- चांगल्या संपादकीयाला वाचकांचा उदंड प्रतिसाद मिळतो. मात्र संपादकाने एकांगी लेखन केल्यास त्याच्यावर टीकास्त्र सोडून वेळीच जागेवर बसविण्याचे काम वाचक करतो.

- चांगले संपादक वाचकावर सद्भिरूची व परिपूर्णतेचे संस्कार करतात.

- चांगल्या संपादकाने एखाद्या चांगल्या सामाजिक कार्यास केलेल्या आवाहनाला वाचक उत्तम प्रतिसाद देतो. उदा. **पुढारीने केलेले** भूकंपनिधी, पूरनिधी इ. **बाबतचे आव्हान**

संपादक व वाचकाचा हा स्नेहसंबंध अभ्यासल्यावर संपादकाने आपल्या कामात न्यायाधीशाची भूमिका करायची असते हे जाणवले. शरीर आणि आत्म्यासारखे हे संपादकाचे वृत्तपत्रातले स्थान असते.

## २.७ वाचकाचा स्तर व त्याची आवड –

स्वातंत्र्यपूर्व काळातला वाचकवर्ग हा सामान्य स्तरातला (मध्यमवर्गीय) होता. इंग्रजी शिक्षणाने ज्ञानाची कक्षा रूंदावलेले विद्वान व समाजसुधारक याचे वाचक होते. संपादकाने वृत्तपत्राचे संपादन करताना वाचकवर्ग कोणत्या स्तरातील आहे, त्याची आवड काय आहे, त्याचा कल कशाकडे आहे हे पाहिले पाहिजे हे खरे असले तरी पूर्वीचा वाचक वर्ग, त्याचा कल पाहताना हे जाणवते की स्वातंत्र्यपूर्वकालीन वृत्तपत्राचा

वाचक हा कल, आवड वा टाईमपास म्हणून वृत्तपत्र वाचत नव्हता. तर स्वातंत्र्यचळवळीचे, नव्या संशोधनाचे, प्रगतीचे, नव्या विचारांचे वृत्त समजून घेण्याची गरज म्हणून वृत्तपत्र वाचत होता.

त्या काळच्या स्वातंत्र्य लढ्याच्या पार्श्वभूमीवर समाजात घडणाऱ्या प्रत्येक घडामोडीचे ज्ञान करून घेणे ही प्रत्येकाची गरज होती. पारतंत्र्याची झळ अगदी सामान्यातल्या सामान्य माणसाला बसत होती. इंग्रजांचे अत्याचार वाढत होते. सर्वसामान्य माणसे गुलामगिरीत भरडली जात होती. अशावेळी ब्रिटीश सत्तेविरूद्ध असंतोष पसरवून जनजागृती करण्यासाठी लेखणीचे हत्यार या संपादकांनी उपसले होते. या असंतोषाचे लोण तळागाळातल्या लोकांपर्यंत पोहोचविण्याचा ते प्रयत्न करीत होते. ब्रिटीशांच्या अत्याचाराच्या नित्य नव्या वार्ता वृततपत्रात झळकत होत्या. संवेदनाहीन समाजमनात क्रांतीची ज्योत चेतवणे ही काळाची गरज होती. त्यामुळे हा वाचकवर्ग सध्याच्या वाचकापेक्षा निराळा होता.

सामाजिक क्रांती जेथे घडू पहाते आहे. असंतोषाचे बीज पेरले गेले आहे. सामान्य माणसाच्या मनातल्या गुलामगिरीच्या चीडीने त्याला हौतात्म्य स्विकारण्याची प्रेरणा दिली आहे. स्वातंत्र्यास्तव हसत हसत फासावर जाणाऱ्या भगतसिंग, राजगुरू यांचा आदर्श पुढे आहे. कल्पना दत्त, सुनीती चौधरी यासारख्या वीर तरूणी बलिदान देत आहेत. आझाद हिंद सेना क्रांतीचे शिंग फुंकते आहे असे वातावरण भोवती आहे.

त्या काळात समाजमन घडविण्याचे काम लोकमान्य टिळकांनी केले. त्यांनी आपल्या अग्रलेखांनी वृत्तपत्रसृष्टीत एक प्रमाण घालून दिले. भाषा सजविण्यासाठी फारसे परिश्रम न घेता आंतरिक तळमळीतून आलेले सुबोधपण, काळजाला भिडणारे त्यांचे अग्रलेख केवळ भाषेचा उत्तम नमुनाच नव्हते तर पोटतिडकीने समाजाच्या कल्याणासाठी त्यांनी केलेली सिंहगर्जना होती. विलक्षण आवेग, निश्चयीपणा, समाजहिताची कळकळ यातून त्यांचा प्रत्येक अग्रलेख अवतरला होता. त्यांना उपमा, दृष्टांत, विनोद व शब्दच्छल करून केवळ भाषेचे सौंदर्य वाढवायचे नव्हते. तर त्यांना ब्रिटीशांच्या अन्यायाविरूद्ध लढा देणारी लोकांची फळी निर्माण करावयाची होती. त्यांनी स्वतःच म्हटले आहे,''केसरीतील लेख लिहित असताना, भाषा सौंदर्याकडे मी फारसे लक्ष देत नाही. माझ्या अंतःकरणात असलेले विचार जितक्या सोप्या भाषेत कळवता येईल तितके कळवण्याचा प्रयत्न मी करीत असतो.

अंतःकरणात घोळत असलेले विचार सहज बाहेर पडलेल्या भाषेने लोकांसमोर ठेवल्याने त्याचा त्यांच्या मनावर परिणाम होतो. मी जेंव्हा कडक टीका करतो तेंव्हा खरोखर माझ्या मनामध्ये रागाचा आवेश आलेला असतो.''[१]

वृत्तपत्रात अग्रलेख लिहिताना भारतीयांच्या मनात स्वदेशाभिमान जागृत करणे, ब्रिटीश राजवटीबद्दल असंतोष निर्माण करून स्वातंत्र्यासाठी त्यागवृत्ती निर्माण करणे या हेतूने त्यांनी धगधगते अग्रलेख लिहिले. केवळ स्वातंत्र्य या विषयावरच अग्रलेख न लिहिता त्यांनी समाजाशी संबंधित प्रत्येक विषयावर अग्रलेख लिहिले. स्वदेशी, स्वराज्य, स्वभाषा, स्वधर्म, राष्ट्रीय शिक्षण व देशप्रेम या षट्सुत्रीबरोबर त्यांनी सामाजिक विषयही हाताळले. शेतीविषयक प्रश्नांचा अभ्यास करून त्यावर अग्रलेख लिहिले. त्यांचा प्रत्येक अग्रलेख हा वैचारिक व वाङमयीनदृष्ट्या अत्यंत सकस होता. स्वराज्य, शेती, शेतकरी, खोती, दुष्काळ, धर्म, सामाजिक सुधारणा, सर्वांगीण शिक्षण, ब्रिटीशांचे गुणदोष, कंपनीसरकार, सुधारणा, वृत्तपत्र स्वातंत्र्य तसेच ब्रिटीश राजवटीबद्दलचे चाळीस अग्रलेख त्यांनी लिहिले.

सर्वांगीण शिक्षण, बहिष्कार, काँग्रेस, समाजसुधारणा, स्त्रीवर्गाच्या सुधारणा, मराठी भाषा अशा अनेक विषयावर त्यांनी लेख लिहिले. त्यांनी लिहिलेले मृत्यूलेख, ग्रंथपरीक्षणे ही त्या काळच्या जनमनाची मशागत करण्यासाठी महत्वाचे ठरले. ऐतिहासिक, पंचांग, संशोधनपर, आशियातील राजकारणाविषयी असे अनेक अग्रलेखही लिहून त्यांनी समाजाच्या हरेक अंगाला स्पर्श केला. लो. टिळकांनी स्वराज्याच्या जन्मसिद्ध हक्काची घोषणा केली आहे. अशा वातावरणातल्या समाजाच्या विविध स्तरातून हा वाचकवर्ग आला आहे.

शब्दाच्या स्फुल्लिंगानी हा बंडाचा भडका उडवणे ही काळाची गरज होती व त्यासाठी या वृत्तपत्रातला शब्द न् शब्द हरेक माणसाच्या अंतःकरणापर्यंत भिडवणे ही वाचकाची गरज होती. लो. टिळकांचा केसरी कुणी हौस म्हणून वाचत नव्हते तर 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?' या सारखा जहाल लेख टिळक मनोरंजन म्हणून लिहीत नव्हते. ती एक काळाची गरज होती हेच खरे. (लो. टिळकांच्या अग्रलेखाचे विषय परिशिष्ठात दिले आहेत.

---

१. अग्रलेखकार लो. टिळक- डॉ. विश्वास मेहंदळे- केसरी मराठा ट्रस्ट.

## २.८ स्वातंत्र्योत्तर काळातील वृत्तपत्रे -

स्वातंत्र्यपूर्व काळातल्या पत्रकारितेसमोर स्वाधीनता, सामाजिक परिवर्तन, पुनर्जागरण हे उद्देश होते. स्वातंत्र्योत्तर काळात सामाजिक परिस्थिती बदलली. गणेश शंकर विद्यार्थी यांनी म्हटल्याप्रमाणे ''जिन लोगोंने पत्रकारिता के पवित्र कार्य को अपना काम बना रखा है, उनमे बहुत काम ऐसे लोग है जो अपने चित्तको इस बातपर विचारका अवसर देते है कि, हमें सच्चाई की लाज रखनी चाहिए. केवल अपनी मख्खन रोटी के लिए दिनभर कई रंग बदलना ठीक नही । इस देशमें भी दुर्भाग्यसे समाचार पत्रों और पत्रकारों का यही मार्ग बनता जा रहा हैं यहाँ भी अब बहुतसे समाचार पत्र सर्वसाधारण के कल्याण के लिए नही रहे, सर्वसाधारण अपने प्रयोग की वस्तु बने जा रहे है ।''[१]

प्रत्यक्षात वस्तूंच्या किंमती झपाट्याने बदलल्या. ईमानदारी, भारतीयता, निर्व्यसनीपणा रुढिवादी गोष्टी झाल्या. धूर्तपणा, व्यसनाधीनता, थाटमाटाला महत्व आले. देशभक्ती लोपली वृत्तपत्रे मालकांच्या ताब्यात गेली. नवे आर्थिक वळण लागले. पत्रकारिता हा धर्म न राहाता व्यवसाय झाला. श्रीमंत शेठ वृत्तपत्राचे मालक झाले. संपादक व इतरांना मजूराचा दर्जा मिळाला. स्वातंत्र्य मिळताच पूर्वीचा जोश थंड पडला. आदर्श बदलले. राष्ट्रहिताच्या बाबतीत उदासिनता आली. व्यक्तिगत स्वार्थाला महत्व आले. सांप्रदायिकता वाढली. जुने आदर्श संपले. वृत्तपत्रांना पूर आला. मात्र ही वृत्तपत्रे शासनाच्या स्वाधीन झाली. पूर्वीच्या वृत्तपत्रांचा एकमेव उद्देश ब्रिटिश हटवणे हा होता. त्यामागे सेवाभाव होता. व्यक्तिगत समस्येला स्थान नव्हते.

आज वृत्तपत्रांना उद्योगाचे रूप आले आहे. विविध प्रकारची मालकी. औद्योगिक समस्या , बदल यांचा सामना करावा लागतो आहे. स्वातंत्र्यानंतर पत्रकारिता हा व्यवसाय होऊन शासन व भांडवलदारांच्यात संघर्ष निर्माण झाला. स्वतंत्रपत्रकारिता व सत्ता याच्यातला संघर्ष शासन व भांडवलदार करू लागले. निष्पक्ष पत्रकारितेची गरज भासू लागली. आदर्श वृत्तपत्रांना विविध संकटांना सामोरे जावे लागले. लोकसेवेचा उद्देश मागे पडला. औद्योगिक. व्यापारी प्रवृत्ती आल्या. राष्ट्राचे पुनर्निर्माण हे मूळ तत्व असून देशाचा आर्थिक विकास,समाजाचे आधुनिकीकरण व आधुनिक तंत्रज्ञान या प्रवृत्ती आल्या. सुनियोजित आर्थिक विकासावर लक्ष व सामाजिक परिवर्तन घडवून आंतरराष्ट्रीय संबंध उभारणे चालू आहे.

---

१. आधुनिक पत्रकारिता एक नजर - बेलारानी शर्मा - पान नं.१४३

मात्र पत्रकारांना वेतनभोगी नोकर मानल्याने इच्छा असूनही तो स्वतंत्र बुद्धी वापरू शकत नाही. तो अनुचित गोष्टीना विरोध करून सत्य मांडू शकत नाही. पूर्वीच्या वृत्तपत्रात देशसेवा, राष्ट्रीय संग्रामाची एकमेव भावना होती. संपादक हा नेता होता. जनजीवनाशी तो समरस होता. परंतु आज पगारी असल्याने संपादकाला आदर्शापेक्षा स्वार्थाची चिंता अधिक आहे. यातूनच पीत- पत्रकारिता आली. नव्या प्रयोगांना यात परवानगी नाही. मालक निष्ठ मानसिकता व व्यावसायिकतेच्या विरूद्ध क्रांती झाली नाही. छोटी - छोटी वृत्तपत्रे निघाली. साहित्यात सामान्य माणसाला प्रतिष्ठा देण्यासाठी स्वतंत्र चिंतनाची भर घातली.

मात्र अशा वृत्तपत्रांना काही कचरापट्टी संपादकांनी, दृष्टीहीन पत्रकारांनी भ्रष्ट केले. वृत्तपत्रांची वाटचाल प्रगतीकडे असली, ती व्यापक बनत असली तरी तिच्यात ठोसपणा नाही. कष्टाळू पत्रकारांचा अभाव आहे. वृत्तपत्रे विश्वव्यापकतेकडे वाटचाल करण्यासाठी वैविध्यपूर्ण रूप धारण करत आहेत. राजकिय, सामाजिक, सांस्कृतिक कृषी, बाल, महिला, विज्ञान, खेळ, साहित्य अशी विविध रूपाने संस्कृतीसापेक्ष बनत आहेत. एकूण या कालातील वृत्तपत्रांचा विचार करताना काही गोष्टी आपणास जाणवतात त्या म्हणजे -

● स्वातंत्र्योत्तर काळात पहिल्या २०-२५ वर्षात ध्येयवादी पत्रकारिता काही प्रमाणात शिल्लक होती. लोकशाही रुजविणे, समाजधारणा घडविणे. परराष्ट्र धोरण, वैज्ञानिक प्रगती, संशोधन इ. अनेक विषय त्यांनी हाताळले आहेत. फरक एवढाच की वृत्तपत्र चालविणे हा धंदा झाला. संपादक हा व्यवसाय झाला. संपादकाचा त्याग. नेतृत्व, स्वातंत्र्य संपले. मालक - संपादक नात्यात फारकत झाली. लोकशाहीचा चौथा स्तंभ भांडवलदारांच्या हातात गेला.

● अठराव्या शतकाच्या अखेरीस नव्या वृत्तपत्राचा व्यवसाय उदयास आला. लोकशाहीचा चौथा स्तंभ आपल्या हातात असावा या दृष्टीने भांडवलदार या व्यवसायात आले. तो इतिहासातील महत्त्वाचा टप्पा होय. या व्यवसायाने ९०% च्या वर वाचक वर्ग खेचला. नव्या वृत्तपत्रामुळे जुनी वृत्तपत्रे संपण्याच्या मार्गावर आली. या नव्या प्रवृत्तीने असे सर्वगामी स्वरूप धारण केले आहे की, ५ कोटी लोकसंख्येच्या ब्रिटनसारख्या देशात जनतेने काय वाचावे, काय विचार करावा, कोणत्या सरकारला मानायचे हे ४-५ बडी धेंडे ठरवतात.[१]

● देशातील समाजव्यवस्था, आर्थिक घडण, राजकिय विचार, शास्त्रीय प्रगती या क्षेत्रावर मूठभर

---

१. माध्यम, पत्रकारिता आणि आपण - डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी

लोकांची मक्तेदारी झाली. प्रगत देशात वृत्तपत्र संचालक (५-१०) एखादा फालतू विचार गीता, बायबलच्या तोडीस नेऊन बसवितात. महत्वाचा विचार लोकांपर्यंत पोहोचू देत नाहीत. सरकार, जनता, आंतरराष्ट्रीय संबंध व ज्ञानाची विविध क्षेत्रे यावर यांचा वचक झाला. नेपोलियनला सुद्धा सैनिकांची मने राखावी लागत. पण आजचा वृत्तसंचालक प्रसिद्ध विचारवंतांना, राजकारणपटूंना खेळवतो. हजारो बुद्धीवंताना राबवून घेतो.

● नव्या जुन्या वृत्तपत्रात जमीन - अस्मानाचा फरक आहे. पण अर्थात जुना नवा हे प्रवृत्ती दाखवतात. पूर्वीची वृत्तपत्रे सेवाभावी होती. ते असिधारा व्रत होते. तत्वनिष्ठ वसा होता. त्याला पावित्र्य होते. पण ७५ वर्षापूर्वी त्यात जाहिराती आल्या. खप वाढला. पत्रकारांना सरकार दरबारी मान मिळाला. पैसा व प्रतिष्ठा मिळवायचे साधन म्हणून उद्योगपती, व्यापारी व भांडवलदाराचे लक्ष गेले. त्यांनी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक सुरू केली. जुनी वृत्तपत्रे विकत घेऊन नवी सुरू करण्यासाठी मोठ्या रकमा गुंतवल्या. वृत्तपत्रांना व्यापाराची शाखा असे स्वरूप आले. फायदा मिळविणे हा हेतू होऊन व्यापाराची सर्व तत्वे त्याला लागू झाली. संपादकाची कचेरी हा कारखाना झाला. चालक शेअर होल्डर झाले. जाहिराती व वाचक वाढविणे व जास्तीत जास्त नफा मिळविणे. विविध क्षेत्रांशी हितसंबंध जुळविणे. प्रतिस्पर्धी वृत्तपत्रांना हुसकावून लावणे, जास्तीत जास्त वृत्तपत्रे आपल्या कंपनीच्या कक्षेत ठेवणे. यांना पोषक धोरण ठेवणारे सरकार आणणे ही त्यांची बैठक झाली. वाचक गिऱ्हाईक झाला. जीवघेणी स्पर्धा सुरू झाली. जेवढा दर्जा कमी तेवढे वाचक जास्त असे गणित झाल्याने वृत्तपत्रांचा दर्जा घसरला.[१]

● सुरूवात मोठ्या प्रमाणावर त्यामुळे सामान्यांना नवे वृत्तपत्र सुरू करणे अशक्य झाले. केलेच तर मोठ्या वृत्तपत्रांच्या चढओढीपुढे टिकेना. बडा संचालक कागदासाठी नॉर्वे वा कॅनडासारख्या देशात जंगले खरेदी करणार. तासाला ३-४ लाख प्रती काढणारी यंत्रे ठेवणार. जगातले फोटो रेडिओ ट्रान्समिशनने उपलब्ध करणार. तज्ज्ञांचे लेख, विविध सदरे यामुळे व मोठ्या उत्पादनामुळे स्वस्तात देणे परवडते.

● आर्थिक दृष्टीमुळे मजकूरावर परिणाम, वाचकांच्या आवडीला प्राधान्य, मागणी तसा पुरवठा हे धोरण. गावगप्पा, करमणुक, अश्लिलतेला प्राधान्य. एखाद्या जागतिक बातमीस प्राधान्य नाही. फालतू गोष्टीना महत्व प्राप्त झाले. खून मारामाऱ्यांचे वृत्तांत, व्यंगचित्रे, अर्धनग्न स्त्रियांची चित्रे यांचा मारा. घटना जागतिक महत्वाची असली तरी तिचे मनोरंजक अंगच येऊ लागले. उदा. १९५६ मध्ये लंडनला

---

१. वृत्तपत्र संपादकाच्या प्रश्नावलीतील उत्तरातून.

इंडिया हाऊसमध्ये पंडित नेहरूंचे भाषण झाले यावेळी हिंदी हायकमिशनर श्री. विजयालक्ष्मी पंडित इतर श्रोत्या प्रमाणे जमिनीवर बसल्या होत्या. हा फोटो डेली एक्सप्रेस मध्ये दिला. नेहरूंचे भाषण नाही.[१] ह्यूमन इंटरेस्टच्या बातम्यांना प्राधान्य, रंजकतेस महत्व दिले गेले. उदा. डेली मिररमध्ये गुन्हेगारांच्या मुलाखती, रेस, प्रेम, घटस्फोटाच्या बातम्या पोलीस टाईम्स हे वृत्तपत्र हे याचे उदाहरण आहे.

● सार्वजनिकदृष्ट्या महत्वाचे व जुजबी वृत्त यांची आर्थिक फायद्यासाठी हेतुपुरस्सर अदलाबदल होऊ लागली.

● भांडवल ही कसोटी, पात्रता मानली गेल्याने सेवावृत्ती, ज्ञान, लोकसंग्रहाला फाटा दिला गेला. समाजाभिमुखता उरली नाही. पैशाने तज्ज्ञ विकत घेता येतात. या धोरणामुळे तात्विक बैठक गेली. विशिष्ट वर्गाचे हितसंबंध जपले जाऊ लागले. दैनंदिन व्यवहार ज्ञानी लोकांबरोबर न होता इतर कंपन्याचे डायरेक्टर्स, मालक, सत्ताधीश, कारखानदार यांच्याशी होऊ लागले. कामगारांनी संप केला तर दुसरे ठेवण्याची पद्धत आली. पत्रकाराचे काम तात्विक आहे ही भूमिका संपली. संचालक, संपादकात मालक - नोकर संबंध आले. ध्येयवाद संपला.

● जनहित संपून वर्गहित पाहिले गेले. बँका, कारखाने यांना संरक्षण. या संबंधा आड येणाऱ्या कामगार, वाचक. सरकारवर टीका केली गेली त्यामुळे संपादक व वाचकातले अंतर वाढले. पूर्वी संपादकावर अप्रत्यक्ष का होईना वाचकाचा नैतिक धाक होता. मोठ्या वृत्तपत्राच्या संपादकास खाजगी जीवन व वृत्तपत्राच्या धोरणात समन्वय ठेवण्याची गरज वाटत नाही. पूर्वी संपादकांचे धोरण. शैली, निष्ठा या सर्वांवर पत्राचे मुल्यमापन होई. नवी वृत्तपत्रे व्यक्तिनिरपेक्ष झाली. संपादक कुणीही असो. डायरेक्टरचे धोरण चालू ठेवावे लागे. त्यामुळे व्यक्ती दुय्यम ठरली. इंग्लंडमधील नव्या वृत्तपत्रात संपादकाचे नावही नसते मात्र या मुळे धोरण, नोकरवर्ग, व वृत्तपत्र यांना स्थैर्य मिळाले.

● मतवैचित्र्य कमी झाले वृत्तपत्रात विचारांचे साचे बनले. मोठ्या पत्रातून क्रीडा, कला, नाट्यशास्त्र असे वैचित्र्य आले. पण त्यातही ठोकळेबाजपणा आला. प्रत्येक विषयाच्या शाखेचे शास्त्र सुरू झाले. ठराविक मतप्रवाह, सामाजिक, आर्थिक क्षेत्रातील बातम्या व लेख आले.

---

१. संपादकाचे जीवनस्वप्न - द्वा. भ. कर्णिक- किर्लोस्कर प्रेस. सातारा

● स्थानिक प्रश्नांना गौण स्वरूप आले. खेड्यातील प्रश्नांना जागा राहिली नाही. लहान प्रश्न मागे पडले. घडणच तत्वनिष्ठेविरूद्ध झाली. आर्थिक फायदा विरूद्ध सार्वजनिक हित अशा संघर्षात आर्थिक फायद्यास प्राधान्य मिळाले. (" Here is the worst evil of the commercialised newspaper. By its very nature it is unfit to guide. It cannot proclaim truth regardless of conseguences. It must not thwart the advertisers wish to full the public into a spending mood. It can not afford to risk alienating purchasers by telling disagreeable truths" [१]

● मोठ्या वृत्तपत्राचा संचालक, घटना व वाचक यांच्यात फार अंतर असल्याने मजकूराची सत्यासत्यता पाहता येत नाही. संचालकांच्या फायद्यावर एखाद्या व्यक्तिचे बरे वाईटपण ठरविले जाते. अधिक वाचकांवर अधिक परिणाम करण्याची शक्ती यात येते.

बदलत्या वृत्तपत्रांचे हे स्वरूप पाहिल्यावर त्यांची भूमिकाही लक्षात घेणे गरजेचे ठरते. या मागे त्यांची भूमिका अशी होती -

१) भरपूर मजकूर व चित्रे वाचकांना द्यावीत.

२) जगाच्या कोपऱ्यातील बातमी त्वरीत वाचकांना उपलब्ध करून द्यावी.

३) जगाबाहेरच्या गोष्टीत लोकांना स्वारस्य निर्माण व्हावे यासाठी प्रयत्न करावेत.

४) वाचकांना ज्ञानाची गोडी निर्माण व्हावी.

५) सर्वसामान्य वाचकास राजकिय, आर्थिक, सामाजिक प्रश्नात रस निर्माण करावा.

६) साहित्य, संगीत, नाट्य, चित्रकला यांना उत्तेजन मिळावे. त्या सर्वापर्यंत पोहोचाव्या.

७) वृत्तपत्र हे विद्वानांचेच क्षेत्र आहे हा समज जाऊन सर्वसामान्यांना आपले क्षेत्र आहे असे वाटावे.

८) राज्यकर्त्यांना जनमताकडे दुर्लक्ष करून चालणार नाही याची जाणीव करून द्यावी.

---

१. Hamilton Fyfe. Press Parade Page 20

९) उद्योगधंद्याची भरभराट व्हावी. पत्रकार, एजंटांना भवितव्याची शाश्वती मिळावी.

१०) तज्ज्ञांच्या ज्ञानाचा उपयोग सर्वांना व्हावा.

११) अनुषंगिक व्यवसायांना चालना मिळावी. उदा. कागद कारखाने, जाहिरात संस्था, विक्री संस्था, चित्रकार.

१२) इतर उद्योगात वाढ व्हावी. जाहिरातीमुळे गरजा व उत्पादनाची माहिती मिळावी.

१३) दळणवळणाच्या साधनात वाढ व्हावी.

१४) यातून निर्जिव वस्तू तयार होत नसून जिवंत विचार दिले जाणारे सांस्कृतिक केंद्र तयार व्हावे.

## २.९ २१ व्या शतकातील वृत्तपत्रातील बदल -

पत्रकारिता व वृत्तपत्रात गेल्या २० वर्षात झालेले बदल पाहिल्यास त्याचे ठळक स्वरूप आपणास पुढीलप्रमाणे सांगता येतील.

● २१ व्या शतकातील पत्रकारिता नवा चेहरा झपाट्याने धारण करते आहे. उपभोगवादी संस्कृतीचीही झकपक वृत्तपत्रे पूर्ण व्यावसायिक बनत आहेत. विविध न्यूज चॅनेल्सशी वाढत्या स्पर्धेमुळे वृत्तपत्रांची जबाबदारी वाढली आहे. दुसरीकडे पत्रकारितेचे चारित्र्यहनन होत चालले आहे. पत्रकारांचे नैतिक अध:पतन होत आहे.

● व्यावसायिकतेच्या टी.आर.पीच्या स्पर्धेत वृत्तपत्राचे मूल्य बदलते आहे. प्रकाशन प्रसारणाच्या गुणवत्तेला स्पर्धेत घेतले तर पत्रकारितेचा एकही पक्ष या पतनाच्या दुष्टचक्रातून वाचलेला नाही.

● संवेदनात्मकतेचा लोप - वृत्तपत्राची संवेदनशीलता कमी झालेली दिसते. मोठ्या महानगरातला वृत्तपत्रात हे प्रकर्षाने जाणवते. बलात्कार हिंसाचाराच्या घटनावर लक्ष, त्यांची बीभत्स वर्णने करण्यात स्वारस्य. संवेदनशीलतेवर व्यावसायिकतेचा पडदा पडलेला दिसतो. आज अपघात, दिल्ली येथील सामूहिक बलात्कार प्रकरण अशा बातम्यांनी हृदय द्रवत नाही. अत्याचाराच्या घटनांनी चीड येत नाही.

● कोणतीही बातमी अतिरंजित करून भडकपणे लिहिण्याकडे कल. वृत्तपत्रीय संस्कृती झपाट्याने बदलते आहे. तिच्यात कारुण्य व कर्तव्याचा अभाव दिसतो आहे. बदलत्या प्रवृत्तीमुळे हे बदलले बातमीदारांच्या मनाची श्रेष्ठता लोप पावते आहे.

● या बदलत्या पत्रकारितेस पाहून जुन्या पत्रकारितेला खेद वाटतो पण त्याचे महानगरीय पत्रकारांना काही सोयर सुतक नाही.

● वृत्तपत्रांचे संपादक पत्रकारितेची बांधिलकी मानत नाहीत. सुविधांच्या बदल्यात या वृत्तपत्रांनी सामाजिक बांधिलकीचा त्याग केलेला दिसतो. व्यावसायिकतेमुळे सामाजिक जबाबदारी सोडून लाभार्थीपण वाढले. गेल्या दशकात ही वृत्ती वाढलेली दिसते.

● पूर्वीची वृत्तपत्रे ध्येयकेंद्रीत. विचारकेंद्रीत होती. संपादकाला अधिकार होते. संपादकही संस्था होती. त्याला स्वातंत्र्य, अधिकार, ध्येये होती. त्याची स्वतःची टीम होती. हे संपून अधःपतनास सुरुवात झालेली दिसते.

● सध्याची वृत्तपत्रे वाचककेंद्रित नाहीत. ती जाहिरात केंद्रित झाली आहेत. त्याला हवे ते छापणे हे ध्येय संपून वृत्तपत्र हे लाभ मिळवण्याचे मशिन झाले आहे.

● भाषेत बदल - सकारात्मक व नकारात्मक पद्धतीने केला जातो आहे. बोलीतील शब्दाचा वापर त्यामुळे भाषा समृद्ध होते. स्थानिक बोलीचा वापर हा सकारात्मक तर भाषेची मोडतोड, व्याकरण धाब्यावर बसवून लिंगवचनांची गल्लत हा नकारात्मक वापर ठरतो आहे. [१]

●.वृत्तपत्रांचे बाजारीकरण झाल्याने नग्नता, सेक्स, हिंसा यांची भरती होऊन त्याला हलका दर्जा प्राप्त होतो आहे.

● मिडीयाच्या प्रभावामुळे बातमीदाराचे घराणे चांगले, सधन, प्रतिष्ठेचे मानले गेले. वृत्तपत्रे ही सर्वाधिक वेतन देणारी सामाजिक संस्था ठरली.

● बदलांमुळे ग्रामीण भागाचे नुकसान झाले. नवी पत्रकारिता शहरान्मुख असल्याने ग्रामीण

---

१. प्रसार माध्यमांची भाषा-लेख-डॉ. माधवी देसाई - भाषा विज्ञान अधिवेशन-विलिंग्डन कॉलेज,सांगली.

समाचार, संदर्भ टाळले गेले.

● आधुनिक पत्रकारितेत शेतीचा उल्लेख केला नाही. मिडीयापुरती राष्ट्रीय वृत्तपत्रे ही शहरापुरती मर्यादित असल्याने अपराध, फॅशन, ग्लॅमर. शहरी जीवनावर कार्यक्रम आले. ग्रामीण भागावर कार्यक्रम कमीच आले. या झगमगटाला एक नशा बनवून समाजावर लादण्याची जीवघेणी स्पर्धा आली. यात ग्रामीण भागाची दखलही घेतली गेली नाही.

● नव्या पत्रकारितेवर राजनीतीचा जबरदस्त पगडा असल्याने मूळ पत्रकारितेचा उद्देश बदलला.

● नवी वृत्तपत्रे विशिष्ट पक्षाची समर्थक असल्याने विरोधी पक्षाच्या बातम्या देत नाहीत. दिल्यातरी त्या विकृत स्वरूपात छापतात. इंग्लंडमधील पत्रकारितेचा हा दुर्गुण आपण घेतला पण आपली पक्षनिष्ठा इंग्लंडपेक्षा घातक ठरली. तथ्य व विचार(मत) यात फरक असला पाहिजे. तथ्य व विचार, संपादकीय व बातमीपत्र यांची मोठ्या प्रमाणावर गल्लत आपल्या वृत्तपत्रात होऊ लागली. ही गफलत धोकादायक आहे.[१]

● वृत्तपत्र हे माध्यम व राजकारण हा उद्देश ठरला. सत्तेच्या जवळ राहण्यात सुख मानणारी वृत्तपत्रे व्यावसायिक हित साधतात. जनमत घडवू शकत नाहीत. जागृतीकरण करत नाहीत. ही वृत्तपत्रे अशी निष्क्रीय ठरली.

● आधुनिक परंपरागत शैलीत द्वंद्व सुरू झाले. पत्रकारितेच्या मानदंडाची भरकट झाली. पत्रकारिता विधायक न ठरता विध्वंसक ठरली. आगीत तेल ओतणारी ठरली. अयोध्या आंदोलन, ताज हॉटेल बॉम्बस्फोट प्रकरण, मालेगाव दंगल, जोधा अकबर प्रकरण, मिरज दंगल ही याची ज्वलंत उदाहरणे आहेत.

● वृत्तपत्रांची विश्वसनीयता कमी झाली.

● सामाजिक प्रश्नांची उत्तरे शोधणे, त्याची पुनरावृत्ती न होऊ देणे. स्वस्थ विकासाला हातभार लावणे ही गरज निर्माण झाली.

---

१. बदलती पत्रकारिता गिरते मूल्य - डॉ. निशांत सिंह - नमन प्रकाशन पान नं. १७

● राष्ट्र निर्माण व सामाजिक पुनर्रचनेची भूमिका घेण्याची गरज निर्माण झाली. सामाजिक समीकरणे, बदलत्या मूल्यांचे निःपक्षपाती आकलन करण्याची गरज निर्माण झाली. नव्या वृत्तपत्रांनी सामाजिक द्वेष पसरवला.

● यातले श्रेष्ठ स्थानावरचे लोक या विषमतेबद्दल अनभिज्ञ व बेफिकीर होते. स्वनामधन्य पत्रकारांनी वार्ताहरांना जाती गोत्राच वरदान दिलं. पूर्व पत्रकारितेवर विशिष्ट जातीचाच पगडा का हवा? जातीयतेवर आधारलेल्या वृत्तपत्रांकडून जातीभेद नष्ट करण्याची आशा कशी करावी? हा नव्या वृत्तपत्राचा प्रश्न ठरला.

● असे लोक नव्या वृत्तपत्रांचे दलाल किंवा ठेकेदार झाले. पत्रकार नाही. यांच्याशी नवनिर्मिती सामाजिक पुनर्रचना. धर्मनिरपेक्षता. निष्पक्षता, पत्रकारितेच्या मूल्यांची चर्चा करणे व्यर्थ ठरले.

● नव्या वृत्तपत्राबद्दल विश्वास कमी झाला कारण हे दलाल किंवा ठेकेदार असून कोणती बातमी छापायची किंवा नाही छापायची हा निर्णय घेऊ लागले. ते सत्ताधारी पक्षाच्याच बातम्या देतात. सत्ता, पैसे व पत्रकारिता यांचा मेळ निवडणुकी दरम्यान परिसीमा गाठतो.[१]

● वृत्तपत्र मालकांकडून संपादक व पत्रकारांचा निःपक्ष राहण्याचा अधिकार हिरावला गेला. वाचकांना निःपक्ष राहणे व बातम्यांपासून तसेच योग्य सूचनांपासून वंचित ठेवले गेले. बेदखल केले गेले. निवडणूक पूर्व सर्वेक्षण वास्तवापासून दूर नेते.

● सॅम पित्रोदा यांनी सूचना क्रांतीचा पाया घातला. कॉंप्युटर व अत्याधुनिक उपकरणे आली. त्यांनी प्रत्येक क्षेत्र व्यापले. कॉंप्युटरने पत्रकारितेत क्रांती घडविली. वृत्तपत्र प्रकाशन व पत्रकारितेस नवे स्वरूप आले. आरंभी मिडीयाचे रंगरूप सजवणारे यंत्र म्हणून आले पण आता मिडीयानेच विकसीत रूप धारण केले आहे.

● कॉंप्युटरमुळे छपाईची सुंदरता, शुद्धता वाढली. डी.टी.पी. मुळे Accuracy with the time हा सिद्धांत स्थापित झाला. जगातल्या कोपऱ्यातील कोणती घटना काही क्षणात वृत्तपत्रात पोहोचली.

---

१. ६.फेब्रुवारी २०१३ पुढारी बातमी

● सूचना क्रांतीचा अधिक लाभ रेडिओ व टि.व्ही. ला झाला. २०० हून अधिक चॅनेल्स आली. वेब पत्रकारिता सुरू होऊन पत्रकारितेचे सर्वात गतीमान रूप आले. यात दर्शक व वाचक यांचा परस्पर संबंध आला. वाचक समाचारावर व बातम्यांवर लगेच आपले मत देऊ लागला. संबंधित पक्ष आपली सफाई देऊ लागला. मात्र यांचा तोटा असा झाला की, सुचना क्रांतीमुळे चुकीच्या सूचना मिळतात. त्यामुळे त्यांची समजण्याची व विश्लेषणाची क्षमताच नष्ट होते.[१]

● विशिष्ट व अनावश्यक बातम्या व सूचनांचा मारा करून सामान्य माणसाची मानसिकता विकृत करून त्याला विशिष्ट दिशेनेच विचार करण्यासाठी विवश केले जाऊ लागले.

● न्यूज चॅनेल्सचा भडीमार होऊ लागला पण त्यात तथ्य काहीच नाही असे झाले. उदा. मुंबईतील पुराच्या बातमीने इतर सर्व बातम्या रद्द केल्या गेल्या. केवळ दिल्लीचे राजकारण, मुंबईतील सुंदर रात्री. गोव्यातील मस्ती, फॅशन शोमधल्या वस्त्रहीन मॉडेल्स एवढाच या पत्रकारितेला अर्थ उरला आहे. त्यात स्टिंग ऑपरेशनचे फॅड वाढते आहे. सलमान ऐश्वर्या प्रकरण शक्तीकपूर प्रकरण.[२]

● चुकत माकत शिकणाऱ्या लहान पोरांप्रमाणे वृत्तपत्रांचे रूप होते आहे. भडक, अतिरंजीत बातम्यामुळे ही वृत्तपत्रे मानवी अभिरूचीची पिळवणूक करत आहेत.

● टी.आर.पी. ला अवास्तव महत्व दिल्यामुळे विकासाच्या बातम्यांपेक्षा गुन्हेगारीला महत्व. अश्लिलतेला महत्व आले आहे. एकूण नव्या वृत्तपत्रांची स्थिती अधिकाधिक खालावतच चालली आहे. ती सवंग लोकप्रियतेकडे झुकते आहे.

● आज वृत्तपत्रे बाजारु बनल्याने बाजारात जे विकले जाते तेच खपविण्याचा प्रयत्न करताना बाजारवाद व भौतिकवादाच्या अधीन होऊन आत्मा हरवत चालले आहे आणि म्हणूनच अशा बाजारु, आत्माहीन वृत्तपत्रांना खऱ्या अर्थाने आत्मावलोकनाची नितांत गरज आहे.

● बाजारीकरणामुळे ते मिशन न राहता प्रोफेशन झाले आहे. संपादकांचे चारित्र्य संशयास्पद ठरले आहे. इलेक्ट्रॉनिक मिडियाचे आगमन, सूचना क्रांती, इंटरनेटमुळे त्याचा आवाका वाढतो आहे. पण

---

१) जनसंचार संपर्क एवं विज्ञापन - डॉ.सुजाता वर्मा. जी.पी.वर्मा - अध्याय पहिला.

२) बदलती पत्रकारिता गिरते मूल्य -डॉ. निशांत सिंह- पृष्ठ क्र.५०,५८,७२,७४ - नमन प्रकाशन

त्याबरोबरच सनसनाटीपणा, चुंबनाचा व्यापार, कास्टींग काऊचच्या नावावर अनेक असभ्य गोष्टींचे दर्शन, रक्तरंजित बातम्या, स्त्रियांचे बाजारीकरण, Exclusive नावाखाली ब्रेकिंग न्यूज, सेक्सचा खेळ, अश्लिल वृत्ते, महिलांचे शोषण, पत्रकाराचे बौद्धिक अधःपतन घडविले जात आहे.

● ब्रेकिंग न्यूजचे फॅड झपाट्याने वाढते आहे. इतर विधायक बातम्या डावलून ब्रेकिंग न्यूजच्या नावाखाली भडक, अतिरंजित बातम्या देऊन समाजमन साशंक, भयग्रस्त व विकृत केले जात आहे. उदा. ताज हॉटेलवरील अतिरेकी हल्ल्याचे एवढे विकृत चित्रीकरण झाले की, मुंबईतला राहणारा हर माणूस आपण घरी परतु की नाही या भीतीखाली वावरताना दिसतो. 'भय इथले संपत नाही' अशी त्याची मानसिकता होण्याचे कारणही वृत्तपत्रे व मिडीयाचे आहेत.

● भाषेची मोडतोड - हल्ली मराठी भाषेचे व्याकरणच बदलत चालले आहे. शुद्ध लेखनाचे सारे नियम धाब्यावर बसवून बातम्या येतात. उदा. मुंबईत अपघात - दोन खल्लास' अनुस्वार. वेलांट्याची सर्कस तर वरचेवर पहायला मिळते. उदा. 'राष्ट्रपतिनी राष्ट्राला संदेश दिला.' हवी ती वेलांटी घ्या असा उघड चॉईस असतो. (मध्यंतरी 'तरुण भारत' मध्ये अशा व्याकरणाच्या चुका रोजच निघत) भाषेची विविध मोहक रूपे डावलून आजच्या नटी सारखी तिला अर्ध विवस्त्रावस्थेत आणण्याचे पवित्र काम आजच्या नव्या वृत्तपत्रात केले जात आहे.[१]

● वृत्तपत्रात अशा बातम्या देताना लहान मुलांच्या मनाची काय अवस्था होईल याचेही भान ते ठेवीत नाहीत. अशा गुन्हेगारीच्या, खुनाच्या बातम्या फोटोसहीत पहिल्या पानावर छापून ही वृत्तपत्रे एकतर भयगंडाने ग्रासलेली नाही तर गुन्हेगारीचे आकर्षण वाटणारी युवा पिढी तयार करत आहेत. एका नामवंत प्राध्यापकाकडे जाण्याचा योग आला. त्याने सकाळी पेपर येताच त्याच्यावर झडप घालून त्याची विशिष्ट पाने काढून ठेवली मग मुलांच्या हातात ठेवला या पानावर अर्धनग्न स्त्रियांची चित्रे, जाहिराती व चुंबनदृश्ये होती. कुठपर्यंत ते असं करणार? गंमत म्हणजे ती मुलं ही पाने शेजाऱ्यांच्यात जाऊन वाचत. मोठ्या मुलाने (दहावीतल्या) या स्त्रियांची चित्रे कापून संग्रही ठेवली होती. मिडियाची हीच कथा आहे. 'आईबाप जे न दावी, ते दाखवी टी. व्ही.' अशीच गत आहे. लहान मुलांच्या पानातून, चॅनल्स मधूनही हिंसेचेच चित्रण दाखवले जाते. ही चिंतनीय गोष्ट आहे.

---

१. प्रसार माध्यमांची भाषा- शोध निबंध लेख- डॉ.माधवी देसाई - भाषा विज्ञान परिषद विलिंग्डन कॉलेज, सांगली.

• ग्रामीण व दलित  पत्रकारिता या प्रवाहात अद्याप रांगते आहे असे म्हणावे लागेल. ग्रामीण, दलित, आदिवासी जीवन, त्यांच्या समस्या, त्यांचे प्रश्न असे अनेक  विषय अद्याप उपेक्षितच ठरले आहेत. यांच्याकडे  वृत्तपत्रांनी गांभिर्याने  पाहिलेले नाही. ही वस्तुस्थिती आहे.

असे वृत्तपत्रातले सकारात्मक व नकारात्मक बदलांचे  विवेचन केल्यावर या वृत्तपत्राच्या भूमिकाही विचारात घेतल्या पाहिजेत या भूमिका अशा आहेत -

१) वाचकांना अद्ययावत  माहिती, ज्ञान तंत्रज्ञान पुरवणे, त्यांची  करमणूक करणे.

२) आदर्श, ध्येये, सनातन विचार सोडून जनतेला हवे ते देणे व त्या बदल्यात भरपूर कमाई करून  घेणे.

३) इंग्रजी वृत्तपत्राप्रमाणे हेतूशून्यु. गंभीर लिखाण न करता सर्व (ध्येयशून्य) रोचक असे लेखन  करणे.

४) ध्येय बुद्धीवादापेक्षा स्वतःची बँक क्रेडीट वाढवणे.

५) खासदार काय म्हणतात या पेक्षा काय करतात याला प्राधान्य. संसदेच्या कामाकाजापेक्षा तेथील भांडणाचे चित्रण करणे.

६) बातमीच्या गुणवत्तेपेक्षा  कंटेटवर भर देणे यामुळे आजचे गुन्हेगार हिरो बनतात.  करोडपती  आदर्श बनतात. ठाण्यात एका  कॅथॉलिक  धर्मगुरूला बजरंगदलाच्या कार्यकर्त्यांनी मारले. मिदनापूरला तृणमूल काँग्रेसच्या ११ पाठीराख्यांना जाळून  मारले. या बातम्या  छापण्याचे  धाडस एकाच वृत्तपत्राने दाखवले.[१]

७) जीवघेण्या स्पर्धेत टिकण्यासाठी स्वतःत आवश्यक ते बदल घडविणे (आकार, छपाई, भाषा, सदरे, अग्रलेख इ. त) उदा. नवभारत टाईम्स, नवभारत, संध्यानंद, अमृतबझार, लोकसत्ता, नवाकाळ, महाराष्ट्र टाईम्स.

८) जागतिक लेव्हलच्या कानाकोपऱ्यातल्या बातम्या तात्काळ देणे.

९) आकर्षक छपाई, रंगीत  पाने, चित्रे रंगीत सुबक मजकूर, विविध पुरवण्या.

---

१. प्रश्नावली - श्री.बापूसाहेब पुजारी (ज्येष्ठ पत्रकार, सांगली)

१०) परदेशातही खप वाढवणे.

११) यासाठी आवश्यक यंत्रणा उभारुन Survival of the fittest हे सिद्ध करणे.

१२) आकाशवाणी, दूरदर्शनच्या स्पर्धेत टिकाव धरणेसाठी अंतर्बाह्य बदल करणे

१३) जनसंवादाचे सोपे, शाश्वत, अक्षर, लोकप्रिय, टिकाऊ माध्यम म्हणून लौकिक टिकवणे.

१४) वाढत्या स्पर्धेनुसार स्वतःला गतिमान बनवणे. 'कायदा पाळा गतीचा थांबला तो संपला.' हे ब्रीद पाळणे.

१५) प्रचंड माहितीच्या ढिगाऱ्यातून नेमक्या बातम्या निवडून वाचकांना समजतील अशा भाषेत सादर करणे.

१६) वाहिन्यांचा सकारात्मक परीणाम आत्मसात करून त्यानुसार स्वतःला आकर्षक बनवणे, वैविध्य, जिवंतपणा आणणे.

१७) लाईव्ह वृत्तपत्रे देणे.

१८) पारंपारिक कल्पना डावलून कॉलम, छायाचित्र मांडणीत बदल करणे. उदा. अमिताभ रुग्णालयातून घरी येताच त्याचा हाफपेज वा फुलपेज फोटो देणे. सौंदर्यदृष्टी ठेवणे.

१९) छायाचित्राचे कुशल संपादन, नकाशे, रेखाचित्र याचे प्रयोग. कार्टून, स्केच यांचा वापर करणे.

२०) मथळ्याचे वैविध्यपूर्ण प्रयोग करणे.

२१) व्हाईट स्पेसला महत्व - सुटसुटीत अंतर सोडून बातम्या देणे.

२२) विविध विषय हाताळणे.

२३) आशयाकडे लक्ष देणे.

२४) ई - पेपर ही संकल्पना आणणे.

२५) वृत्तपत्रात बहुश्रुतता आणणे. उदा. आंबेडकर, परुळेकर, अत्रे, विद्याधर गोखले, माधव गडकरी,

बाबुराव ठाकूर, रंगा वैद्य, अनंत भालेराव यांनी ही भूमिका आणली.

२६) जाहिरातीचे प्रमाण अधिक, कार्यालये अद्ययावत (टाईम्स ऑफ इंडिया, नवभारत टाईम्स, हिंद, लोकमत, सकाळ) करणे.

२७) मतपत्र' ही भूमिका सोडून व्यवहारवादी भूमिका ठेवणे. उदा. पूर्वीचा केसरी हे मतपत्र होते आता नाही. तोही व्यवहारवादी झाला. गेल्या १० वर्षात त्याने कात टाकली व काळाशी सम जुळवली.

२८) चटकदार बातम्यांना महत्व दिले गेले. अग्रलेखाचे महत्व कमी झाले. बातम्यांची सजावट करण्याकडे कल झाला.

२९) व्यावसायिक रूपामुळे 'संपादक' हे पद काढून व्यवस्थापकीय संपादक हे पद आणले.

३०) वातानुकुलित पत्रकारिता आणण्याकडे कल झाला. फिल्ड वर्कला कमी महत्व. पत्रकाराच्या म्हणजेच वृत्तपत्राच्या या भूमिकेबद्दल बोलताना संपादक बॉब एवन म्हणतो - ''लोक मिडियाचा तिरस्कार, घृणा करतात अशा स्थितीत आम्ही जगू शकत नाही. आम्हाला काहीतरी केले पाहिजे.''भारतीय मिडियालाही याचा विचार करून आपली भूमिका ठरवली पाहिजे. खोल अविश्वासाच्या भावनेने लोक त्यांच्याकडे पाहतात. हल्ली कोणी विश्वासाने म्हणत नाही की वृत्तपत्रात छापले म्हणून ते खरे आहे. गांधीजीच्या मते - ''जब अखबार को मुनाफा कमाने के साधन के तौर पर चलाया जाएगा तो गंभीर अनाचार इसके परिणाम होंगे ।''

३१) प्रसंगी चुकीचे व्यवहार करून केवळ रेटींग वाढवणे.

३२) व्यापारी वृत्तीमुळे वृत्तपत्राच्या आचरणाच्या नियमांचे प्रसंगी उल्लंघन करून फायदा साधणे. पत्रकारितेच्या सिद्धांताना तिलांजली देणे.

३३) कित्येकदा पुष्टी नसलेल्या बातम्या देणे व झालेल्या चुकीबद्दल खेदही व्यक्त न करणे.

एकंदरीत बदलत्या पत्रकारितेचे बरे वाईट गुणदोष, त्याची भूमिका, परीणाम यांच्या सविस्तर विवेचनानंतर वाचक वर्गातही असलेल्या बदलाची दखल आवर्जून घ्यावी लागेल.

## २.१० वाचक वर्गाच्या बदलत्या भूमिका व अभिरूची -

'कालाय तस्मै नम.' या उक्तीप्रमाणे पूर्वीचा वाचक व आजचा वाचक यांच्यात बराच बदल झालेला दिसतो. पूर्वीचा वाचक हा सनातनी वृत्तीचा असून एका विशिष्ट चाकोरीत राहणे पसंत करत होता. त्याच्या समोर स्वातंत्र्यप्राप्ती, देशनिष्ठा हीच ध्येये होती. जातीभेद, धर्म, समाज या बद्दलच्या काही दृढ संकल्पना होत्या. तो अशिक्षित होता. अंधश्रद्धाळू होता. वृत्तपत्र वाचून आपण ज्ञान मिळवावे. सुधारणा कराव्या. समाज परितर्वन करावे असे त्याला वाटत नव्हते. जुन्या अनिष्ट चालीरिती समजुतीना तो धरून होता. इंग्रजानी सत्ता काबीज केल्याचे त्यांना काही देणे घेणे नव्हते. गुलामगिरी. पारतंत्र्याबद्दल त्याला चीड होती पण त्यातून सुटण्यासाठी काही करावे असे त्याला वाटत नव्हते. ''दैवजात दुःखे भरता दोष ना कुणाचा. पराधीन आहे जगती पुत्र मानवाचा.'' ही त्याची धारणा होती. देवाने इंग्रजांना आपल्या कल्याणासाठी पाठवले आहे. देव गोरे असतात. इंग्रज गोरे आहेत म्हणजेच देवच आहेत अशी समजूत होती. त्यामुळे वृत्तपत्र वाचून जागृती करण्याचा प्रश्नच येत नव्हता.

बदलत्या काळानुसार वाचक बदलला. त्याची अभिरुची बदलली.

**नवीन वाचक -**

- शिक्षणामुळे जागृत झालेला होता.
- स्वातंत्र्यामुळे कसलेही बंधन त्याच्यावर नव्हते.
- सामाजिक सुधारणांनी त्याच्या मनाची मशागत केली होती. त्यामुळे जुन्या रूढी परंपरातून तो बाहेर पडला होता.
- इंग्रजी शिक्षणाने त्याला नवी दृष्टी लाभली होती. चाकोरीबाह्य जीवन जगण्याकडे त्याचा कल होता.
- ज्ञानाची नवी क्षितिजे, तंत्रज्ञान, आधुनिक सोई यामुळे तो प्रगल्भ झाला होता.
- वृत्तपत्राकडे पाहण्याची दृष्टी बदलली होती.
- नव्या सामाजिक जाणीवा त्याला आल्या होत्या.

- केवळ रंजन त्याला नको होते. त्याबरोबर प्रबोधनही व्हावे ही त्याची अपेक्षा होती.[1]
- वृत्तपत्रांनी बातम्यांबरोबर अन्यही विषय द्यावेत ही त्याची इच्छा होती.
- तो पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करणारा होता.
- देशप्रेम, राष्ट्रनिष्ठा यापेक्षा त्याला स्वार्थ महत्वाचा वाटत होता.
- 'पैसा' हा त्याच्या दृष्टीने श्रेष्ठ गोष्ट होती.
- खेड्यापाड्यातला माणूस जागृत झाला होता. वृत्तपत्र हे सामाजिक प्रगतीचे साधन आहे याची याला जाणीव झाली होती.
- एका बाजूने तो माहितीच्या जंजाळात पुरता अडकला होता. नेमके काय घ्यावे हे त्याला समजत नव्हते. विविध ज्ञानाच्या चौफेर माऱ्यात तो अडकला होता.
- संपादक, पत्रकार, वृत्तपत्र व्यवसाय याकडे पाहण्याची त्याची दृष्टी बदलली होती.
- त्याचा सामाजिक दृष्टीकोन विकसित झाल्याने खेळ, भविष्य, विकास, रंजन इ. विविध विषयाकडे त्याचे लक्ष गेले. त्याच्याविषयी ते जागृत झाले.
- आजचा वाचक माहितीच्या ढिगाऱ्याखाली गाडला गेला आहे. यातले नेमके आपणास काय घ्यायचे आहे हेच न समजल्याने तो संभ्रमावस्थेत आहे व त्याला योग्य दिशा देण्यासाठी वृत्तपत्राची मदत हवी आहे.
- आजच्या वाचकाची दृष्टी कॉम्प्युटर, इंटरनेटच्या ज्ञानामुळे सजग व डोळस झाली आहे. त्यामुळे वृत्तपत्रांनी काय द्यावे व काय देऊ नये हे तो ठरवू लागला आहे. किंबहुना तेवढी नीरक्षीर विवेकबुद्धी त्याला आली आहे.

---

१. प्रश्नावल्या -बहुसंख्य वाचक

- एकीकडे विवेकी वाचक तर दुसरीकडे हीन अभिरूची जपणारा, हिणकस गोष्टी वाचणारा अभिरूची हीन वाचक अशा दुहेरी रूळावरून वृत्तपत्राची गाडी चालली आहे.[१]
- महिला सुशिक्षित झाल्याने त्या अभिरूची संपन्न वाचनाची चोखंदळपणे मागणी करताहेत.[२]
- ग्रामीण भागातल्या शेतकऱ्यांपासून कारखान्यातल्या कामकऱ्यांपर्यत हमालापासून बालापर्यत सर्वांना साक्षर केल्याने तेही वृत्तपत्राचे वाचक झाले आहेत.
- एकतर विद्वान पंडिताचा (शिक्षक, प्राध्यापक, वकील, डॉक्टर इ.) वृत्तपत्रांकडून सकस लेखनाची व समर्थ प्रबोधनाची अपेक्षा करणारा वाचक वर्ग वाढतो आहे. दुसरीकडे त्याचवेळी सामान्य विषयाची मांडणी करून, हलके फुलके विषय चघळून केवळ मनोरंजनाची अपेक्षा ठेवणारा कॉमन मॅनचा वाचकवर्ग पुढे येतो आहे.
- वृत्तपत्रांनी आपल्या गुणवत्तेवर दर्जा व खप वाढवावा. लोकप्रियता मिळवावी असे म्हणणारा वाचकवर्ग आहे तर या विरूध्द विविध बक्षिसांची, भेटवस्तूंची प्रलोभने दाखवून खप वाढवावा असे म्हणणारा वाचकवर्ग वाढतो आहे. लोकमत सखी मंच, सदस्यांना भेटवस्तू देणे. लोकमतने आयोजित केलेली कात्रणाची योजना, किंमत कमी करून उडवलेली खळबळ, तरूण भारतची सहा महिन्यांची कन्सेशन योजना या सगळ्या याच दुष्टचक्राचा भाग आहेत. सकाळची निर्लेप भांडी भेट योजनाही.
- मुले, तरूण स्त्रिया, प्रौढ, शेतकरी, पेशंट, विविध व्यवसायिक या सर्वांनाच आपल्या विषयाचे 'विशेष' काहीतरी हवे असते. असे आपल्यासाठी काहीतरी स्पेशल मागणाऱ्या वाचकांचाही मोठा वर्ग आहे. या सर्व वाचकांच्या अभिरूचीही तशाच आहेत.

१) देशभक्ती, राष्ट्रसेवा हा त्यांच्या अभिरूचीचा भाग राहिलेला नाही.

२) माहिती मिळवणे व त्याचा अन्वय लावणे हा त्यांचा छंद झाला आहे.

३) मनोरंजन हीच त्याची अभिरूची झाली आहे.

---

१. वाचकांची प्रश्नावली - डॉ.विलास जोशी, सांगली

२. वाचकांची प्रश्नावली - सौ.ज्योत्स्ना तानवडे, सांगली

४) व्यवसायाभिमुख माहितीचे ज्ञान ही त्याची मागणी झाली आहे.[१]

५) वृत्तपत्रांनी सकारात्मक लिहावे हा त्यांचा आग्रह आहे.

६) विकासात्मक व विज्ञानात्मक दृष्टीकोन त्याला हवा आहे.

७) राजकारणापेक्षा समाजाभिमुख वृत्तपत्र त्यांना हवे आहे.

८) वृत्तपत्रांच्या बाजारूवृत्तीला व सवंग लोकप्रियतेला त्याचा विरोध आहे.

९) स्त्रीचे विकृत दर्शन, धर्माचे, जातीचे राजकारण करण्यापेक्षा वृत्तपत्रांनी समाजाच्या प्रगतीला मदत करावी अशी त्यांची इच्छा आहे.[२]

१०) त्यांना बीभत्सता, हिंसाचार याची चीड येते आहे.

११) व्यापारीकरणाचा सोस पत्रकारितेचे आदर्श उध्वस्त करून टाकेल ही त्याला खात्री आहे. म्हणूनच पत्रकारितेने वेळीच सावध होऊन आपले पतन थांबवावे असे त्याला वाटते.

१२) वृत्तपत्रांनी साहित्य, शिल्प, संगीत इ. कलांचे उन्नयन करावे अशी त्याची मागणी आहे.

१३) नवतंत्रज्ञानामुळे जग जवळ येत चालले आहे. या जगातील जास्तीत जास्त माहिती कमीत कमी वेळात मिळवावी असे त्याला वाटते आहे.

१४) एकीकडे लोकरूची बातमीपत्रांची आवड. नटनट्यांच्या भानगडीची आवड तर दुसरीकडे प्रिंट मिडियाने गंभीर प्रश्नांना विनोदाचे रूप दिले आहे असा ओरडा करणारे लोक अशा दोन टोकाच्या अभिरूचीचे दर्शन घडते आहे.[३]

१५) सर्वेक्षणातून जाणवलेली सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे बहुसंख्य वाचकांना वैचारिक, बौद्धीक, सैंद्धांतिक अशा आयुष्याला गंभीर वळण देणाऱ्या बातम्या, लेख नको आहेत. या स्पर्धात्मक युगात मानसिक टेन्शन देणाऱ्या कोणत्याच गोष्टी त्यांना नको आहेत. यातील काही लोकांनी मजेशीर

---

१. वाचकांची प्रश्नावली - कु. प्रणाली आवटी.(क्लासवन अधिकारी)

२. संपादक प्रश्नावली - केसरी - श्री. पेशवे

३. संपादक प्रश्नावली - दै.जनप्रवास - श्री.पाटील

पण विचार करावा अशी प्रतिक्रिया व्यक्त केली ती म्हणजे - ''हल्ली डायबेटीस, हार्टअॅटॅक सारखे आजार वाढण्यास ही वृत्तपत्रेच कारणीभूत आहेत. वृत्तपत्रातल्या खून, मारामाऱ्या, गुन्हेगारी, भ्रष्टाचार यांच्या बातम्या वाचताना या समाजात आपले काय होणार? आपल्याला काही चांगल्या गोष्टी पाहायला मिळणार नाहीत का? या जगात विधायक असे काही शिल्लकच नाही की काय? असे प्रत्येकाला वाटते. लाकूड पोखरणाऱ्या भुंग्याप्रमाणे या बातम्या काळीज व मेंदू पोखरत राहतात. परिणामी अशा व्याधी जडण्याची शिक्षा गुन्हा न करताच मिळते.''[१]

एक गृहस्थ तर म्हणाले,- '' काय वाचण्यासारखं राहिलेलेच नाही. वृत्तपत्रात पहिल्या पानापासून शेवटच्या पानापर्यंत बॉंबस्फोट, खून, मारामाऱ्या, फसवणूक, भांडणे, दरोडे, अपघात सारे रक्तरंजित. ही अक्षरं मस्तकात खिळे ठोकल्यासारखी रूतू लागतात. अशी रक्तरंजित (अतिरंजितही) वृत्तपत्र वाचण्यापेक्षा मी बंद करून टाकली. वाचायलाही नकोत व त्रास व्हायलाही नको.''[२]

यावरून जागृत वाचकालाही आता विध्वंसक बातम्यापेक्षा विधायक वर्तमान वृत्त हवे आहे. सकारात्मक, आशावादी वृत्तपत्र हवे आहे हे जाणवते.

वाचकाची बदलती अभिरूची व भूमिका याची सविस्तर चर्चा केल्यानंतर आपणास वाचक वर्गाचे विविधस्तर व त्या नुरूप त्यांची आवड कशी आहे. त्यांच्या आवडीची दखल ही वृत्तपत्रे कशी घेतात हे पहायचे आहे.

## २.११ वाचकवर्गाचे स्तर-

आज वृत्तपत्राच्या वाचकांची संख्या लाखाच्या घरात आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात वृत्तपत्रासमोर एकाच अभिरूचीने, ध्येयाने बांधलेला वाचक वर्ग होता. मात्र बदलत्या काळानुरूप वाचकवर्ग बदलला. विभिन्न अभिरूची, भिन्न व्यवसाय. भिन्न वयोगट, भिन्न लिंग, भिन्न मतमतांतरे असणारे वाचक पुढे आले. सर्वांना हवे ते देऊन त्यांचे समाधान करण्याची जबाबदारी अर्थात वृत्तपत्रांवर आली. साहजिकच

---

१. वाचक प्रश्नावली - श्री.बी.बी.काळे - ज्येष्ठ नागरिक.

श्री.जमदग्नी - संपादक मंडळ - साप्ताहिक विजयंत

२. वाचक प्रश्नावली - श्री. नांद्रेकर (अॅडव्होकेट)

त्याच्या स्तरानुसार वृत्तपत्रांना आपल्या ध्येयधोरण व रूपरेषेत बदल करावा लागला. विविध विषय नव्याने हाताळावे लागले. विविध सदरे सुरू करावी लागली. अशा वाचकवर्गाचे स्तर पुढीलप्रमाणे सांगता येतील -

**२.११. १) विविध वयोगट - यात अबालवृद्ध असा उल्लेख करता येईल.**

● **बालक वर्ग -** या वयोगटाचा विचार आवर्जुन केला जातो. जपानसारख्या देशात या गटावर लक्ष केंद्रीत केले जाते. कारण भावी देशाची मदार यांच्यावरच असते. त्यामुळे या पिढीचे व्यक्तिमत्व व अभिरुची सुसंस्कारित करणे हे ध्येय त्यांच्यापुढे असते. आपल्याकडे या वयोगटाचा फारसा गांभीर्याने विचार केला गेला नव्हता. तरीही ह. ना. आपटे यांनी करमणुकीमध्ये बालकांसाठी बोधकथा सुरू केल्या होत्या. नंतर वृत्तपत्रांनी लहान मुलांसाठी बालांचे पान. बालजगत अशी स्वतंत्र सदरे सुरू केली. छावा, अंकुर, बालमित्र, खजाना अशा स्वतंत्र बालपुरवण्या सुरू झाल्या. लोकमतने आई, गुरूशिष्य कथांची घेतलेली कात्रण स्पर्धा, कॉमिक्स, चित्रकथा इ. अनेक सदरे या दृष्टीने उल्लेखनीय ठरतात. सकाळच्या बालचित्र स्पर्धाही याचाच भाग आहेत.

● **तरूण वर्ग -** वास्तविक आजची तरूणपिढी या परिवर्तनाच्या प्रक्रियेत महत्वाची समजली जाते. या पिढीवर योग्य संस्कार केले तरच ती उद्याच्या देशाला योग्य आकार देऊ शकेल. त्यासाठी योग्य प्रगल्भ विचार त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी वृत्तपत्रांनी प्रयत्नशील राहिले पाहिजे. मात्र पाश्चात्य संस्कृतीने भारावलेल्या या तरूणपिढीला वैचारिक उद्‌बोधन कितपत रूचावे हा एक प्रश्नच आहे. कारण या तरूणाईचे मनोगत मांडताना भाऊराव पाटणकरांनी मार्मिक शब्दांत मांडले आहे ते म्हणतात -

''जातो तिथे उपदेश आम्हां. सांगतो, कोणीतरी
किर्तने सारीकडे सारीकडे ज्ञानेश्वरी ।
काळजी आमच्या सुखाची, एवढी वाहू नका.
जाऊ सुखे नरकात आम्ही, तेथे तरी येऊ नका ।।''

अशा तरूण पिढीसाठी वृत्तपत्रांनी थोडा वेगळा टर्न घेतला आहे. त्यातही महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या हजारो युवक युवतींचा एक खास वाचक वर्ग आहे. उमलत्या तारुण्यातील त्यांचे भावविश्व,

शैक्षणिक समस्या, विविध उपक्रम, त्यांच्या आवडी निवडी, प्रचलित विषयांवरच्या त्यांच्या प्रतिक्रिया या साऱ्यांचा परामर्श घेण्यासाठी काही विशेष पुरवण्या काढल्या आहेत. या वाचकांसाठी सकाळचे 'युवासकाळ' हे स्वतंत्र दैनिक निघते. लोकमतची 'मैत्र' पुरवणी उल्लेखनीय आहे. कॉलेजकट्टा सारखी, हितगुज, सखीसारखी सदरेही आहेत.

तरूण पिढीचे खेळाचे आकर्षण लक्षात घेऊन व वाढते क्रीडा रसिक पाहून त्यांच्यासाठी साप्ताहीक पुरवणीपेक्षा रोजच्या अंकात एक पूर्ण पान भरून क्रीडा वृत्त दिले जाते.

● **बेरोजगार युवक** – नोकरी मिळवणे हे आजकाल दिव्य झाले आहे. नोकरी नाही म्हणून अनुभव नाही व अनुभव नाही म्हणून नोकरी नाही. अशा परिस्थितीत ''पदवीची भेंडोळी घेऊन आत्म्यासकट इमान विकणाऱ्या'' या बेकार तरूणाची वेदना व त्याला मार्गदर्शन करण्यासाठी दैनिक पुढारीची करिअर, सकाळची Appointments पुरवणी निघते. यात नोकरी मिळविण्याची पूर्व तयारी कशी करावी. मुलाखतीचे तंत्र काय असते. विविध स्पर्धापरीक्षांना कसे बसता येते. त्याची पद्धत काय, नोकरीच्या संधी कोठे उपलब्ध आहेत अशी माहिती दिली जाते.

● **प्रौढ** – प्रौढ वयीन व्यक्तीची अभिरूची लक्षात घेऊन वृत्तपत्रात वैचारिक लेख, अग्रलेख, वृत्तवेध बातम्यांचे विश्लेषण, परिपाठ, बोधकथा, सत्संग, संतसहवास सारखी सदरे असतात. त्यासाठी विविध पुरवण्या काढल्या जातात. यात रविवार पुरवणी प्रमाणे माहितीपर व मनोरंजक मजकूर संकलित स्वरूपात दिला जातो. पर्यटन स्थळांची माहिती. ऐतिहासिक स्थळांचा इतिहास, ट्रेकींग, संसारापयोगी माहिती, नवे पदार्थ, आरोग्य, शासकीय माहिती, भविष्य,कोडी जगातील आश्चर्यजनक माहिती, थोरांचे जीवनप्रसंग, प्राणी - पक्षी यांची माहिती या पुरवणीद्वारे वाचकांना सादर केली जाते. दै. तरुण भारतची 'खजाना' विविधा, दै. सागरची कुटुंब, दै. लोकसत्ताची हास्यरंग - लोकमुद्रा ही प्रकाशने, महाराष्ट्र टाईम्सची अविष्कार पुरवणी याचा यात उल्लेख करावा लागेल.

तसेच काही प्रासंगिक पुरवण्याही विषयानुषंगाने काढल्या जातात. त्या प्रासंगिक व एकाच विषयावर असतात. उदा. कृषी पुरवणीत शेती विषयी मजकूर व जाहिराती असतात. राजकिय व सामाजिक क्षेत्रातील नेत्यांच्या जन्मदिनी खास वाढदिवस पुरवणी काढतात. त्यात त्या व्यक्तिच्या कार्यावरच्या लेखांचे संकलन असते. देवदेवतांच्या यात्रांच्या निमित्तानेही काही खास पुरवण्या प्रसिद्ध

होतात. त्यात त्या ठिकाणच्या इतिहास, देवदेवतांची माहिती. चमत्कार, कथा यांची माहिती असते. (सातारा जिल्ह्यातील मांढरदेवी यात्रेनिमित्त काळूबाईची माहिती देणारी पुरवणी, पुसेगाव यात्रा - सेवागिरी महाराजांवर पुरवणी निघते. आषाढी कार्तिकी वारी विशेषांक निघतात.) सुट्टीत पर्यटन स्थळाची माहिती देणाऱ्या पुरवण्या, अर्थपुरवणी इ. निघतात.

● .**वृद्ध** - यांच्यासाठी आरोग्य, व्यायाम, पेन्शनरांच्या समस्या व उपाय, अध्यात्म, वृद्धाश्रम अशा विविध विषयांवर लेखन केले जाते.

## २.११. २) विविध व्यावसायिक -

आपल्याकडे चरितार्थासाठी विविध व्यवसाय करणारे लोक आहेत. सामाजिक जागृतीमुळे हे सर्व लोक वृत्तपत्र वाचत असतात. प्रौढ शिक्षणाने साक्षर झालेला हमाल. मोलकरीणही मोठ्या उत्साहाने वृत्तपत्र वाचत असतात. पूर्वी आमच्या वडिलांकडे एक हमाल सकाळी सकाळी वृत्तपत्र घेऊन येत असे. ''साहेब, तुम्ही वाचा अन् मला बी सांगा.'' असे सांगत असे. आमची कामवालीही दुपारी इतर चार पाच कामवाल्यांना घेऊन आमच्याकडे बसत असे. त्यावेळी वृत्तपत्राच्या वाचनाचा जाहीर कार्यक्रम असे. मात्र त्यांना राजकीय बातम्यांपेक्षा, खून, बलात्कार, अपघाताच्या बातम्यांमध्ये रस असे. एकूण अशा सर्व व्यावसायिकांना त्याच्या व्यवसायाशी संबंधित व त्याची आवड पुरविणारे काही ना काही वृत्तपत्राकडून मिळावे असे वाटत असते. ते वृत्तपत्रे पुरवतही असतात.

● **हमाल** - हलक्या फुलक्या बातम्या, बाजारातल्या उलाढाली, अपघाताच्या बातम्या, विनोद, चित्रपट या विषयाचे लेखन, व्यापाराशी संबंधित वृत्त या बाबी त्यासाठी असत. लोक रूची वार्ताही त्याच्या खास आवडीचा विषय असतो.

● **दुकानदार** - व्यापारातल्या हालचाली, बाजारभाव, राजकारण, महागाई. जकातवार्ता या विषयावरील लेखन यांच्यासाठी दिले जाते.

● **शेतकरी** - शेतीविषयक माहिती. नवे तंत्रज्ञान, शोध, कृषिवार्ता, जाहिराती, शेती मालाचा भाव. बाजारभाव, नवीन अवजारांची माहिती यात दिली जाते. तसेच. शेती प्रदर्शन, निरनिराळ्या बियाणांची माहिती हे विषय असतात. पुढारीची भूमीपुत्र ही पुरवणी याचा उत्तम नमुना आहे.

● **विद्यार्थी –** यांच्यासाठी वेगवेगळी शैक्षणिक सदरे, दहावी व बारावीचा अभ्यास प्रश्नपत्रिका स्वरूप, चौथी व सातवी स्कॉलरशिप परीक्षेच्या सराव प्रश्नपत्रिका. शब्दज्ञान, सामान्यज्ञान, विविध अभ्यासलेख, पुस्तक परिक्षणे, परिपाठासारखी सदरे, वाक्प्रचार, म्हणी, शब्दव्युत्पती, परकिय भाषेतील पुस्तकांची ओळख इ. शैक्षणिक उपक्रम, साधने, शिक्षणसंस्था, उपक्रम. अभ्यासक्रमातील, विषय, पाठ्य पुस्तकातील बदल, परीक्षांच्या बैठक व्यवस्था, तारखा, स्थळे, रिझल्ट असे शिक्षण क्षेत्राशी संबंधित असंख्य विषय यात येतात. देशोदेशीच्या शिष्यवृत्त्या, मुदती, शैक्षणिक कर्जे यांचीही माहिती येते.

● **गृहिणी –** गृहिणीशी संबंधित बातम्या, माहेर, सखी, पाककृती, शिवण, भरतकाम, मेंदीची नक्षी, हितगुज, मुलांवर संस्कार, माझी आई, माझं गाव, अविस्मरणीय प्रसंग, बालसंगोपन, अशी अनेक सदरे महिलांसाठी असतात. संसारोपयोगी टिप्स असतात. त्याचप्रमाणे (लोकमत) सखी, (सकाळ) मधुरा, चतुरंग, (लोकसत्ता) चतुरा, कस्तुरी, (पुढारी), डार्लिंग (तरूण भारत) या पुरवण्यांनी महिलांची मने काबीज केली आहेत. 'तनिष्का' ही विशेष पुरवणी (सकाळ) उल्लेखनीय आहे. यात पाककला, सौंदर्य प्रसाधने, दागिने, व्रतवैकल्ये, स्वयंपाक घरातील उपकरणे, घर सजावट. महिलांसाठी विविध व्यवसाय. स्त्रियांपुढील आव्हाने, नोकरदार स्त्रियांचे विश्व, समस्या, प्रश्न, हस्तकला, राजकारण, समाजकारण, मिडियामधील महिलांचा प्रवेश असे नवे जुने विषय चर्चिले जातात. कर्तबगार महिला, वेगळ्या क्षेत्रातल्या महिलांचा परिचय करून दिला जातो. नव्या फॅशन, महिलांचे आरोग्य, सौंदर्य प्रसाधनांच्या जाहिराती हे ही विषय असतात.

● **नोकरदार –** यांच्यासाठी शासनाची परिपत्रके, नियम, आदेश, नियमातील बदल, पगार, सुट्ट्या, अन्य समस्या, न्यायनिवाडे, फोन नंबर्स, आचारसंहिता या विषयांचे विवेचन असते.

● **एजंट –** विमा वगैरेच्या एजंटना पूरक अशी माहिती यात असते. घर खरेदी विक्री नियम, शेअर्स, त्यातील चढउतार, जमिनीच्या खरेदी विक्री नियम, बदल, पद्धत, छोट्या मोठ्या जाहिराती. परिणाम. न्यायनिवाडे, ग्राहक न्यायालयात गेलेले प्रश्न, त्यांचे निकाल, आर्थिक तेजी -मंदी सेन्सेक्स चढउतार, रिझर्व्ह बँकेचे नियम, Income Tax इ. टॅक्सची माहिती, नियम इ. विषय यात येतात. व्यवहारात डोळसपणा कसा हवा, फ्लॅट - घरी खरेदी करताना घ्यायची काळजी, एजंटाचे काम इ. चे अभ्यासपूर्ण विवेचन यात असते.

● **शिक्षक -** प्राध्यापक - यांच्यासाठी वैचारिक लेख, अग्रलेख, बातम्यांचे विश्लेषण, शासकीय सेवाशर्ती, शैक्षणिक लेख, अभ्यासक्रमाबद्दल मार्गदर्शन, शिक्षण क्षेत्रातील नवे प्रयोग, शासकीय धोरणे, शैक्षणिक संस्था, नवी क्षितिजे, नवे कोर्स, नव्या पाऊलवाटा, नवे नियम, नव्या जाणीवा, शिक्षकांच्या समस्या, न्यायनिवाडे, प्रश्न, संघटना, निवडणुकी, धोरणे, शिक्षकाचे सुयश, शिक्षण क्षेत्रासंबंधीत घटना या विषयांचे विवेचन असते. प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत आलेले नवे प्रवाह, नव्या योजना, वेतन आयोग, नॅक - सॅक कमिटी, नव्याशिक्षण संस्था, अनुदाने, विना अनुदानित संस्था, शिक्षक - संस्थाचालक संबंध, देणग्या, वेतनभत्ते, तासिका तत्वावरचे प्राध्यापक, शिक्षणसेवक, माध्यान्ह भोजन सारख्या योजना, शिक्षकांच्या सेवाशर्ती, नवे विषय, शिक्षकांच्या प्रशिक्षणाची माहिती अशा अनेक विषयांचे विवेचन वृत्तपत्रात असते. एम फील. पीएच डी. व नेट सेट ग्रस्तांच्या प्रश्नांना वृत्तपत्रानीच वाचा फोडलेली दिसते.

● **कारकून -** वेगवेगळी शासकीय धोरणे, निमयावली. सरकारी परिपत्रके, इ. वृत्तपत्रात येतात त्यामुळे बऱ्याच गोष्टीची माहिती मिळते.

● **बँकेतील कर्मचारी -** बँकांची आर्थिक परिस्थिती, रिझर्व्ह बँकेची धोरणे, बदलते नियम, अर्थव्यवस्था. बँकाचे शाखाविस्तार, परदेशी बँकांची स्थिती, धोरणे, आंतरराष्ट्रीय आर्थिक धोरणे, कर्जस्थिती, पतसंस्थाची प्रगती, आर्थिक कारभार, वेतनवाढी, संप, सुट्टया इ. विषयांची माहिती त्यात मिळते.

● **मासेमार -** हवामानाचा अंदाज, वादळाची स्थिती, धोके, व्यवसायातील चढउतार या सर्वांशी निगडीत बातम्या, बाजारभावही असतो.

● **गुन्हेगार -** गुन्हेगार, शिक्षा, खटले, गुन्हेगाराची स्थिती, मानसिकता, तुरुंगात होणारी अवस्था, हाल, त्यांच्यावर होणारे अत्याचार, त्यांची बाजू, वाढत्या गुन्हेगारीची कारणे, भ्रष्ट पोलीस यंत्रणा, भ्रष्ट शासन, गुन्हेगारी, गुन्हेगारी जगताच्या चटकदार वार्ता (गुन्हेगार जगत. पोलीस टाईम्स), गुन्हेगार व राजकारण यांचे लागेबांधे या सर्व गोष्टी यात चर्चिल्या जातात. त्याचबरोबर गुन्हेगारांची बाजू मांडण्याचे कामही ते करतात. त्यामुळे गुन्हेगारांना वृत्तपत्र जवळची वाटतात. काही वेळा या गुन्हेगारांमधला माणूस, कलावंत यांना प्रकाशात आणण्याचे काम ते करतात. उदा. वीरप्पन, फुलनदेवी.

● **दहशतवादी -** वृत्तपत्रातून दहशतवादाच्या बातम्या येतात. वृत्तपत्रे केवळ त्यांचे अपराधीपणच प्रकाशात आणत नाही तर त्याच्या या व्यक्तिमत्वामागचा इतिहास. त्यांची कारणमिमांसा, त्यांची भूमिका सगळी वृत्तपत्रे मांडतात. त्यामुळे दहशतवाद्यांना वृत्तपत्राबद्दल आदर व आधाराची भावना वाटते. विश्वासही वाटतो. ओसामा बीन लादेन आपली मते मांडण्यासाठी वृत्तपत्रे व मिडियाशी मोकळेपणाने बोलतो. कसाबसारखे दहशतवादी पत्रकारांशी संपर्क साधतात व आपले म्हणणे मांडतात. अशा दहशतवाद्यांसाठी वृत्तपत्रे मध्यस्थासारखी असतात.

● **परदेशातील वाचक -** परदेशात नोकरीच्या निमित्ताने गेलेली मराठी माणसे आपल्या मातीच्या गंधासाठी आसुसलेली असतात. 'ने मजसी ने परत मातृभूमिला.' अशी त्याची अवस्था असते. आपल्या देशाचे, आपल्या गावचे, आपल्या भागाचे, वर्तमान जाणून घेण्याची अनिवार ओढ त्यांना असते. त्यांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे काम 'ऑन लाईन पत्रकारिता ' करते. इंटरनेट वरून अनेक दैनिके ते वाचू शकतात. व आपल्या गावाकडच्या गोष्टीची मजा घेतात.

● **सर्वसामान्य वाचक -** अशा वाचकांसाठी वृत्तपत्रे लोकरूची बातमीपत्रे, परदेश वार्ता, अद्‌भूत दुनिया. विनोद, शब्दकोडी, चित्रकथा, विडंबने, व्यंगचित्रे, बाल गोष्टी- गाणी अशा चटपट्या मजकुरांनी भरलेल्या रविवार पुरवण्या देतात. दै. लोकसत्ताची लोकरंग, महाराष्ट्र टाईम्सची 'संवाद', सकाळची 'सप्तरंग.' केसरीची विविधा, तरूण भारतची 'अक्षरयात्रा,' लोकमतची 'मंथन,' पुढारीची 'बहार', दै. सागरची 'रसिक', दै. ऐक्यची 'झुंबर' सामनाची 'उत्सव' या पुरवण्या अशा रसिक वाचकांसाठी नेहमीच सजूवन येत असतात.

● **चित्रपट शौकिन -** चित्रपटाचे हजारो रसिकांना, वाचकांना एक वेडच आहे व त्यांच्यासाठी खास चित्रपट पुरवण्याचे प्रकाशन केले जाते. चित्रतारकां व कलाकारांची आकर्षक छायाचित्रे, नव्या चित्रपटाच्या चित्रीकरणाचे वृत्त, मुहुर्त, जुन्या चित्रपटाच्या दंतकथा, पडद्यामागील खुमासदार चर्चा, चित्रपट गीते, संगीत असा सर्व मालमसाला रंजक व चटकदार शैलीत वाचणे शौकिनांना आवडते. त्यांच्यासाठी या पुरवण्या प्रसिद्ध होतात. या साठी स्वतंत्र पत्रकार नेमले जातात. सोनेरी (पुढारी), चंदेरी (ऐक्य), मस्तमस्त (तरूण भारत), कलारंजन (सकाळ) या पुरवण्या आहेत. काही पुरवण्यात हिंदी, मराठी, इंग्रजी चित्रपटांची परीक्षणेही येतात. नाट्यपरीक्षणेही येतात.

याचप्रमाणे काही प्रासंगिक पुरवण्याही काढून वाचकांची जिज्ञासा शमविली जाते. स्वातंत्र्य दिन,

प्रजासत्ताक दिन, दसरा, दिवाळी, नवीन वर्षारंभ, वर्षाअखेर, वर्धापनदिन, साहित्य संमेलने, कृषी प्रदर्शन, वाढदिवस या निमित्ताने या पुरवण्या निघतात.

वृत्तपत्राच्या वाचकांचे विविधस्तर व त्यांच्या अभिरूचीनुसार 'जो जे वांछिल तो ते लाहो' पुरवणारी वृत्तपत्रे यांचे सविस्तर विवेचन वाचल्यावर आपणास वृत्तपत्र व वाचकाचे नाते किती दृढ आहे हे समजते.

## २.१२ समारोप -

प्रस्तुत प्रकरणात आपण स्वातंत्र्योत्तर काळातील वृत्तपत्रे, गेल्या २० वर्षात वृत्तपत्रात. त्यांच्या धोरणात झालेले बदल पाहिजे.

आकाशवाणी, दूरदर्शन यामुळे वृत्तपत्रात बदल झाले. वृत्तपत्रांचे एकांगी स्वरूप पालटले. त्यात विविधता आली. त्याचे रूप अंतर्बाह्य पालटले पत्रकारितेने ग्रामीण, दलित, रेडिओ, दूरदर्शन, चित्रपट, इंटरनेट पत्रकारिता अशी रूपे धारण केली. कृषी पत्रकारिता, विकास पत्रकारिता, पीत पत्रकारिता. शोध पत्रकारिता, क्रीडा पत्रकारिता अशा पत्रकारितेतून वृत्तपत्रांना वैविध्य प्राप्त झाले. उपग्रहांची वाढती संख्या, नवे तंत्रज्ञान, संगणक क्रांतीतून वाहिन्यांचा वाढता प्रभाव यामुळे त्याचे साधेसुधे रूप पालटले. वृत्तपत्र व्यावसायिक झाले.

राजनैतिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, फिल्म. खेळ, शिक्षण. साहित्य, औद्योगिक, उच्च तंत्रज्ञान, चिकित्सा, कृषी, शोध, पर्यावरण, वन्यप्राणी जीवन, ऑटोमोबाईल, गृहसजावट, ज्योतिष, कॉम्प्युटर, फोटोग्राफी, बाल व महिला या अनेक अंगांनी पत्रकारिता सजली.

असे असले तरी पत्रकारिता बातम्यांकडून, मनोरंजनाकडे प्रवास करताना परिस्थिती शरणतेकडे निघाली नाही ना? असे प्रश्नचिन्ह आपल्यापुढे उभी करती झाली आहे असे म्हणावे लागेल.

या पुढच्या प्रकरणात आपण वाचकांकडून घेतलेल्या प्रश्नावल्यातील माहितीचे विश्लेषण व अर्थ निर्वचन करणार आहोत. आपण गृहित धरलेली गृहितके व वाचक, संपादक, पत्रकार यांच्याकडून भरून आलेल्या प्रश्नावलीतील त्याच्या अपेक्षांचे विश्लेषण करून आपल्या गृहितकात कितपत तथ्य आहे हे अभ्यासणार आहोत.

## प्रकरण तिसरे

# गृहितके

# प्रकरण ३ रे

## गृहितके (Hypothesis)

३.१ प्रस्तावना

३.२ संशोधन विषयाची ओळख

३.३ संचशोधनाची उद्दिष्टे

३.४ संशोधनाची गरज व महत्व

३.५ संशोधनाची मर्यादा व व्याप्ती

३.६ गृहितके

३.७ संशोधनाची कार्यपध्दती

३.८ संशोधनाची साधने

३.९ नमुना निवड

३.१० प्रश्नावल्यांचे स्वरुप

३.११ संशोधनाची कार्यवाही

३.१२ माहितीचे प्रथ्थकरण व विश्लेषण

३.१३ माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

- ३.१३.१ सर्वसामान्य वाचकांच्या प्रश्नावलीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन
- ३.१३.२ वृत्तसंपादक व कार्यकारी संपादक यांच्या प्रश्नावलीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन
- ३.१३.३ विद्यार्थी प्रश्नावलीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन
- ३.१३.४ शहरी व ग्रामीण वार्ताहरांच्या प्रश्नावलीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन
- ३.१३.५ वृत्तपत्र एजंट व विक्रेते यांच्या प्रश्नावलीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

३.१४ सारांश

३.१५ समारोप

## प्रकरण ३ रे

## गृहितके (Hypothesis)

### ३.१ प्रस्तावना

पहिल्या प्रकरणांत आपण वृत्तपत्राची संकल्पना हेतु, उद्देश व कार्य यांचा अभ्यास केला. त्याचबरोबर स्वातंत्र्यपूर्व काळातील वृत्तपत्रे त्यांचे उद्देश कार्य तसेच स्वातंत्र्योत्तर काळातील वृत्तपत्रे त्यांचे उद्देश व कार्य वृत्तपत्रांच्या बदलत्या भूमिका याचा सविस्तर उहापोह केला.

त्याचबरोबर दुसऱ्या प्रकरणात वृत्तपत्र व वाचकाचे नाते, पूर्वीचा वाचक वर्ग, त्याच्या अपेक्षा स्वातंत्र्यपूर्वकाळातील वृत्तपत्राचे विषय, बातम्याचे स्वरूप, संपादकाच्या भूमिका, संपादक व वाचकाचे नाते, वाचकाच्या आवडीतील वैविध्य यांचा अभ्यास केला. स्वातंत्र्योत्तर काळात वाचकाची भूमिका कशी बदलली. अभिरूचीत कोणते बदल झाले, विविध व्यवसायिक व वयोगटानुसार वाचकांची अभिरूची कशी बदलली यावर चर्चा केल्यानंतर प्रस्तुत प्रकरणात आपण संशोधन विषयाची ओळख, संशोधनाची गरज, संशोधन समस्येचे महत्त्व, संशोधनाची उद्दिष्ट्ये, गृहितके त्याची व्याप्ती व मर्यादा याचा विचार करणार आहोत.

### ३.२ संशोधन विषयाची ओळख

वृत्तपत्र हा लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ मानला गेला आहे. प्रारंभापासून आजपर्यंत वृत्तपत्रांनी समाजप्रबोधन व रंजनाचे दुहेरी काम केले आहे. पूर्वीची वृत्तपत्रे काळानुसार बदलत गेली. आज त्यांचा संपूर्ण चेहरामोहराच बदलून गेला आहे. या बदलामागे अनेक गोष्टी कारणीभूत ठरल्या आहेत. वृत्तपत्र व वाचक यांचा घनिष्ट संबंध आहे. किंबहुना वृत्तपत्रातील बदलाला वाचकाची बदलती अभिरूचीच कारणीभूत ठरली आहे असे म्हंटल्यास चुकीचे ठरणार नाही. बदलत्या काळानुसार वाचकाचे ज्ञान वाढत असते. त्याची आवड बदलत असते कधी वयानुसार, कधी व्यवसायानुसार, कधी परीस्थितीनुसार तर कधी जाणीवपुर्वक तर कधी कालानुरुप त्याला आपल्या आवडीनिवडी बदलाव्या लागतात या बदलत्या अभिरूचीबरोबरच या प्रसारमाध्यमाकडून त्याच्या अपेक्षा बदलत असतात. रेडिओ, दूरदर्शन यांच्याकडून त्याला सतत काहीतरी नवे हवे असते. तसे वृत्तपत्रांकडूनही त्याला सातत्याने नवीन बदलांची अपेक्षा असते. वृत्तपत्रांकडून वाचकांच्या या बदलत्या अपेक्षा हाच संशोधनाचा विषय आहे.

### ३.३ संशोधनाची उद्दिष्टये :-

पूर्वीची पत्रकारिता ही ध्येयनिष्ठ होती, एक व्रत म्हणून ती स्विकारली गेली होती. त्यामुळे तिचे हेतू, उद्दिष्टये पण वेगळी होती, आदर्श वेगळे होते, ध्येये वेगळी व उदात्त होती, पण स्वातंत्र्य मिळाले. काळ बदलला. माणसाच्या समाजाच्या जाणीवा बदलल्या, जगण्याच्या संकल्पना बदलल्या, नीतिमत्तेची गणिते बदलली. त्यामुळे पत्रकारितेचे स्वरूपही बदलले. वृत्तपत्रादी प्रसार माध्यमांनी कात टाकली. नवे रूप धारण केले. आपली ध्येयधोरणे बदलली. वृत्तपत्रांचे हे बदलते स्वरूप अभ्यासताना एक गोष्ट जाणवली. ती म्हणजे वृत्तपत्रांच्या बदलत्या रूपड्याबरोबर वाचकांची अभिरूचीही बदलली आहे. त्यांच्या अपेक्षाही बदलल्या आहेत आणि अजूनही बदलत आहेत. या बदलत्या अपेक्षा कोणत्या आहेत? या पूर्ण होत आहेत की नाही? त्या रास्त आहेत की अवास्तव आहेत? वृत्तपत्रे त्या पूर्ण करण्यास समर्थ आहेत का? या सर्वांचा अभ्यास करणे हे या संशोधनाचे उद्दिष्ट आहे.

वाचकांच्या अपेक्षेनुसार वृत्तपत्रे बदलली की वृत्तपत्रातील बदलांमुळे वाचकांच्या अपेक्षा वाढल्या, बदलल्या हे तपासणे हा या संशोधनामागचा हेतू आहे. आज प्रसारमाध्यमे मोठ्या प्रमाणात वाढली आहेत जग जवळ येत चालले आहे. जागतिकीकरण, वैश्विकीकरण हे शब्द परिपाठाचे झाले आहेत. दूरदर्शन, संगणक, इंटरनेटमुळे ‘अवघे विश्व अंगणी अवतरले’ आहे. साहजिकच मिडीयाच्या या गदारोळात वृत्तपत्रे आपले स्थान टिकवून आहेत. त्यांचे रूप अंतर्बाह्य बदलते आहे. हे बदलते रूप विधायक आहे की विदारक? त्यामागे वाचकाचे हित आहे की व्यवसाय? वाचकाच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात आहे का? आपल्या बदलानुसार वाचकाला घडवण्याचे काम ती करत आहेत? आज जागृत झालेल्या वाचकांच्या या वृत्तपत्रांकडून कोणत्या अपेक्षा आहेत. हे अभ्यासणे गरजेचे आहे. एक काळाची गरज म्हणून हा संशोधन प्रपंच येथे केला आहे.

यासाठी येथे विविध स्तरावरील वाचकांकडून प्रश्नावली भरून घेऊन या वाचकाच्या अपेक्षा आजमावल्या आहेत, या अपेक्षा पूर्ण झाल्या का? होतील का? पूर्ण होण्यासाठी वृत्तपत्रांना काय करावे लागेल? अपेक्षा व वृत्तपत्रांचे स्वरूप यात सुसंवाद चालला आहे का? वृत्तपत्रातील बदल विधायक आहेत का? वाचकांच्या बदलत्या अपेक्षाची दखल वृत्तपत्रांनी कितपत घेतली आहे? हा संशोधनाचा भाग आहे. वाचक-वृत्तपत्र संवाद ही समस्या कितपत गंभीर आहे. हे या शोधनिबंधात मांडले आहे.

समाज व प्रसारमाध्यमे या दोघांच्याही दृष्टीने ही समस्या महत्त्वाची ठरली आहे. सौंदर्यमूल्य, व्यावसायिक, तार्किक, विवेकी,सामाजिक, संस्कृतिक मुल्यांबरोबर नीतिमूल्यांची जाण ठेवणे गरजेचे आहे. या सर्वांचा अभ्यास करून वाचकांच्या अपेक्षा व वृत्तपत्रे यांच्यामधल्या विसंवादाची कारणे शोधून या समस्येवर उपाय सांगणे हे या संशोधनाचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे.

## ३.४ संशोधनाची गरज व महत्त्व :-

आज प्रसारमाध्यमे मोठ्या प्रमाणात वाढली आहेत. जग इंटरनेटमुळे जवळ येत चालले आहे. दूरदर्शनसारखी माध्यमे अधिकाधिक लोकप्रिय होत चालली आहे. वृत्तवाहिन्यांची संख्या चारशेच्यावर गेली आहे. असे असले तरी लिखित माध्यम म्हणून वृत्तपत्रांचे महत्त्व जराही कमी झालेले नाही. वृत्तपत्र हे समाज जोडण्याचे काम करत असतात. जागतिकीकरणामुळे त्यांच्यात झालेली व्यवसायिकता जाहिरीतींचा बाजार 'प्राईज पेड शेड्युल्ड' (जागतिकीकरण आणि भारतीय प्रसारमाध्यमे विचारमंथन लेख मा.गो.वैद्य पान२६) वृत्तपत्रांचे बाजारीकरण या सगळ्या गोष्टीमुळे वृत्तपत्राचे स्वरूप बदलत चालले आहे. वृत्तपत्रातून समाजपरिवर्तन किती घडवणार यापेक्षा वृत्तपत्रासाठी पैसे किती मिळवून आणणार असा प्रश्न विचारला जावू लागला. (दिपक टिळक यांचे भाषण) प्रसारमाध्यमातील या अनिष्ट रूढींना नेमके काय कारणीभूत होत आहे. या बदलामागे वाचक कारणीभूत आहेत की मालक? वृत्तपत्रांच्या सामाजिक दायित्वाबद्दल जे प्रश्न निर्माण होत आहे त्यामागे वाचकांच्या अपेक्षा कारण आहेत का? या सगळ्याचा अभ्यास करण्याची गरज आज निर्माण झाली आहे. एखाद्या वैद्याने रोगाचे निदान करण्यासाठी नाडी तपासणी करावी तसे वृत्तपत्राच्या अध:पतनाच्या आजाराला नेमकी कोणती गोष्ट कारणीभूत आहे. हे तपासणे आवश्यक आहे. यासाठीच प्रस्तुत संशोधनाची नितांत गरज भासते आहे.

वृत्तपत्रातील बदल लक्षात घेवून त्यानुसार त्यांची गुणवत्ता तपासताना त्यामागे वाचकांच्या कोणत्या अपेक्षा लपलेल्या आहेत काळानुरूप त्या बदलल्या असल्या तरी त्या विधायक आहेत की विघातक हे तपासणे गरजेचे आहे. वाचकांच्या सर्वच अपेक्षांची पूर्तता वृत्तपत्रांकडून केली जाते का? या सर्वांची विस्तृत चर्चा होणे आवश्यक आहे. वाचकांच्या अपेक्षा वृत्तपत्रांना वळण लावतात की वृत्तपत्रे वाचकांच्या अपेक्षांना वळण लावतात याचा अभ्यास होण्याची नितांत आवश्यकता आहे. या विषयावरच हे संशोधन केले आहे. सामाजिक व सांस्कृतिक या दोन्ही दृष्टीने हे संशोधन महत्त्वाचे ठरणार आहे.

## ३.५ व्याप्ती आणि मर्यादा :-

या विषयावरचे संशोधन करणे म्हणजे आकाशाला गवसणी घालण्यासारखे आहे. कारण आज वाचकांची संख्या कित्येक लाखांच्या घरात आहे. प्रत्येकाची अपेक्षा निराळी असणार. अशा लाखो अपेक्षांचा मागोवा घेणे हे कठिण काम आहे. वृत्तपत्र हे साधन सर्वव्यापी असल्याने व तिचा वाचकवर्गही तितकाच मोठा असल्याने सर्वांच्या अपेक्षांचा विचार करायचे म्हटले तर प्रबंधाचा विस्तार प्रचंड वाढेल. व्यक्ती तितक्या प्रकृती असल्याने प्रत्येकाच्या अपेक्षा पाहणे हे महासागराप्रमाणे व्यापक आहे.

म्हणूनच संशोधनाच्या मर्यादा लक्षात ठेवून येथे प्रातिनिधीक स्वरूपात निवडक लोकांकडून प्रश्नावल्या भरून घेवून त्यांच्या अपेक्षा मांडल्या आहेत या अपेक्षा म्हणजे हिमनगाचे टोक आहे याची मला जाणीव आहे. तरीही हे लोक निवडताना सर्व स्तरावरील वाचक येतील याची सर्व वयाचे, सर्व व्यवसायाचे, सर्व स्तरावरील वाचक येतील याची मी दक्षता घेतली आहे. .या संशोधनाला ज्या मर्यादा आहेत याची मला जाणीव आहे तरीही शितावरून भाताची परीक्षा करावी तसे मी त्या त्या वर्गाचे निष्कर्ष मांडले आहेत.

## ३.६ गृहितके

प्रस्तुत संशोधनासाठी आपण काही गृहितके निश्चित करणे गरजेचे आहे.

१. वृत्तपत्र व राजकारण यांचा जवळचा संबंध असल्याने वृत्तपत्रांचा एक विशिष्ट दृष्टिकोन बनतो.

२. वृत्तपत्रे विशिष्ट राजकीय पक्षाचे समर्थन करतात.

३. अलीकडे वृत्तपत्रामध्ये सकारात्मक बातम्यांपेक्षा नकारात्मक बातम्यांवर भर दिला जातो. बऱ्याच वृत्तपत्रात गुन्हेगारीच्या बातम्या भडकपणे रंगविल्या जातात.

४. अग्रलेख वाचणाऱ्या वाचकांची संख्या अगदी कमी आहे.

५. वृत्तपत्रांकडून निखळ मनोरंजन व प्रबोधन व्हावे ही वाचकांची अपेक्षा आहे.

६. वृत्तपत्रांनी वेगवेगळ्या पुरवण्या देवून वाचकांची अभिरूची जपावी असे वाचक म्हणतात.

७. दूरदर्शनचा वृत्तपत्र वाचनावर परिणाम होवून वाचकवर्ग कमी झाला आहे.

८. वृत्तपत्रे दूरदर्शनच्या स्पर्धेत टिकवण्यासाठी जाहिरातींच्या अधीन गेली आहेत.

९. वृत्तपत्रांचे बाजारीकरण झाल्यामुळे खप वाढवण्यासाठी वृत्तपत्रे चमत्कृतीकडे वळत आहेत.

१०. पीतपत्रकारितेचे प्रमाण अलिकडे मोठ्या प्रमाणात वाढले आहे.

११. वृत्तपत्राच्या संपादकाला हवे तेवढे स्वातंत्र्य न मिळाल्याने त्यांना मालकांच्या इच्छेनुरूप आपल्या विचारांची दिशा ठरवावी लागते.

१२. गेल्या दहा-पंधरा वर्षात स्वरूप हेतू उद्दिष्टये, धोरणे व विषय यात महत्त्वपूर्ण बदल होवून वृत्तपत्र वाचकाभिमुख होण्यापेक्षा अर्थाभिमुख झाले आहे.

१३. बाजारीकरणाबरोबर वृत्तपत्रांची मानसिकता बदलत चालली आहे.

१४. वाढत्या स्पर्धेत वृत्तपत्रकारितेचा आत्माच हरवित चालला आहे. त्याचे ध्येयवादीत्व संपून तो धंदा बनला आहे.

१५. वृत्तपत्रे समाजहितासाठी काही विशेष कार्य करतात. या गोष्टीत खरेपणा आहे.

संशोधनाची गृहितके निश्चित केल्यावर आपण कोणत्या संशोधन पद्धतीचा अभ्यास करणार आहोत हे पाहणे गरजेचे ठरेल.

### ३.७ संशोधनाची कार्यपद्धती :-

परिस्थिती जाणून घेण्यासाठी एखाद्या विषयाचा बारकाईने केलेला समीक्षणात्मक चिकित्सक अभ्यास म्हणजे संशोधन होय (लघुसंशोधन प्रबंध - श्री. गोपाळ ग.कुलकर्णी) हे विविध पद्धती वापरून केले जाते. या संशोधनासाठी जी शास्त्रशुद्ध पद्धतशीर कृती असते. तिला ' पद्धत' म्हणतात. शैक्षणिक संशोधन विविध पद्धतीने केले जाते.

१. **ऐतिहासिक संशोधन पद्धती** - यात भूतकाळातील संबंधित विषयाच्या बाबतीत असलेल्या सत्य घटना शोधून त्याचा योग्य तो अर्थ लावण्याचा प्रयत्न केला जातो.

२. **प्रायोगिक संशोधन पद्धती** - यात भविष्यकालीन घडामोडींचा अभ्यास केला जातो. त्यामुळे संशोधकास अनेक प्रश्न भेडसावत असतात. विविध प्रयोग करून बिनचूक निष्कर्ष काढले जातात.

**३. सर्वेक्षण संशोधन पद्धती** - यात सद्यस्थिती म्हणजे वर्तमानकालीन घटनांचा अभ्यास करून त्यांचे वर्णन केले जाते. यात वर्तमान स्थिती जाणून घेणे हा उद्देश असतो. सद्यपरिस्थितीत असलेल्या अडचणी त्रुटी यावर तज्ञांची मते घेवून संशोधकानी आपले ज्ञान व अनुभवाद्वारे त्यावर कोणता उपाय करता येईल हे ठरवायचे असते.

या प्रबंधातदेखिल सर्वेक्षण पद्धतीचा वापर केला आहे. या पद्धतीत परिस्थितीचे काटेकोर निरीक्षण करावे लागते. सर्वेक्षणालाच आदर्शमूलक सर्वेक्षण असे म्हणतात.

**सर्वेक्षण संशोधन पद्धतीची वैशिष्टये :-**

**अ)** या पद्धतीने विशिष्ट कामातील माहिती मोठ्या प्रमाणात संकलित करता येते.

ब) सर्वेक्षण वयाच्या किंवा जनसंख्येच्या वैशिष्टयांशी संबंधित असते.

क) हे तुलनात्मक अथवा संख्यात्मक असते.

ड) सर्वेक्षण समस्येचे स्वरूप निश्‍चित असते. यात माहितीचे संकलन विश्‍लेषण अहवाल व लेखन या बाबी असतात.

इ) प्रश्‍नावली, मुलाखत इ. साधने यात वापरता येतात.

## ३.८ संशोधनाची साधने :-

संशोधनांच्या परिकल्पनांच्या मूल्यांकनावरून अंतिम निष्कर्ष काढण्यासाठी विविध प्रकारची माहिती व आकडेवारी आवश्यक असते तिला संशोधनाची आधारसामग्री म्हणतात. ही सामग्री वैध व विश्‍वासार्ह असावी लागते. तिच्या विश्‍लेषणातून आपण निष्कर्ष मांडत असतो. संशोधनाच्या समस्येचे स्वरूप, व्याप्ती, उद्दिष्टये लक्षात घेवून योग्य त्या साधनांचा वापर करावा लागतो. प्रस्तुत संशोधनासाठी पुढील साधनांचा वापर केला आहे.

१) निरीक्षण २) मुलाखती ३) प्रश्‍नावली

## १) निरीक्षण -

सार्वजनिक वाचनालये (महात्मा गांधी, वि.स. खांडेकर, सांगली नगर वाचनालय इ.) येथे जाऊन तिथे जाणारे वाचक कोणती वृत्तपत्रे वाचतात. त्यांना वृत्तपत्रातील काय आवडते? त्यांच्या अपेक्षा काय आहेत? याचे निरीक्षण केले तसेच महाविद्यालयातील ग्रंथालयात बसणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचे निरीक्षण करून त्यांना कोणते वृत्तपत्र आवडते? का? त्यांची अभिरूची कशात आहे त्यांना वृत्रपत्रांकडून काय अपेक्षित आहे? याचे निरीक्षण केले. निरीक्षणाने ज्या गोष्टी जाणवल्या त्या निष्कर्षात नमुद केल्या आहेत.

## २) मुलाखती -

संशोधन विषयाचा महत्त्वपूर्ण भाग म्हणून काही महत्त्वाच्या व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या. यात काही वृत्तपत्रांचे संपादक, काही सन्माननीय वाचक, प्राध्यापक, लेखक अशा व्यक्तिंच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या यात श्री. मंगेश मंत्री, प्रा. वैजनाथ महाजन, डॉ. तारा भवाळकर, श्रीनिवास शिंदगी, डॉ. मधू आपटे, श्री.अरूण नाईक, श्री.खराडे इ. मान्यवरांनी मुलाखतीत आपल्या वृत्तपत्रांकडून असणाऱ्या अपेक्षा मोकळेपणाने सांगितल्या. मात्र काही लोकांनी मुलाखती देण्यास टाळाटाळ केली. उपजिल्हाधिकारी वर्षा उंटवाल, काही नगरसेवक, सेवानिवृत्त अधिकारी यांनीही उत्साहाने मुलाखती दिल्या याचा तपशिल पुढे दिला आहे.

## ३) प्रश्नावली :-

सर्वेक्षण संशोधन पद्धतीत या साधनाचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. संशोधनाच्या विविध साधनांमध्ये अत्यंत लोकप्रिय व मोठ्या प्रमाणात वापरले जाणारे हे साधन आहे. याद्वारे जमा होणारी माहिती संख्यात्मक व गुणात्मक दोन्ही प्रकारची असते.

वास्तविक प्रश्नावली वाटते तितकी सोपी, जलद व निश्चित फल देणारी नसते. बऱ्याचदा ती कष्टसाध्य, कालापव्ययी, अपूर्णता, निश्चितता व प्रयोज्याच्या असहकारी वृत्तीमुळे असमाधानकारक फलित देणारी असते. प्रश्नावली दीर्घ असेल तर प्रयोज्याची प्रतिक्रिया प्रतिकूल व नकारात्मक असते. म्हणूनच उत्तम प्रश्नावली तयार करण्यासाठी श्रम घ्यावे लागतात. सर्व प्रश्नावल्या भरून येतात असे नाही. काही पूर्ण भरलेल्या नसतात. अशावेळी निष्कर्ष काढणे अवघड होते. तथापि सर्वापर्यंत प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पोहचण्याचे तंत्र म्हणून प्रश्नावली पद्धतीला प्राधान्य दिले.

**प्रश्नावलीतील प्रश्नाचे २ प्रकार आहेत.**

**१) मुक्त प्रश्न :-** या प्रश्नांची उत्तरे प्रतिसादक, स्वत:च्या शब्दात देऊ शकतो.

**२) बद्ध प्रश्न :-** या प्रश्नांची उत्तरे होय/नाही/अनिर्णित अशा एका शब्दात दिली जातात.

**उत्तम प्रश्नावलीची वैशिष्टये (अरूण कुमार सिंग प्रणित)**

'Test measurement and research method in behavioural Science'

१) प्रश्नावली लहान असावी. विषयाला हात घालणारी असावी.

२) प्रश्नांची रचना व्याकरणदृष्टया अचुक असावी.

३) प्रश्नांची मांडणी अचुक असावी. प्रत्येक प्रश्न स्वतंत्र असावा.

४) प्रश्नावलीतील सूचना स्पष्ट असाव्यात.

५) संशोधनाच्या निश्चित उद्दिष्टांवर आधारित प्रश्न असावेत.

संशोधनाचे साधन निश्चित झाल्यावर प्रथम प्रश्नावली तयार केल्या. श्री. कार्टरच्या म्हणण्याप्रमाणे अशी प्रश्नावली एखादी व्यक्ती किंवा गटाकडून भरून घेतली जाते किंवा पोष्टाने पाठवून परत मागविता येते. प्रस्तुत अध्ययनासाठी दोन्ही मार्गांचा अवलंब केला. काही प्रश्नावल्या लगेच भरून घेतल्या. काही नंतर तर काही पोष्टाने भरून मागविल्या. विद्यार्थ्यांच्या प्रश्नावल्या लगेच शाळा, कॉलेजमध्ये जाऊन एकत्र भरून घेतल्या तसेच सकाळ, लोकमत, तरूण भारत यांच्या ऑफिसमध्ये कर्मचाऱ्यांनी प्रश्नावल्या एकाचवेळी भरून दिल्या. केसरीमधील श्री. पेशवे, हेमंत मोरे, गाडगीळ मॅडम यांचे सहकार्य चांगले मिळाले.

प्रश्नावली तयार करतानाच ती कोणाकोणाला द्यायची यांच्या याद्या तयार केल्या. किती जणांकडून घ्यायच्या ती संख्या निश्चित केली. यानंतर प्रश्नावल्या २ भागात तयार केल्या.

**१) स्टक्चर्ड** **२) नॉन स्टक्चर्ड**

☆ पहिलीत निश्चित प्रश्न, उपप्रश्न असून सविस्तर उत्तराची अपेक्षा ठेवली.

☆ दुसरीत मुलाखत वजा प्रश्न घातले मात्र यात मुलाखत देणाऱ्याची सोय पहावी लागते.

तेव्हा प्रतिसादकाकडून वस्तुस्थितीतबाबतची माहिती अपेक्षित असते. तेव्हा प्रश्नावली पद्धत वापरली जाते. यानुसार प्रश्नावली दोन प्रकारात काढली ती म्हणजे

१) बंदिस्त/बद्ध (Closed form type)

२) खुली/मुक्त (Open form type)

## ३.९ नमुना निवड (Sampling Tecchnique)

संशोधनासाठी सर्वांत महत्त्वाची असते. नमुना निवड. नमुने निवडताना पुढील निकष लावले जातात.

१) प्रतिसाद देणारी व्यक्ती वृत्तपत्रादी माध्यमांपर्यंत पोहोच असणारी व वृत्तपत्र वाचण्याची क्षमता असणारी हवी.

२) आपल्या भावना व मते व्यक्त करण्याची क्षमता तिच्यात हवी.

३) प्रतिसादक व्यक्ती आपल्या वेळेत उपलब्ध असणारी व प्रतिसाद देण्याच्या स्थितीत हवी.

४) प्रतिसादक व्यक्ती जनमाध्यम व वृत्तपत्राची नैतिकत्ता यांची जाण असणारी हवी.

अशा निकषांवर आधारित पुढीलप्रमाणे प्रश्नावल्या तयार करण्यात आल्या.

## ३.१० प्रश्नावल्यांचे स्वरूप

### अ) सर्वसामान्य वाचकांसाठी :-

यात हमाल, मजूर, कामगार, शिक्षक, प्राध्यापक, वकील, डॉक्टर्स, ग्रंथपाल, कारकून, शिपाई, गृहिणी, उद्योगपती अशा विविध व्यावसायिकांकडून जवळपास २०० प्रश्नावल्या भरून घेतल्या. यात १०० स्त्रिया व १०० पुरूष यांना प्रश्नावल्या दिल्या. यातल्या १७५ परत आल्या. १५ अर्धवट होत्या. १० जणांनी दिल्याच नाहीत.

### ब) विद्यार्थी, युवक यांच्यासाठी :-

यात शाळा माहाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून १०० प्रश्नावल्या भरून घेतल्या. यात विद्यार्थ्यांनी

उत्साहाने प्रश्नावलीला प्रतिसाद दिला. यात शाळेतील विद्यार्थी २५, महाविद्यालयातील एफ.वाय ते पदव्युत्तर ५० व एम.पी एस.सी चे २५ अशा प्रश्नावल्या आल्या. शिवाय काहींनी उत्साहाने हाताने लिहूनही दिल्या. ११५ प्रश्नावल्या जमल्या.

### क) संपादक, उपसंपादकासाठी :-

यात २५ प्रश्नावल्या तयार केल्या. केसरी, तरूण भारत, पुण्यनगरी, जनप्रवास, पुढारी, सकाळ, सामना, ललकार, दुसरी बाजू इ.च्या संपादकाकडे प्रश्नावल्या दिल्या. यात काही संपादकांनी अत्यंत अभ्यासपूर्ण रीतीने या भरून दिल्या. मात्र काहींनी देण्याचे पूर्णत: टाळले. लोकमत, तरूण, भारत, विजयंत, ललकार, दुसरी बाजू, सामना यांनी उत्साहाने प्रतिसाद दिला. याउलट काही संपादकांनी देण्याचे नाकारले. मात्र तोंडी चर्चा करून महत्त्वाचे मुद्दे मांडले.

### ड) ग्रामीण व शहरी वार्ताहरासाठी :-

यात ५० प्रश्नावल्या तयार केल्या. यालाही इस्लामपूर, आष्टा, सांगली, इचलकरंजीतील वार्ताहरांनी चांगला प्रतिसाद दिला. दै.लोकमत, सकाळ, केसरी, विजयंत, पुढारी, तरूण भारत मधील वार्ताहरांनी चांगले सहकार्य केले. श्री. नरंदेकर, श्री. दादासाहेब कोळी, शेखर मुळे, श्री.पाटील आष्टयाचे पत्रकार यांनी चांगल्या सूचना दिल्या.

### इ) वृत्तपत्र एजंट व विक्रेते :-

यांच्यासाठी २५ प्रश्नावल्या केल्या. सांगली, इचलकरंजी, इस्लामपूर, कोल्हापूर, आष्टा अशा २० प्रश्नावल्या भरून आल्या पण यातल्या बऱ्याच त्रोटक असल्याने निषकर्ष काढणे अवघड झाले. काही विक्रेत्यांना ही माहिती सरकारी कामासाठी घेणार असे वाटल्याने त्यांनी ती दिली नाही.

अशाप्रकारे पाच प्रकारच्या प्रश्नावल्या तयार करून संबंधित प्रतिसादकाकडून भरून घेतल्या.

**३.११ संशोधनाची कार्यवाही :-**

समस्या विधान ⟶ आराखडा ⟶ संशोधन उद्दिष्टये

↓

नमुना निवड ⟵ साधने ⟵ संशोधन पद्धत

↓

प्रश्नावल्या ⟶ पूर्वसिद्धता ⟶ पृथ:करण व विश्लेषण

**पूर्व पक्षाची सिद्धता :-**

प्रश्नावल्या तयार करताना पुढील गोष्टी लक्षात घेवून त्याचे काटेकोर पालन केले.

१) प्रश्नावलीचे चार भाग केले. पहिल्या भागात उत्तरे देणाऱ्याचे नाव, वय.इ. वैयक्तिक माहिती, दुसऱ्या भागात प्रश्नावलीतील उत्तरे कशी लिहावी याची सूचना तिसऱ्या भागात प्रश्न व चौथ्या भागात प्रश्नावली भरणाऱ्याची स्वाक्षरी व सूचना, अपेक्षा. प्रश्नावलीसोबत सविस्तर उत्तरासाठी स्वतंत्र कागद देण्यात आले.

२) प्रश्नावलीचे प्रश्न सुस्पष्ट, सोपे, सुटसुटीत विचारले गेले.

३) सर्वांना समजण्यासाठी प्रश्नावली मराठीत तयार केली.

४) संदिग्ध व व्यापक अर्थाच्या बाबी टाळून काटेकोरपणा आणला.

५) स्वतंत्र मत व्यक्त करण्यासाठी भरपूर पर्याय व स्वतंत्र कागद दिले.

६) प्रश्नामध्ये तार्किक सुसंगती व क्रमबद्धता ठेवली.

७) वरीपप्रमाणे पाच प्रकारच्या एकूण ४०० प्रश्नावल्या तयार केल्या.

८) या प्रश्नावल्या टंकलिखित करून घेतल्या.

अशा प्रकारे तयार झालेल्या प्रश्नावल्या क्षेत्रभेट देऊन भरून घेतल्या. एकूण ४०० पैकी ३०० प्रश्नावल्या व्यवस्थित भरून आल्या.एकूण संशोधनातल्या पूर्वपक्षाची सिद्धता झाली. यात डाटा कलेक्शन झाले. यातील सर्वसामान्य वाचकांच्या १००, विद्यार्थ्यांच्या ५०, संपादकांच्या १०, एजंटाच्या १०,

वार्ताहराच्या ३० अशा वेचक प्रश्नावल्या विश्लेषणासाठी निवडल्या. यातून त्यांनी व्यक्त केलेली मते व अपेक्षाचे सविस्तर विश्लेषण केले. त्याचा सारांश, मतितार्थ याच प्रकारणाच्या उत्तरार्धात मांडला.

**सामग्रीचे पृथ:करण** - यात पृथ:करणात फार खोल न जाता पुढीलप्रकारे वर्गीकरण केले.

अ) स्त्री व पुरूष

ब) व्यवसाय व नोकरी

क) शैक्षणिक वयोगट

ड) वृत्तपत्राधारित

इ) अपेक्षानुसार

## ३.१२ माहितीचे पृथ:करण व विश्लेषण :-

अ) **स्त्री व पुरूष गटात वर्गीकरण** करताना सर्वसामान्य वाचकांकडून आलेल्या १७५ पैकी १०० पूर्ण समाधानकारक होत्या. यात ६० पुरूष व ४० स्त्रिया असे प्रमाण होते. बऱ्याच स्त्रियांनी उत्तरे लिहताना पूर्ण न लिहिल्याने त्यांचा विचार केला नाही.

ब) **व्यवसाय व नोकरीनुसार वर्गीकरण** केले असता प्रतिनिधिक १०० प्रश्नावल्यांपैकी व्यावसायिक २० तर नोकरदार ४० होते. महिलांमध्ये गृहिणी ११ तर नोकरी करणाऱ्या २०, व्यवसाय करणाऱ्या ०५, निवृत्त ०४ असे प्रमाण घेतले.

क) **शैक्षणिक वयोगटानुसार वर्गीकरण** केले असता ५ ते १४ शालेय वयोगटातील १५, महाविद्यालयीन १६ ते २५ वयोगटातील २५ व पदव्युत्तर १० असे एकूण ५० विद्यार्थी घेतले.

ड) **वृत्तपत्राच्या पसंतीनुसार वर्गीकरण** केले असता पुढीलप्रमाणे वाचकांचे प्रमाण दिसले. पुढारी २०, सकाळ ४०, लोकमत १६,. तरूण भारत १०, लोकसत्ता १०, केसरी ०४.

इ) **वाचकांनी दिलेल्या अपेक्षांचा सविस्तर विचार** पुढे केला आहे. यात प्राधान्याने पुढील अपेक्षा व्यक्त केल्या.

| | |
|---|---|
| १) जाहिरातींचा अतिरेक नको | २० |
| २) बाजारीकरण नको | १५ |
| ३) अतिरंजित बातम्या नको | १० |
| ४) राजकीय पक्षाचे समर्थन नसावे | १५ |
| ५) महिलांसाठी स्वतंत्र पुरवणी, वृत्तपत्रे हवे | १० |
| ६) मंत्र्याचे वाढदिवस विशेषांक नकोत | ०५ |
| ७) पेडन्यूज नकोत | ०५ |
| ८) केसरीसारखी वृत्तपत्रे हवे | ०५ |
| ९) प्रसारमाध्यमांशी स्पर्धा नको | ०५ |
| १०) सकारात्मक दृष्टिकोन हवा. | १० |

प्रश्नावलीतून संकलित केलेल्या माहितीचे संकलन व पृथ:करण केल्यानंतर आपण या सर्व माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करणार आहोत.

## ३.१३ माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :-

वृत्तपत्रात कालानुरूप बदल होणे ही गरजेची बाब आहे. तसे बदलत्या कालानुरूप वाचकांच्या अपेक्षा बदलणे हे देखिल सहज प्रक्रिया आहे. वाचकांकडून आपण प्रश्नावलीच्या माध्यमातून ज्या प्रतिक्रिया जमवल्या त्याच्या आधारे आपण आपली गृहितके कितपत योग्य आहेत. हे तपासणे गरजेचे आहे.

प्रस्तुत संशोधनातून ज्या गोष्टी स्पष्ट करायच्या आहेत. त्या म्हणजे बदलत्या काळानुरूप वृत्तपत्रांनी आपल्यात केलेले बदल योग्य आहेत का हे तपासण्यास वाचकांना प्रवृत्त करणे आणि दुसरे म्हणजे वाचकांच्या बदलत्या अपेक्षा कोणत्या आहेत याबाबतीत वृत्तपत्रांना नवी दिशा मिळावी यादृष्टिने प्रयत्न

करणे. सदर प्रश्नावल्या गोळा करताना वेगवेगळ्या माध्यमांच्या सहवासात वावरणाऱ्या, भिन्न व्यवसायातल्या सजग रसिक वाचक व प्रेक्षकांकडून त्या भरून घेतल्या. या वाचकांची प्रतवारी यापूर्वी केलीच आहे.

### ३.१३.१ सर्वसामान्य वाचकांच्या प्रश्नावलीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

**प्रश्न क्र.१** वृत्तपत्रांचे वाचन या प्रश्नाच्या उत्तरात ९५% लोक किमान दैनिकाचे वाचन करतात. २८% लोक ३ वृत्तपत्रे, २४%, लोक २ वृत्तपत्रे, ४०% लोक किमान १ वृत्तपत्र, तर ३% लोक मिळेल त्या वृत्तपत्राचे वाचन करतात.५ % वाचतच नाही.

| **लोकांची संख्या टक्केवारीमध्ये** | **२८** | **२४** | **४०** | **३** | **५** | **एकूण १००** |
|---|---|---|---|---|---|---|
| वृत्तपत्रांची संख्या | ३ | २ | १ | मिळेल ती | वाचतच नाही | |

**प्रश्न क्र.२** रोज वृत्तपत्रासाठी वेळ देणारे किंवा वेळ काढून वाचणारे वाचक ९५% असून त्यातील सकाळी उठल्या उठल्या चहा पिताना ४०%, प्रवासात २०%, संध्याकाळी १०%, रात्री १०% व दुपारी १५% लोक वृत्तपत्र वाचतात असे दिसले. दुपारी वाचणाऱ्यात १५% स्त्रियांचा समावेश आहे. अजिबात न वाचणाऱ्यात ग्रामीण भागातील विद्यार्थीनीचा समावेश आहे.

| **वाचनाची वेळ** | **सकाळी** | **दुपारी** | **रात्री** | **संध्याकाळी** | **प्रवासात** | **आजिबात वाचत नाही** |
|---|---|---|---|---|---|---|
| वाचक संख्या (टक्केवारीमध्ये) | ४० | १५ | १० | १० | २०५ | |

**प्रश्न क्र ३** : एकापेक्षा अधिक वृत्तपत्रे वाचणाऱ्यांच्यामध्ये ५५% लोकांचा समावेश करता येईल. स्वखर्चाने वृत्तपत्रे वाचणारे २% सोडले. तर बहुतेक सर्व सार्वजनिक वाचनालये तर १% इतरांकडून मागून घेवून वृत्तपत्र वाचतात. १०% शाळा, महाविद्यालयीन शिक्षकवर्ग

ग्रंथालयातील वृत्तपत्र घेवून वाचतो.

| **वाचकाचे स्वरुप** | **इतरांकडून घेऊन** | **स्वखर्चाने** | **ग्रंथालये शाळा, कॉलेजमधील** | **सार्वजनिक ग्रंथालय** | **एक वृत्तपत्र वाचन** | **न वाचणारे** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वाचक संख्या | १ | २ | १० | ४२ | ४० | ५ | १०० |

**प्रश्न क्र ४** : दूरदर्शनवरच्या बातम्या पाहून वृत्तपत्रातील बातम्या वाचणाऱ्या वाचकांत ९०% वाचकांचा समावेश होतो.

| **दूरदर्शनवरच्या बातम्या पाहून वृत्तपत्र वाचणारे** | **फक्त वृत्तपत्र वाचणारे** | **वृत्तपत्र न वाचणारे** | **एकूण** |
|---|---|---|---|
| ९० | ५ | ०५ | १०० |

**प्रश्न ५ :** वृत्तपत्रातील विविध सदरे वाचणाऱ्या वाचकांच्यामध्ये ३०% लोक बोधकथा, विनोद, चित्रपट व परिपाठ क्रिडा अशी हलकीफुलकी सदरे वाचतात. ४०% लोक बातम्यांना प्राधान्य देतात. १०% लोक संपादकीय, अग्रलेख वाचतात. १०% लोक वाचकांचा पत्रव्यवहार ५% लोक वैचारिक लेख, जाहीराती वाचतात. ५% लोक केवळ वरवर सर्व सदरे वाचतात.

| **मनोरंजक सदरे** | **संपादकीय व अग्रलेख** | **वैचारिक** | **बातम्या** | **वरवर वाचणारे** | **वाचकांचा पत्रव्यवहार** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|
| ३० | १० | १० | ४० | ५ | ५ | १०० |

**प्रश्न क्र. ६ :** वृत्तपत्रांतील बातम्या कशा असतात यावर वाचकांनी ज्या प्रतिक्रिया नोंदवल्या त्यात यथार्थ २०% वास्तव ३४% भडक ४०% असत्य ५% अशी प्रतिक्रिया नोंदवली

| यथार्थ | वास्तव | भडक | असत्य | न वाचणारे | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| २० | ३४ | ४० | ५ | १ | १०० |

**प्रश्न क्र. ७ :** वृत्तपत्र व राजकारण यांचा संबंध असावा की नको हे सांगताना ५०% लोकांनी सबंध असावा तर ४०% लोकांनी संबंध नसावा असे सांगितले. ५% लोकांनी वृत्तपत्र व राजकारण यांचा आवश्यक तेवढा संबंध असावा मात्र राजकारण वृत्तकारणात शिरु नये व वृत्तपत्रांनी वृत्तांचे राजकारण करु नये असे सांगितले.

| राजकारणाशी संबंध | हवा | नको | जेमतेम हवा | वृत्तपत्र न वाचणारे | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | ५० | ४० | ५ | ५ | १०० |

**प्रश्न क्र. ८:** वृत्तपत्रांनी विशिष्ठ राजकीय पक्षाचे समर्थन करावे का? या प्रश्नाला प्रतिसाद देताना ५०% लोकांनी समर्थन करण्यास हरकत नाही. ४०% लोकांनी समर्थन करु नये तर ५% समतोल भुमिका ठेवावी असे सांगितले.

| समर्थन करावे | करु नये | समतोल ठेवावा | वृत्तपत्र न वाचणारे | एकूण |
|---|---|---|---|---|
| ५० | ४० | ५ | ५ | १०० |

**प्रश्न क्र. ९ :** वृत्तपत्रातील बातम्या सकारात्मक असाव्या की नकारात्मक याबाबत ७०% लोकांनी सकारात्मक असाव्या २०% लोकांनी नकारात्मक असण्यास हरकत नाही तर ५% लोकांनी याबाबत नीरक्षीर विवेकबुध्दीने लिहाव्यात असे सांगितले.

| सकारात्मक असाव्यात | नकारात्मक असण्यास हरकत नाही | नीरक्षीर विवेक बुध्दिने | वृत्तपत्र न वाचणारे | एकूण |
|---|---|---|---|---|
| ७० | २० | ५ | ५ | १०० |

**प्रश्न क्र. १० :** वृत्तपत्रात गुन्हेगारीच्या बातम्या भडकपने रंगविल्या जातात यावर ७०% लोकांनी होय असे मत मांडले तर २०% लोकांनी सर्वच वर्तमानपत्रे तसे करीत नाहीत असे सांगितले तर ५% लोकांनी संमिश्र बातम्या असतात असे सांगितले.

| गुन्हेगारीच्या बातम्या भडकपणे रंगविल्या जातात | गुन्हेगारीच्या बातम्या भडकपणे रंगविल्या जात नाहीत | संमिश्र | वृत्तपत्र न वाचणारे | एकूण |
|---|---|---|---|---|
| ७० | २० | ५ | ५ | १०० |

**प्रश्न क्र ११:** कोणत्या वृत्तपत्रात बातम्या संयमित व नीरक्षीर विवेक ठेवून दिल्या जातात? या प्रश्नाला वाचकांनी सकाळ, लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स व केसरी या वृत्तपत्रात बातम्या संयमित असतात असे उत्तर दिले यात ४०% लोकांनी सकाळ, ३०% लोकसत्ता, १०% लोकांनी महाराष्ट्र टाईम्स व तरुण भारत ५% लोकांनी केसरी १०% लोकांनी संमिश्र असा प्रतिसाद दिला

**नीरक्षीर विवेक ठेवून लिहलेल्या बातम्याबद्दल दिलेला प्रतिसाद**

| सकाळ | लोकसत्ता | महाराष्ट्र टाईम्स | केसरी व लोकमत | वृत्तपत्र न वाचणारे | संमिश्र | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| ४० | ३० | १० | ५ | ५ | १० | १०० |

**प्रश्न क्र. १२ :** वृत्तपत्रातील कोणते सदर आवडते या प्रश्नाला उत्तर देताना ६०% लोकांनी परिपाठ, दिनविशेष, विश्वसंचार व ज्योतिष, २०% लोकांना गुन्हेगारी, अपघात, १०% लोकांना चित्रपट, क्रिडा, महिला विषयक, ५% लोकांना वैचारिक लेख शब्दकोडे अग्रलेख अर्थविचार, वाणिज्य असा प्रतिसाद दिला.

| परिपाठ, दिनविशेष व विश्वसंचार,ज्योतिष | गुन्हेगारी, अपघात | चित्रपट,क्रिडा महिलाविषयक | वैचारिक लेख शब्दकोडे | न वृत्तपत्र वाचणारे | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ६०% | २०% | १०% | ५% | ५% | १००% |

**प्रश्न क्र.१३ :** अग्रलेख वाचनाबद्दल विचारलेल्या प्रश्नांना वाचकांकडून प्रतिसाद अत्यल्प आला. केवळ ५% लोकच अग्रलेख चोखंदळपणे वाचतात. ३०% लोक कधीकधी वरवर अग्रलेख वाचतात. ३०% लोकांनी अग्रलेख असूच नये. असे मत मांडले आहे. २०% अग्रलेख व संपादकीय यापैकी एकच असावे तसेच १०% लोक अग्रलेखाकडे दुर्लक्ष करतात.

| वृत्तपत्र न वाचणारे वाचणारे | अग्रलेख चोखंदळपणे वाचतात | अग्रलेख वरवर कधीकधी वाचतात | अग्रलेख असूच नये | अग्रलेख व संपादकीय यापैकी एकच असावे | अग्रलेखाकडे दुर्लक्ष करतात | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| ५% | ५% | ३०% | ३०% | २०% | १०% | १००% |

**प्रश्न क्र. १४ :** परिपाठ, दिनविशेष, यासारख्या सदरानी समाजप्रबोधन होते का? या प्रश्नाला प्रतिसाद देताना ६०% लोकांनी प्रबोधन होते, २०% लोकांनी प्रबोधन होतेच असे नाही १५% लोकांनी यातुन माहिती मिळते असे सांगितले.

| परिपाठ, दिनविशेष, सदरातून प्रबाोधन होते | प्रबोधन होतेच असे नाही | यातून फक्त माहिती मिळते | न वाचणारे | एकूण |
|---|---|---|---|---|
| ६०% | २०% | १५% | ५% | १००% |

**प्रश्न -१५-** याव्यतिरिक्त कोणती सदरे असावीत असे विचारल्यावर वाचकांनी महिलाविषयक सदरांना प्राधान्य दिले. ६०% लोकांनी महिला व लहान मुलांविषयी सदरांना प्राधान्य द्यावे. २०% लोकांनी समाजातील गुन्हेगारी व अन्यायाला वाचा फोडणारी सदरे असावीत. १०% लोकांनी कलाविषयक सदरांना प्राधान्य द्यावे. ५% लोकांनी चित्रविचित्र बातम्या व जागतिक बातम्यांची सदरे असावीत असे मांडले.

| **वृत्तपत्र न वाचणारे** | **महिला व लहान मुलांविषयक सदरे असावीत** | **गुन्हेगारी व अन्यायाला वाचा फोडणारी सदरे असावीत** | **कलाविषयक सदरांना प्राधान्य द्यावे** | **चित्रविचित्र जागतिक** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| ५% | ६०% | २०% | १०% | ५% | १००% |

**प्रश्न क्र. १६ :** वृत्तपत्रांकडून प्रबोधन व्हावे की मनोरंजन या प्रश्नाला प्रतिसाद देताना ७०% लोकांनी प्रबोधन व मनोरंजन दोन्ही व्हावे १५% केवळ प्रबोधन व्हावे. १०% लोकांनी केवळ मनोरंजन व्हावे असे विचार मांडले.

| **वृत्तपत्रांकडून प्रबोधन व मनोरंजन दोन्ही व्हावे** | **केवळ प्रबोधन व्हावे** | **केवळ मनोरंजन व्हावे** | **वृत्तपत्र न वाचणारे** | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| ७०% | १५% | १०% | ५% | १००% |

**प्रश्न क्र. १७ व**

**प्रश्न क्र. १८ :** सकाळ, पुढारी, लोकसत्ता, तरुण भारत, लोकमत या वृत्तपत्रांच्या पुरवण्या बहुसंख्य वाचक वाचताना दिसतात. यात ६०% लोकांनी छावा(केसरी) सखी(लोकमत), मैत्र (सकाळ), चित्रगंधा(सकाळ), अक्षररंग, मंथन, स्मार्ट सोबती, या पुरवण्यांना पसंती दर्शवली २०% लोकांनी खजाना, अक्षरयात्रा, बालमित्र फॅमिली डॉक्टर, दिशा या पुरवण्यांना पसंती दाखवली १०% लोकांनी धुमकेतु, भुमिपुत्र, वनौषधी, अपॉइन्टमेंटस, करिअर या

पुरवण्यांना पसंती दर्शवली. ५% लोकांनी केवळ कलारंजन करिअर वृत्तांत, चतुरंग पुरवणीला पसंती दर्शवली.

| वृत्तपत्र न वाचणारे | छावा, सखी, मैत्र, चित्रगंधा, अक्षररंग, मंथन, स्मार्टसोबती | खजाना, अक्षरयात्रा, बालमित्र, दिशा, फैमिली डॉक्टर | धुमकेतु, भुमिपुत्र, वनौषधी, करिअर, अपॉइन्टमेंट | कलारंजन करिअर वृत्तांत चतुरंग | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ५% | ६०% | २०% | १०% | ५% | १००% |

**प्र. क्र. १९ :** पुरवण्या ज्ञान व समाजप्रबोधन करू शकतात का? यावर ७५% लोकांनी ज्ञान व समाजप्रबोधन करतात असे मांडले. १५% लोकांनी पुरवण्यातून केवळ मनोरंजन होते असे म्हटले ५% लोकांनी पुरवण्याद्वारा माहिती मिळून मार्गदर्शन मिळते असे मांडले.

**वृत्तपत्र पुरवण्या**

| वृत्तपत्र न वाचणारे | ज्ञान व समाजप्रबोधन करतात | केवळ मनोरंजन करतात | माहितीद्वारे मार्गदर्शन करतात | एकूण |
|---|---|---|---|---|
| ५% | ७५% | १५% | ५% | १००% |

**प्रश्न क्र २० व प्रश्न क्र. २१ :** या पुरवण्यातील फॅशनविषयक पुरवण्या थोड्या अतिरंजित वाटतात असे ७०% लोकांनी, चित्रपट पुरवण्या अतिरंजित वाटतात असे २०% लोकांनी तर गुन्हेगारीविषयक पुरवण्या अतिरंजित वाटतात असे ५% लोकांनी सांगितले आहे. यापैकी माहिलाविषयक आरोग्यविषयक पुरवण्या ६५% लोकांना जवळच्या वाटतात. २०% लोकांना समस्याविषयक चित्रपटविषयक, फॅशनविषयक पुरवण्या जवळच्या वाटतात तर १०% लोकांना राजकारण व गुन्हेगारीविषयक पुरवण्या तसेच करिअरविषयक पुरवण्या जवळच्या वाटतात.

| वृत्तपत्र न वाचणारे | फॅशनविषयक पुरवण्या अतिरंजित वाटतात | गुन्हेगारीविषयक पुरवण्या अतिरंजित वाटतात | चित्रपटविषयक पुरवण्या अतिरंजित वाटतात | एकूण |
|---|---|---|---|---|
| ५% | ७०% | ५% | २०% | १००% |

| वृत्तपत्र वाचणारे | महिलाविषयक, आरोग्यविषयक पुरवण्या | समस्याविषयक, चित्रपटविषयक फॅशनविषयक पुरवण्या | राजकरण गुन्हेगारीविषयक करिअरविषयक | एकूण |
|---|---|---|---|---|
| ५% | ६५% | २०% | १०% | १००% |

**प्रश्न क्र. २२** : महिलांचे प्रश्न वृत्तपत्रांकडून मांडले जातात का? याला ४०% लोकांनी मांडले जातात असे सांगितले ३०% लोकांनी मांडल्या जातात पण त्याच्या पाठपुरावा म्हणावा तसा केला जात नाही. १०% लोकांनी महिलांच्या समस्या केवल वरवर मांडल्या जातात तर १५% लोकांनी महिलांच्या प्रश्नापेक्षा महिलांच्या विकृत दर्शनाला प्राधान्य दिले जाते असे म्हंटले.

यासाठी महिलांचे प्रश्न खऱ्या अर्थाने ऐरणीवर आणण्याचे झाल्यास स्वतंत्र्य पुरवण्या असाव्यात असे मत मांडले. या पुरवण्यामध्ये ५०% लोकांनी महिलांसाठी करिअर, विविध संधी, मनोरंजन त्यांच्या समस्या यांच्याविषयी माहिती असावी असे मांडले ३०% लोकांनी केवळ महिलांचे प्रश्न न घेता त्याचा पाठपुरावा त्यावर उपाय महिलाविषयक कायदे, झुंजार महिलांची माहिती मुलाखती द्याव्यात असे सांगितले. १५% लोकांनी महिलांच्या प्रश्नाबरोबरच मेहंदी, फॅशन, विविध उद्योग, पाककला, फॅशन्स घरगुती सल्ले, किचन टिप्स असे वैविध्यपूर्ण माहिती असावी असे मांडले.

| वृत्तपत्र न वाचणारे | महिलांचे प्रश्न वृत्तपत्रांकडून मांडले जातात | प्रश्नांचा पाठपुरावा म्हणावा तितका होत नाही | महिलांच्या समस्या वरवर मांडल्या जातात | महिलांच्या प्रश्नापेक्षा त्यांच्या विकृत दर्शनाला प्राधान्य दिले जाते | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ५% | ४०% | ३०% | १०% | १५% | १००% |

| वृत्तपत्र न वाचणारे | महिलांसाठी करिअर विविध संधी मनोरंजन त्यांच्या समस्या | केवळ महिलांचा प्रश्न न घेता त्याचा पाठपुरावा त्यावर उपाय, महिलांविषयक कायदे, झुंजार महिलांची माहिती मुलाखती घ्याव्यात | लोकांनी महिलांच्या प्रश्नाबरोबर मेहंदी, फॅशन, विविध उद्योग, पाककला घरगुती सल्ले द्याव्यात | एकूण |
|---|---|---|---|---|
| ५% | ५०% | ३०% | १५% | १००% |

**प्रश्न क्र. २३ व प्रश्न क्र. २४**

दूरदर्शन व वृत्तपत्रातील कोणत्या बातम्या आवडतात या प्रश्नाला ४०% लोकांनी अपघात व गुन्हेगारीविषयक, चमत्कारिक, ३०% लोकांनी राजकारणविषयक, १०% लोकांनी सामाजिक प्रश्न, शेतीविषयक १०% लोकांनी अर्थकारण, शिक्षणविषयक, ५% लोकांनी परदेशवृत्त विषयक बातम्या आवडतात असे सांगितले.

| अपघात व गुन्हेगारीविषयक व चमत्कारिक बातम्या आवडतात | राजकारणविषयक बातम्या आवडतात | सामाजिक प्रश्न, शेतीविषयक वृत्ते आवडतात | अर्थकारण, शिक्षण विषयक | परदेशवृत्त विषयक | वृत्तपत्र न वाचणारे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| ४०% | ३०% | १०% | १० % | ५% | ५% | १००% |

**प्रश्न क्र. २५ :** वृत्तपत्रात जाहिराती असाव्यात की नसाव्यात व त्या कशा असाव्यात याबद्दल प्रतिक्रिया देताना ५०% लोकांनी जाहिराती अजिबात असू नये असे सांगितले. ३०% लोकांनी जाहिराती असाव्यात पण त्यांचे प्रमाण मर्यादित असावे व त्यात सभ्यता असावी १०% लोकांनी जाहिराती असाव्यात. मात्र त्याबरोबर मजकुरालाही प्राधान्य असावे व ५% लोकांनी जाहिराती अनिवार्यच आहेत त्यात सभ्यता अश्लिलता याचा प्रश्न नाही. याकडे एक कला म्हणून पाहिले जावे असे मत मांडले.

| वृत्तपत्र न वाचणारे | जाहिराती अजिबातच असू नयेत | जाहिराती असाव्यात पण त्यांचे प्रमाण मर्यादित व सभ्यता असावी | जाहिराती असाव्यात मात्र त्याबरोबर मजकुराला प्राधान्य असावे | जाहिराती अनिवार्यच आहेत | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ५% | ५०% | ३०% | १०% | ५% | १००% |

**प्रश्न क्र. २६ :** दूरदर्शनच्या स्पर्धेत टिकवण्यासाठी वृत्तपत्रांनी जाहिरातीच्या अधीन जावे का? याला ५०% लोकांनी जाहिरातीच्या अधीन जावू नये असे सांगितले ३०% लोकांनी जाहिरातीच्या असण्याला विरोध केला नाही पण त्यात प्रमाणशीलता असावी. १०% लोकांनी वृत्तपत्रांनी जाहिरातीबरोबरच मजकुराला स्थान दिले पाहिजे असे सांगितले ५% लोकांनी मात्र वृत्तपत्राचे अर्थकारण सांभाळायचे असेल तर जाहिरीतीच्या अधीन जाण्याशिवाय पर्याय नाही असे सांगितले.

| वृत्तपत्र न वाचणारे | जाहिरातींच्या अधीन जाऊ नये | जाहिराती असाव्यात पण त्यात प्रमाणशीलता असावी | जाहिरातींबरोबर मजकु राला प्राधान्य द्यावे | वृत्तपत्राचे अर्थकारण सांभाळायचे असेल तर जाहिराती महत्वाच्या | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ५% | ५०% | ३०% | १०% | ५% | १००% |

**प्रश्न क्र. २७ :** आजची वृत्तपत्रे बातम्यांपेक्षा जाहिरातींना प्राधान्य देतात हे योग्य आहे का? याचे उत्तर वरील प्रश्नात मिळाले आहेच

**प्रश्न क्र. २८ :** आजची वृत्तपत्रे विशिष्ट मालकवर्ग, राजकारण, जाहिरात व गल्लेभरूपणा या चौकटीत अडकली आहेत हे योग्य आहे का? याला ७०% लोकांनी हे खरे आहे. असे म्हंटले २०% लोकांनी हे विशिष्ट मर्यादेपर्यंत खरे आहे असे म्हटले ५% लोकांनी हे चुकीचे असून आजही वृत्तपत्रे स्वतंत्र आहेत असे म्हटले आहे. यातून बाहेर पडण्यासाठी वृत्तपत्रांनी राजकीय नेते, मालक, जाहिराती यांचे वर्चस्व झुगारून दिले पाहिजे व ती

स्वयंपूर्ण झाली पाहिजेत हे ७०% लोकांनी सांगितले. २०% लोकांनी मालकवर्गाचे वर्चस्व न झुगारता राजकारणाबरोबर स्वातंत्र्य व समाजकारणाला प्राधान्य देवून जाहिरातींचा समतोल ठेवून गल्लेभरूपणापेक्षा माफक फायद्याला प्राधान्य दिले पाहिजे असे मांडले. ५% लोकांनी या गोष्टी टाळायच्या असतील तर वाचकांनी वृत्तपत्रासाठी अधिक किंमत मोजण्याची तयारी दर्शवली पाहिजे असे म्हंटले आहे.

| **हे खरे आहे** | **हे विशिष्ट मर्यादेपर्यंत खरे आहे** | **हे चुकीचे असून आजही वृत्तपत्रे स्वतंत्र आहेत** | **वृत्तपत्रे न वाचणारे** | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| ७०% | २०% | ५% | ५% | १००% |

| **वृत्तपत्र न वाचणारे** | **वृत्तपत्रांनी राजकीय नेते, मालक जाहिराती यांचे वर्चस्व झुगारुन स्वयंपूर्ण व्हावे** | **मालक वर्गाचे वर्चस्व न झुगारता राजकारणाबरोबर स्वातंत्र्य व समाजकारणाला प्राधान्य देऊन जाहिरातींचा समतोल ठेवून फायदा पहावा** | **वाचकांनी वृत्तपत्रासाठी अधिक किंमत मोजण्याची तयारी दाखवली पाहिजे** | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| ५% | ७०% | २०% | ५% | १००% |

**प्रश्न क्र. २९ :** पूर्वीच्या दर्पण, केसरीप्रमाणे आजची वृत्तपत्रे परखड सत्याग्रही व अन्यायाविरूद्ध लढणारी राहिली नाहीत हे खरे आहे का? यावर ६०% लोकांनी हे खरे आहे असे मांडले आहे. २०% लोकांनी असे पूर्णत: म्हणता येणार नाही. १०% लोकांनी पुढारी, तरूण भारत सारखी वृत्तपत्रे अन्यायविरूद्ध लढणारी आहेत. ५% लोकांनी वृत्तपत्रांना सत्याग्रही, समाजहितदक्ष रहावे लागते ते मालकांच्या अधिन राहून

| **वृत्तपत्र न वाचणारे** | **आजची वृत्तपत्रे परखड सत्याग्रही राहिली नाहीत** | **असे पूर्णतः म्हणता येणार नाही** | **अजून काही वृत्तपत्रे अन्यायाविरुध्द लढताहेत** | **सत्याग्रही रहातात ती मालकाच्या अधीन राहून** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| ५% | ६०% | २०% | १०% | ५% | १००% |

**प्रश्न क्र. ३० :** केसरीसारखी समाजाला दिशा देणारी वृत्तपत्रे येण्यासाठी वृत्तपत्रांना पूर्ण स्वातंत्र्य दिले पाहिजे असे ९०% लोकांचे मत आहे. मात्र ५% लोकांनी कालानुरुप आपले स्वरूप बदलले पाहिजे जुन्या आदर्शांना धरून न ठेवता नवी त्तत्त्वे स्विकारली पाहिजेत असे म्हंटले आहे.

| **वृत्तपत्र न वाचणारे** | **समाजाला दिशा देण्यासाठी वृत्तपत्रांना स्वातंत्र्य दिले पाहिजे** | **कालानुरुप आपले स्वरुप बदलले पाहिजे जुन्या आदर्शांना धरुन न ठेवता नवी तत्वे स्वीकारली पाहिजेत** | **एकूण** |
|---|---|---|---|
| ५% | ९०% | ५% | १००% |

**प्रश्न क्र. ३१:** वृत्तपत्रांचे बाजारीकरण थांबवण्यासाठी काय केले पाहिजे हे सांगताना ४०% लोकांनी भांडवलदारांच्या हातून वृत्तपत्रे काढून घेवून समाजहितदक्ष लोकांच्याकडे आले पाहिजे असे मांडले ३०% लोकांनी जाहिराती पूर्ण बंद केल्या पाहिजेत असे सांगितले. १०% लोकांनी वृत्तपत्र राजकारणापासून पूर्ण अलिप्त केले पाहिजे असे मांडले १०% लोकांनी स्पर्धेत टिकवण्यासाठी शासनाने वृत्तपत्रांना मदत करावी, पत्रकारांना संपादकांना भरघोस पगार दयावे. पीत पत्रकारिता थांबवावी असे मांडले. ५% लोकांनी वृत्तपत्र पूर्णत: वाचककेंद्री करून त्यावर वाचकांचा हक्क स्थापन करावा त्यासाठी वाचकांनी वृत्तपत्राची योग्य किंमत देवून ते खरेदी करावे किंमतीयुद्ध करू नये असे मत मांडले.

| **वृत्तपत्र न वाचणारे** | **भांडवलदारी हस्तक्षेपातून स्वतंत्र होऊन वृत्तपत्रे समाजहितदक्ष व्हावी** | **जाहिराती पूर्ण बंद व्हाव्यात** | **राजकारणा-पासून अलिप्त व्हावे.** | **लोकांची मदत अपेक्षीत** | **वाचकेंद्री व्हावीत** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|
| ५% | ४०% | ३०% | १०% | १०% | ५% | १००% |

**प्रश्न क्र - ३२ :** खप वाढवण्यासाठी वृत्तपत्रे विकृतीकडे वळत आहेत यात कितपत तथ्य आहे? हे सांगताना ५०% लोकांनी हे खरे आहे. असे मांडले २०% लोकांनी हे अर्धसत्य आहे व २०% लोकांनी याबरोबर वृत्तपत्रांच्या चांगुलपणाकडेही, गुणात्मकतेकडे पाहिले पाहिजे व

५% लोकांनी ही काळाजी गरज आहे याला विकृती म्हणता येणार नाही असे सांगितले. स्पर्धेत टिकण्यासाठी हे करणे आवश्यक आहे असेही सांगितले.

| **हे खरे आहे** | **हे अर्धसत्य आहे** | **वृत्तपत्रांच्या चांगुलपणाकडेही लक्ष द्यावे** | **ही काळाची गरज आहे** | **वृत्तपत्र न वाचणारे** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| ५०% | २०% | २०% | ५% | ५% | १००% |

**प्रश्न क्र. ३३ :** वृत्तपत्र खरेदी करताना वाचक कोणत्या गोष्टीचा प्राधान्याने विचार करतात यावर ५५% वाचकांनी किंमत असे उत्तर दिले १५% वाचकांनी बातम्या, १०% लोकांनी आवड, १०% लोकांनी पुरवणी तर ५% लोकांनी राजकीय हेतू असे उत्तर दिले.

| **किंमत व पानांची संख्या** | **बातम्या** | **आवड** | **पुरवणी** | **राजकीय हेतू** | **वृत्तपत्र न वाचणारे** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|---|
| ५५% | १५% | १०% | १०% | ५% | ५% | १००% |

**प्रश्न क्र. ३४ :** गेल्या दहा वर्षात वृत्तपत्रांचे बदलते स्वरूप प्रगतीचा आलेख उंचावणारे आहे की खाली नेणारे आहे. यावर ४०% लोकांनी खाली नेणारे आहे ३०% लोकांनी उंचावणारे आहे १०% लोकांनी हे अर्धसत्य आहे व १५% लोकांनी याला संमिश्र प्रतिसाद दिला.

| **वृत्तपत्र न वाचणारे** | **खाली नेणारे आहे** | **उंचावणारे आहे** | **अनिश्चितता अर्धसत्य** | **संमिश्र प्रतिसाद** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| ५% | ४०% | ३०% | १०% | १५% | १००% |

**प्रश्न क्र. ३५ :** गेल्या दहा वर्षात वृत्तपत्रात झालेले बदल सकारात्मक आहेत की नकारात्मक हे सांगताना ४०% लोकांनी नकारात्मक ३०% लोकांनी सकारात्मक ४०% तसे सांगता येणार नाही व १५% लोकांनी संमिश्र असे उत्तर दिले

| वृत्तपत्र न वाचणारे | बदल नकारात्मक आहेत | बदल सकारात्मक आहेत | अनिश्चितता | संमिश्र प्रतिसाद | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ५% | ४०% | ३०% | १०% | १५% | १००% |

**प्रश्न क्र. ३६ व प्रश्न क्र. ३७**

वृत्तपत्राचे कोणते पान वाचकाला आवडते यावर ४०% लोकांनी बातम्या २०% लोकांनी चित्रपट, परिपाठ इ. १०% क्रिडा, १०% लोकांनी संपादकीय, ५% लोकांनी अर्थविश्व ५% लोकांनी करिअर ५% परदेशवृत्त असे उत्तर दिले

बातम्या आवडणाऱ्या लोकांनी जागतिक बातम्यांपेक्षा, प्रादेशिक बातम्यांना प्राधान्य द्यावे असे सांगितले.

| वृत्तपत्र न वाचणारे | बातम्या | चित्रपट परिपाठ | क्रिडा | संपादकीय | अर्थविश्व | करिअर | संपादकीय | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५% | ४०% | २०% | १०% | १०% | ५% | ५% | ५% | १००% |

**प्रश्न क्र. ३८ :** वृत्तपत्रांनी आजवर केलेल्या कामगिरीने समाधानी आहात का या प्रश्नावर ४०% वाचकांनी समाधानी आहोत असे सांगितले ३०% लोकांनी असमाधान व्यकत केले. १०% लोकांनी तसे सांगणे कठीण आहे असे म्हटले १०% लोकांनी संमिश्र प्रतिसाद दिला ५% लोकांनी काहीच उत्तर दिले नाही.

| समाधानी आहोत | असमाधान व्यक्त केले | अनिश्चितता | संमिश्र प्रतिसाद | काहीच उत्तर दिले नाही | वृत्तपत्र न वाचणारे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| ४०% | ३०% | १०% | १०% | ५% | ५% | १००% |

**प्रश्न क्र. ३९:** जागतिक बाजारपेठेत टिकवण्यासाठी गुणात्मक प्रगती करण्याच्या दृष्टीने वृत्तपत्रांनी कोणते बदल करावेत. याला प्रतिसादकांनी वेगवेगळ्या बाबतीत बदल सुचवले. ६०% लोकांनी सकारात्मक बातम्या देवून जाहिराती कमी कराव्यात असे सुचविले. २०% लोकांनी एकांगी राजकीय दृष्टीकोन न ठेवता समतोल दृष्टी ठेवावी असे सांगितले. ५% लोकांनी मनोरंजन व सामाजिक दृष्टीकोनावर भर द्यावा असे सांगितले ५% लोकांनी संपादकाला स्वायत्तता द्यावी. ५% लोकांनी पत्रकारितेतील गुन्हेगारी थांबावावी असे सांगितले.

| वृत्तपत्र वाचणारे | सकारात्मक देऊन जाहिराती कमी कराव्यात | समतोल दृष्टी ठेवावी | मनोरंजन व सामाजिक दृष्टीकोनावर भर द्यावा | संपादकाला स्वायत्तता | पत्रकरितेतील गुन्हेगारी थांबबावी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| ५% | ६०% | २०% | ५% | ५% | ५% | १००% |

**प्रश्न क्र. ४० :** केसरीसारख्या वृत्तपत्राकडून कोणत्या अपेक्षा आहेत. प्रश्नाला ८०% लोकांनी केसरीसारखी ध्येयवादी वृत्तपत्रे निर्माण व्हायला हवीत व त्यांनी समाजपरिवर्तन करावे. असे म्हंटले १५% लोकांनी केसरीने स्पर्धेत टिकण्यासाठी स्वत:मध्ये बदल करायला हवेत हे सांगितले.

| ध्येयवादी वृत्तपत्र निर्माण व्हायला हवीत त्यांनी समाजपरिवर्तन करावे | स्पर्धेत टिकवण्यासाठी स्वत:मध्ये बदल करायला हवेत | वृत्तपत्र न वाचणारे | एकूण |
|---|---|---|---|
| ८०% | १५% | ५% | १००% |

### ३.१३.२ वृत्तसंपादक व कार्यकारी संपादक यांच्या प्रश्नावलीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

सर्वसामान्य वाचकांकडून घेतलेल्या प्रश्नावलीतून मिळालेल्या उत्तरांचा विस्तृत आढावा घेतल्यावर वृत्तसंपादक व कार्यकारी संपादक यांचेकडून घेतलेल्या प्रश्नावलीतूनही बऱ्याच गोष्टी स्पष्ट झाल्या. कोणताही वृत्तपत्र संपादक हा आधी वाचक असतो. या यादृष्टीकोनातून विचार करून काही संपादकाकडून प्रश्नावल्या भरून घेतल्या. अशा २५ प्रश्नावल्याचे विश्लेषण पुढीलप्रमाणे :

**प्रश्न क्र. १ ते ५** मध्ये त्यांची वैयक्तिक माहिती घेतली यात नांव पत्ता, दूरध्वनी शिक्षण, संपादनाचा अनुभव इ.

यात सर्व संपादकांनी आपली माहिती पूर्णपणे दिली.

**प्रश्न क्र. ६** ते चालवत असलेल्या वृत्तपत्राविषयी त्यांचे स्वत:चे मत विचारले असता २५ पैकी २० जणांनी आपल्या वृत्तपत्राबद्दल ते दर्जेदार, समाजहित दक्ष, प्रामाणिक, परखड वृत्तपत्र असल्याचे सांगितले. तिघांनी या पदावर आहोत तोपर्यंत ते दर्जेदार ठेवण्याचा प्रयत्न करू असे म्हटले तर एकाने आम्ही वृत्तपत्राविषयी तसे मत ठरवू शकत नाही कारण जिथे अधिक पगार ते वृत्तपत्र चांगले असो व्यवहारी दृष्टीकोन त्यांनी मांडला.

| **दर्जेदार, परखड, समतोल** | **आम्ही असे तोपर्यंत दर्जेदार** | **अधिक पगार ते चांगले** | **एकूण** |
|---|---|---|---|
| २० | ३ | २ | २५ |
| ८०% | १२% | ८% | १००% |

**प्रश्न क्र. ७** त्याचे वृत्तपत्र विशिष्ट राजकीय प्रणालीशी निगडीत आहे का ? कोणत्या ? त्यावर २० जणांनी नकारात्मक उत्तर दिले. दोघांनी सत्ताधारी पक्षाच्या, एकाने लोकहित वादी राजकिय प्रणालीशी, दोघांनी स्वतंत्र राजकीय प्रणालीशी निगडित आहे असे सांगितले.

| कोणत्याही राजकीय प्रणालीशी निगडीत नाही (लोकमत, पुण्यनगरी, जनप्रवास, तरूणभारत) | सत्ताधारी पक्षाच्या प्रणालीशी निगडीत (सकाळ, पुढारी, सामना) | जनहितवादी (दुसरी बाजू ,विजयंत, तरूणभारत) | स्वतंत्र राज्यप्रणाली (ललकार, केसरी) | एकूण |
|---|---|---|---|---|
| २० | २ | १ | २ | २५ |
| ८०% | ८% | ४% | ८% | १००% |

**प्रश्न क्र. ८** वृत्तपत्र विशिष्ट राजकीय पक्षाचे असावे की नाही यावर १५ जणांनी नसावे ५ जणांनी असण्यास हरकत नाही. तिघांनी सर्व राजकीय पक्षाना समान लेखावे, २ जणांनी वृत्तपत्रांनी जनहिताचा पक्ष घ्यावा असे मांडले.

| राजकीय पक्षाचे नसावे (लोकमत पुण्यनगरी, जनप्रवास) | असावे (सकाळ, पुढारी, सामना) | सर्वपक्ष समान लेखावे (तरुण भारत, दुसरी बाजू) | जनहितपक्ष घ्यावा (तरुण भारत, ललकार) | एकूण |
|---|---|---|---|---|
| १५ | ५ | ३ | २ | २५ |
| ६०% | २०% | १२% | ८% | १००% |

**प्रश्न क्र. ९** सत्ताधारी राजकीय पक्षाच्या बदलानुसार वृत्तपत्राने बदलावे का? याला १५ जणांनी बदलू नये, ३ जणांनी तटस्थ रहावे तर दोघांनी आपले स्वतंत्र धोरण ठेवावे असे म्हटले.

| बदलू नये | बदलावे | तटस्थ रहावे | स्वतंत्र धोरण ठेवावे | एकूण |
|---|---|---|---|---|
| १५<br>६०% | ५<br>२०% | ३<br>१२% | २<br>८% | २५<br>१००% |

**प्रश्न १०** राजकारण व वृत्तपत्र याच्या संबंधाबद्दल विचारले असता १५ जणांनी अजिबात असू नयेत, ५ जणांनी अवश्य असावेत, २ नी घनिष्ट नसावेत, २ नी सुवर्णमध्य असावा १ नी ते मार्गदर्शकाचे असावेत असे मांडले

| अजिबात असू नयेत | अवश्य असावे | घनिष्ठ नसावे | सुवर्णमध्य असावा | मार्गदर्शकाचे असावेत | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १५ | ५ | २ | २ | १ | २५ |
| ६०% | २०% | ८% | ८% | ४% | १००% |

**प्रश्न क्र. ११** संपादनात असलेल्या स्वातंत्र्याबद्दल विचारले असता १० जणांनी स्वातंत्र्य आहे असे सांगितले. १० लोकांनी काही ठिकाणी स्वातंत्र्य आहे पण काही अंशी बंधने पाळावी लागतात. ५ जणांनी मात्र अजिबात स्वातंत्र्य नाही. संपादकाला सर्वस्वी मालकाचे ऐकावे लागते असे सांगितले.

| स्वातंत्र्य आहे | काही अंशी आहे | अजिबात नाही | एकूण |
|---|---|---|---|
| १० | १० | ५ | २५ |
| ४०% | ४०% | २०% | १००% |

**प्रश्न १२** संपादकाला असणाऱ्या स्वातंत्र्याबद्दल मत मांडताना १५ लोकांनी पूर्ण स्वातंत्र्य असले पाहिजे असे सांगितले. ५ लोकांनी आवश्यक ते स्वातंत्र्य असले पाहिजे मात्र काही निर्बंध आवश्यक आहेत असे मांडले. ५ लोकांनी मात्र शक्यतो स्वातंत्र्य असू नये अन्यथा ते वृत्तपत्र स्वैर होईल. ब्लॅक जर्नालीझम सुरू होईल असे मांडले.

| **पूर्ण स्वातंत्र्य असावे (तरूण भारत, सकाळ, ललकार)** | **काही अंशी असावे (पुढारी, पुण्यनगरी, सामना, लोकमत)** | **अजिबात नसावे (दुसरी बाजू, अग्रदूत)** | **एकूण** |
|---|---|---|---|
| १५ | ५ | ५ | २५ |
| ६०% | २०% | २०% | १००% |

**प्रश्न १३** गेल्या पंधरा वर्षात वृत्तपत्राची धोरणे बदलली आहेत का? याला १५ जणांनी काळानुसार बदलली आहेत असे सांगितले. ५ जणांनी फारशी बदलली नाही तर ५ लोकांनी पूर्वीचीच धोरणे अद्याप कायम ठेवली आहेत असे मांडले.

| **काळानुसार बदल** (पुढारी, लोकसत्ता, सकाळ, लोकमत) | **फारसा बदल नाही** (ललकार, पुण्यनगरी, सामना) | **काहीच बदल नाही** (दुसरी बाजू केसरी महाराष्ट्र टाईम्स) | **एकूण** |
|---|---|---|---|
| १५ | ५ | ५ | २५ |
| ६०% | २०% | २०% | १००% |

**प्रश्न १४** गेल्या १०-१५ वर्षात वृत्तपत्राचे हेतू,स्वरूप, उद्दिष्टे, धोरणे व विषय यात महत्त्वपूर्ण बदल कोणते झाले? हे सांगताना १० जणांनी वृत्तपत्राचे स्वरूप, उद्दिष्टे, धोरणे व विषय यात आमुलाग्र बदल झाले  असे म्हटले १३ लोकांनी वृत्तपत्राचे बाह्यस्वरूप हेतू व विषय यात बदल झाले मात्र उद्दिष्टे व धोरणे तीच आहेत असे म्हटले. वृत्तपत्राच्या छपाईतंत्रात, बाह्यरुपात बदल झाला मात्र अंतरंग तसेच आहे असे म्हटले तर दोन जणांनी बाह्य तंत्राबरोबर वृत्तपत्राचा आत्मा हरवला असे मांडले.

| **आमुलाग्र बदल (पुढारी, लोकसत्ता, सकाळ, लोकमत)** | **बाह्य बदल (ललकार, पुण्यनगरी, सामना)** | **बाह्यबदला बरोबर आत्मा हरवला (दुसरी बाजू केसरी, महाराष्ट्र टाईम्स)** | **एकूण** |
|---|---|---|---|
| १० | १३ | २ | २५ |
| ४०% | ५२% | ८% | १००% |

**प्रश्न १५** वृत्तपत्र वाचकाभिमुख असावे की अर्थाभिमुख? यात १५ जणांनी वाचका व अर्थाभिमुख असावे असे मत मांडले ५ जणांनी वाचकाभिमुख असावे असे मांडले. २ जणांनी केवळ अर्थाभिमुख असावे कारण तो धंदा आहे असे मांडले.

| **दोन्हीचा सुवर्णमध्य** | **केवळ वाचकाभिमुख** | **केवळ अर्थाभिमुख** | **एकूण** |
|---|---|---|---|
| १५ | ८ | २ | २५ |
| ६०% | ३२% | ८% | १००% |

**प्रश्न १६,१७** - वाचकांच्या अपेक्षानुसार वृत्तपत्रात कोणते बदल केले? हे सांगताना २० लोकांनी वाचकांना आवडेल अशा बातम्या, पुरवण्या, माहिती, मजकूर देण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी आपल्या ध्येय धोरणांना काही ठिकाणी मुरड घातली. ५ लोकांनी वाचकांच्या अपेक्षापेक्षा स्वत:च्या विचाराने आवश्यक ते बदल केले. त्यासाठी ध्येय धोरणांना मुरड घातली नाही असे सांगितले.

| **आवश्यक बदल व ध्येय धोरणांना मुरड घातली** (तरूण भारत, लोकमत, पुढारी, सकाळ, पुण्यनगरी, संध्यानंद, लोकसत्ता, टाईम्स). | **स्वत:च्या मनाने बदल, मुरड नाही** (केसरी, ललकार, महासत्ता) | **एकूण** |
|---|---|---|
| २० | ५ | २५ |
| ८०% | २०% | १००% |

**प्रश्न १८** वृत्तपत्राचे बाजारीकरण योग्य की अयोग्य हे सांगताना १५ जणांनी बाजारीकरण योग्य असल्याचे म्हटले ५ जणांनी बाजारीकरण सर्वस्वी अयोग्य असे सांगितले ५ जणांनी बाजारीकरण गरजेचे असले तरी सर्वस्वी धंदेनाईक बनू नये असे म्हटले.

| **बाजारीकरण योग्य** (तरुण भारत, पुढारी, लोकसत्ता, लोकमत) | **अयोग्य** (दुसरी बाजू, ललकार) | **सुवर्णमध्य हवा** (सकाळ, पुण्यनगरी, केसरी | **एकूण** |
|---|---|---|---|
| १५ | ५ | ५ | २५ |
| ६०% | २०% | २०% | १००% |

**प्रश्न १९** वृत्तपत्रात बातम्याचे संपादन करताना त्यात संयमीपणा हवा की भडकपणा या प्रश्नाचे उत्तर देताना १५ जणांनी बातम्या संयमीपणे असाव्यात असे मत मांडले ७ जणांनी अगदी साध्या व अगदी भडक न करता मध्यम असाव्यात असे सांगितले. ३ जणांनी लोकांना भडक बातम्या आवडतात तशा असाव्यात मात्र त्यात सत्यता हवी असे सांगितले.

| **बातमी संयमित हवी** (केसरी, सकाळ, ललकार, अग्रदूत, दुसरी बाजू) | **मध्यम हवी** (लोकमत, महासत्ता, तरूणभारत) | **रंजित मात्र सत्यधारित हवी** (पुण्यनगरी, पुढारी, सामना), | **एकूण** |
|---|---|---|---|
| १५ | ७ | ३ | २५ |
| ६०% | २८% | १२% | १००% |

**प्रश्न २०** वृत्तपत्रात अग्रलेखाला किती महत्व देता याचे उत्तर देताना १८ जणांनी अग्रलेख हा वृत्तपत्राचा प्राण आहे असे सांगून तो हवाच असे मांडले. ४ जणांनी अग्रलेख किंवा संपादकीय यापैकी एक असावे मात्र त्यात किल्ष्टता नसावी असे सांगितले ३ जणांनी अग्रलेखाचा आग्रह धरू नये असे मांडले.

| **अग्रलेख हवाच** (केसरी, ललकार, पुढारी, सकाळ, दुसरी बाजू) | **अग्रलेख/संपादकीय हवे** (तरुणभारत, सामना) | **नसावाच** (महासत्ता, पुण्यनगरी) | **एकूण** |
|---|---|---|---|
| १८ | ०४ | ०३ | २५ |
| ७२% | १६% | १२% | १००% |

**प्रश्न २१** वृत्तपत्रातील कोणती सदरे महत्त्वाची वाटतात याला १५ जणांनी अग्रलेख परिपाठ, प्रबोधनात्मक सदरे महत्वाची वाटतात असे सांगितले ८ जणांनी ज्ञान व मनोरंजनात्मक सदराना प्राधान्य दिले. २ जणांनी चित्रपट, ज्योतिष, बोधकथा, विनोद, साहित्यविषयक सदरांना महत्व दिले.

| **अग्रलेख वैचारिकलेख प्रबोधनात्मक** (केसरी, पुढारी, सकाळ, ललकार) | **ज्ञान व रंजनात्मक** (पुण्यनगरी, महासत्ता, सामना) | **चित्रपट, विनोद इ.** (तरूण भारत संध्यानंद) | **एकूण** |
|---|---|---|---|
| १५ | ०८ | ०२ | २५ |
| ६०% | ३२% | ०८% | १००% |

ही सदरे सकस करण्यासाठी प्रत्येक संपादक ह्या सदरांना न्याय देण्याचा प्रयत्न करतो. असे बहुतेक सर्व संपादकांनी सांगितले.

**प्रश्न २२ व २३** - गेल्या १०-१५ वर्षात वृत्तपत्रांनी कोणत्या उल्लेखनीय पुरवण्या दिल्या याचे उत्तर देताना २०जणांनी राजकारण, प्रासंगिक, मनोरंजनात्मक, शेती, उद्योग, करियर, विज्ञान तंत्रज्ञान, महिला विषयक पुरवण्या दिल्याचे सांगितले. ५ जणांनी चित्रपट, बालमनोरंजन, गुन्हेगारी, स्त्रियाशी निगडीत विषयावर पुरवण्या दिल्याचे सांगितले.

| **विविध विषयावरील पुरवण्या** (केसरी, पुढारी, पुण्यनगरी, सकाळ) | **चित्रपट, आरोग्य, बाल गुन्हेगारी,** (पोलिसटाइम्स, केसरी, संध्यानंद, तरूण भारत) | **एकूण** |
|---|---|---|
| २० | ०५ | २५ |
| ८०% | २०% | १००% |

सदर पुरवण्या देताना १८ जणांनी केवळ वाचकाची अभिरूची लक्षात घेऊन काढल्याचे, ५ जणांनी खप व अभिरूची लक्षात घेतल्याचे तर २ जणांनी केवळ व्यावसायिक दृष्टी ठेऊन पुरवणी काढल्याचे सांगितले.

| **वाचकांची अभिरूची पाहून** (पुण्यनगरी,सकाळ,लोकसत्ता, संध्यानंद) | **खप अभिरूची मेळ** (पुढारी, त.भारत, लोकमत, महासत्ता, केसरी) | **व्यावसायिक दृष्टी ठेऊन** (महाराष्ट्र टाइम्स, पोलिस टाइम्स) | **एकूण** |
|---|---|---|---|
| १८ | ५ | २ | २५ |
| ७२% | २०% | ८% | १००% |

**प्रश्न २४ –** वृत्तपत्राचा खप वाढवण्यासाठी कोणत्या योजना राबवल्या याचे उत्तर देताना १० जणांनी मुख्य वितरण व्यवस्थेबरोबर विक्रेत्यांसाठी आकर्षक कमिशन योजना राबवल्याचे सांगितले. १० जणांनी वाचकासाठी बक्षिस योजना, कूपन चिकटवा, शालेय मुलासाठी चित्रकथा, चित्रकला इ. योजना, किंमत कमी करणे, सहा महिने घरपोच अंक इ. योजना काढल्याचे सांगितले. मात्र ५ जणांनी अशा कोणत्याही योजना न राबवता केवळ गुणवत्ता हाच निकष ठेवल्याचे सांगितले.

| **विक्रेत्यांना आकर्षक कमिशन योग्य वितरण व्यवस्था** | **वाचक, बालकांसाठी बक्षिस योजना** | **गुणवत्ता** | **एकूण** |
|---|---|---|---|
| १० | १० | ५ | २५ |
| ४०% | ४०% | २०% | १००% |

**प्रश्न२५ -** मध्यंतरी वृत्तपत्रांच्या किंमती कमी करून खप वाढवण्याचा जो प्रयत्न झाला याबद्दल मत व्यक्त करताना १२जणांचे मत हे योग्य नाही असे आले ६ जणांनी हे करणे योग्य आहे असे मांडले स्पर्धायुद्धात यात काही वावगे नाही असे म्हंटले मात्र ५ जणांनी ही भूमिका सर्वस्वी चूक आहे कमी किंमत लावून खप वाढवण्यापेक्षा गुणवत्ता ठेवून दर्जा टिकवणे महत्त्वाचे मानले.

| **किंमत कमी करणे अयोग्य** (केसरी, पुढारी, दुसरी बाजू, महासत्ता) | **योग्य** (सकाळ, लोकमत, संध्यानंद) | **पूर्णतः चूक** (ललकार, अग्रदूत, तरूण भारत) | **एकूण** |
|---|---|---|---|
| १२ | ०८ | ०५ | २५ |
| ४८% | ३२% | २०% | १००% |

यावेळेला १७ लोकांनी आपले धोरण ठाम तर ८ लोकांनी लवचिक ठेवले

| **किंमती न बदलणे** | **लवचिक धोरण** | **एकूण** |
|---|---|---|
| १७ | ८ | २५ |
| ६८% | ३२% | १००% |

**प्रश्न २६-** हल्ली बाजारीकरणाबरोबर वृत्तपत्राचे गुन्हेगारीकरण होत चालले आहे. हे योग्य आहे का? यावर १६ जणांनी हे अयोग्य आहे असे म्हटले ०६ जणांनी तसे नेमके सांगता येणार नाही असे म्हटले २ जणांनी गुन्हेगारीच्या बातम्या देणे म्हणजे गुन्हेगारीकरण म्हणता येणार नाही असे म्हटले गुन्ह्याच्या बातम्या देणे गरजेचे आहे असे म्हटले तर १एकाने कोणतेच मत व्यक्त केले नाही.

| **अयोग्य** (ललकार, केसरी, सकाळ) | **तसे सांगता येणार नाही** (पुढारी, त.भा, महासत्ता) | **योग्य** (पुण्यनगरी दुसरी बाजू) | **कोणतेच मत** (अग्रदूत) **नाही** | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| १६ | ०६ | ०२ | ०१ | २५ |
| ६४% | २४% | ०८% | ०४% | १००% |

**प्रश्न २७-** त्याच्या वृत्तपत्रातील मजकूर सर्वसामान्य वाचकासाठी असतोले की विव्दान वर्गासाठी की विशिष्ट राजकीय प्रणालीच्या समर्थनासाठी यावर १५ जणांनी सर्वसामान्य वाचकासाठी म्हटले ८ जणांनी सर्वसामान्य वाचक व विव्दानांसाठी म्हटले तर २ जणांनी विशिष्ट राजप्रणालीचे समर्थनासाठी असे सांगितले.

| **सर्वसामान्य वाचकासाठी** (केसरी, लोकमत, संध्यानंद, तरूणभारत) | **दोघांसाठी** (पुढारी, सकाळ, लोकसत्ता, महासत्ता) | **राजकीय समर्थनासाठी** (सामना, सकाळ) | **एकूण** |
|---|---|---|---|
| १५ | ०८ | ०२ | २५ |
| ६०% | ३२% | ०८% | १००% |

**प्रश्न-२८** आपण वाचकांकडून त्याच्या अपेक्षांचे सिंहावलोकन केले आहे का? त्यांना हवे ते देण्याचा प्रयत्न केला आहे का? याला १० जणांनी अपेक्षाचे सिंहावलोकन करून त्यांना हवा तो बदल केल्याचे सांगितले १० जणांनी वाचकाच्या अपेक्षा व व्यावसायिकता याचा मेळ घालून त्यानुरूप मजकूर देत असल्याचे म्हटले आहे तर ५ जणांनी वाचकाच्या अपेक्षेसाठी आपल्या तत्त्वात कोणताही बदल न केल्याचे सांगितले आहे.

| **वाचकाच्या अपेक्षानुरूप बदल (सकाळ, पुण्यनगरी, तरुण भारत)** | **अपेक्षा व व्यवसाय याचा सुवर्णमध्य (पुढारी, महासत्ता, लोकमत, केसरी)** | **बदल नाही (दुसरी बाजू, ललकार, लोकसत्त्ता, महा. टाइम्स)** | **एकूण** |
|---|---|---|---|
| १० | १० | ५ | २५ |
| ४०% | ४०% | २०% | १००% |

वाचकांच्या अपेक्षेनुसार बातम्या, पुरवण्या, सदरे किंमत यात बदल केला आहे. असे म्हटले आहे.

**प्रश्न २९-** बदलत्या मिडीयामुळे वृत्तपत्राच्या वाचक संख्येवर परिणाम झाला आहे का यावर १६ जणांनी अजिबात फरक पडलेला नाही असे म्हटले आहे. ६ जणांनी फरक पडल्याचे सांगितले ३ जणांनी तसे नेमके सांगता येणार नाही असे म्हटले आहे.

| **फरक पडलेला नाही** (सकाळ, पुढारी, त.भा, लोकसत्ता, महासत्ता) | **पडला आहे** (पुण्यनगरी, लोकमत, केसरी, महासत्ता) | **नेमके सांगणे अशक्य** (संध्यानंद, अग्रदूत, ललकार, दुसरी बाजु, सनातन प्रभात) | **एकूण** |
|---|---|---|---|
| १६ | ०६ | ०३ | २५ |
| ६४% | २४% | १२% | १००% |

**प्रश्न ३०-** वाचकाच्या अपेक्षापूर्तीसाठी व विश्वासाला पात्र होण्यासाठी आपण कोणते खास प्रयत्न केले यावर १५ जणांनी आपण खास प्रयत्न केल्याचे म्हटले ७ जणांनी तसे प्रयत्न करण्याची आवश्यकता भासली नाही असे म्हटले तर ३ जणांनी केवळ सत्यनिष्ठा ठेवल्याचे म्हटले आहे.

| **विविधता, पुरवण्या, रंजन, बातम्या, कमी किंमत आणण्याचा प्रयत्न** (पुढारी, लोकमत, सकाळ, संध्यानंद, जनप्रवास) | **प्रयत्नाची गरज भासली नाही** (महाराष्ट्र टाईम्स, महासत्ता, लोकसत्ता, सामना, केसरी) | **सत्यनिष्ठा, व्रतस्थता,** (पुण्यनगरी, ललकार, दुसरी बाजू) | **एकूण** |
|---|---|---|---|
| १५ | ०७ | ०३ | २५ |
| ६०% | २८% | १२% | १००% |

**प्रश्न ३१ -** वाढत्या स्पर्धेत वृत्तपत्रकारितेचा आत्मा हरवत चालला आहे काय यावर १८ जणांनी याचे उत्तर होय असे दिले. ५ जणांनी याला स्पष्ट नकार दिला. २ जणांनी हे वाचकांनी ठरवावे असा निर्वाळा दिला.

| पत्रकारितेचा आत्मा हरवला आहे | मुळीच नाही | हे वाचकांनी ठरवावे | एकूण |
|---|---|---|---|
| १८ | ५ | २ | २५ |
| ७२% | २०% | ८% | १००% |

**प्रश्न ३२-** या स्पर्धेत आपले अस्तित्व टिकवण्यासाठी काय केले पाहिजे यावर १० जणांनी अत्याधुनिक यंत्रणा, चांगल्या दर्जाचा कागद, उत्तम छपाई हे बाह्यरंग बदलावे असे म्हंटले ५ जणांनी विविधता मनोरंजकता, नवी सदरे पुरवण्या देऊन अंतरंग बदलावे म्हंटले आहे. ७ जणांनी बातम्याची विश्वासार्हता, तत्वनिष्ठा टिकवली पाहिजे असा सल्ला दिला आहे. ३ जणांनी जाहिरातीच्या माध्यमातून व्यवसायिकरणावर भर द्यावा असे म्हंटले आहे.

| बाह्यरंगात बदल हवा | अंतरंगात बदल | विश्वसार्हता तत्त्वनिष्ठा, कष्टाची तयारी | जाहिरातीकरण, धंदेवाईकता | एकूण |
|---|---|---|---|---|
| १० | ०५ | ०७ | ०३ | २५ |
| ४०% | २०% | २८% | १२% | १००% |

**प्रश्न ३३-** वृत्तपत्रे खप वाढवण्यासाठी अपप्रवृत्तीकडे वळत आहेत या आरोपाला उत्तर देताना १८ जणांनी होकार दिला आहे. ५ जणांनी नकार दिला आहे. २जणांनी काही अंशी खरे आहे असे म्हंटले आहे.

| **होय** (केसरी, दुसरी बाजू, सकाळ अग्रदूत, जनप्रवास, ललकार, लोकसत्ता) | **नाही** (पुण्यनगरी, पुढारी, महाराष्ट्र टाइम्स, लोकमत) | **काही अंशी खरे** (संध्यानंद, तरूण भारत) | **एकूण** |
|---|---|---|---|
| १८ | ०५ | ०२ | २५ |
| ७२% | २०% | ०८% | १००% |

**प्रश्न ३४-** गेल्या १५ वर्षात वृत्तपत्राच्या बदलत्या स्वरूपाच्या आलेखाबद्दल लिहताना १२ जणांनी आलेख उंचावणारा आहे असे म्हंटले ६ जणांनी घसरणारा आहे असे म्हंटले नी काहीनी थोडा उंचावणारा काही घसरणारा असा संमिश्र प्रतिसाद दिला. २ नी उंचावणारा असला तरी तो टिकणार नाही असे म्हटले १ नी याबाबत कोणतीच प्रतिक्रिया दिलेली नाही.

| **आलेख उंचावणारा** | **घसरणारा** | **संमिश्र** | **टिकणारा नाही** | **प्रतिक्रिया नाही** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| १२ | ०६ | ०४ | ०२ | ०१ | २५ |
| ४८% | २४% | १६% | ०८% | ०४% | १००% |

**प्रश्न ३५-** जागतिक बाजारपेठेत टिकण्यासाठी गुणात्मक प्रगती करण्याचे दृष्टिने वृत्तपत्राने कोणते बदल केले पाहिजेत या प्रश्नाला १५ जणांनी सामाजिक समस्यांना प्राधान्य द्यावे असे मांडले. ५ जणांनी विश्वासार्हता टिकवली पाहिजे असे तर ५ जणांनी राजकारण व जनअभिरूची बरोबर व्यवसायिक दृष्टिकोन वाढवला पाहिजे असे म्हटले आहे.

| **सामाजिक समस्यांना प्राधान्य** | **विश्वासार्हता टिकवावी** | **राजकारण, सामा. अभिरूचीबरोबर व्यवसाय** | **एकूण** |
|---|---|---|---|
| १५ | ५ | ५ | २५ |
| ६०% | २०% | २०% | १००% |

**प्रश्न ३६-** आजची पत्रकारिता ध्येयवादी उरलेली नसून आपला फायदा पाहणारी, धंदेवाईक झाली आहे हा आक्षेप कितपत खरा आहे? याला १० जणांनी हा खरा आहे ८ जणांनी तसे म्हणता येणार नाही असे सांगितले आहे. ५ जणांनी अद्याप ध्येयवादी वृत्तपत्रे टिकून आहेत तर २ नी काहीच मत दिलेले नाही.

| आक्षेप खरा आहे | असे म्हणता येणार नाही | ध्येयवाद आहे | कोणतेच मत नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| १० | ०८ | ०५ | ०२ | २५ |
| ४०% | ३२% | २०% | ०८% | १००% |

**प्रश्न३७ -** वृत्तपत्रे आधी बातम्या प्रसिद्ध करतात मग खुलासा करतात हे योग्य आहे का? यावर १५ जणांनी असे करणे हे अयोग्य आहे असे म्हटले. ७ जणांनी असे अनवधानाने घडू शकते असे म्हटले आहे. ३ जणांनी यावर कोणतेच मत दिलेले नाही.

| अयोग्य | अनवधानाने घडल्यास क्षम्य | कोणतेच मत नाही | एकूण |
|---|---|---|---|
| १५ | ०७ | ०३ | २५ |
| ६०% | २८% | १२% | १००% |

**प्रश्न ३८-** सामाजिक ऋण फेडण्यासाठी आपण काय केले यावर १० जणांनी समाजहितासाठी प्रबोधन ०५ जणांनी आरोग्य सेवेवर लक्ष केंद्रित केले तर ०५ जणांनी अन्यायाला, गुन्हेगारीला तोंड देण्यासाठी प्रबोधन, ०५ जणांनी अंधश्रद्धा, रूढी , भ्रूण हत्येविरूद्ध व्यापक चळवळ उभारल्याचे सांगितले.

| समाजहितासाठी प्रबोधन | आरोग्यसेवेबाबत प्रबोधन | अन्यायाविरूद्ध प्रबोधन | अंधश्रद्धा न भ्रुणहत्या विरूद्ध प्रबोधन | एकूण |
|---|---|---|---|---|
| १० | ५ | ५ | ५ | २५ |
| ४०% | २०% | २०% | २०% | १००% |

**प्रश्न ३९-** चांगल्या पत्रकारांना प्रोत्साहन देण्यासाठी योजना आखता का? या प्रश्नाच्या उत्तरात ५ जणांनी हा स्पर्धेच्या भाग आहे असे सांगितले. १० लोकांनी अशा पत्रकारांसाठी प्रोत्साहनात्मक योजना आखतो असे सांगितले. ५ जणांनी प्रत्येकवेळी योजना आखतोच असे नाही असे सांगितले. तर ५ जणांनी पत्रकारांसाठी विविध बक्षिसे, आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांच्या बातम्या पाठविण्यासाठी त्यांना अर्थिक व लागेल ती मदत करणे, पुरस्कार देणे अशा योजना आखतो असे सांगितले.

| **प्रोत्साहनासाठी आखतो** | **आखत नाही** | **एकूण** |
|---|---|---|
| २० | ५ | २५ |
| ८०% | २०% | १००% |

**प्रश्न ४०-** बातमी प्रसिद्ध करताना पुराव्यांची शहानिशा करून मगच प्रसिद्ध करता का व त्यानंतर त्याचा पाठपुरावा करता का? यामध्ये २० जणांनी शहानिशा केल्याशिवाय बातमी प्रसिद्ध करत नाही असे सांगितले तर ३ जणांनी शक्यतो पुरावा पाहून मग बातमी छापतो २ जणांनी ती जबाबदारी पत्रकारांची असल्याने ती बातमी सत्यच आहे असे गृहित धरून छापतो असे सांगितले.

| **शहानिशा करतो** (केसरी, पुण्यनगरी, पुढारी, सकाळ, तरूण भारत) | **पुरावा पाहून करतो** | **गरज वाटत नाही** (दै. ललकार) | **एकूण** |
|---|---|---|---|
| २० | ३ | २ | २५ |
| ८०% | १२% | ८% | १००% |

सदर बातम्यांचा पाठपुरावा करता का व यातून समस्या सुटल्या आहेत का? या प्रश्नात १५ जणांनी बातम्यांचा पाठपुरावा करतो असे सांगितले. ५ जणांनी ते काम आमचे नव्हे शासनाचे व पोलिसांचे आहे असे सांगितले. ५ जणांनी अनेक प्रश्न आमच्या वृत्तपत्राने तडीस लावलेले आहेत असे सांगितले. यात सांगलीतील गुन्हेगारीवर गावगुंड सदरातून दै. तरूण भारतने टाकलेला प्रकाश तसेच

सांगलीतील माधवनगर येथील शाळेच्या दुरूस्तीबद्दलची बातम्यांचा दै. पुण्यनगरीने केलेला पाठपुरावा, पुढारीने घेतलेला शेतकऱ्यांच्या समस्येचा प्रश्न अशी अनेक उदाहरणे त्यांनी दिली आहेत.

| **पाठपुरावा केला** (केसरी, सकाळ, त.भारत, लोकसत्ता) | **पाठपुरावा करत नाही** (दै. ललकार, सत्यदूत) | **पाठपुरावा करून प्रश्न सोडवले** (पुण्यनगरी, पुढारी, तरूण भारत, लोकमत) | **एकूण** |
|---|---|---|---|
| १५ | ५ | ५ | २५ |
| ६०% | २०% | २०% | १००% |

**प्रश्न ४१-** ग्रामिण, अदिवासी भागातील बातम्या व प्रश्न मांडता का? व त्यामुळे समस्या सुटल्या का? या प्रश्नात २० जणांनी समस्या मांडतोच व त्या सोडवण्याचा प्रयत्न करतो असे सांगितले. ५ जणांनी मात्र आम्ही फक्त मांडतो व त्या सोडवण्याची जबाबदारी शासनाची असते सांगितले.

| **बातम्या व प्रश्न मांडून सोडवण्याचा प्रयत्न करतो** (केसरी, पुढारी, सकाळ,लोकमत, लोकसत्ता) | **फक्त बातम्या व प्रश्न मांडतो** (अग्रदूत, ललकार, त.भारत, महासत्ता, दुसरी बाजू) | **एकूण** |
|---|---|---|
| २० | ५ | २५ |
| ८०% | २०% | १००% |

**प्रश्न ४२-** वृत्तपत्र ज्या ठिकाणाहून प्रसिद्ध होते त्या ठिकाणाच्या विकासासाठी काय करता? या प्रश्नाचे उत्तर देताना १५ संपादकांनी आपल्या गावाच्या विकासासाठी तिथल्या समस्या, लोकांच्या अडचणी वृत्तपत्रात प्रसिद्ध करून शासनापर्यंत पोहचवतो तसेच शासकीय योजना लोकापर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांना प्रसिद्धी देतो असे सांगितले. ८ जणांनी आपण केवळ आपल्या गावापुरते न पाहता सर्वांच्या विकासाला प्राधान्य देतो असे सांगितले. २ जणांनी आपण केवळ गावाचाच नाही तर देशाच्या विकासाला प्राधान्य देतो

असे सांगितले. विकासाला प्राधान्य देतो असे सांगितले. याबाबतीत पाणी टंचाई, दुष्काळ, गुन्हेगारी, शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार, शेतकऱ्याच्या समस्या यासाठी शासन पुढे अनेक योजना मांडल्या आहेत. व पुढेही मांडण्याचा मानस आहे असे सांगितले.

| **गावाच्या विकासासाठी अनेक योजनांना प्रसिद्धी** (पुण्यनगरी, केसरी, पुढारी, लोकमत, त.भारत) | **केवळ गावापुरते न पाहता सर्वांचा विकास** (सत्यदूत, महासत्ता, सकाळ) | **देशाच्या विकासाला प्राधान्य** (दुसरी बाजू, अग्रदूत, ललकार) | **एकूण** |
|---|---|---|---|
| १५ | ८ | २ | २५ |
| ६०% | ३२% | ८% | १००% |

**प्रश्न ४३ -** दुसऱ्या वृत्तपत्रात जादा पगाराची ऑफर आल्यास पहिले वृत्तपत्र सोडावे का? सोडताना पूर्वीच्या वृत्तपत्रावर दोषारोप करावे का? याला उत्तर देताना १० जणांनी जरूर सोडावे पण कुठलेही दोषारोप न करता असे सांगितले १२ जणांनी अजिबात सोडू नये असे सांगितले मात्र ३ जणांनी सोडावे व सोडताना त्यांचे दोष दाखवावेत असे सांगितले. याबाबत ललकारच्या संपादकाचे मत माननीय आहे. ते या वृत्तीला भांडवलदाराचे कारस्थान समजतात. संपादकाने निष्ठावंत असावे असे म्हणतात.

| **जरूर सोडावे दोषारोप न करता** (पुढारी, सकाळ, महासत्ता, पुण्यनगरी) | **अजिबात सोडू नये** ललकार, त.भारत, केसरी, अग्रदूत, सत्यदूत) | **दोष दाखवून सोडावे** (लोकमत, दुसरी बाजू, विजयंत) | **एकूण** |
|---|---|---|---|
| १० | १२ | ३ | २५ |
| ४०% | ४८% | १२% | १००% |

**प्रश्न ४४-** केसरीसारख्या ध्येयनिष्ठ वृत्तपत्राबद्दल आपले मत काय? केसरीने कोणते बदल करावे हे सांगताना २० जणांनी केसरीसारखी ध्येयवादी, प्रांजल, अन्यायाविरूद्ध लढणारी आदर्श वृत्तपत्रे आज हवी आहेत मात्र भांडवली वृत्तपत्रात केसरीसारख्या वृत्तपत्राने टिकाव धरणे अवघड झाले आहे असे मत मांडले. ५ जणांनी मात्र केसरी हा एकेकाळी परखड, ध्येयवादी असला तरी त्याने आता हा ध्येयवाद सोडून बदलाला सामोरे गेले पाहिजे असे मत मांडले. त्यासाठी त्यांनी लोकांना रूचेल अशा बातम्या, सदरे, पुरवण्या व राजकारणाशी मिळते जुळते धोरण स्विकारावे असे मांडले आहे.

| **केसरी ध्येयवादी परखड असून त्याने हे धोरण कायम ठेवावे** (केसरी, पुढारी, अग्रदूत, ललकार, लोकसत्ता, तरुण भारत) | **केसरी ध्येयवादी, सात्विक आहे मात्र त्याने काळानुरूप बदल करावे** (सकाळ, लोकमत, महासत्ता, पुण्यनगरी, संध्यानंद | **एकूण** |
|---|---|---|
| २० | ५ | २५ |
| ८०% | २०% | १००% |

संपादक, वृत्तसंपादकाच्या प्रश्नावलीतून आलेल्या उत्तरातून ज्या अपेक्षा जाणवल्या त्यांचा सारांश एवढाच ☆ वृत्तपत्राने कालानुरूप बदलायला हवे ☆ आदर्शाबरोबर व्यवहारिक बाजूही सांभाळावी. ☆ प्रबोधन , मनोरंजन, ज्ञानाबरोबरच स्पर्धेत टिकवण्यासाठी वाचकाभिमुख ठेवली पाहिजे.

### ३.१३.३ विद्यार्थी प्रश्नावलीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

संपादक वृत्तसंपादकाच्या प्रश्नावल्यानंतर विद्यार्थी वर्गाकडून प्रश्नावली भरून घेतली. तिचे विश्लेषण पुढीलप्रमाणे. शालेय, महाविदयालयीन, पदव्युत्तर व एम.पी.एस.सी अशा एकूण ११५ विद्यार्थ्यांकडून प्रश्नावल्या घेतल्या. यापैकी १५ प्रश्नावल्या अपूर्ण होत्या. १०० प्रश्नावल्यातील उत्तरे पुढील प्रमाणे आली.

**प्रश्न १-** घरात कोणती वृत्तपत्रे घेता? वाचता का? कोणते?

यात ४० जणांनी लोकमत, ३० जणांनी पुढारी, ०५ जणांनी लोकसत्ता, २० जणांनी सकाळ, ५ पुण्यनगरी असे उत्तर दिले.

| **लोकमत** | **पुढारी** | **लोकसत्ता** | **सकाळ** | **पुण्यनगरी** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| ४० | ३० | ०५ | २० | ०५ | १०० |

**प्रश्न२-** वृत्तपत्र वाचता का केव्हा?

यावर ३० जणांनी सकाळी, ३० जणांनी दुपारी, २० जणांनी रात्री झोपण्यापूर्वी , १५ जणांनी कॉलेजच्या वेळेत तर ०५ जणांनी वेळ मिळेल तेव्हा असे उत्तर दिले.

| **सकाळी** | **दुपारी** | **रात्री झोपण्यापूर्वी** | **कॉलेजच्या वेळेत** | **वेळ मिळेल तेव्हा** | **एकूण** |
|---|---|---|---|---|---|
| ३० | ३० | २० | १५ | ०५ | १०० |

**प्रश्न ३-** दुसरे कोणते वृत्तपत्र वाचता?

यावर ४० जणांनी संध्यानंद, २० जणांनी पुढारी, १० जणांनी महाराष्ट्र टाइम्स, १० जणांनी लोकसत्ता, ०२ नी पोलिस टाइम्स, ३ नी नोकरी संदर्भ, ५ जणांनी महासत्ता, ०५ जणांनी सामना असे उत्तर दिले.

| संध्यानंद | पुढारी | म.टाइम्स | लोकसत्ता | पोलिस टाइम्स | नोकरी संदर्भ | महासत्ता | सामना | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४० | २० | १० | १० | ०२ | ०३ | ०५ | १० | १०० |

**प्रश्न४-** शाळेतील ग्रंथालयात कोणती वृत्तपत्रे घेतात?

याला ८० जणांनी मराठी, हिंदी, इंग्रजीची बहुतेक सर्व असे लिहले. १० जणांनी पुढारी, लोकमत, म.टाइम्स, सकाळ, लोकसत्ता, टाइम्स ऑफ इंडिया असे लिहले.५ जणांनी महा.टाइम्स, लोकसत्ता, महासत्ता, टाइम्स ऑफ इंडिया, तर ५ जणांनी लोकमत (हिंदी) इंडियन एक्सप्रेस, पुढारी, म.टाइम्स, सामना, पुण्यनगरी हे उत्तर दिले.

| बहुतेक सर्व (मराठी, हिंदी, इंग्रजी) | पुढारी, लोकमत, टाइम्स, सकाळ इ. | टाइम्स, लोकसत्ता, महासत्ता टाइम्स ऑफ इंडिया | लोकमत (हिंदी), इंडियन एक्सप्रेस, पुढारी इ. | एकूण |
|---|---|---|---|---|
| ८० | १० | ०५ | ०५ | १०० |

**प्रश्न५ -** त्याचा वापर करता का?

यावर सर्वांचे उत्तर होकारार्थी आले.

| वापर करतो | एकूण |
|---|---|
| १०० | १०० |

**प्रश्न ६-** वृत्तपत्रातील कोणत्या गोष्टी वाचता?

यावर ५० जणांनी बातम्या, २० नी चित्रपट, १०नी विनोद/ज्योतिष, १० परिपाठ, १० क्रिडा व मनोरंजक मजकूर असे उत्तर दिले.

| बातम्या | चित्रपट | विनोद, ज्योतिष | परिपाठ अभ्यासक्रम | क्रिडा, मनोरंजक, मजकूर | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ५० | २० | १० | १० | १० | १०० |

**प्रश्न७-** वृत्तपत्रातील कोणते सदर आवडते याला ४० जणांनी बातम्या, १० नी चित्रपट, १०नी विनोद व ज्योतिष, १० नी अभ्यासक्रम व परिपाठ, १० नी मनोरंजक मजकूर, १० नी अग्रलेख, वैचा लेख, ५ नी क्रिडावृत्त, ५ नी आंतरराष्ट्रीय घडामोडी ही सदरे आवडतात असे सांगितले.

| बातम्या | चित्रपट | विनोद ज्योतिष | परिपाठ व अभ्यासक्रम | मनोरंजक मजकूर | आग्रलेख, वैचा लेख | क्रिडावृत्त | आंतरराष्ट्रीय घडामोडी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ४० | १० | १० | १० | १० | १० | ०५ | ०५ | १०० |

**प्रश्न ८-** परिपाठ व दिनविशेष वाचता का?

यावर फक्त ४५ जणांनी परिपाठ रोज वाचतो असे सांगितले, ३० जणांनी कधीकधी वाचतो त्यातील विनोद वाचतो तर ५ जणांनी वाचत नाही असे सांगितले.

| परीपाठ रोज वाचतो | कधी कधी वाचतो | त्यातील विनोद | वाचत नाही | एकूण |
|---|---|---|---|---|
| ४५ | ३० | २० | ०५ | १०० |

**प्रश्न ९ –** परिपाठातील कोणता भाग अधिक आवडतो?

यावर ६० जणांनी बोधकथा, २० जणांनी सुविचार, सुभाषित, १० जणांनी प्रार्थना, दिनविशेष, १० जणांनी विनोद, मौन, ग्रंथपरिचय आवडते असे सांगितले.

| बोधकथा | सुविचार, सुभाषित | प्रार्थना | विनोद,ग्रंथपरिचय | एकूण |
|---|---|---|---|---|
| ६० | २० | १० | १० | १०० |

**प्रश्न १० व ११–** तुमच्या इयत्तेचा अभ्यासक्रम छापून येतो तो वाचता का त्याचा उपयोग होतो का?

याच्या उत्तरात १० वी १२ च्या ६० विद्यार्थ्यांनी याचा उपयोग होतो असे लिहले आहे २० जणांनी याचा थोडाफार उपयोग होतो. असे म्हटले आहे तर २० जणांनी आपण त्याचा उपयोग करत नाही असे मांडले.

| अभ्यासक्रमाचा उपयोग खुप होतो | थोडाफार होतो | होत नाही | एकूण |
|---|---|---|---|
| ६० | २० | २० | १०० |

**प्रश्न १२–** लहानासाठीच्या पुरवणीतील कोणत्या गोष्टी आवडतात?

याला उत्तर देताना ६० मुलांनी त्यातील कथा कोडी, २० जणांनी विनोद, व्यंगचित्रे, २० जणांनी त्यातील प्रश्नमंजुषा आवडते असे मांडले.

| कथा, कोडी | विनोद, व्यंगचित्रे | प्रश्नमंजुषा | एकूण |
|---|---|---|---|
| ६० | २० | २० | १०० |

**प्रश्न १३ व १४ –** लहान मुलासाठी असणाऱ्या पुरवणीतील कोणती पुरवणी आवडते?

याला उत्तर देताना ४० जणांनी बालमित्र, ३० जणांनी अंकुर, १० जणांनी चॅम्पियन, व १० जणांनी छावा, १० जणांनी स्मार्ट सोबतही असे उत्तर दिले.

| बालमित्र | अंकुर | चॅम्पियन | छावा | स्मार्ट सोबती | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ४० | ३० | १० | १० | १० | १०० |

**प्रश्न १५ –** तुम्हाला कोणत्या प्रकारच्या बातम्या आवडतात?

याला उत्तर देताना ३० जणांनी गुन्हेगारी, १० जणांनी सामाजिक, २० जणांनी राजकीय, २० जणांनी खेळ, १० जणांनी विश्वसंचार मधील असे उत्तर दिले.

| गुन्हेगारी | सामाजिक | राजकीय | क्रिडावृत्त | विश्वसंचार | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| ३० | २० | २० | २० | १० | १०० |

**प्रश्न १६–** अग्रलेख वाचता का?

या प्रश्नाला ४० विद्यार्थ्यांनी होकार दिला, २० जणांनी क्वचित वाचतो म्हटले तर ४० विद्यार्थ्यांनी अजिबात वाचत नाही असे उत्तर दिले.

| अग्रलेख नेहमी वाचतो | क्वचित वाचतो | वाचतच नाही | एकूण |
|---|---|---|---|
| ४० | २० | ४० | १०० |

**प्रश्न १७ –** वृत्तपत्रातील शेवटच्या पानावरील अदभूतरम्य बातम्या वाचता का? याला ८० जणांनी होकार दिला, १५ जणांनी कधीतरी चाळतो, तर ०५ जणांनी मुळीच नाही व अशा बातम्या देऊ नयेत असे मांडले.

| वाचतो व त्या असाव्यात | क्वचित वाचतो मात्र अतिरंजित नसाव्यात | वाचत नाही. त्या नसाव्यात | एकूण |
|---|---|---|---|
| ८० | १५ | ०५ | १०० |

**प्रश्न १८ –** वृत्तपत्रानी ज्ञान द्यावे की मनोरंजन करावे याला उत्तर देताना ७० जणांनी ज्ञान व रंजन दोन्ही द्यावे, २० जणांनी मनोरंजातून ज्ञान द्यावे, तर १० जणांनी निखळ ज्ञान द्यावे असे मत मांडले.

| ज्ञान वर रंजन दोन्ही द्यावे | मनोरंजनातून ज्ञान द्यावे | निखळ ज्ञान द्यावे | एकूण |
|---|---|---|---|
| ७० | २० | १० | १०० |

**प्रश्न १९ –** वृत्तपत्राचा आकार कसा असावा? पानांची संख्या किती असावी?

याचे उत्तर देताना ४० जणांनी वृत्तपत्रे छोट्या आकाराची व प्रत्येक विषयाचे एक पान असे असावीत असे मत मांडले. ३५ जणांनी ती आहेत तेवढ्या आकाराची मर्यादीत पानाची असावीत असे मांडले. तर २५ जणांनी वृत्तपत्रे टॅबलेट साईजची किमान १० पानाची असावीत असे मांडले.

| मासिकाच्या आकाराची | नेहमीच्या आकाराची | टॅबलेट साईजची | एकूण |
|---|---|---|---|
| ४० | ३५ | २५ | १०० |

**प्रश्न २०,२१ –** वृत्तपत्रांनी कोणत्या प्रकारच्या बातम्या द्याव्या व आणखी काय द्यावे?

याचे उत्तर ४० जणांनी विधायक, सकारात्मक बातम्या द्याव्यात, २० जणांनी सामाजिक अन्यायाला वाचा फोडणाऱ्या, १० जणांनी राजकीय, १५ देशांच्या औद्योगिक प्रगतीच्या ५ जणांनी देशोविदेशीच्या आंतरराष्ट्रीय तर १० जणांनी स्थानिक बातम्या द्याव्यात असे मांडले.

| विधायक | सामा. अन्यायाला वाचा फोडणाऱ्या | राजकीय | औद्यो. प्रगतीच्या | आंतरराष्ट्रीय | स्थानिक | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| ४० | २० | १० | १५ | ०५ | १० | १०० |

वृत्तपत्रांनी देशाच्या प्रगतीला हातभार लावण्याचे, अन्यायाविरूद्ध आवाज उठवण्याचे काम करावे. तरूण पिढीला योग्य दिशा देऊन समाज परिवर्तनाचे काम करावे असे मत मांडले.

**प्रश्न २२ व २३ –** इंग्रजी वृत्तपत्रे वाचता का? याचे उत्तर ५० जणांनी वाचतो तर ५० जणांनी वाचत नाही असे उत्तर दिले. कारण घरात इंग्रजी वृत्तपत्रे घेत नाहीत असे उत्तर दिले.

| इंग्रजी वृत्तपत्रे वाचतात | वाचत नाही | एकूण |
|---|---|---|
| ५० | ५० | १०० |

**प्रश्न २४–** तुम्ही वृत्तपत्रात लिखाण करता का? कोणत्या प्रकारचे?

याला उत्तर देताना २० जणांनी करतो. ते प्रासंगिकलेख, कविता, वाचकाचा पत्रव्यवहार, या स्वरूपाचे असे लिहले. १० जणांनी शब्दकोडे, समस्यापूर्ती, ओळखा या प्रकारचे तर २० जणांनी मैत्र सखी या पुरवण्यासाठी लिहतो असे म्हंटले आहे. १० जणांना लिहण्याची इच्छा आहे पण प्रसिद्धी मिळत नाही. ४० जणांना लिखाणात रस नाही असे म्हंटले आहे.

| लिखाण करतात लेख, कविता, वाचकपत्रे इ. | लिहतात शब्दकोडे, ओळखा इ | पुरवणीसाठी लिहतात | लिहतात पण प्रसिद्धी नाही | लिहित नाही | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| २० | १० | २० | १० | ४० | १०० |

**प्रश्न २५–** इंटरनेटवरून वृत्तपत्रे वाचता का?

या प्रश्नाचे उत्तर ४५ जणांनी हो असे दिले ५५ जणांनी नाही दिले.

| इंटरनेटवरून पेपर वाचणारे | न वाचणारे | एकूण |
|---|---|---|
| ४५ | ५५ | १०० |

**प्रश्न २६ –** वृत्तपत्रांकडून अपेक्षा व्यक्त करताना पुढील मत मांडले

| वृत्तपत्रांनी अन्यायाविरूद्ध आवाज उठवावा | मनोरंजन व प्रबोधन भरावे | तरूणाईला योग्य दिशा द्यावी | गुन्हेगारी व भ्रष्टाचार थांबवावा | महिलांचे प्रश्न मांडावे | भ्रुणहत्येविरूद्ध लढा द्यावा | समाजाला विधायक वळण द्यावे | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३० | १० | १५ | १० | १५ | १० | १० | १०० |

विद्यार्थ्यांकडून घेतलेल्या प्रश्नावलीतून आलेल्या अपेक्षांचे विश्लेषण केले यात शालेय विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाचे मार्गदर्शन, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी मनोरंजानातून ज्ञान द्यावे तर एम.पी.एस.सी च्या विद्यार्थ्यांनी विज्ञान तंत्रज्ञान विषयक, सामा. घडामोडीचे ज्ञान देण्याविषयी अपेक्षा व्यक्त केल्या.

## ३.१३.४ शहरी व ग्रामीण वार्ताहरांच्या प्रश्नावलीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

यानंतर शहरी व ग्रामीण वार्ताहरांकडून घेतलेल्या प्रश्नावल्याचे विश्लेषण यातील ५० पैकी २५ पत्रकारांनी प्रश्नावल्या व्यवस्थित भरून दिल्या त्याचाच विचार करावा लागेल.

**प्रश्न १–** कोणत्या वृत्तपत्रासाठी बातम्या पुरवता?

यांच्या उत्तरात त्या त्या पत्रकारांनी आपापल्या वृत्तपत्राची नावे दिली मात्र ५ पत्रकार अनेक वृत्तपत्रासाठी वार्तांकन करत होते.

| लोक मत | केसरी | पुढारी | तरूण भारत | विजयंता | महासत्ता | पुण्यनगरी | सकाळ | मुक्त वार्ताहर | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | २ | २ | २ | २ | ३ | ४ | ५ | २५ |
| ८% | १२% | ८% | ८% | ८% | ८% | १२% | १६% | २०% | १००% |

**प्रश्न २–** कोणत्या प्रकारच्या बातम्या कव्हर करणे तुम्हास आवडते?

याला उत्तर देताना ६ जणांनी गुन्हेगारीच्या, ७ जणांनी राजकीय, ४ जणांनी सामाजिक, ३ जणांनी शैक्षणिक, ३ जणांनी क्रिडा व सांस्कृतिक, २ जणांनी प्रासंगिक असे उत्तर दिले.

| गुन्हेगारी | राजकीय | सामाजिक | शैक्षणिक | क्रिडा व सांस्कृतिक | प्रासंगिक | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ७ | ४ | ३ | ३ | २ | २५ |
| २४% | २८% | १६% | १२% | १२% | ८% | १००% |

**प्रश्न३-** कोणत्या प्रकारची पत्रकारिता करता?

यावर १५ जणांनी शहरी, ७ जणांनी ग्रामीण, ३ जणांनी संमिश्र असे सांगितले.

| शहरी | ग्रामीण | संमिश्र | एकूण |
|---|---|---|---|
| १५ | ०७ | ०३ | २५ |
| ६०% | २८% | १२% | १००% |

**प्रश्न ४ -** बातम्या लिहताना वाचकाच्या आवडीला प्राधान्य देता की वास्तव कथनाला?

याला उत्तर देताना १३ जणांनी वास्तव कथनाला, ७ जणांनी वाचकाच्या आवडीला, ५ जणांनी दोन्हीच्या समन्वयाला असे उत्तर दिले.

| वास्तव कथन | वाचकाची आवड | दोन्हीचा समन्वय | एकूण |
|---|---|---|---|
| १३ | ०७ | ०५ | २५ |
| ५२% | २८% | २०% | १०० |

**प्रश्न ५-** बातम्या प्रत्यक्ष त्या ठिकाणी जाऊन आणता की ऐकीव माहितीवर तयार करता?

याचे उत्तर देताना २२ जणांनी प्रत्यक्ष स्थळावर जाऊन असे सांगितले तर ३ जणांनी दोन्हीचा आधार घेऊन असे दिले.

| प्रत्यक्ष स्थळावरून | दोन्हीचा आधार घेऊन | एकूण |
|---|---|---|
| २२ | ०३ | २५ |
| ८८% | १२% | १००% |

**प्रश्न ६-** बातम्या मिळवताना एखादा धोक्याचा प्रसंग आला आहे का? तेव्हा काय केले?

याचे उत्तर देताना ०९ जणांनी तसा प्रसंग आल्याचे सांगितले. १०जणांनी तसा प्रसंग आला नाही म्हणून सांगितले. ६ जणांनी असा प्रसंग येता येता वाचलो असे सांगितले.

| धोक्याचा प्रसंग आला होता | आला नव्हता | येता येता वाचला | एकूण |
|---|---|---|---|
| ९ | १० | ६ | २५ |
| ३६% | ४०% | २४% | १००% |

**प्रश्न ७,८ -** भ्रष्टाचाराच्या बातम्या देण्याचे धाडस दाखवता का? संपादक त्या देतात का? व न दिल्यास त्या विरूद्ध दाद मागून त्या बातमीचा पाठपुरावा करता का ?

या प्रश्नांची उत्तरे देताना ७ जणांनी भ्रष्टाचाराची बातमीदेण्याचे धाडस दाखवतो व पाठपुरावा करतो असे सांगितले. ९ जणांनी भ्रष्टाचाऱ्याच्या बातम्या देतो पण ते छापणे न छापणे संपादकावर सोपवतो असे सांगितले. ९ जणांनी भ्रष्टाचाराच्या बातम्या देतो त्याचा पाठपुरावा करत नाही. ते परिस्थितीवर अवलंबून ठेवतो असे सांगितले

| भ्रष्टाचाराची बातमी देवून पाठपुरावा करतो | बातमी छापणे संपादकावर सोपवतो | बातमी देणे न देणे परिस्थितीवर ठेवतो | एकूण |
|---|---|---|---|
| ७ | ९ | ९ | २५ |
| २८% | ३६% | ३६% | १००% |

**प्रश्न ९ –** लोकरूची बातमीपत्रामध्ये तथ्य असते का? विश्वासार्हता किती असते? याचे उत्तर देताना १७ लोकांनी लोकरूची बातम्यांमध्ये तथ्य नसते असे सांगितले. ५ लोकांनी सगळ्याच बातम्यात तथ्य नसते असे नाही सांगितले. तर ३ लोकांनी त्यात पूर्ण तथ्य असते मात्र मांडण्याची तऱ्हा रंजक असते असे सांगितले.

| विश्वासार्हता नसते | काही अंशी असते | पूर्ण तथ्य असते व मांडण्याची तऱ्हा वेगळी | एकूण |
|---|---|---|---|
| १७ | ५ | ३ | २५ |
| ६८% | २०% | १२% | १००% |

**प्रश्न १० –** सवंग लोकप्रियता मिळवण्यासाठी वार्ताहर काहीही लिहतात व वृत्तपत्रे ते छापतात हा आरोप कितपत खरा आहे? याचे उत्तर देताना १८ लोकांनी हे पूर्ण खोटे आहे असे सांगितले. ४ जणांनी हे खरे आहे असे सांगितले व ३ जणांनी सरसकट असे विधान करता येणार नाही असे सांगितले.

| हा आरोप खोटा आहे | हा आरोप पूर्णतः खरा आहे | असे सरसकट म्हणता येणार नाही | एकूण |
|---|---|---|---|
| १८ | ४ | ३ | २५ |
| ७२% | १६% | १२% | १००% |

**प्रश्न क्र. ११ :** पीतपत्रकरिता अलीकडे वाढत चालली आहे. याला कोण जबाबदार आहे असे तुम्हास वाटते? याचे उत्तर देताना १७ जणांनी वृत्तपत्रांचे मालक व वाढती स्पर्धा जबाबदार आहे असे सांगितले, ३ जणांनी याला वार्ताहर जबाबदार आहेत असे सांगीतले तर ५ जणांनी यात राजकीय नेते जबाबदार आहेत असे सांगितले.

| **पीतपत्रकरिता वृत्तपत्रांचे मालक जबाबदार** | **वार्ताहर जबाबदार** | **राजकीय नेते जबाबदार** | **एकूण** |
|---|---|---|---|
| १७ | ३ | ५ | २५ |
| ६८% | १२% | २०% | १००% |

**प्रश्न क्र १२ :** वाचकांची मागणी तसा पुरवठा हे वृत्तपत्राचे धोरण तुम्हास योग्य वाटते का ? याला उत्तर देताना १५ जणांनी योग्य वाटत नाही असे सांगीतले १० जणांनी ती काळाची गरज आहे असे सांगितले.

| **मागणी तसा पुरवठा धोरण योग्य नाही** | **धोरण काळाची गरज आहे** | **एकूण** |
|---|---|---|
| १५ | १० | २५ |
| ६०% | ४०% | १००% |

**प्रश्न क्र. १३ :** वाचकांच्या कोणत्या अपेक्षा तुम्हाला योग्य वाटतात व त्या तुम्ही पूर्ण करता का? याचे उत्तर देताना १० जणांनी वाचकांच्या वृत्तपत्राने समाज प्रबोधन करावे व ज्ञान द्यावे या अपेक्षा योग्य वाटतात व आपण त्या पूर्ण करतो असे सांगीतले. १० जणांनी वृत्तपत्रांनी गल्ले भरु धोरण ठेवण्यापेक्षा सामाजिक हित व लोकरंजन करावे तर ५ जणांनी वाचकांच्या या अपेक्षा एकतर्फी आहेत असे सांगितले.

| प्रबोधन करावे व ज्ञान द्यावे | सामाजिक हित व लोकरंजन जपावे | अपेक्षा एकतर्फी | एकूण |
|---|---|---|---|
| १० | १० | ५ | २५ |
| ४०% | ४०% | २०% | १००% |

प्रश्न क्र. १४ : आजकाल ध्येयवादी पत्रका रिता संपून गल्ला भरु पत्रका रिता का उरली आहे हे खरे आहे का? याचे उत्तर देताना १० जणांनी हे खरे आहे असे सांगितले १२ जणांनी हा आरोप एकतर्फी आहे कारण हा व्यवसाय म्हणून पाहिला जातो असे सांगितले ३ जणांनी वृत्तपत्रे भांडवलदारांच्या हाती गेल्याने हे झाले आहे यात पत्रकारांचा दोष नाही असे सांगीतले.

| हे खरे आहे | हा आरोप एकतर्फी आहे | खोटे आहे | एकूण |
|---|---|---|---|
| १० | १२ | ३ | २५ |
| ४८% | ४८% | १२% | १००% |

प्रश्न क्र. १५ : वृत्तपत्रे सुधारावयाची असतील तर पत्रकारांनी आपली मनोवृत्ती बदलली पाहिजे हे श्री. जयदेव डोळे यांचे मत तुम्हास पटते का? यास उत्तर देताना १२ जणांनी हे मत पटते असे सांगितले ८ जणांनी हे मत पूर्णत: चुकीचे आहे तर ५ जणांनी काही अंशी हे पटते असे सांगितले.

| मत पटते | पटत नाही | काही अंशी पटते | एकूण |
|---|---|---|---|
| १२ | ८ | ५ | २५ |
| ४८% | ३२% | २०% | १००% |

प्रश्न क्र. १६ : पेड न्यूज बाबत आपले मत काय? अशा बातम्या वृत्तपत्रांनी द्याव्यात काय ? याचे उत्तर देताना पेड न्यूज ही पत्रकारितेस लागलेली कीड आहे असे ९ जणांनी सांगीतले पेडन्यूज ही काळाची गरज आहे. असे ११ जणांनी सांगितले. पेड न्युज हा व्यवसायाचा भाग असला तरी त्यावर निर्बंध असला पाहिजे असे ५ जणांनी सांगितले.

| पेड न्यूज देवू नयेत | द्याव्यात | निर्बंध असावेत | एकूण |
|---|---|---|---|
| ९ | ११ | ५ | २५ |
| ३६% | ४४% | २०% | १००% |

प्रश्न क्र. १७ : ग्रामीण भागातील आरोग्य विषयक प्रश्न आपण मांडता का ? व ते सुटले आहेत का? या प्रश्नांच्या उत्तरात १२ जणांनी हे प्रश्न मांडून सोडवले आहेत असे सांगितले ७ जणांनी हे प्रश्न मांडले पण पूर्ण सुटले नाहीत तर ६ जणांनी प्रश्न मांडले पण त्याची दखल शासनाने घेतली नाही असे सांगितले.

| प्रश्न मांडले व सुटले | मांडले व काही अंशी सुटले | मांडले पण दखल घेतली नाही | एकूण |
|---|---|---|---|
| १२ | ७ | ६ | २५ |
| ४८% | ४८% | २४% | १००% |

## ३.१३.५ वृत्तपत्र एजंट व विक्रेते यांच्या प्रश्नावलीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन

वृत्तपत्र एजंटाना व विक्रेत्यांना २५ प्रश्नावल्या दिल्या त्यातील १० परिपूर्ण व १० त्रोटक होत्या व ५ आल्या नाहीत.

**प्रश्न क्र. १ ते ७** यात त्यांची वैयक्तीक माहिती घेतली आहे.

**प्रश्न क्र. ८** खपाच्या दृष्टीने कोणती वृत्तपत्रे अग्रेसर आहेत यांच्या उत्तरात सर्वानीच पुढारी, सकाळ, लोकमत, पुण्यनगरी, जनप्रवास या वृत्तपत्रांची नावे घेतली.

**प्रश्न क्र. ९ :** सर्वात कमी खप असणारी वृत्तपत्रे कोणती? याचे उत्तर सर्वांनीच स्थानिक वृत्तपत्रे कमी खपतात असे सांगितले.

**प्रश्न क्र. १०** वृत्तपत्राचा खप कमी अधिक होण्याची कारणे देताना ६ जणांनी पुरवण्या हे महत्वाचे कारण सांगीतले २ जणांनी वृत्तपत्राचा दर्जा तर एकाने लोकमत असे सांगितले.

| **पुरवठ्यामुळे खप कमी अधिक** | **दर्जामुळे खप कमी अधिक** | **विशेष बातमीमुळे** | **पूर्वग्रहामुळे** | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| ६ | २ | १ | १ | १० |
| ६०% | २०% | १०% | १०% | १००% |

प्रश्न ११ वृत्तपत्राबाबतच्या सूचना वाचक देतात का? यात ७ जणांनी देतातच असे नाही असे मांडले तर ३ जणांनी आवर्जुन देतात असे सांगीतले.

| **सूचना देतात** | **सूचना देतातच असे नाही** | **एकूण** |
|---|---|---|
| ३ | ७ | १० |
| ३०% | ७०% | १००% |

प्रश्न १२ वाचक त्याच्या कोणत्या अपेक्षा तुमच्याकडे मांडतात? या प्रश्नाच्या उत्तरात ५ जणांनी किंमतीच्या संदर्भात तर ५ जणांनी दर्जेदार पुरवण्या असाव्यात असे मत मांडले.

| **किंमती संदर्भात अपेक्षा** | **दर्जेदार पुरवण्यासंदर्भात अपेक्षा** | **एकूण** |
|---|---|---|
| ५ | ५ | १० |
| ५०% | ५०% | १००% |

प्रश्न १३ : वाचकांच्या अपेक्षा वृत्तपत्रांपर्यत पोहोचवता का व कशा? य प्रश्नाला ८ जणांनी त्या पोहोचवतो तर २ जणांनी पोहोचवत नाही असे उत्तर दिले. या सूचना वृत्तपत्रांचे प्रतिनिधी येतात तेव्हा किंवा त्यांच्या सभेमधून पोहोचवतो असे सांगतो.

| **वृत्तपत्रांपर्यंट मिटीग किंवा प्रतिनिधी मार्फत पोहोचवतो** | **पोहोचवत नाही** | **एकूण** |
|---|---|---|
| ८ | २ | १० |
| ८०% | २०% | १००% |

प्रश्न १४ पूर्वीची वृत्तपत्रे, त्यांची धोरणे व आजची वृत्तपत्रे यात कोणते बदल जाणवतात? या प्रश्नाच्या उत्तरात ७ जणांनी हल्लीच्या वृत्तपत्रात बौध्दिक लेखन कमी दिले जाते व खप वाढेल याकडे लक्ष दिले जाते असे मत दिले २ जणांनी हल्ली वृत्तपत्रे पुढारी लोकांच्या हातात असल्याने राजकीय बातम्यांना प्राधान्य दिले जाते असे मांडले. तर एकाने अलिकडे वृत्तपत्रांचे गुन्हेगारीकरण झाले आहे असे मते मांडले

| **बौध्दिक लेखन कमी व खपाकडे लक्ष** | **राजकीय बातम्यांना प्राधान्य** | **गुन्हेगारी बातम्यास प्राधान्य** | **एकूण** |
|---|---|---|---|
| ७ | २ | १ | १० |
| ७०% | २०% | १०% | १००% |

प्रश्न १५ पूर्वीच्या व आजच्या वाचक वर्गाच्या आवडीनिवडीत कोणते बदल जाणवतात? यात ७ लोकांनी हल्लीचे वाचक भडक बातम्यांना प्राधान्य देतात असे सांगितले. २ जणांनी अलीकडील वाचकांना गुन्हेगारीच्या व अपघाताच्या बातम्या आवडतात तर एकाने हल्लीचे वाचक टाईमपास म्हणून बातम्या वाचतात असे सांगितले.

| **भडक बातम्या वाचतात** | **गुन्हेगारी व अपघाताच्या वाचतात** | **टाईमपास म्हणून वाचतात** | **एकूण** |
|---|---|---|---|
| ७ | २ | १ | १० |
| ७०% | २०% | १०% | १००% |

प्रश्न १६ वृत्तपत्र हा पेशा न राहता पैसे कमवण्याचा धंदा झाला आहे याबद्दल तुम्हाला काय वाटते? या प्रश्नाला ६ जणांनी हे खरे आहे असे उत्तर दिले २ जणांनी सगळेचजण पैसा कमवण्यासाठी वृत्तपत्र चालवतात असे नाही असे सांगितले. २ जणांनी व्यवहार व निष्ठा यांचा सुवर्णमध्य साधणारे साधन आहे असे सांगितले

| **पैसे कमवण्याचे साधन** | **पैसे कमवण्याचे साधन नाही** | **दोन्हीचा सुवर्णमध्य** | **एकूण** |
|---|---|---|---|
| ६ | २ | २ | १० |
| ६०% | २०% | २०% | १००% |

प्रश्न १७ वाचक व वृत्तपत्र यांच्यामधला महत्वाचा दुवा म्हणून तुम्ही कोणती भूमिका बजावता? हे नाते काळानुसार बदलते आहे का? याच्या उत्तरात ८ जणांनी वृत्तपत्राने मालक वाचक यांच्यामध्ये फक्त खरेदी विक्रीमधला दुवा म्हणून काम करतो २ जणांनी मात्र मालक व वाचक यांचा समन्वय साधून वाचकांची मते मालकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य करणे असे सांगितले.

| **व्यवहारातला दुवा म्हणून** | **मध्यस्त म्हणून** | **एकूण** |
|---|---|---|
| ८ | २ | १० |
| ८०% | २०% | १००% |

सर्वांच्याच मते मालक व वाचक यांच्या मधला दुवा हे नाते काळानुसार बदलते आहे. ते व्यावहारिक बनते आहे.

प्रश्न १८ वृत्तपत्राच्या कोणत्या पुरवठ्यांना जास्त मागणी असते? याला ६ जणांनी आरोग्य व महिला विषयक पुरवणी असे सांगितले. २ जणांनी चित्रपट विषयक व २ जणांनी क्रीडाविषयक असे सांगितले.

| आरोग्य व महिला पुरवण्यांची मागणी | चित्रपट पुरवण्यांची मागणी | क्रीडा पुरवण्यांची मागणी | एकूण |
|---|---|---|---|
| ६ | २ | २ | १० |
| ६०% | २०% | २०% | १००% |

प्रश्न १९ वृत्तपत्र खरेदी करताना वाचक मजकूर पाहून करतात की, किंमत पाहून? याला ८ जणांनी जास्त पाने पाहून, २ जणांनी किंमत पाहून असे उत्तर दिले.

| किंमत पाहून खरेदी | जास्त पाने पाहून | एकूण |
|---|---|---|
| २ | ८ | १० |
| २०% | ८०% | १००% |

प्रश्न २०,२१ मध्यंतरी वृत्तपत्रांच्या किंमती अचानक उतरल्या व वाढल्या याचा परिणाम वाचक वर्गावर किती झाला व आपल्या व्यवसायावर किती? याला सर्व विक्रेत्यांनी उत्तर दिले की, वाचकांच्या खरेदीवर याचा परिणाम झाला. वाचक वाढले मात्र विक्रेत्यांवर याचा काहीच परिणाम झाला नाही. विक्रेत्यांना गाळल्यामुळे त्यांचा फायदा झाला नाही.

| वाचकावर परिणाम झाला वाचक वाढले | व्यवसायावर परिणाम नाही फायदा नाही |
|---|---|
| १० | १० |
| १००% | १००% |

प्रश्न २२ आपण कोणते वृत्तपत्र नियमित वाचता? कोणते वृत्तपत्र आपणास दर्जेदार वाटते? या प्रश्नाचे उत्तर देताना ६ जणांनी पुढारी व सकाळ वाचतो तर एकाने सर्वच वृत्तपत्रे वरवर चाळतो असे सांगितले.

| महाराष्ट्र टाइम्स व लोकसत्ता | पुढारी व सकाळ वाचन | सर्व वृत्तपत्रे चाळतो | एकूण |
|---|---|---|---|
| ६ | ३ | १ | १० |
| ६०% | ३०% | १०% | १००% |

सर्वांगसुंदर असे एकही दैनिक वाटत नाही

प्रश्न २३ आपल्याकडे येणारे वाचक कोणत्या वयोगटातील व स्तरातील असतात याला ७ जणांनी सर्वच वयोगटातील असून त्यांच्या आवडीचा अंदाज येत नाही असे सांगितले. २ जणांनी येणारा वाचक हा तरुण व प्रौढ वर्गातील असून त्याला रंजित बातम्याची आवड दिसते. एकाने वाचक सर्व वयोगटातील असून प्रत्येकाची आवड वेगवेगळी असलेली जाणवते.

| सर्व वयोगटातील व आवडीचा अंदाज येत नाही | तरुण ते प्रौढ भडक बातम्यांची आवड | सर्व वयोगटातील व प्रत्येकाची आवड विभिन्न | एकूण |
|---|---|---|---|
| ७ | २ | १ | १० |
| ७०% | २०% | १०% | १००% |

प्रश्न २४ घरपोच सेवा पुरवता का? व वृत्तपत्रे जास्त कोठे खपतात? याच्या उत्तरात ७ जणांनी दैनिके, मासिके घरपोच पुरवितात. चौकातील व स्टॅंडवरील स्टॉलवर जास्त खप होतो. त्यात ३ जणांनी घरपोच पुरवण्यापेक्षा स्टॉलवर वाचक येवून खरेदी करतात असे सांगितले.

| घरपोच पुरवतात | स्टॉलवरुन खरेदी | एकूण |
|---|---|---|
| ७ | ३ | १० |
| ७०% | ३०% | १००% |

बऱ्याचदा फिरायला बाहेर पडल्यानंतर टाईमपास म्हणून एखाद्या बातमीसाठी, शब्दकोड्यासाठी वाचक रेल्वे स्टेशनवर, स्टँण्डवर येवून पेपर घेतात असे सांगितले.

प्रश्न २५: खप वाढविण्यासाठी वृत्तपत्रे ज्या नव्या योजना आखतात त्यामुळे खप वाढतो का? यात ९ जणांनी नव्या योजनांमुळे त्या दैनिकांचा खप वाढतो असे म्हटले आहे. तर एकाने या योजनांचा फारसा परिणाम होत नाही कारण निष्ठावंत वाचक हवे तेच दैनिक घेतात असे सांगितले. योजना संपल्यावर ते दैनिक घेणे बंद करतात असे सांगीतले.

| **नव्या योजनांमुळे खप वाढतो** | **वाढत नाही** | **एकूण** |
|---|---|---|
| ९ | १ | १० |
| ९०% | १०% | १००% |

प्रश्न २६ : वृत्तपत्राचा खप अचानक वाढतो वा कमी होतो असे का घडते याचे उत्तर देताना ६ जणांनी याचे कारण किंमत कमी केल्यावर वा जास्त झाल्यावर असे होऊ शकते असे सांगितले. ३ जणांनी एखादी महत्वाची घटना, बातमी, बहिष्कार असला तर १ नी असे सहसा होत नाही असे सांगितले.

| **किंमत कमी जास्त होणे** | **एखादी महत्त्वाची घटना/बातमी बहिष्कार** | **असे सहसा होत नाही** | **एकूण** |
|---|---|---|---|
| ६ | ३ | १ | १० |
| ६०% | ३०% | १०% | १००% |

प्रश्न २७ : वृत्तपत्राचे संपादक व मालक यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क येऊन वैचारिक देवाण घेवाण होते का? या प्रश्नाचे उत्तर ९ जणांनी फार कमी वेळा येतो त्यावेळी ग्राहकांचे विचार त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करतो मात्र त्यावर विचार केला जात नाही असे मांडले. १ नी मात्र बऱ्याचदा येतो यातून वैचारिक देवाण घेवाण होते असे सांगितले (दप्तरदार)

| संपर्क कमी वैचारिक देवाण घेवाण नाही | संपर्क होतो वैचारिक देवाण घेवाण होते | एकूण |
|---|---|---|
| ९ | १ | १० |
| ९०% | १०% | १००% |

प्रश्न २८ : स्पर्धेच्या युगात वृत्तपत्रांचा आत्मा हरवत चालला आहे असे म्हणतात. याबद्दल तुमचे मत काय? या प्रश्नाला उत्तर देताना ४ जणांनी वृत्तपत्राला आत्मा आहे का हाच प्रश्न पडतो असे म्हटले ३ जणांनी वृत्तपत्राचा आत्मा अद्याप जागृत आहे असा विश्वास दिला. ३ जणांनी हे विधान खरे आहे असे म्हटले आहे.

| आत्माच नाही | अद्याप जागृत आहे हरवलेला नाही | हरवत चालला आहे | एकूण |
|---|---|---|---|
| ४ | ३ | ३ | १० |
| ४०% | ३०% | ३०% | १००% |

प्रश्न २९ : स्पर्धेत टिकण्यासाठी स्वत:च्या रंगरुपात काही चुकीचे बदल केलेत ते योग्य आहेत का? अशी वृत्तपत्रे स्पर्धेत टिकाव धरतील का? या प्रश्नाचे उत्तर देताना ६ जणांनी हे बदल काळाची गरज म्हणून योग्य आहेत अशी वृत्तपत्रेच स्पर्धेत टिकतील असे म्हटले २ जणांनी हे बदल अयोग्य आहेत असे सांगून ससा व कासवाच्या शर्यतीप्रमाणे बदल करणारी वृत्तपत्रे स्पर्धेत क्षणिकपुढे जाणारी ठरतील असे म्हटले २ जणांनी बदल करावेत पण स्पर्धेसाठी अपवृत्तीकडे जाऊ नये असे मांडले.

| बदल योग्य आहेत स्पर्धेत टिकतील | बदल अयोग्य स्पर्धेत टिकणार नाही | बदल व्हावेत पण चुकीचे नकोत स्पर्धेत क्षणिक टिकतील | एकूण |
|---|---|---|---|
| ६ | २ | २ | १० |
| ६०% | २०% | २०% | १००% |

प्रश्न ३०: सर्व वृत्तपत्रे समान कमिशन देतात का? वृत्तपत्रमालक आपल्या आरोग्याबाबत काही योजना आखतात का? याचे उत्तर ७ जणांनी समान कमिशन द्यावे हा मुद्दा बरोबर नाही. प्रत्येक दैनिकाची कुवत वेगळी वेगळी असते त्यानुसार कमिशन देतात. ३ जणांनी दैनिके कष्टाच्या मानाने कमी कमिशन देतात असे मांडले. काही मोजकी दैनिके एजंटांच्या आरोग्य व भविष्याबाबत जागृत आहेत. त्यांनी इन्शुरन्स योजना केली आहे मात्र ती तात्पुरती आहे. आरोग्य तपासणी शिबिरे क्वचित घेतात असे सांगितले.

| **समान कमिशन देत नाहीत** | **कष्टाच्या मानाने कमी कमिशन** | **एकूण** |
|---|---|---|
| ७ | ३ | १० |
| ७०% | ३०% | १००% |

प्रश्न ३१ : सर्व ऋतुत पहाटे उठावे लागते त्याचा त्रास होतो का? काही घरगुती काम निघाल्यास काय करता? या प्रश्नांच्या उत्तरात ९ जणांनी हे रोजचेच काम असल्याने अंगवळणी पडले असल्याने त्रास नाही १ नी मात्र त्रास होतो पण नाईलाज होतो असे म्हंटले आहे. अशावेळी घरातले काम निघाल्यास पर्यायी व्यवस्था करावी लागते असे ४ जणांनी म्हंटले ६ जणांनी व्यवसायाला प्राधान्य देतो असे सांगितले.

| **त्रास वाटत नाही** | **त्रास झाला तरी नाईलाज आहे** | **एकूण** |
|---|---|---|
| ९ | १ | १० |
| ९०% | १०% | १००% |

| **घरगुती काम असल्यास पर्यायी व्यवस्था करतो** | **व्यवसायाला प्राधान्य देतो** | **एकूण** |
|---|---|---|
| ४ | ६ | १० |
| ४०% | ६०% | १००% |

प्रश्न ३२ वृत्तपत्र एजटांनी एकाच वृत्तपत्राची कास धरावी का? याच्या उत्तरात ६ जणांनी धरु नये, २ जणांनी धरण्यास हरकत नाही. ३ जणांनी ही गोष्ट मालक-एजंट यांच्या नाते संबंधावर अवलंबून आहे असे म्हटले आहे.

| कास धरु नये | धरावी | परस्पर नाते संबंधावर अवलंबून | एकूण |
|---|---|---|---|
| ६ | २ | २ | १० |
| ६०% | २०% | २०% | १००% |

प्रश्न ३३ : वाचक बिले वेळेवर देतात का? न दिल्यास तुमच्यावर आर्थिक बोजा पडतो का ? या प्रश्नाला उत्तर देताना ६ जणांनी वाचक बिले वेळेवर देत नाहीत त्यामुळे आर्थिक बोजा पडतो असे म्हटले ३ जणांनी नोकरदार तेवढे बिल वेळेवर देतात असे म्हंटले आहे तर १ नी उधारी ठेवत नसल्याने हा प्रश्न येत नाही असे म्हंटले आहे.

| बिले वेळेवर देत नाहीत | वेळेवर देतात | रोखीचा व्यवसाय असल्याने हा प्रश्नन येत नाही | एकूण |
|---|---|---|---|
| ६ | ३ | १ | १० |
| ६०% | ३०% | १०% | १००% |

प्रश्न ३४: ग्रामीण भागात वार्षिक बिल योजना परवडते का ? याला ८ जणांनी परवडत नाही व २ नी परवडते कारण ग्राहक बांधील राहतो असे सांगितले.

| वार्षिक बिल परवडत नाही | परवडते | एकूण |
|---|---|---|
| ८ | २ | १० |
| ८०% | २०% | १००% |

## ३.१४ सारांश

सर्वसामान्य वाचक शाळा व कॉलेजचे विद्यार्थी, वृत्तपत्र संपादक, वार्ताहर व एजंट यांच्याकडून घेतलेल्या पाच प्रकारच्या प्रश्नावल्यांचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केल्यावर यातून काही ठळक अपेक्षा आपल्यासमोर आल्या त्याचा सारांश पुढील प्रमाणे सांगता येईल.

- वृत्तपत्रांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेऊन समाजाला विधायक दिशा द्यावी.
- वृत्तपत्रांनी कोणत्याही राजकीय वर्चस्वापेक्षा सामाजिक बांधिलकी महत्वाची मानावी.
- वृत्तपत्रांनी मनोरंजन व प्रबोधनाचा योग्य समन्वय घालावा
- दर्जेदार पुरवण्या द्याव्यात
- संख्यात्मक प्रगतीपेक्षा गुणात्मक विकास साधावा
- अन्यायाविरुध्द आवाज उठवण्याचे धाडस दाखवावे.
- जाहिरातीचा अतिरेक टाळावा. एक व्यवसाय म्हणून पाहण्यापेक्षा एक व्रत म्हणून वृत्तपत्र चालवावे.
- वृतपत्रांचे बाजारीकरण थांबवावे.
- वृत्तपत्रांनी संपादकांना पूर्ण स्वातंत्र्य द्यावे. सामाजिक हिताकडे पूर्ण लक्ष द्यावे
- कोणत्याही एका राजकीय प्रणालीशी निगडीत न राहता तटस्थ भूमिका ठेवावी
- राजकारण व समाजकारणात समतोल असावा.
- कालानुरुप बदलताना विधायक बदलच स्वीकारावेत.
- आपला खप वाढवण्यासाठी वाचकांना प्रलोभने न दाखवता गुणात्मक दर्जा टिकवून स्पर्धेत टिकून रहावे.
- गुन्हेगारीकरण होऊ देऊ नये
- वृत्तपत्रानी विद्यार्थी व तरुण वर्गाची उदासिनता दूर करुन त्याचे मनोबल वाढवावे. त्याची सामाजिक बांधिलकी वाढवावी.

- देशोविदेशीचे तंत्रज्ञान, नवे बदल, अभ्यासक्रम याबाबत मार्गदर्शन करावे.
- वार्ताहरांना समाधानकारक वेतन देऊन त्यांना संतुष्ट ठेवावे.
- पेडन्यूज, पीत पत्रकारिता यासारख्या दुष्ट, विघातक प्रवृत्तीना थारा देऊ नये.
- वृत्तपत्राच्या मालकांनी एजंट विक्रेते यांच्या भविष्याबाबत काळजी घ्यावी.

एकूण वृत्तपत्र ही कोणा एकाची मक्तेदारी नसून मालक, संपादक, वाचक, पत्रकार व विक्रेते या सर्व घटकानी देशकार्यासाठी उभारलेले संकुल आहे. याची जाणीव ठेऊन प्रत्येक घटकाने आपल्या कर्तव्य व जबाबदारीची जाणीव ठेऊन आपली भूमिका पार पाडावी हे योग्य ठरेल.

### ३.१५ समारोप :

सदर प्रकरणात आपण प्रश्नावल्याचे संकलन, विश्लेषण व अर्थनिर्वचन करुन त्याचा सारांश पाहिला. पुढील प्रकरणात आपण निष्कर्ष व शिफारशी यांचा सविस्तर उहापोह करणार आहोत.

# प्रकरण चौथे

# निष्कर्ष

# व

# शिफारशी

# प्रकरण ४ थे

## निष्कर्ष व शिफारशी

४.१ प्रस्तावना

४.२ सारांश

४.३ निष्कर्ष

४.४ शिफारशी

४.५ उपसंहार

## ४.१ प्रस्तावना –

मानवी जीवनात वृत्तपत्राचे स्थान अनन्यसाधारण आहे. लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणून त्याच्याकडे पाहिले जाते. पूर्वीची वृत्तपत्रे लोकजागृतीसाठी सुरू केली होती. मात्र कालांतराने वृत्तपत्राचे स्वरूप बदलले. काळाच्या ओघात त्याच्या स्वरूप , हेतू, उद्दिष्टे यांच्यात बदल झाला तशी वाचकांची मानसिकताही बदलली. वृत्तपत्रांनी काय करावे, काय करू नये, काय द्यावे, काय देवू नये या बद्दलच्या त्यांच्या अपेक्षा बदलल्या. या बदलत्या अपेक्षांचा अभ्यास आपण येथे करणार आहोत.

## ४.२ सारांश –

या संशोधनाचे विभाजन पाच प्रकरणात केले असून वृत्तपत्राची पार्श्वभूमी या प्रकरणात आपण वृत्तपत्र ही संकल्पना नेमकी कुठून आली, तिची व्याप्ती, तिचा अर्थ काय होता. पूर्वीची वृत्तपत्रे कशी होती, त्याचा हेतू काय होता यावर विचार केला. वृत्तपत्राच्या विविध व्याख्यांबरोबर स्वातंत्र्यपूर्व काळातील वृत्तपत्रे, त्यांचे स्वरुप, त्याचे कार्य याचा सविस्तर विचार केला. तद्नंतर स्वातंत्र्योत्तर काळातील वृत्तपत्रांचे स्वरूप, विषय, भूमिका यांचा अभ्यास करून त्यांच्यात झालेल्या बदलांवर सविस्तर चर्चा केली.

दुसऱ्या प्रकरणात आपण वृत्तपत्र व वाचक यांच्यातील सहसंबंधांचा अभ्यास केला. यात वृत्तपत्र व वाचकांचे नाते कसे असते. या नात्याचे विविध स्तर कोणते, पूर्वीच्या वाचक वर्गाची भूमिका व अपेक्षा, वृत्तपत्रातील विषय व बातम्यांचे स्वरूप, संपादकाच्या भूमिका, संपादक व वाचकाचे नाते या सर्वाचा विस्तृत अभ्यास केला. तसेच  आपण स्वातंत्र्योत्तर काळातील वृत्तपत्रे व वाचक वर्गाचा स्तर यावर चर्चा करताना स्वातंत्र्योत्तर काळातील वृत्तपत्रे कशी होती, त्यांची भूमिका कोणती, एकविसाव्या शतकातील वृत्तपत्रांचा वाचकवर्गही कसा बदललला, वाचकांची अभिरूची कशी बदलली यावर चर्चा केली. हा वाचक विविध स्तरातील कसा आहे हे बघताना त्याचे वयोगटानुसार, व्यवसायानुसार कसे गट पडतात. त्यानुसार अभिरूची कशी बदलत जाते याचा सविस्तर अभ्यास केला.

तिसऱ्या प्रकरणात आपण संशोधनासाठी कोणती संशोधन पद्धती वापरली, त्याची उद्दिष्टे, साधने, गृहितकांची निश्चिती, व्याप्ती व मर्यादा यांचा विचार केला. संशोधनाची साधने निश्चित करुन नमुना निवड केली व प्रत्यक्ष संशोधनातील कार्यवाहीत प्रश्नावल्यांचे वाटप व संकलन केले. संकलीत माहितीचे

विश्लेषण, पृथक्करण करून अर्थनिर्वचन केले. त्याच्या आधारे वाचकांच्या बदलत्या अपेक्षांचा सविस्तर उहापोह केला.

प्रस्तुत प्रकरणात आपण या सर्व विवेचनातून आलेल्या निष्कर्षांचा विचार करून योग्य त्या शिफारशी सुचवणार आहोत.

## ४.३ निष्कर्ष :

प्रस्तुत प्रबंधात आपण ज्या प्रश्नावल्या संकलित केल्या त्यांच्या आधारे गृहितकाची यथार्थता तपासून पाहणे महत्त्वाचे ठरते. संकलित केलेल्या प्रश्नावलीच्या आधारे प्रत्येक गृहितक योग्य की अयोग्य हे तपासून पहिल्यावर वृत्तपत्रांकडून वाचकांच्या नेमक्या कोणत्या अपेक्षा आहेत याचा अंदाज येतो.

### ४.३.१ गृहितकांची यथार्थता:

१) वृत्तपत्र व राजकारण यांचा जवळचा संबंध असल्याने प्रत्येक वृत्तपत्राचा एक विशिष्ठ दृष्टिकोन बनतो हे गृहितक योग्य आहे असे बहुसंख्य वाचकांच्या मतावरुन म्हणता येईल.

२) वृत्तपत्रे विशिष्ट राजकीय पक्षाचे समर्थन करतात याबाबत संमिश्र मते आल्याने हे गृहितक काही अंशी यथार्थ आहे असे म्हणता येईल.

३) अलीकडे वृत्तपत्रामध्ये सकारात्मक बातम्यांपेक्षा नकारात्मक बातम्यांवर भर दिला जातो. बऱ्याच वृत्तपत्रात गुन्हेगारीच्या बातम्या भडकपणे रंगवल्या जातात हे मत सर्वच वाचकांनी मान्य केले आहे. त्यामुळे हे गृहितक योग्य आहे असे म्हणावे लागते.

४) अग्रलेख वाचणाऱ्या वाचकांनी संख्या अगदी कमी आहे. एकूण प्रश्नावल्यांवरुन सर्वसामान्य वाचकाचा अग्रलेख वाचनाकडे असणारा कल अगदी कमी दिसतो. त्यामुळे हे गृहितक योग्य आहे असे म्हणता येईल.

५) वृत्तपत्रांकडून निरवळ प्रबोधन व मनोरंजन व्हावे ही वाचकांची अपेक्षा आहे. हे गृहितक वाचक व विद्यार्थ्यांच्या प्रश्नावल्यांच्या आधारे योग्य आहे असे सांगता येईल.

६) वृत्तपत्रांनी वेगवेगळ्या पुरवण्या देवून वाचकांची अभिरुची जपावी ही वाढवावी हे वाचकांनी मुळातच गृहित धरले आहे. त्यामुले आपला हा अंदाज अचूक ठरतो.

७) दूरदर्शनचा वृत्तपत्रवाचनावर परिणाम होवून वाचकवर्ग कमी झाला आहे. हे गृहितक एकूण वाचक पाहणीवरुन व प्रश्नावलीतील मतावरुन फारसे योग्य ठरत नाही कारण दूरदर्शन आले तरी वृत्तपत्र वाचकांच्या संख्येवर फारसा परिणाम झालेला नाही. किंबहुना वृत्तपत्रवाचकांची संख्या आहे तितकीच आहे.

८) वृत्तपत्रे दूरदर्शनच्या स्पर्धेत टिकण्यासाठी जाहिरातींच्या आधीन गेली आहेत हे गृहितकही बऱ्याच अंशी योग्य आहे कारण वाचकांच्या पाहणीनुसार आपल्या सभोवती असलेल्या विविध प्रसारमाध्यमांच्या तुलनेत वृत्तपत्रांनी आपली ताकद विश्वसनियता व प्रभाव टिकवणे गरजेचे आहे. यासाठी आर्थिक ताकदही महत्त्वाची आहे. ही वाढवण्यासाठी जाहिरातीचा आधार घेणे गरजेचे आहे. मात्र नाकापेक्षा मोती जड या नात्याने वृत्तपत्रात मजकुरापेक्षा जाहिरातीना अधिक प्राधान्य दिसत आहेत.

९) वृत्तपत्रांचे बाजारीकरण झाल्यामुळे खप वाढवण्यासाठी वृत्तपत्रे चमत्कृतीकडे वळत आहेत हे ही गृहितक यथार्थ आहे असे म्हणावे लागते. वाचक, संपादक व वृत्तपत्रांचे मालक यांच्यामते वृत्तपत्र हा व्यवसाय झाल्याने त्यात प्रचंड स्पर्धा निर्माण झाली. या स्पर्धेत टिकवण्यासाठी जी चढाओढ करावी लागली, आपले वर्चस्व प्रस्थापित करावे लागले. त्यातून काही अनैतिक प्रवृत्ती यात शिरल्या व यातून या अपप्रवृत्ती निर्माण झाल्या.

१०) अलीकडे पीतपत्रकारितेचे प्रमाण वाढले आहे. सर्वसामान्य वाचक, वार्ताहर, संपादक यांच्या प्रश्नावल्यांचा आढावा घेताना हे गृहितक अगदी योग्य आहे हे जाणवते. वृत्तपत्रांमधील वाढत्या स्पर्धेचे फलित म्हणजे त्यात शिरलेल्या अनिष्ट प्रवृत्ती. या अनिष्ट प्रवृत्तीचाच एक भाग म्हणजे पीत पत्रकारिता, वार्ताहरांना मिळणारा अपुरा मोबदला, लोकांच्या मधला प्रसिध्दीचा हव्यास व सत्ता स्पर्धेतून वाढलेली चुरस, परस्परांवर चिखलफेक करण्याची प्रवृत्ती यामुळे हे प्रमाण वाढले आहे.

११) वृत्तपत्राच्या संपादकाला हवे तेवढे स्वातंत्र्य न मिळाल्याने त्यांना मालकांच्या इच्छेनुसार आपल्या विचारांची दिशा ठरवावी लागते. हे गृहितक पूर्णत: यथार्थ म्हणता येणार नाही. कारण काही वृत्तपत्रे आजही संपादकाला वैचारिक स्वातंत्र्य देणारी व निष्ठा सांभाळणारी आहेत. मात्र जी वृत्तपत्रे राजकीय

नेते व भांडवलदारांच्या हातात गेली आहेत. त्यांच्या बाबतीत हे गृहितक मान्य करावे लागते. केसरी सारखे वृत्तपत्र याला अपवाद ठरले आहे

१२) गेल्या १०-१५ वर्षात वृत्तपत्राचे स्वरुप, हेतू, उद्दिष्टे, धोरणे व विषय यात महत्वपूर्ण बदल होवून वृत्तपत्र वाचकाभिमुख होण्यापेक्षा अर्थाभिमुख झाले आहे हे गृहितक शंभर टक्के खरे आहे असे म्हणावे लागते. वाचक, संपादक व मालक यांच्याकडून घेतलेल्या प्रश्नावलीतून वृत्तपत्राचा व्यवसायाभिमुख दृष्टिकोन स्पष्ट झाला आहे. वृत्तपत्र हे व्रत न राहता व्यवसाय बनला आहे हे स्पष्ट झाले आहे.

१३) बाजारीकरणाबरोबर वृत्तपत्रांची मानसिकता बदलत चालली आहे हे गृहितक आजच्या पत्रकरितेला योग्य ठरले आहे. आजकाल वृत्तपत्रे गुन्हेगारीच्या बातम्यांना प्राधान्य देतात. गुन्ह्यांचे उदात्तीकरण करुन गुन्हेगारांना हिरो ठरवतात. (हर्षद मेहता, अजमल कसाब इ) दहशतवादाच्या बातम्या, खून मारामारीच्या बातम्या जेवढ्या भडक तेवढा खप अधिक असे गणित मांडल्याने प्रस्तुत गृहितक योग्य ठरले आहे.

१४) वाढत्या स्पर्धेत वृत्तपत्राचा आत्माच हरवला असून ध्येयवाद सोडून तो धंदा बनला आहे. बहुतेक सर्व वाचकांनी संपादकांनी याला दुजोरा दिला आहे. पूर्वी वृत्तपत्र एक व्रत्त म्हणून चालवत होते. आतामात्र त्यात भांडवलदार व राजकारणी उतरल्याने तो पैसा मिळवण्याचा धंदा ठरला. समाजकल्याण हा त्याचा आत्मा जावून आत्मकल्याण ही स्वार्थी वृत्ती राहिली. त्यामुळे हे गृहितक योग्य ठरले आहे.

१५) वृत्तपत्रे समाजहितासाठी काही विशेष कार्य करतात हे खरे आहे. हे गृहितक मात्र सर्वस्वी यथार्थ आहे असे म्हणता येईल कारण भूकंप, महापूर, वादळ, दुष्काळ इ. आपत्तीकाळात वृतपत्रांनी समाजहितासाठी केलेले कार्य नाकारुन चालणार नाही. केसरी, पुढारी, सकाळ, लोकमत यांनी केलेले सामाजिक कार्य लक्षात घेण्याजोगे आहे हे नक्की.

एकूण आपण धरलेल्या गृहितकांची यथार्थता तपासल्यानंतर ती योग्य व उचित आहेत हे जाणवते.

**याशिवाय आणखी काही निरीक्षणे या अभ्यासातून निघाली आहेत ती पुढीलप्रमाणे**

## ४.३.२ इतर निरीक्षणे -

संकलीत केलेल्या प्रश्नावल्या आपण वेगवेगळ्या स्तरातील लोकांकडून भरून घेतल्या. या घेताना त्यातून ज्या काही अपेक्षा वाचकांनी, संपादकांनी, वार्ताहरांनी, एजंट व विक्रेते यांनी व्यक्त केल्या त्याचे वर्गीकरण करून प्रत्येकाने मांडलेल्या अपेक्षा योग्य आहेत की अयोग्य याचे परीक्षण केले. यातून जे काही आपणांस जाणवले त्यातून काही ठळक निष्कर्ष आपण काढले. ते निष्कर्ष पुढीलप्रमाणे -

१) आज वृत्तपत्रांचे व्यावसायिकरण मोठ्या प्रमाणावर होते आहे. त्यामुळे मालक व संपादक असे दोन गट निर्माण झाले आहेत. संपादक हा केवळ नोकर अशी मालकांची भूमिका आहे. या बाजारीकरणातून वृत्तपत्राची गुणवत्ता मात्र ढासळते आहे. याचा दूरगामी परिणाम संपूर्ण समाजावर पर्यायाने वाचकांवर होतो आहे.

२) पूर्वीची वृत्तपत्रे ही एका विशिष्ट ध्येयाने भारावून गेली होती. ती व्रतपत्रे होती. त्यांनी समाजसेवेचे व्रत घेतले होते. परंतू अलिकडे वृत्तपत्राची धोरणे बदलली. त्याचे धंद्यात रूपांतर झाले. लोकशाहीचा चौथा स्तंभ आपल्या हातात असावा म्हणून भांडवलदार या व्यवसायात आले आणि वृत्तपत्र हे फायदा देणारे उत्पादन अशी भूमिका झाली. यातून गल्लाभरू धोरण निर्माण झाले.

३) केवळ पैसा कमावणे हेच धोरण ठेवल्यामुळे वृत्तपत्राच्या मालकांनी पैसा मिळवण्यासाठी वेगवेगळ्या मार्गांचा अवलंब केला. प्रसंगी अवैध मार्गही स्वीकारले. नीतीमुल्ये पायदळी तुडवली. त्यामुळे वृत्तपत्राची संख्यात्मक व आर्थिक प्रगती झाली पण दर्जा घसरला.

४) परदेशातून विविध प्रसारमाध्यमांनी इंटरनेट, ब्लॉग, फेसबुक अशा अनेक सुविधा आणल्या. अल्पक्षणात जगातील कुठलीही माहिती बसल्या ठिकाणी मिळू लागली. या गतीमान युगात वृत्तपत्रे मागे पडू लागली. जी गोष्ट प्रत्यक्ष डोळ्यांनी पहायला मिळणार व तेही प्रत्यक्ष घडताना असे असेल तर वृत्तपत्रात वाचण्यासाठी दुसऱ्या दिवशीपर्यंत कोण थांबणार? आजकाल काही परदेशी वृत्तपत्रेही येवू लागली आहेत. त्यांच्या तुलनेत टिकण्यासाठी आपल्या वृत्तपत्रांनी गुणवत्ता व विश्वसनियता निश्चितच सुधारली पाहिजे.

५) आजकाल मिडीयाचे प्रस्थ प्रचंड वाढले आहे. लोकांना त्यांचे प्रचंड आकर्षण आहे. अशावेळी वृत्तपत्रांनी त्यांच्या स्पर्धेत टिकण्यासाठी स्वतःमध्ये योग्य ते गुणात्मक बदल केले पाहिजेत.

६) परदेशी वृत्तपत्रांच्या तुलनेत टिकून राहण्यासाठी त्यांनी प्रिंटींग, फोटोग्राफी, पानांची रचना, मांडणी याबद्दलचे आधुनिक तंत्र आत्मसात केले पाहिजे. आज वृत्तपत्राचे शेवटचे पान त्याची मांडणी यात मोठे बदल झालेले आपण पहातो. पण ते करताना ते विधायक ठरतील, समाजहितकारक असतील हे पाहिले पाहिजे.

७) वृत्तपत्रांनी सर्वप्रथम स्वार्थी राजकारणापासून दूर राहिले पाहिजे. कोणत्याही राजकीय पक्षाचा, नेत्याचा हस्तक्षेप वृत्तपत्रांच्या कामकाजात होणार नाही याची खबरदारी घेतली पाहिजे. किंबहुना प्रत्येक वृत्तपत्र वैचारिकदृष्ट्या, आर्थिकदृष्ट्या, तात्विकदृष्ट्या स्वतंत्रच असले पाहिजे. कुठल्याही विशिष्ट राजकीय, सामाजिक, धार्मिक प्रणालीच्या अधीन त्याने जावू नये.

८) आपल्याकडे आपण केवळ इंग्रजी वृत्तपत्रे घेतो. याचे वाचकही विशिष्ट असतात. त्यांच्या तुलनेत बसण्यासाठी आपल्याला सुधारण्याचा विचित्र अट्ट्हास करावा लागतो. असे करण्यापेक्षा आपल्या देशात ज्या प्रादेशिक भाषा बोलल्या जातात त्या भाषेतील वृत्तपत्रे काढली पाहिजेत. गोव्यात पोर्तुगीज, कोकणी, मुंबईत गुजराती, भोजपुरी इ. भाषेतील वृत्तपत्रे काढली पाहिजेत.

९) वृत्तपत्रांनी मनोरंजनाबरोबर प्रबोधनाचे महत्वाचे कार्यही तितक्याच सबळपणे केले पाहिजे.

१०) वृत्तपत्र वाचणाऱ्या वाचकांचे विविध स्तर असतात. प्रत्येक स्तरातील वाचकाची अभिरूची वेगळी असते. प्रत्येकास आपल्या आवडीचे असे काही तरी वृत्तपत्रांनी द्यावे असे वाटत असते व तसे दिलेही पाहिजे. ज्याच्या त्याच्या अभिरूचीनुसार विविध सदरे देताना या लोकांची अभिरूची संपन्न करण्याचा प्रयत्नही वृत्तपत्रांनी केला पाहिजे.

११) आज स्पर्धेत टिकण्यासाठी वृत्तपत्रे विविध प्रलोभने दाखवित आहेत. वेगवेगळ्या पुरवण्या, वेगवेगळ्या योजना, क्विझ, बक्षिसे, चित्रस्पर्धा, चित्रकथा कात्रण स्पर्धा, कुपन स्पर्धा अशा स्पर्धांबरोबर लोकमत सखी मंच, सकाळ मधुरा यांच्यातर्फे महिलांसाठी सभासद योजना, त्यांच्यासाठी विविध कार्यक्रमाचे, सहलींचे आयोजन, चित्रपटाची तिकीटे देणे, हळदी कुंकू, वाढदिवस, भेटवस्तू देणे इ. एका विशिष्ट

मर्यादेपर्यंत ही प्रलोभने ठीक आहेत. पण याने निकोप स्पर्धा न राहता एकमेकांचे पाय ओढणे असली वैरवृत्ती वाढते.

१२) मध्यंतरी वृत्तपत्रांनी किंमती कमी करण्याच्या विचित्र चढाओढीचा आरंभ केला. ही गोष्ट खरोखरच तिरस्करणीय आहे. त्यातून साध्य काहीच झाले नाही. किंमत कमी केली, पुन्हा वाढवली यात वाचकांच्या डोळ्यात धूळ फेकल्याचा प्रकार झाला. यातून वृत्तपत्राच्या नुकसानीशिवाय काही साधले नाही. पुन्हा अशाप्रकारची चुरस कधी होऊ नये.

१३) आज वृत्तपत्रांवर जाहिरातींचे जे प्रचंड आक्रमण झाले आहे त्यामुळे तर त्याचा दर्जा सुमार ठरतो आहे. मीठामुळे पदार्थाची चव वाढते हे खरे आहे पण जेवणात नुसते मीठच वाढले तर काय होईल ? तसे जाहिरातींनी आकर्षकता वाढते, आर्थिक लाभ होतो हे मानले तरी जाहिरातींचा अतिरेक वाचकांना असह्य होतो हे ही तितकेच खरे आहे. काही संपादकांनी याचे स्पष्टीकरण दिले आहे. ते म्हणतात – वाचकांना वृत्तपत्र माफक किंमतीत हवे असते. वृत्तपत्र छापण्यासाठी येणारा खर्च व त्याची ठेवावी लागणारी किंमत यांचा मेळ घालणे कठीण होते. हा खर्च भरून काढण्यासाठी जाहिराती घेणे क्रमप्राप्त ठरते. असे असले तरी जाहिराती देताना त्या अश्लील असणार नाहीत एवढे तरी पहावे. यातून वाचकांची अभिरूची हीन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१४) लोकरूचीच्या नावाखाली आज प्रत्येक वृत्तपत्र विश्वसंचार, विचित्र विश्व यासारखे शेवटचे पान देते. त्याने वाचकाची अभिरूची सकस बनते का ? यात येणाऱ्या बातम्या नवलाईच्या असल्या तरी त्यात सत्य व तथ्य असते का ? त्यात असणारे अश्लील फोटो वाचकांच्या आवडीसाठी असतात की धंदा व्हावा म्हणून ? याचा वृत्तपत्रांनी विचार अवश्य करावा. ब्रिटन, अमेरिका हे देश आपल्यापेक्षा कित्येक शतके पुढे आहेत. पण त्यांची बरोबरी करण्यासाठी आपण आपल्या संस्कृतीचे पाश्चात्यीकरण करतो आहोत हे थांबवले पाहिजे. प्रत्यक्ष वाचकांनी हे आवर्जुन सांगितले आहे.

१५) या माध्यमांनी लोकांच्या विचारशक्तीवर इतका पगडा बसवला आहे की लोकांची स्वतंत्र विचारशक्ती नाहीसी करून ते निष्क्रीय होत आहेत. मी आंघोळीला कोणता साबण वापरावा हे या जाहिराती ठरवतात व अशा जाहिराती लादण्याचे काम ही माध्यमे करत असतात. आपल्या जीवनाची दिशा कोणती असावी हे ठरवण्याचे काम माध्यमांनी करावे हे वाचकांना मान्य नाही.

१६) आज वृत्तपत्रे गुन्हेगारीच्या बातम्या पहिल्या पानावर एवढ्या भडकपणे देतात की समाजाला प्रश्न पडतो की येथे काही चांगले घडते आहे की नाही ? यासाठी खून, मारामारी, अपघाताच्या बातम्या आतील पानावर देऊन विधायक बातम्या पहिल्या पानावर द्याव्यात.

१७) संपादक हा नोकर नसून तो एक बुद्धीवादी माणूस आहे याची जाणीव ठेऊन त्याला वैचारिक व तात्विक स्वातंत्र्य दिले पाहिजे आणि संपादकांनीही चार पैशासाठी आपली अस्मिता विकू नये.

१८) वृत्तपत्रांनी समाजातील सर्वसामान्य माणसाचे वैचारिक, नैतिक व सांस्कृतिक प्रबोधन करावे अशी वाचकांचीच अपेक्षा आहे.

१९) समाजाच्या / तरूण पिढीच्या अध:पतनाला ही माध्यमेच कारणीभूत आहेत असे समाजातील सुसंस्कृत वर्गाला वाटते आहे.

२०) वृत्तपत्रांमध्ये ध्येयनिष्ठा, विचारांचा परखडपणा, गुन्हेगारीविरूद्ध लढण्याची ताकद असावी. तसेच सामाजिक आरोग्य सुधारण्याची ताकदही हवी.

२१) समाजातील काही लोक मात्र सामाजिक अध:पतनास वृत्तपत्रांना जबाबदार धरत नाहीत. उलट वृत्तपत्रे ते रोखत आहेत असे ते म्हणतात.

२२) वृत्तपत्रांनी इतर माध्यमांशी स्पर्धा न करता आपली स्वत:ची प्रतिमा स्वच्छ, सुंदर व पवित्र ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे वाचकांना वाटते.

२३) भ्रष्टाचाराविरूद्ध तरूणाईची नवी फळी तयार करण्याचे काम वृत्तपत्रांनी केले पाहिजे. ही जबाबदारी अप्रत्यक्षपणे वाचकांनी वृत्तपत्रावर सोपवली आहे.

२४) वृत्तपत्रांनी अतिरंजित सदरे बंद करून लो. टिळकांसारखी निर्भीड पत्रकारिता निर्माण केली पाहिजे.

२५) पेड न्यूज हा जो धंदा सध्या भरभराटीला आला आहे हा बंद करून नि:स्पृह पत्रकार निर्माण करण्याचे काम केले पाहिजे.

२६) वाचकाच्या अपेक्षा पाहताना बहुसंख्य वाचकांना मंत्री लोकांच्या वाढदिवस अंकासाठी जी पानेच्या पाने खर्ची घालतात ते पसंत नाही. एखाद्या कर्तृत्ववान पुरूषाबद्दल लिहताना कद्रुपणा करायचा

आणि ज्यांना गुंडांचे पाठबळ आहे अशा पुढाऱ्याच्या लांगूलचालनासाठी अखंड अंक खर्ची घालायचा या गोष्टीला त्यांनी उघड विरोध केला आहे.

२७) सत्यान्वेषण, महिलांच्या प्रश्नावर चर्चा व त्यांच्या प्रश्नाचा पाठपुरावा करण्यात आमची वृत्तपत्रे कमी पडतात असा वाचकांचा आरोप आहे.

२८) जाहिरातीशिवाय अंक हाती यावे यासाठी वाचकवर्ग वृत्तपत्राची किंमत वाढवून द्यायला तयार आहे. आम्ही मजकूराची किंमत देऊ जाहिरातीची नाही असे त्यांनी बजावले आहे.

२९) वृत्तपत्रांनी नाट्य, संगीत, नृत्य, चित्र, शिल्प इ. कलांच्या अविष्काराला प्राधान्य द्यावे. याचे विशेषांक काढावे अशी कलावंतांची मागणी आहे.

३०) ब्रेकींग न्यूज, स्टिंग ऑपरेशन या प्रकारांना अवास्तव महत्व देऊ नये.

३१) अश्लील चित्रे, जाहिराती, मजकूर या गोष्टी पूर्णतः टाळाव्यात.

३२) नैतिकमूल्ये जपावी.

३३) काही वाचकांनी केसरीसारखी संयमी, ध्येयवादी पत्रकारिता नव्याने सुरू होऊन घराघरात पोहोचली पाहिजे असे म्हटले आहे.

३४) हिंसा, कामोत्तेजन या व्यतिरिक्त महत्वाची मूल्ये माध्यमे देत नाहीत.

३५) वृत्तपत्रांमधून विशिष्ट वर्गाचीच विचारसरणी प्रसृत होते आहे ते योग्य नाही.

३६) वृत्तपत्रांनी विधायक व सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करावा.

३७) खुपदा वृत्तपत्र नियंत्रकाचे हेतू वृत्तपत्रावर बिंबवले जातात. एखादी गोष्ट आहे तशी न दाखवता ती कशी असावी, काय घडावे हे त्याला जसे वाटते ते दाखवले जाते.

३८) खूपदा वेळ आली की वृत्तपत्रे 'तो मी नव्हेच' असा विश्वामित्री पवित्रा घेउन घूमजाव करतात. त्यांनी आपली नैतिक जबाबदारी टाळून पळ काढू नये.

३९) वृत्तपत्रादी माध्यमाकडे सृजनशीलतेचा अभाव असल्याने समाजात वैफल्य वाढते आहे.

४०) पत्रकार समाजहित पाहण्यापेक्षा व्यवसायातून मिळणाऱ्या लाभावर लक्ष ठेवतात. त्यासाठी स्वतःचे प्रामाणिक मत व्यक्त करण्यास ते स्वतंत्र नसतात. तर कधी माध्यम स्वातंत्र्याच्या गैरवापराने समाजाची नीतीमत्ता धोक्यात येते हे धोक्याचे आहे.

४१) वृत्तपत्र ठेवावी तितकी सामाजिक बांधिलकी मानीत नाहीत.

४२) समाजाची नैतिकता त्याच्यामुळे धोक्यात आली आहे.

४३) आज वृत्त मिळवण्यासाठी पत्रकार चुकीचे मार्ग स्वीकारतात हे समाजाला मान्य नाही.

४४) वृत्तपत्रे स्वार्थासाठी राजकर्ते, नेते यांचे लांगूलचालन करतात त्यामुळे निर्भिड मताची मुक्त अभिव्यक्ती होत नाही.

४५) मालकाचे हित प्रधान मानणारी वृत्तपत्रे आपली शक्ती समाजासाठी न वापरता मालकहितासाठी वापरताहेत.

४६) असे असूनही सामान्य वाचक वृत्तपत्रांना जबाबदार धरत नाही ही शोकांतिका आहे.

४७) सांस्कृतिक वर्चस्वाचा सोस, पैशाची हाव, आचारसंहितेचा अभाव, मुक्त अर्थव्यवस्था, बाजारीकरण, कायदे व आदर्शवादाचा अतिरेक यामुळे वृत्तपत्राच्या नीतीमत्तेला धोका निर्माण झाला आहे हेच खरे.

४८) वृत्तपत्र स्वातंत्र्याचे खरे हक्कदार (सामान्य जनता) बाजूला पडून वृत्तपत्र सम्राट - मालक हेच स्वातंत्र्य भोगत आहेत.

४९) वृत्तपत्राची नीतीमत्ता टिकवण्यास शासनाने जबाबदारी घेतली पाहिजे.

५०) तडजोडवृत्ती, गळेकापू धोरण, स्वशक्ती प्रदर्शन व आत्मसन्मानाचा विसर यामुळे वृत्तपत्राची स्थिती दयनीय झाली आहे.

५१) भांडवलशाहीमुळे वृत्तपत्रे मालकाच्या हिताशी बांधील असल्याने त्यांना समाज कल्याणाशी कर्तव्य नाही.

५२) पत्रकारांनी आपल्या व्यवसाय, ध्येयाशी इमान राखले पाहिजे. वृत्तपत्रात समाजाभिमुखता आणली पाहिजे. लोकांचा विश्वास गमावू नये. सामाजिक नीतिमूल्ये जपावीत ती मालकाच्या गळी उतरवण्याचे काम पत्रकारच करतील हा लोकांचा विश्वास आहे.

५३) जाहिरातदारांच्या ओंजळीने पाणी पिण्याचे थांबविण्यासाठी वाचकांनी वृत्तपत्राचे वाढीव मूल्य देण्याची तयारी दाखवली पाहिजे.

५४) या मूल्याच्या अध:पतनास या नियंत्रक शक्ती व बदलते विश्व जबाबदार आहेत. काही अंशी वाचकवर्गही याला जबाबदार आहे कारण कमी पैशात जास्त मिळवण्याची आमची वृत्ती याला कारणीभूत आहे.

५५) भांडवलदारांची नफेखोर वृत्ती, जागतिकीकरणाचा रेटा, परकीय संस्कृतीचे आकर्षण, स्वार्थवृत्ती यामुळे सामाजिक आरोग्य धोक्यात आले आहे. हे भांडवलदार माध्यमांची पावित्र्यता संपवत आहेत. आपल्यावर वर्चस्व गाजवत आहेत व अप्रत्यक्षपणे आपण त्यांना प्रोत्साहन देतो आहे. 'स्वस्तात मस्त' मागतो आहे.

५६) म्हणूनच वृत्तपत्रानी आज कठोर आत्मपरीक्षण करून स्वत:ला सुधारण्याची गरज आहे. संवेदनाहीन वाचकानी आत्मसंवेदना जागवून अपप्रवृत्ती वेळीच उखडून टाकली पाहिजे.

५७) वृत्तपत्राच्या या नैतिक पोकळपणाने, सद्य स्थितीने अस्वस्थ झालेले काही लोक जनआंदोलन करण्याची आवश्यकता व्यक्त करताहेत. पण अशाची संख्या कमी आहे. अधिकार, सत्ता, संपत्ती व साधनापासून वंचित असलेल्या बहुजनांच्या हितासाठी कुणीतरी बंडाची तुतारी फुंकणे गरजेचे आहे.

५८) जनहिताच्या हेतूने ज्याचा पाया घातला ते वृत्तपत्र माध्यम आज समाजकल्याणाची तमा नसणाऱ्या, अन्यायी, स्वार्थी लोकांचे होणे हेच या लोकशाहीचे दुर्दैव आहे. माध्यम सामर्थ्याचे अपयश आहे. विधायकतेचा पराभव आहे.

५९) वृत्तपत्र स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी, ते समाजाभिमुख करण्यासाठी या मूठभर स्वार्थी भांडवलदारांच्या हातून काढून घेतले पाहिजे. जे समाजाचे, समाजहिताचे आहे ते समाजाच्या हातातच ठेवले पाहिजे. यासाठी सुशिक्षित, उच्चशिक्षित लोकांनी लढा उभारला पाहिजे हे कळते पण वळत नाही ही आमची स्थिती आहे.

६०) वृत्तपत्राच्या मुक्तीलढ्यासाठी बुद्धीवंत, तज्ञ लोकांनी यावर नियंत्रण ठेवणारा गट स्थापन केला पाहिजे. 'जनअंकुश गट' 'सूज्ञवाचक संघ' स्थापून एक दबाव निर्माण केला पाहिजे. असे झाले तरच पूर्वीसारखी ध्येयवादी, लोकहितरक्षक पत्रकारिता निर्माण होऊ शकेल.

६१) समतोल, निष्पक्ष कोणावरही अन्याय न करणारे वृत्त ही बातमी मानली पाहिजे. मानवी भल्यासाठी प्रयत्न, अधिकांचे अधिक कल्याण व दुर्बलांना संरक्षण, व्यापक समाजहिताचे रक्षण करणारी पत्रकारिताच चिरंतन टिकते.

६२) आर्थिक प्रश्न, विश्वासार्हता, माध्यामांची नीतीमत्ता, आचारसंहितेचे पालन ही वृत्तपत्रापुढची महत्वाची आव्हाने आहेत. म्हणून त्याचे स्वरुप मनोरंजनात्मक व बाजारु करुन नीतिमूल्ये टाकणे हे चुकीचे आहे.

६३) लोकशिक्षण, माहिती देणे, सामाजिक क्रांती, विचारप्रवर्तनाचे महत्वाचे साधन जाहिरातीच्या ढिगाऱ्यात दबलेले, खाजगी जीवन उध्वस्त करणारे,आपली मते इतरांवर लादणारे व खोबरं तिकड चांगभल करणारे असू नये.

६४) वृत्तपत्र हे माध्यम लोकांना आधार, मनोबल देणारे असावे. त्याची दहशत असू नये. आज वृत्तपत्र नीतिमूल्याबाबत ठणठणपाळ असणारे झाले आहे.

६५) वृत्तपत्राचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे सर्वोच्च मूल्य मानले जात होते.त्यातून एक विवेक विचार पूर्ण जग निर्माण करण्याची मुभा होती. आज याउलट स्थिती आहे. आज हे माणसाचे माणसांनी लबाडीने सामाजिक राजकीय रुपांतर करणारे, स्वत:शी लबाडी करायला शिकवणारे माध्यम बनू पहात आहे.(युनेस्को अहवाल -ॲपेलो)

६६) वृत्तपत्रात गुन्हेगारीच्या बातम्या देणे म्हणजे त्याचे गुन्हेगारीकरण झाले असे म्हणता येणार नाही. मात्र त्या देतांना त्याची मांडणी कशा पध्दतीने कराता हे महत्वाचे ठरते. अशा बातम्यांना अतिरंजित रुप न देता संयमीत पध्दतीने त्या दिल्यास त्या विधायक ठरतात.(दत्तात्रय कुलकर्णी – मुख्य उपसंपादक, दै. पुण्य नगरी, सांगली)

६७) संपादकांनी विविध वयोगटाचे व अभिरुचीचे वाचक समाधानी होतील असे लेखन द्यावे. त्याने आपला टार्गेटेड वाचक पक्व करुन त्याची अभिरूची संपन्न करावी व त्याला हवे ते द्यावे.(मंगेश मंत्री –तरुण भारत)

६८) संपादकाला स्वातंत्र्य असले तरी मार्केटमधल्या अनिष्ट स्पर्धा व मार्केटिंगच्या गेम्स यात वाचकाचें हित सांभाळण्यासाठी त्याला जी कसरत करावी लागते ती करावी लागू नये कारण अस्थिर मानसिकतेचा संपादक वाचकाचे पूर्ण समाधान करू शकत नाही. (मंगेश मंत्री –तरुण भारत)

६९) स्पर्धेत टिकण्यासाठी आधुनिक छपाई यंत्र, अद्ययावत साधने याच्याबरोबर मनुष्यबळ प्रशिक्षित करून नेटवर्क बळकट केले पाहिजे. केबीनमध्ये बसून पत्रकारिता चालविण्यापेक्षा वाचकांच्या अपेक्षा, मते जाणून घेण्यासाठी सतत त्यांच्या संपर्कात राहिले पाहिजे. (मंगेश मंत्री –तरुण भारत)

७०) समाजाला उपयोगी कामे कागदोपत्री न करता तरूण भारतमधील सर्व कर्मचाऱ्यांनी जसे नेत्रदानाचे फॉर्म भरून देउन स्वतःपासून कामाची सुरूवात केली असे आदर्श प्रत्येक दैनिकाने निर्माण केले पाहिजेत. (मंगेश मंत्री –तरुण भारत)

७१) वार्ताहराच्या संदर्भात जी पीतपत्रकारिता वाढत चालली आहे ती बऱ्याच अंशी खरी असून या संदर्भात वाचकांनीच आवाज उठवला पाहिजे. मात्र भ्रष्टाचाराचा पर्दाफाश करणारे जे धाडसी पत्रकार आहेत त्यांच्या व त्यांच्या कुटुंबाच्या संरक्षणाची जबाबदारी समाजानेच पुढे होऊन घेतली पाहिजे. (वार्ताहर तरूण भारत मोहन कांबळे, अ. लाट)

७२) टि. व्ही. मुळे आजच्या वाचकवर्गावर परिणाम झाला आहे. मात्र टि.व्ही वर जी विश्वासार्हता मिळत नाही ती वृत्तपत्रे देतात. त्यामुळे हा विश्वास वृत्तपत्रांनी टिकवला पाहिजे. (वृत्तपत्र एजंट एस.टी. बुक स्टॉल - बी.एम. नाईक, सांगली.)

७३) वृत्तपत्रविक्रीमध्ये एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे वाचकांना भडक बातम्या असलेले दैनिक आवडते. कित्येकवेळा वाचकांच्या आवडीनिवडी संपादकापर्यंत पोहोचवणे गरजेचे असते. परंतु, मालक, संपादक यांच्याशी संपर्क फार कमीवेळा येतो. त्यामुळे यासाठी वृत्तपत्र विक्रेते, मालक व संपादक यांच्यात सतत संपर्क राहिला पाहिजे. खपाच्या दृष्टीने महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता यापेक्षा सकाळ, लोकमत, पुढारी यांचा खप आहे. अलिकडे संध्यानंदचा खप वाढतो आहे. मात्र या साऱ्यात

विक्रेत्यांच्या भवितव्याचा कुणी फारसा विचार करीत नाही. (भालचंद्र लिमये आदर्श एजन्सी, विश्रामबाग.)

विविध निष्कर्षाचा उहापोह केल्यावर वृत्तपत्रांच्याकडून वाचकांच्या बदलणाऱ्या अपेक्षा काय आहेत याची पूर्ण कल्पना येते. तथापी या संदर्भात काही महत्वाच्या शिफारशी वाचकांकडून आलेल्या आहेत त्यांचा विचार केल्याशिवाय हा विषय परिपूर्ण होणार नाही.

## ४.४ शिफारशी –

१. वृत्तपत्रांनी आपली गुणवत्ता टिकवायची असेल तर जाहिरातींच्या विळख्यातून बाहेर येणे गरजेचे आहे. अत्यंत दर्जेदार असे वृत्तपत्र कितीही वैचारिकदृष्टया प्रगल्भ असले तरी जर त्याचे विचार जाहिरातीच्या ढिगाखाली दबले जात असतील तर ते पूर्णतः चूकीचे ठरेल. केवळ पैशासाठी वृत्तपत्रांनी जाहिरातींची गुलामी पत्करणे हे सामाजिकदृष्टया घातक ठरणार आहे. म्हणूनच प्रथम जाहिरातमुक्त होउन स्वतंत्र्य विचारांचा श्वास द्यावा.

२. सत्याचा पाठपुरावा, नीतीमूल्यांचे पालन इ. नीतीतत्वांचे अवमूल्यन होणार नाही याची वृत्तपत्रांनी खबरदारी घ्यावी.

३. वृत्तपत्रांची सर्वात महत्वाची बाब म्हणजे तिची आचारसंहिता. या आचारसंहितेतील मूल्ये व संकेत यांचे काटेकोर पालन करून समाज व राष्ट्रबांधणीत मोलाचे योगदान द्यावे.

४. वृत्तपत्राची किंमत कमी ठेवणे आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही त्यामुळे जाहिरातींच्या आधीन जावे लागते. तथापी सूज्ञ वाचक जाहिरातमुक्त वृत्तपत्रासाठी अधिक किंमत मोजायला तयार आहे याचा आवर्जुन विचार व्हावा.

५. अलिकडे खप वाढविण्यासाठी वृत्तपत्रे गुन्हेगारीच्या बातम्या अधिक भडक पद्धतीने पहिल्या पानावर घालतात. तसे न करता चांगल्या घटनांच्या विधायक बातम्या पहिल्या पानावर घालून गुन्हेगारीच्या बातम्यांसाठी आतले एखादे पान ठेवावे. म्हणजे समाजात काहीतरी चांगले घडते आहे असा विश्वास लोकांना वाटू लागेल. गुन्हेगारीच्या बातम्या देतानाही अशा पद्धतीने द्याव्यात की त्यातून गुन्हेगारीवर

प्रकाश पडेल पण बालमनावर विपरीत परिणाम होणार नाही. ना. जयंतराव पाटील यांनी स्वतः ही शिफारस केली आहे.

६. अलिकडे वृत्तपत्राचा खप वाढवण्यासाठी नटनट्यांची अर्धनग्न छायाचित्रे घालण्याची फॅशन आली आहे. या संदर्भात वाचकांच्या प्रतिक्रिया नोंदवल्या आहेतच. तरीही अनेक वाचकांनी आवर्जुन सांगितलेली महत्वाची सूचना म्हणून ही शिफारस दिली आहे ती म्हणजे अशी चित्रे घालून खप वाढवण्यापेक्षा वाचकांची अभिरूची सकस तयार करून त्यांना वृत्तपत्र घेण्यास प्रवृत्त करावे.

७. परदेशात निघणाऱ्या काही वृत्तपत्राप्रमाणे आपल्याही वृत्तपत्राने प्रत्येक वाचकाच्या आवडीचे एक पान अशी बहुपानी वृत्तपत्रे काढण्याचा प्रयोग करून पाहण्यास हरकत नाही. त्यामुळे सर्वच वयोगटातील, व्यवसायातील वाचकांना त्यांच्या अभिरूचीनुसार वैचारिक खाद्य मिळू शकेल.

८. अलिकडे प्रायोजकतेचे एक लोण या क्षेत्रात आले आहे. आपल्याला कोणतीही गोष्ट अल्प किंमतीत घेण्याची जी सवय लागली आहे त्याची परिणती म्हणून प्रायोजकाच्या ओंजळीने पाणी पिण्याचे दिवस माध्यमांवर आले आहेत. यातून अनागोंदी व मूल्यहीनता पसरते आहे. त्यापेक्षा सहकारी तत्वावर उभारणी करून आपली स्वायत्तता माध्यमांनी टिकवून ठेवावी हे अधिक चांगले ठरेल.

९. अलिकडे टी.आर.पी. च्या अधीन जाऊन जी विचित्र स्पर्धा चालू आहे,जो तो आपला खप अधिक दाखवण्यासाठी पहिल्या पानवर आलेख दाखवतो आहे. यातून 'तूही खाऊ नको व मीही खाणार नाही' अशी परिस्थिती आली आहेत. आपआपसांत भांडत बसून तिसऱ्याचा लाभ करून देण्यापेक्षा सर्व वृत्तपत्रांनी एकमेकांच्या विचाराने सौजन्याने आपली प्रगती करावी.

१०. भावी काळात लोकमान्य टिळक, आगरकर व आचार्य अत्र्यांसारखे निर्भिड पत्रकार तयार व्हावेत. 'केसरी' सारखी व्रतस्थ वृत्तपत्रे समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचावीत व त्यांनी सामाजिक प्रबोधनाचे, मूल्यसंवर्धनाचे कार्य पवित्र यज्ञाप्रमाणे पूर्ण करावे.

११. वृत्तपत्रांनी कुठेही सत्याचा विपर्यास करू नये. अमेरिकन वृत्तपत्रांनी 'वॉटरगेट' प्रकरण, सद्दाम हुसेन प्रकरण, लॅटीन अमेरिकेत मारलेल्या पोलिश धर्मोपदेशकाच्या मृत्यूचे प्रकरण यात राज्यकर्त्यांच्या बाजूने राहण्यासाठी सत्याचा विपर्यास केला तसा विपर्यास करू नये.

१२. दरवर्षी प्रत्येक माध्यमाने लोकांकडून आपले कठोर परीक्षण करून घेतले पाहिजे व सत्यनिष्ठ, वस्तुनिष्ठ लोकसेवक ही बिरूदे मिळवण्यास आपण योग्य आहोत का ? याचा तपास केला पाहिजे. (नॉम चॉम्स्की)

१३. या सर्व शिफारसींमध्ये अत्यंत महत्वपूर्ण अशी एक शिफारस महिला वर्गाकडून आली आहे ती म्हणजे आज वृत्तपत्रात महिलांच्या प्रश्नावर चर्चा होतात पण त्या केवळ वरवरच मर्यादित राहतात. त्याचा सखोल विचार होऊन त्यातून काही निश्चित फलित मिळवण्यासाठी महिलांनी एखादे स्वतंत्र फक्त महिलांचे प्रश्न मांडणारे वृत्तपत्र चालवावे. 'खबर लहरीया' हे याचे उत्तम उदाहरण आहे. अशा प्रकारचे वृत्तपत्र महिलांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध लढून त्यांना न्याय मिळवून देणारे असावे. कासेगावमधील सौ. गेल ऑम्वेट (पाटणकर) यांनी 'वीरांगना' हे दैनिक १९८८ – १९८९ साली यशस्वीरीत्या चालवले होते. स्त्रीवादी दैनिक म्हणून त्याचे वेगळेपण होतेच. मात्र आर्थिक अडचणींमुळे ते बंद पडले.

## ४.५ उपसंहार –

प्रस्तुत प्रबंधात आपण वृत्तपत्राकडून वाचकांच्या बदलत्या अपेक्षांचा सविस्तर उहापोह केला आहे. वाचक व संपादक यांच्यात वृत्तपत्र विक्रेते हा महत्वाचा दुवा असतो. पण तीनही घटक एकत्र येऊन आपल्या गरजा, मागण्या यावर विचार करत नाहीत.त्यामुळे वाचकांच्या नेमक्या अपेक्षा काय आहेत हे वृत्तपत्रांना कळत नाही व वृत्तपत्रे आपल्याला काय देऊ इच्छितात हे वाचकाला समजत नाही.वाचक व वृत्तपत्र यांच्यात कुठेतरी सुसंवाद निर्माण व्हावा व पत्रकारितेला विधायक वळण मिळावे.यासाठी संशोधनाचा हा विषय निवडला होता.

या निमित्याने विविध वयोगटाच्या, वर्गाच्या, व्यवसायाच्या वृत्ती प्रवृत्तीच्या वाचकांशी मला संवाद साधता आला. तसेच केसरी, सकाळ, तरूण भारत, पुढारी, लोकमत, पुण्यनगरी, जनप्रवास, ललकार या वृत्तपत्रांच्या संपादक, उपसंपादकांशी, पत्रकारांशी, वार्ताहरांशी तसेच, वृत्तपत्र एजंट व विक्रेत्यांशी संपर्क आला. त्यांच्याबरोबर विचारविनिमय करण्याची संधी मिळाली व आपण निवडलेल्या विषयांची व्याप्ती बरीच मोठी असल्याचे लक्षात आले. लाखो वाचकांपैकी केवळ ४०० वाचकांशी संवाद साधून त्यावरून निष्कर्ष काढताना संशोधनाच्या मर्यादा जाणवल्या. मात्र या संशोधनात मांडलेले विचार व निष्कर्ष हा या

विषयाचा एक भाग आहे. यावर अजूनही बरेच काही विचारमंथन होवू शकेल व ते भविष्यकाळात व्हावे अशी अपेक्षा आहे.

यातून जे काही निष्कर्ष काढले आहेत ते वृत्तपत्रांना निश्चितच उपयुक्त ठरतील अशी आशा आहे. पत्रकारितेच्या क्षेत्रात जे विद्यार्थी नव्याने संशोधन करीत आहेत त्यांना या निष्कर्षाचा फायदा होईल अशी आशा आहे.

सदर संशोधन करताना मनुष्य स्वभावानुसार काही उणीवा, त्रुटी राहिल्या असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्या असल्यास सुधारण्याचा प्रयत्न मी करेनच. वाचक, पत्रकार, संपादक व वृत्तपत्रे यांच्यामध्ये सुसंवादाचा एक धागा ओवून त्यांच्यात एकसूत्रता, समन्वय साधण्यासाठी हे संशोधन निश्चितच उपयुक्त ठरेल.

## प्रकरण पाचवे

# संदर्भ ग्रंथांचे पुनरावलोकन

**प्रकरण ५**

# संदर्भ ग्रंथांचे पुनरावलोकन

प्रस्तुत प्रबंधात आपण वृत्तपत्रांकडून वाचकांच्या बदलत्या अपेक्षा या विषयावर संशोधन करून तत्संबंधी निष्कर्ष व शिफारशी मांडल्या. या विषयाच्या अनुषंगाने संशोधन करताना एक गोष्ट जाणवली ती म्हणजे या पूर्वी या विषयावर फारसा विचार झाला नाही. झाला असला तरी त्याला संशोधनाच्या चौकटीत बसवले गेले नाही. त्यामुळे जे संदर्भग्रंथ याच्या अभ्यासासाठी वापरले त्यातून थोडेफार संदर्भ मिळाले त्याचा आधार घेवून हे लेखन केले आहे. प्रस्तुत प्रबंधाची चार प्रकरणात विभागणी केली असून त्या त्या प्रकरणासाठी जे संदर्भ ग्रंथ वापरले आहेत त्यातून कोणता आशय घेतला याचा आढावा प्रस्तुत प्रकरणात घेतला आहे.

प्रबंधाच्या प्रस्तावना व वृत्तपत्र संकल्पना, वृत्तपत्रांचा इतिहास यासाठी **'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास'** हा रा. के. लेले यांचा ग्रंथ उपयुक्त ठरला. यात भारतात वृत्तपत्रांचा उदय कसा झाला या पासून आजपर्यंतच्या वृत्तपत्रातील स्थित्यंतराचा इतिहास मांडला आहे.

**'वृत्तपत्रविद्या'** हे प्रसन्नकुमार अकलूजकर यांचे पुस्तक घेतले. वृत्तपत्रांची निर्मिती, मुद्रण, वृत्तपत्रांची मांडणी, अग्रलेख हा आशय संदर्भाला घेतला.

**'समाजसंवाद'** डॉ. सुभाषचंद्र अक्कोळे यांच्या पुस्तकातून त्यांचे विविध अग्रलेख संदर्भासाठी उपयुक्त ठरले.

**' केसरीतील निवडक निबंध'** हे गोपाळ गणेश आगरकर यांचे पुस्तक लोकमान्य टिळकांच्या अग्रलेखाचे स्वरूप, त्यातील विषय याचा संदर्भ घेण्यासाठी उपयुक्त ठरले.

**'संपादकाचे जीवनस्वप्न'** हे द्वा.भ. कर्णिक यांचे पुस्तक वृत्तपत्राचे पहिले पान, बातम्यांचे संपादन, विविध सदरे यांच्या माहितीसाठी उपयोगी ठरले. यातील कुमार केतकरांचे 'संपादन दैनिकाचे' ही प्रस्तावना अतिशय महत्त्वाची वाटली.

**'सांस्कृतिक महाराष्ट्र भाग१'** या मधु मंगेश कर्णिक यांनी संपादित केलेल्या पुस्तकातील वृत्तपत्र व नियतकालिके या संबंधीचे प्रकरण वृत्तपत्रांची स्थित्यंतरे समजण्यासाठी उपयुक्त ठरले.

**'पत्रकारिता मार्गदर्शक' व 'पावले पत्रकारितेची'** ही दोन्ही एस.के.कुलकर्णी यांची पुस्तके वृत्तपत्रांची जबाबदारी, आचारसंहिता, परिपूर्ण वृत्तपत्र कसे असते या विषयाच्या दृष्टिने मार्गदर्शक ठरली. यातील वार्ता आणि वार्तामूल्य, वृत्तपत्रसंपादन, व्यावसायिक लिखाण हे मुद्देही विवेचनात उपयुक्त ठरले.

**'बातमीदारी व वार्ताजगत'** ही एस.के. कुलकर्णी यांची पुस्तके बातमी, वृत्तपत्रविश्व, बातम्यांचे विषय, जबाबदारीची पत्रकारिता, बातमीदारीचे यश अपयश या विषयांसाठी महत्त्वाची ठरली.

**'टेलिव्हिजन प्रॉडक्शन टेक्नीक्स'** हे प्रो. गिरीश केमकर यांचे पुस्तक मिडीयामधील बदल व या पार्श्वभुमीवर वृत्तपत्रांचे बदलते रूप यांची तुलना करण्यासाठी उपयुक्त ठरले.

**'निबंधकार टिळक'** हे न.चिं.केळकर यांचे पुस्तक केसरी व लोकमान्यांचे लेखन, वृत्तपत्र व्यवसायाचा आधार कसे ठरले याच्या अभ्यासासाठी उपयुक्त ठरले.

**'लो.टिळक यांचे चरित्र'** हे न.चिं.केळकर यांचे पुस्तक लो.टिळकांचे व्यक्तिमत्त्व व वृत्तपत्रीय कार्य याच्या विवेचनासाठी महत्त्वाचे ठरले.

**'वृत्तमिमांसा'** हे न.चिं.केळकर यांचे पुस्तक वृत्तपत्रातील वृत्तलेखन कौशल्याबाबत विवेचन करणारे असून संदर्भाला उपयुक्त ठरले.

**'मराठीतील नभोवाणी पत्रकारिता'** या पुरूषोत्तम कोर्डे यांच्या पुस्तकाचा वृत्तपत्र व नभोवाणी यांची तुलना करण्यासाठी उपयोग झाला.

**'पत्रकारिता झूठा सपना कडवा सच'** या राकेश कोहरवाल यांच्या पुस्तकात बदलत्या पत्रकारितेचे व पत्रकारितेतील विकृत प्रवृत्तीबद्दलचे विवेचन अतिशय सुंदर आहे. बाजारीकरणाकडे निघालेल्या पत्रकारितेबद्दलचे विचार मांडणारी त्यांची प्रस्तावना विवेचनाला उपयुक्त ठरली.

**'रामदासांची पत्रकारिता'** हे गजानन खोले यांचे पुस्तक पूर्वीच्या पत्रकारितेचे स्वरूप व पत्रकारितेची प्राचीनता या गोष्टीमुळे वाचनीय ठरले.

**'आकांक्षा पत्रकारितेच्या'** हे स.गा.गर्गे यांचे पुस्तक पत्रकारितेकडून वाचकांच्या व पत्रकारांकडून वृत्तपत्राच्या कोणत्या अपेक्षा आहेत याच्या विवेचनासाठी मार्गदर्शक ठरले.

**'पत्रकारिता विचार व व्यवहार'** या पुस्तकात सुधाकर गव्हाणे यांनी पत्रकारिता म्हणजेच वृत्तपत्रे आदर्श व व्यवहाराचा योग्य मेळ घालणारी कशी असावीत व याचे विवेचन केले आहे. वृत्तपत्रांकडून केल्या जाणाऱ्या अपेक्षा मांडताना हे विवेचन उपयुक्त ठरले.

**'मिडियालेखन आणि प्रिंट पत्रकारिता'** या डॉ. यू.सी.गुप्ता यांच्या पुस्तकातील आधुनिक पत्रकारिता व संपादन कला या दोन प्रकरणांचा वृत्तपत्रांची बदलती भूमिका या विषयाच्या विवेचनात उपयोग झाला.

**'व्यवहारिक पत्रकारिता'** या डॉ.यू.सी.गुप्ता यांच्या पुस्तकातील 'पत्रकारिताके विविध रूप' हे प्रकरण बदलत्या वृत्तपत्राची भूमिका तसेच पत्रकारितेची आचार संहिता याच्या विवेचनासाठी उपयोगी ठरले.

**'संपादन'** हे अरविंद गोखले यांचे पुस्तक संपादनकलेतील बदल, संपादनशास्त्र व तंत्र, वृत्तपत्र संपादकाची जबाबदारी, भूमिका इ.गोष्टीचे बहुमोल विवेचन करणारे असल्याने त्याचाही संदर्भ म्हणून उपयोग झाला.

**'पत्रकारिता विद्या'** हे किरण गोखले यांचे पुस्तक, त्याची प्रस्तावना, पत्रकारितेची विविध क्षेत्रे तसेच वृत्तपत्र सृष्टीचे कायदे कानून या विषयांच्या मांडणीसाठी महत्त्वाचे ठरले. त्यातील अरूण साधू यांचा 'पत्रकारितेचे शिक्षण औपचारिक व अनौपचारिक तसेच वृत्तपत्रांचे मुद्रण, मांडणी, सजावट हा दत्तात्रय पाडेकरांचा लेख संदर्भासाठी महत्त्वाचा ठरला.

**'पत्रकारितेचा सन्मान'** या ल.न गोखले यांच्या पुस्तकात पत्रकारिता हे लोकव्रत कसे आहे व यासाठी कोणत्या आचारसंहितेचे पालन पत्रकारांनी केले पाहिजे याचे विवेचन आहे. वृत्तपत्रांकडून सर्वसामान्यांच्या अपेक्षांचे प्रतिबिंब यात जाणवते.

**'माध्यम, पत्रकारिता आणि आपण'** या डॉ.श्रीपाद जोशी यांच्या पुस्तकात माध्यमांचा प्रभाव, समाज व पत्रकारिता, भाषिक वृत्तपत्रांच्या समस्या व पत्रकारितेचे उत्तरदायित्व काय आहे या विषयांचे उत्कृष्ट विवेचन केले आहे. प्रबंध विषयात याचा उपयोग झाला आहे. माध्यमांची नीतीमत्ता आणि नभोवाणी' या पुस्तकातील सर्वच विवेचनाचा प्रबंध विवेचनात उपयोग झाला आहे. या संदर्भात श्रीपाद जोशी यांनी केलेले विवेचन निश्चितच मौलिक व चिंतनीय आहे.

**'नभोवाणी व दूरचित्रवाणी'** या प्रसाद नामजोशी यांच्या वृत्तपत्रविद्या अभ्यासक्रमात नेमलेल्या पुस्तकाचा तुलनेसाठी उपयोग झाला आहे.

**'वृत्तपत्र आणि कायदा'** या वैजयंती जोशी यांच्या पुस्तकात वृत्तपत्रीय कायद्याबद्दल केलेले विवेचन मार्गदर्शक ठरले आहे.

**'वृत्तपत्रांचा इतिहास'** या वि.कृ.जोशी यांच्या पुस्तकाचा वृत्तपत्रांची बदलती रूपे अभ्यासण्यासाठी उपयोग झाला आहे.

**'जागतिकीकरण आणि भारतीय प्रसारमाध्यमे विचारमंथन'** या विद्याधर ताटे संपादित पुस्तकातले बापूसाहेब पुजारी, मा.अच्युतानंद मिश्र, मा.सच्चिदानंद जोशी, चं.प.भिशीकर, मा.डॉ.दिपक टिळक, मा.अरविंद गोखले, कुमार केतकर, प्रतापसिंह जाधव या सर्वांचेच व्याख्यानमालेतील निबंध हा या

प्रबंधाचा आधारस्तंभ ठरला आहे. भारतीय पत्रकारितेची विश्वासार्हता, वृत्तपत्रातील स्पर्धा, वैचारिकता, विश्वासार्हता व वृत्तपत्रांपुढील आव्हाने यावर उत्कृष्ट विवेचन यात केले आहे.

**'हिंदी पत्रकारिता'** या डॉ. माया त्रिपाठी यांच्या पुस्तकातील सामाजिक न्याय और भाषाका सवाल हे प्रकरण संदर्भासाठी महत्त्वाचे ठरले आहे.

**डॉ.दिपक टिळक यांचे 'न्यूजपेपर मॅनेजमेंट'** हे पुस्तक वृत्तपत्र व्यवसायात व्यवसाय म्हणून कोणत्या अडचणी येतात व वृत्तपत्राचे व्यावसायिकरण का झाले आहे याचे विवेचन करताना उपयोगी पडले.

**'चित्रपट, दूरदर्शन:माध्यमांचे अवलोकन'** हे वैशाली दिवाकर यांचे पुस्तक वृत्तपत्र व अन्य माध्यमांच्या तुलनेच्या दृष्टीने वाचनीय ठरले आहे.

**'मराठी पत्रकारिता'** हे ए.व्ही.देशपांडे व **'वृत्तविद्येचे अंतरंग'** हे शं.ह.देशपांडे यांचे पुस्तक मराठी पत्रकारितेचे स्वरूप, वृत्तपत्रविद्येचे स्वरूप, समस्या, वास्तव या विषयांसाठी संदर्भ म्हणून वाचनीय ठरले.

**'मराठी नियतकालिकांचा वाङ्मयीन इतिहास'** या डॉ.उषा देशमुख यांच्या पुस्तकाचा थोडाफार उपयोग झाला.

**'पत्रकार'** हे ज.पा.देशमुख यांचे पुस्तक वृत्तपत्र व पत्रकार यांच्यातील सहसंबंध अभ्यासण्यासाठी उपयुक्त ठरले.

**'वृत्तपत्र कसे चालते ?'** हे ही त्यांचे पुस्तक वृत्तपत्रांच्या अडचणी, समस्या व कामकाज याचे मार्गदर्शन करणारे आहे.

**'उपसंपादकाचा सोबती'** व **'पत्रकारितेची मूलत्तत्वे** ही सुधाकर पवार यांची पुस्तके बदलत्या पत्रकारितेवर पर्यायाने वृत्तपत्र स्वरूपावर प्रकाश टाकणारी ठरली.

**'पत्रकारितेची मूलत्तत्वे'** प्र. ना. परांजपे यांचे पुस्तक वृत्तपत्रव्यवसायाचा आत्मा काय आहे याबाबत मार्गदर्शक ठरले.

**'काळातील निवडक निबंध'** या शि. म. परांजपे यांच्या पुस्तकाला रा.श्री.जोगांनी लिहलेली प्रस्तावना अभ्यासपूर्ण व संदर्भाला उपयुक्त ठरली.

**‘पत्रकारिताके विविध आयाम, मिडीयालेखन और संपादनकला’** ही प्रसाद गोविंद व अनुपम पाण्डेय यांची पुस्तके व त्यातील संपादनकला, व्यवस्थापन व संपादकीय कार्य हे लेख शिवाय वृत्तपत्रांचे बाजारीकरण भारतीय वृत्तपत्रांची सद्यस्थिती’ इ.लेख संदर्भ म्हणून वापरता आले.

**‘पत्रकारिता व माहितीचा अधिकार** हे डॉ.प्रताप पाटील यांनी संपादित केलेले पुस्तक अभ्यासनीय आहे.

**‘पत्रकारिताका अवलोकन’** हे एन.सी.पंताचे पुस्तक स्वातंत्र्योत्तर पत्रकारितेचे स्वरूप अभ्यासण्यासाठी उपयुक्त ठरले.

**‘मिडीयाके पचास वर्ष या प्रेमचंद्र** पातंजलि यांच्या पुस्तकातील प्रभाष जोशी, डॉ.नंदकिशोर त्रिखा, अच्युतानंद मिश्र, राहूल देव, बालमुकुंद सिन्हा, कृष्णाकिशोर पाण्डेय, बीजेंद्र कुमार व डॉ.सुरेश शर्मा यांचे लेख अत्यंत उपयुक्त ठरले. यात त्यांनी मिडीयाची पन्नास वर्षे, वृत्तपत्र स्वातंत्र्य, परदेशी वृत्तपत्रांची भिती, पत्रकारिता हे मिशन का धंदा? पत्रकाराची स्थिती, सामाजिक न्याय व बातमीपासून मनोरंजनापर्यंत वृत्तपत्रांचा झालेला प्रवास याचे विवेचन आले आहे.

**‘मराठी वृत्तपत्रसृष्टी’** या गोपाळ बेणारे यांच्या पुस्तकात वृत्तपत्राच्या बदलत्या स्वरूपाचे विवेचन केले आहे.

**‘आगरकरदर्शन’** या कमलाबाई भिडे यांनी संपादित केलेल्या पुस्तकात काही महत्त्वाचे संदर्भ मिळाले आगरकरांची पत्रकारिता कशी होती याचे यात चांगले विवेचन आले आहे.

**‘अग्रलेखकार लोकमान्य टिळक’** या डॉ.विश्वास मेहेंदळे यांच्या पुस्तकाचा लोकमान्य टिळकांच्या पत्रकारितेचा अभ्यास करताना चांगला उपयोग झाला.

**‘राजकीय प्रबोधन आणि मराठी वृत्तपत्रे’** या डॉ. संगीता मेश्राम यांच्या प्रबंधाचा संदर्भासाठी उपयोग झाला. भारतात वृत्तपत्रांची पायाभरणी कशी झाली व त्यांच्या भूमिका कोणत्या होत्या यांचे विवेचन त्यांच्या पुस्तकात आहे.

**‘वृत्तपत्रव्यवसाय’** या माधव मंत्री यांच्या पुस्तकाचा वृत्तपत्रातील जाहिरातींचा परिणाम, वृत्तपत्रे व समाजहित, परदेशातील वृत्तपत्र व्यवसाय या विषयांच्या अभ्यासात उपयोग झाला.

**‘पत्रकारिता प्रशिक्षण व जनसंचार, जनसंपर्क एवं विज्ञापन’** या डॉ.सुजाता वर्मा यांच्या पुस्तकात व पत्रकारितेचा अर्थ, स्वरूप, वृत्तपत्रीय लेखन तसेच जनसंपर्क व वृत्तपत्रे या विषयाचे विवेचन आले आहे तेही उपयुक्त ठरले आहे.

**'वृत्तसंकलन, लेखन आणि संपादन'** हे देवेंद्र विस्पुते यांचे पुस्तक वृत्तपत्राची सुरूवात, मांडणी, सजावट या विषयासाठी उपयोगी ठरले.

**'पत्रकारिता और साहित्य** या डॉ. शांती विश्‍वनाथन यांच्या पुस्तकातील पत्रकारिता व साहित्य, वृतपत्रांची भाषा या विषयाचे विवेचन उपयुक्त ठरले.

**'प्रकाशन विश्‍व'** हे मोहन वैद्य यांचे पुस्तक वृतपत्र व्यवसायातील बारकावे अभ्यासण्यासाठी उपयुक्त ठरले.

**'आधुनिक पत्रकारिता–एक नजर'** या बेला रानी शर्मा यांच्या पुस्तकात वृत्तपत्रात संपादनाचे महत्व, आचारसंहिता, त्यांचे अधिकार व स्वामित्व या विषयावर विचारमंथन केले आहे.

**'वृत्तपत्रविद्या'** या बा.दो. सातोस्कर यांच्या पुस्तकांत वृत्तपत्र व्यवसायासंबंधी विवेचन केले आहे.

**'बदलती पत्रकरिता – गिरते मुल्य'** या निशांत सिंह यांच्या पुस्तकात पत्रकारितेतील झालेल्या स्तित्यंतराबद्दल व वृत्तपत्राच्या गुन्हेगारीकरणाकडे होणाऱ्या वाटचालीबद्दल मार्मिक विचार मांडले आहेत.

**'माध्यमवेध'** या संजय गवई यांच्या पुस्तकात प्रसारमाध्यमे कशी बदलत चालली आहेत, वृतपत्रांचे बाजारीकरण कसे होत चालले आहे याचे विवेचन केले आहे.

**'मराठी वृत्तपत्र व्यवसाय'** - मा कृ.शिंदे यांच्या पुस्तकात मराठी वृत्तपत्रव्यवसायाची वाटचाल कशी झाली यावर लिहले आहे.

या शिवाय **'चाणक्यनिती – भाग १ ते ४'** यातील कांही संदर्भ यात घेतले आहेत.

वरील सर्व पुस्तके संदर्भ ग्रंथम्हणून कमी अधिक प्रमाणात उपयुक्त ठरली आहेत. याशिवाय **वृत्तपत्रव्यवस्थापन** ( संपा. अभय कुलकर्णी), **मुद्रित माध्यमासाठी लेखनकौशल्ये, लेखनाचे विविध आकृतीबंध (संपा. रमेश वरखेडे)** या पाठ्यपुस्तकांचीही संदर्भासाठी बहुमोल उपयोग झाला आहे.

यानंतर **विकसीत भारत पत्रकारकी भूमिका–२००४'** ' साधना ऑक्टो २००७, डिसे २००५ व डिसे. २०११, नवभारत नोव्हेंबर २०११, हिंदुस्थान समाचार नवोत्थान अंक २००३, सत्याग्रही

विचारधारा फेब्रु २००७ ते २०१०, महाराष्ट्र इतिहास परिषद शोधनिबंध संग्रह २००९, प्रबोधन प्रकाशन ज्योती. जानेवारी २०११ या मासिकांचा अत्यंत महत्वपूर्ण संदर्भम्हणून उपयोग झाला आहे.

याशिवाय 'केसरी शताब्दी, विशेषांक - १९८१, 'केसरी १२५ वर्षाची व्रतस्थ वाटचाल - २००६ या विशेषांकाचा या प्रबंधातील महत्वाचा संदर्भ म्हणून उपयोग झाला आहे.

व्यंकटराव हायस्कूल येथील गोपाळ गजानन कुलकर्णी यांच्या लघुसंशोधन प्रबंधाचा व कृतिसंशोधनाचा यातील संशोधन पध्दती या प्रकरणासाठी उपयोग झाला आहे.

या व्यतिरिक्त वृत्तपत्रात येणारे विविध लेख, बातम्यांची कात्रणे, चर्चासत्रातील शोधनिबंध यांचाही संदर्भासाठी वापर केला आहे. या लेखांची छायांकित प्रत परिशिष्ठात जोडली आहे.

वरील सर्व संदर्भ ग्रंथाचा आधार घेवून प्रबंधाचे लेखन केले आहे. असे असले तरी प्रबंधाच्या विषया संदर्भात असे जाणिवपुर्वक केलेले लेखन उपलब्ध झाले नाही. प्रबंधाचा विषय नविन व पूर्वी चर्चिला गेला नसल्याने वरील ग्रंथाचे वाचन करून त्यातून मिळालेला विचार कणिकातून, मतमतांतरातून, प्रश्नावल्या, मुलाखती यातील चर्चेतून जे कांही विचार मांडले ते एकसंधपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

या संशोधनाचा आवाका निश्चितच प्रचंड आहे. परदेशात या विषयावर बरेच विवेचन झाले आहे. मात्र आपल्याकडे हा अभ्यास केवळ टी.आर.पी. मिळवण्यापुरता मर्यादित झाला आहे. त्यामुळे भावी अभ्यासकांना यात बरेच काही करण्यासारखे आहे.

# परिशिष्टे

# परिशिष्ट प्रकरण १ ले

## काही महत्वाची अवतरणे –

- प्रसार माध्यमांचा ताबा ज्यांच्यापाशी असतो. त्यांच्या वर्गीय, शैक्षणिक व सांस्कृतिक पार्श्वभूमीची छाया प्रसारणावर पडत असते. मराठी पत्रकारितेवर ब्राम्हणी प्रभाव आहे. - जयदेव डोळे.

- ब्रिटीश राज्यकर्त्यांपासून वर्तमानपत्र ही संस्था आम्ही घेतली खरी परंतु विलायतेत संपादकाचे कार्य करू इच्छिणारा जी पूर्व तयारी करतो ती मात्र आम्ही पूर्वी कधी केली नाही व आजही करीत नाही. '' भगवंतराव पाळेकर – सत्यशोधक''

- आर्थिक दृष्टया सबळ झालेले पत्रकारही मनाने कारकूनच का राहातात, कारकूनीचा बदलौकीक स्वतःला का चिकटवतात हा प्रश्न आहे. नक्कल, पुनर्लेखन, पुनरुक्ती, नोंद, हिशेब, उजळणी इ, साचेबंद कामे कारकूनाला करावी लागतात. त्यात नाविन्य नसते. कल्पना शक्तीला वाव नसतो. तारतम्य वा विवेकबुद्धीचा वापर नसतो. भाषेचा वापर ठराविक पद्धतीने होत असल्याने तिथेही मर्यादा पडते. पण चुकीबद्दल बोलणे खाण्याचा अग्रमान यांचा. एकप्रकारचा कोडगेपणा, रुक्षता या वृत्तीत मुरलेली असते. पत्रकार व कारकून यातील मोठा फरक हा की पत्रकाराला प्रत्येक गोष्टीत निर्मितीचा आनंद घेता येतो.

- 'फुकट' हा तीन अक्षरी शब्द म्हणजे पत्रकारांचा जीव की प्राण. चित्रपट, नाटक, सर्कस, प्रदर्शन अशा ठिकाणी त्याला तिकिटे काढून जाणे कमीपणाचे वाटते. काही पत्रकार पैसे खातात, बातमी छापण्याचे व न छापण्याचेही. गेल्या काही वर्षात मराठी पत्रकारांमध्ये जातीय तट पडले आहेत. ब्राम्हण पत्रकार ब्राम्हणांना 'जागा' देतात. तर दलित, ब्राम्हणेतर त्यांच्या बांधवांना 'प्रकाशात' आणतात. यातूनच 'आपला माणूस' म्हणून त्यांना वाचक विशेषण बहाल करतात. त्यांची मजल किंगमेकर, सल्लागार, तज्ज्ञ इथपर्यंत जाते. याच भूमिकेत वावरण्याचा नाद पत्रकाराला लागतो. आपण मंत्र्याचे किंगमेकर, खासदाराचे सल्लागार आहोत या भ्रमात ते राहू लागतात. ही शोकांतिका आहे. - जयदेव डोळे - मराठी पत्रकाराची मनोवृत्ती – सत्याग्रही – फेब्रु. २००७.

- वृत्तपत्रांची स्थिती पाहिली तर असे दिसून येईल की भांडवलशाहीचे पाश वृत्तपत्रांवर झपाट्याने पडत असून वालचंद, हिराचंद - गोयंका प्रभृती भांडवलवाल्यांचे दास होण्याची पाळी अनेक नामवंत संपादकांवर आली आहे. वृत्तपत्रकारांनी या नवीन संकटाकडे वेळीच लक्ष न दिल्यास हिंदुस्थानात बाकीच्या

स्वतंत्र वृत्तीच्या पत्रांभोवतालचे पाश कडकडून आवळले जाण्यास मुळीच अवधी लागणार नाही. - आज वृत्तपत्रे भांडवलदाराच्या आहारी भराभर चालली आहेत. याचे प्रमुख कारण म्हणजे वृत्तपत्रांचे आपसातील स्पर्धा व हेवेदावे. ही स्पर्धा व हेवेदावे वृत्तपत्रांनी बाजूला ठेवून जर भांडवलवाल्यांच्या संकटाला संघटीतपणे तोंड दिले तर वृत्तपत्राचे 'पावित्र्य' कायम राहून तेजस्वी व निर्भय बाण्याच्या संपादकांची अखंड परंपरा कायम राहिल. - ग. गो. जाधव संपादक, पुढारी - अग्रलेख -१९४५.

• वृत्तपत्रे व्यवसाय इतका जिवंत, परिवर्तनशील, जोमदार आणि विधायक आहे की त्यातील माणसे जीर्णशीर्ण विचारांची आणि जैसे थै वादी राहू शकतच नाहीत. पण मराठी पत्रकार बहुदा या प्रक्रियेला अपवाद असतो. तो साधी, सरळ, थेट टीका करण्याऐवजी एकदम विरोधातील बाजू घेऊन आपले परंपराप्रिय अंतर्मन उघडे करतो.

• दहशतीचे चित्रण करून अव्याहत ते विकत राहणाऱ्या या माध्यमांसाठी 'दहशत' ही सुद्धा माध्यमांद्वारे यथायोग्य 'संस्कार' करून 'आकर्षक' व मनोरंजकरीत्या विकली जाणारी माध्यमनिर्मिती अशी केवळ एक वस्तू आहे. माध्यमांनी तिची निर्मिती करण्याचा उद्योग देखील कोणत्याही शास्त्राच्या निर्मिती उद्योगापेक्षा कमी दर्जाचा लेखण्याचे कारणच नाही. कारण घडणाऱ्या हिंसेचे प्रत्यक्ष दूरदूरवर दर्शन हे हिंसा घडवणारे करत नसून त्या दहशतीचे जगभर वितरण हे या माध्यमांद्वारेच केले जाते. दहशत नावाची वस्तू ऐकण्याची, वाचण्याची वाचक, प्रेक्षकाला चटक लावत असतात. ही प्रत्यक्षातील दहशत घराघरात मनामनांत कायम व सतत पोहोचती राखण्याचे खरे काम तर माध्यमांच्याच मार्फत चालते. माध्यमांचा टी.आर. पी. वाढविण्यासाठी व त्याच्या आधारावर स्पर्धेतला नफ्याचा वाटा वाढता राखण्यासाठी हे हिंसेचे, दहशतीचे चित्रण हा माध्यमांच्या व्यवसायाचा व व्यावसायिक स्पर्धेचा भाग आहे. ही स्पर्धा करण्यासाठीच तर खुली मुक्त अर्थव्यवस्था त्यांना हवी आहे.

दहशत, हिंसा हा साराच मुळात माध्यमांसाठी कच्चा माल असून तो अधिकाधिक वाचनीय, श्रवणीय, प्रेक्षणीय करून मगच तो माध्यमातून 'सोडणे' हा माध्यम उद्योजकांच्या व्यवसायाचा व्यावसायिक भाग आहे आणि असा व्यवसाय करण्याचे मुक्त स्वातंत्र्य असणारे जग माध्यम सम्राटांना हवे आहे.

दहशतवादी वा दहशतवादाला विरोध या दोन्ही बाजूंवर आधारित माध्यम वस्तूच्या निर्मिती व वितरणात व चित्रणात माध्यम उद्योगांचे हितसंबंध गुंतलेले आहेत.

(दहशतीची माध्यमे व माध्यमांचा दहशतवाद डॉ. श्रीपाद आ. जोशी, नवभारत नोव्हें. ११)

एखादे खेडे, गाव, मूल दत्तक घेउन ते जोपासावे तशी ही माध्यमे दहशतवाद दत्तक घेउन त्याची जोपासना करत चालली आहेत.

हिंसा, भय, दहशतमुक्त, शस्त्रास्त्रमुक्त शांततामय सहअस्तित्वाचे जग निर्माण करणे हे काही माध्यमसम्राटांचे उद्दिष्ट नाही तर अधिकाधिक नफा कमीत कमी ताकद लावून मिळवणे हे त्यांचे उद्दिष्ट आहे. (डॉ. श्रीपाद आ. जोशी)

- नॉम चॉम्स्की – माध्यमांचे चारित्र्य, चरित्र आणि स्वभाव मुलतः सत्ताकेंद्री, विविध प्रकारच्या अधिकारी यंत्रणांच्या सत्ताकेंद्राच्या बाजूने झुकण्याचा असतो.

- समर्थ रामदास - बातमीदारी कशी हवी ? –

कुग्रामे अथवा नगरे । पाहावी घरांची घरे ।

भिक्षामिसे लहान थोरे । परीक्षून सोडावी ।।

बहुती काहीतरी सांपडे । विचक्षण लोकी मैत्री घडे ।

उगेच बैसता काहीच न घडे । फिरणे विवरणे ।।

सावधपणे सर्व जाणावे । वर्तमान आधीच घ्यावे ।

जाउ ये तिकडे जावे । विवेके सहित ।।

## परीशिष्ठ

**लोकमान्य टिळकांनी लिहीलेल्या अग्रलेखातील विषय वैविध्य.**

अ) इंग्रज राज्य व राज्यकर्त्याशी निगडीत

१) इंग्रजी राज्यात आम्हास फायदा काय झाला ?

२) आमच्यावर जुलूम कसा होतो ?

३) हिंदुस्थानचा कारभार

४) महाराणी सरकारचा जयजयकार

५) अनावर राज्यविस्तार

६) हिंदुस्थानची अंतर्व्यवस्था

७) कंपनी सरकार व इंग्रज सरकार

८) सरकारी जुलमांचा नवीन मासला

९) राज्य करणे म्हणजे सूड उगवणे नव्हे.

१०) मोहाच्या फुलांचा कायदा.

११) पुण्यात सध्या चालू असलेला धुमाकूळ.

१२) पुण्यातील प्लेग – व्यवस्था.

१३) दारूच्या गुत्यांची चळवळ.

१४) बादशहा ब्राम्हण झाले.

१५) इंडिया कौन्सिल बील

१६) कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ.

१७) अखेर व्हायचे तेच झाले.

१८) स्थानिक स्वराज्याची पिछेहाट

१९) दिव्याखाली अंधेर / स्थानिक स्वराज्याचा खून

२०) सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय ?

२१) राजद्रोह

२२) ग्रहण सुटले.

२३) साम्राज्याची बंधने

२४) मराठी आणि इंग्रजी काळ

२५) कोळसा उगाळला तरी काळाच

२६) क्रॉफर्ड प्रकरण.

२७) राज्यकारभार कसा चालवावा ?

२८) लॉर्ड स्टॅनहर्स्ट यांची कारकिर्द

२९) कमिशनांचा हंगाम

३०) कोर्ट कर्झन यांचा आदेश.

३१) भ्रमाचा भोपळा लवकरच फुटला.

३२) सहानुभूतीचा पूर

३३) भिल्ल आणि मोर्ले

३४) देशाचे दुर्दैव

३५) लॉर्ड वुइलिंग्टन यांचा अत्याचार

३६) दिल्ली परिषदेत काय झाले

ब) शेती, खोती, शेतकरी व दुष्काळविषयक –

१) शेतकऱ्यांचा कायदा

२) हे सारा वाढवणे की जुलूम ?

३) हिंदुस्थानमधील शेतकरी लोकांस खरोखरच बंड करावे लागेल काय ?

४) शेतकऱ्यांच्या कमिशनने काय केले ?

५) शेतकऱ्यांनो व सावकारांनो सावध व्हा

६) उठा, अजून वेळ गेलेली नाही.

७) नवीन बिलाची आरती

८) खोतीच्या हक्कावर घाला

९) दुष्काळ

१०) दुष्काळाची व्यवस्था

११) दुष्काळ निवारण्याचे मार्ग

१२) दुष्काळाची पीडा (१ ते ४ भाग)

१३) शेतसाऱ्याची वाढ व दुष्काळाची पीडा

१४) डोंगर पोखरुन उंदीर निघाला

१५) तेरा मुघांचा पूरावा

क) आर्थिक धोरण, औद्योगिक विकास, स्वदेशी - बहिष्कार

१) राज्यकारभारातील उधळेगिरिचा खर्च

२) सोन्या-रुप्याची लढाई

३) हिंदुस्थानचे दारिद्रय

४) लष्करी खर्चाचे ओझे

५) हिदुस्तानच्या भरभराटीच्या दंतकथा

६) औद्योगिक पारतंत्र्य

७) आमचे उद्योगधंदे कसे ठार झाले ?

८) पुण्यातील पहिली चिमणी

९) राष्ट्रीय बहिष्कार

१०) आणीबाणीची वेळ

११) हातघाईवर आले ?

१२) बारिसल प्रकरण

१३) स्वदेशीवरील आक्षेप

ड) सर्वांगिण शिक्षण -

१) लष्करी शिक्षणाच्या शाळा

२) देशी भाषांची दैना

३) खरे विद्यापीठ कोणते ?

४) ना जाईल साहेबाची मुक्ताफळे

५) हिंदुस्थानातील शिक्षणाची दिशा

६) हे आमचे गुरुच नव्हेत

७) सुशिक्षितांची कर्तव्ये

८) चतकोर भाकरीची गुलामगिरी

९) स्त्री शिक्षणाची दिशा

१०) गणपतीचा उत्सव

११) श्री शिवजयंत्युत्सव

१२) थोर पुरुषांची चरित्रे

इ) कॉंग्रेस पक्ष –

१) ह्यूम आणि कॉंग्रेस

२) मलबारी आणि कॉंग्रेस

३) राजकीय चळवळीची नवी दिशा

४) यंदाची राष्ट्रीय सभा

५) कॉंग्रेसमधील लोकशाही पक्षाचे धोरण

६) वेळ तर हीच आहे.

७) लोकनायकांचे कर्तव्य

८) हा म्हातारचळ की पोरखेळ

९) चोराच्या उलट्या बोंबा

१०) मवाळांचा रूसवा व फूट

११) टिळक व बेझंट

१२) प्रिन्सीपॉल, पशूपाल की शिशूपाल

क) धर्म व सामाजिक सुधारणा –

१) आपला धर्म

२) जागे व्हा आणि मरा

३) हिंदुत्व आणि सुधारणा

४) विवेकभ्रष्टानां भवति विनिपातः शतमुखः

५) मुंबईतील दंगा आणि सरकारचे कर्तव्य

६) हिंदू मुसलमानांचा समेट

७) थिऑसोफी आणि हिंदू धर्म

८) दंगे कशाने बंद होतील

९) अजून तरी आमच्या सरकारचे डोळे उघडतील काय ?

१०) कायदा आणि शिष्टाचार

ग) सामाजिक व सांस्कृतिक दृष्टीकोन –

१) अज्ञेयवाद

२) न्या. रानडे यांची ब्रम्हमीमांसा

३) दत्तकाची आवश्यकता १ ते ७

४) सामाजिक सुधारणेचे मार्ग

५) आमच्या बुद्धीस खरोखर उतरती कळा लागली आहे का ?

६) कोकणस्थ, देशस्थ व कऱ्हाडे

७) ब्राम्हण व ब्राम्हणेतर

८) विवाहधर्माचे संस्थापन

९) मलबारी शेटजींचा उद्योग

१०) पुनर्विवाह

म) मराठी भाषा –

१) मराठी भाषेची लेखन पद्धती

२) आमच्या वर्णमालेचा खून

३) मराठी भाषेचा उत्कर्ष

भ) व्यक्तिचित्रणात्मक –

या व्यतिरीक्त काही मृत्यूलेख त्यांनी लिहले आहेत.

न) ग्रंथासंबंधी परिक्षणात्मक

## परिशिष्ट (प्रकरण २ रे)

वृत्तपत्रात काळानुरूप बदल होणे अपरिहार्य असले तरी आज पत्रकारितेत जे अनिष्ट बदल दिसताहेत त्याची कारणे -

- वर्चस्वाची इच्छा
- पैशाची हाव
- योग्य आचारसंहितेच्या पालनाचा अभाव
- अधिकार पिपासा
- नफेखोरी
- विद्यमान कायदे व आदर्शवादाचा अतिरेक
- माध्यमांच्या संचालनाबद्दल अक्षमता
- निर्णयशक्ती मालक व जाहिरातदारांच्या हातात
- बाजाराची अर्थव्यवस्था
- माणसाचे यांत्रिकीकरण व तांत्रिक प्रगतीचा प्रभाव
- श्रमाबद्दल उदासिनता
- आर्थिक हितसंबंध

**वृत्तपत्रातील अनिष्ट बदलाची कारणे –**

- अन्य संस्कृतींचा संपर्क
- उपभोगवृत्ती व बदलती मानसिकता

- जीवनाकडे बघण्याचा बदलता दृष्टीकोन
- बदलती सामाजिक जाणीव
- विचारवंतांची कृतिशून्यता
- बेजबाबदार राज्यकर्ते
- नवे तंत्रज्ञान / जागतिकीकरण
- हिंसाचार, अश्लीलतेचे दर्शन
- संस्कृतीबद्दल अनादर
- जाहिरातींचा अतिरेक
- नैतिकतेच्या बदलत्या व्याख्या
- बदलती सामाजिक, राजकीय परिस्थिती व असहिष्णूता
- जनहिताकडे दुर्लक्ष व मालकहीत महत्वाचे
- माहितीच्या मुक्त संचाराचा व माध्यमस्वातंत्र्याचा दुरूपयोग
- राजकीय नेत्यांकडे कल
- कल्पकता, सृजनशीलता यांचा अभाव

**वृत्तपत्रामागचे उद्देश सांगणारी काही अवतरणे -**

**(मिडीयाके पचास वर्ष - प्रेमचंद पातंजली पान ११)**

''दिनकर कर प्रगटत दिन हि यह प्रकाश अग्याम ।
ऐसो रवि अब उग्यो महि जेहि - जेहि सुख को धाम ।
उत कमलनि विकसित करत बढत चाव चित वाम ।
लेत नाम या पत्र को होत हर्ष अरू काम ।।'' – (उदंत मार्तंड – युगल किशोर शुक्ल)

''दूतनि की यह रीति बहुत थोरे में भावैं ।
लोगनि को बहुलाभ होय यही ते लाखै।
बंगला को दूत – दूत यहि वायु को जानौ।
होय विदित सब देश क्लेश को लेश न मानौ।''(बंगदूत – नीलरत्न हलहार)

स्वलगनसो सज्जन दुखी मती होही,हरिपद भति रहे ।
अपधर्म छूटे,सत्व निज भारत यहै,कर दुःख बहै।
बुध तनहि मत्सर, नारीनर समहोही, जग आनंद लहै।
तनि ग्राम कविता, सुकविजन को अमृतवानी सब कहै। (कवि वचन सुधा – भारतेंदू हरिश्चंद्र)

गजालिश्रेष्ठा। या निबिडतर कांतार जहरी। मदांधाक्षा मित्रा। क्षणभरही वास्तव्य न करी।
नखाग्रानी येथे गुरूतर शिला भेदुनि करि। भ्रमाने आहे रे, गिरीकुहरी निद्रिस्त हरि।।

तव स्मरण सतत स्फुरणदायी आम्हा घडो।
त्वदीय गुणकीर्तन ध्वनि सुरम्य कर्णी पडो।
स्वदेशहितचिंतनाविण दुजी कथा नावडो।
तुझ्यासमचि आमुची तनुहि देशकार्यी पडो।। ( दै. केसरी)

# परिशिष्ट (प्रकरण ३ रे)

- वृत्तपत्र हे मिशन व्हावे धंदा नको.
- वृत्तपत्र राजकारणापासून अलिप्त हवे.
- आर्थिक लाभापेक्षा समाजहित जपावे.
- पूर्वग्रहदूषितता नसावी, पीतपत्रकारिता नसावी.
- सकारात्मक व चौफेर बातम्यांना प्राधान्य हवे.
- विविध सदरे असावीत.
- समाजाभिमुखता हवी.
- परखडपणा
- जाहिरातीत नीरक्षीर विवेक हवा, जाहिरातींचा अतिरेक नको.
- विविध पुरवण्यांतून मनोरंजन, विचारमंथन हवे.
- सत्याग्रही, संस्कारक्षम
- अन्यायाविरूद्ध आवाज, सामाजिक जाणीव जपावी.
- विचार प्रवर्तन हवे.
- लवचिकता, सर्वसमावेशकता हवी.
- विचार व धर्मसहिष्णूता हवी.
- समाजाला दिशादर्शक, सामाजिक प्रश्नांची उकल करणारी

## वृत्तपत्राकडून वाचकांच्या अपेक्षा – वृत्तपत्रे कशी हवी ?–

- रहस्यभेद करणारी
- भ्रष्टाचाराला विरोध करणारी
- लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून भूमिका समर्थपणे पेलणारी
- शासनावर अंकुश ठेवणारी
- विविध विषयस्पर्शी, मनोरंजक व प्रबोधन करणारी
- व्यावसायिकीकरण हवे पण धंदेवाईक नको.
- जागतिकीकरणात सामावणारी
- नीतीमूल्ये व आचारसंहिता पाळणारी, संस्कारक्षम
- विधायक शक्तीस उत्तेजन व विघातक शक्तींना विरोध करणारी.
- धोरणात्मक निर्णय घेणारी व शासनाला घ्यायला लावणारी.
- नीतीमूल्यांची पायमल्ली न करणारी, सामाजिक न्यायाची जाणीव ठेवणारी
- स्त्रीवादी, आंबेडकरी, दलित जाणीवांचे व्यासपीठ
- घरातील प्रत्येकाच्या आवडीचा विचार देणारी
- सैद्धांतिक व वैचारीक बैठकीचे अधिष्ठान असावे.
- राष्ट्रवाद, देशप्रेम यांचे बळ असावे.
- वाचकवर्गाच्या गरजा, आवडीनिवडी जपाव्यात, मागणी तसा पुरवठा नसावा.
- गल्लेभरू, इतरांशी स्पर्धा करणारी नको, इतर वृत्तपत्रेही तत्ववादी.
- जुन्याचे पावित्र्य ठेउन नव्याचा स्वीकार करावा.

## परिशिष्ट (प्रकरण ४ थे)

लिओ बोगार्ट प्रेस ॲण्ड पब्लिक (१९८१) यांनी केलेल्या वाचकांच्या अभिरूचीचा तक्ता.

| वयोगट | विषय | प्रमाण |
|---|---|---|
| १८ ते २४ | १) कॉमिक्स | ४२% |
| | २) घात अपघात, नैसर्गिक संकटे | ३२% |
| | ३) वाचकांचा पत्रव्यवहार | २९% |
| | ४) सर्वसाधारण स्थानिक नसणारा परंतु मानवी आस्थाविषयक मजकूर | २८% |
| | ५) करमणूक व हॉलिवूड न्यूज | २६% |
| २५ ते ३४ | १) कर व अर्थविषयक | ३९% |
| | २) घात-अपघात नैसर्गिक संकटे | ३८% |
| | ३) श्रम रोजगार इत्यादी. | ३५% |
| | ४) हवामान | ३३% |
| | ५) गुन्हे विषयक | ३२% |
| ३५ ते ४९ | १) मानवी आस्था विषयक | ३९% |
| | २) घात-अपघात नैसर्गिक संकटे इ. | ३७% |
| | ३) सार्वजनिक आरोग्य व कल्याण | ३६% |
| | ४) पर्यटन | ३५% |
| ५० च्या पुढे | १) घात-अपघात, नैसर्गिक संकटे | ४३% |
| | २) वाचकाचा पत्रव्यवहार | ४२% |
| | ३) निधन वृत्त | ४१% |
| | ४) गुन्हे | ३६% |
| | ५) सार्वजनिक आरोग्य व कल्याण | ३५% |

## परिशिष्ट (प्रकरण ४ थे)

**● प्रश्नावलीतून वाचकांच्या पसंतीचे जाणवलेले संख्यात्मक तक्ते –**

| | वृत्तपत्रानुसार वाचकाची पसंती | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लोकसत्ता | पुढारी | केसरी | लोकमत | सकाळ | तरूण भारत | म.टाईम्स | सामना | एकूण |
| वाचकांची संख्या | १० | २० | ०४ | ११ | ३५ | १० | ०५ | ०५ | १०० |

**● प्रश्नावल्यांचे स्त्री – पुरूषानुसार वर्गीकरण –**

| एकूण | स्त्रिया | पुरूष |
|---|---|---|
| १०० | ४० | ६० |

**● विद्यार्थी वर्गीकरण –**

| एकूण | शालेय | महाविद्यालयीन | पदव्युत्तर |
|---|---|---|---|
| ५० | १५ | २५ | १० |

**● व्यवसायानुसार प्रश्नावल्यांचे वर्गीकरण –**

| एकूण | स्त्रिया | | पुरुष | | स्त्री - पुरुष |
|---|---|---|---|---|---|
| | नोकरदार व्यवसाय | गृहिणी | नोकरदार | व्यवसाय | निवृत्त |
| १०० | २६ | ११ | ४० | १५ | ०८ |

● **जाहिरात वाचणाऱ्या वाचकानुसार वर्गीकरण –**

| एकूण | जाहिरात काळजीपूर्वक वाचणारे | नुसत्याच वाचणारे | दुर्लक्ष करणारे | वरवर वाचणारे | केवळ नजर फिरवणारे |
|---|---|---|---|---|---|
| १०० | ४० | ३५ | १५ | ०५ | ०५ |

● **पत्रकारितेने नीतीमूल्ये सांभाळावी या विषयानुसार –**

| एकूण | वृत्तपत्रांनी नीतीमूल्ये पाळावीत | आधुनिकता व नीतीमूल्यांचा सुवर्णमध्य हवा | नीतीमूल्यांचे बंधन नको |
|---|---|---|---|
| १०० | ७० | २५ | ०५ |

● **वृत्तपत्राच्या नैतिक घसरणीला कारणीभूत कारणानुसार –**

| कारणे | झटपट श्रीमंत होण्याची इच्छा | नीतीमूल्यांचा अनादर | हीन दर्जाची वर्तणूक | अस्तित्वाची लढाई | जबाबदारीची जाणीव कमी | स्वार्थ | बदलत्या काळाची सम राखणे. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वाचक | १३ | ०९ | ०७ | ०६ | ०५ | ११ | ०४ |

| राजकारण | संस्कार | पाश्वात्यांचा प्रभाव | बदलती सामाजिक आर्थिक स्थिती | लालसा/ हाव | ग्राहकवाद मागणी तसा पुरवठा | अश्लीलता | जाहिरात अधीनता | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | १० | ०९ | ०३ | ०३ | ०२ | ०५ | ०३ | १०० |

**● वाचकाच्या अपेक्षानुसार वर्गीकरण –**

| जाहिरातींचा अतिरेक नको | बाजारीकरण नको | अतिरंजित व भडक बातम्या नकोत | राजकारणाशी संबंध नसावा | महिलांसाठी स्वतंत्र वृत्तपत्र, त्यांचे प्रश्न मांडावेत. | पुढारी, मंत्र्यांचे वाढदिवस विशेषांक नको, योग्य गोष्टीसाठी विशेषांक असावा. |
|---|---|---|---|---|---|
| २० | १५ | १० | १५ | ०७ | ०५ |

| पेड न्यूज / पीतपत्रकारिता नसावी | केसरीसारखे आदर्शवादी, निःस्पृह वृत्तपत्र यावे | अन्य प्रसार माध्यमांशी स्पर्धा नको | सकारात्मक दृष्टीकोन हवा | एकूण |
|---|---|---|---|---|
| ०८ | ०५ | ०५ | १० | १०० |

**● वाचकाच्या नजरेतून वृत्तपत्रांच्या नैतिक ऱ्हासाला / सद्यस्थितीला जबाबदार गोष्टी –**

| बरीच कारणे | पाश्चात्य संस्कृती प्रभाव | शासन | वृत्तपत्रांचे मालक | पत्रकार | जाहिराती व जाहिरातदार | सांस्कृतिक वर्चस्वाची भावना | योग्य आचार-संहितेचे पालन नाही. | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १० | १० | १४ | २० | ०६ | २० | १० | १० | १०० |

# संदर्भग्रंथसूची

# संदर्भग्रंथ सूची


| | | | |
|---|---|---|---|
| अकलूजकर प्रसन्नकुमार | वृत्तपत्रविद्या | श्रीविद्या प्रकाशन, पुणे | २००० |
| अक्कोळे सुभाषचंद्र | समाजसंवाद (संपादक) | दक्षिण भारत जैन सभा, सांगली | १९९९ |
| आगरकर गोपाळ गणेश | केसरीतील निवडक निबंध (संपादक) | आर्यभूषण छापखाना, पुणे | १८८७ |
| आगरकर गोपाळ गणेश | संपूर्ण आगरकर (खंड १ ते ३) | | |
| आळतेकर मनोहर माधव | मराठी निबंध | सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे | १९६३ |
| कर्णिक द्वा. भ. | संपादकाचे जीवनस्वप्न | किर्लोस्कर प्रेस, सातारा | १९५२ |
| कर्णिक मधु मंगेश | सांस्कृतिक महाराष्ट्र (संपादक) भाग १ | महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, मुंबई | २०११ |
| कुलकर्णी एस. के. | पत्रकारिता मार्गदर्शक | पुणे विद्यार्थीगृह, पुणे | २००६ |
| कुलकर्णी एस. के. | पावले पत्रकारितेची (संपादक) | डॉ. नानासाहेब परूळेकर, सकाळ चॅरिटी ट्रस्ट, पुणे | २००० |
| कुलकर्णी एस. के. | बातमीदारी | पुणे विद्यार्थीगृह, पुणे | २००४ |
| कुलकर्णी एस. के. | वार्ताजगत | टि.म.वि. पुणे | |
| केमकर गिरीश | टी.व्ही. प्रॉडक्शन टेक्निकल्स | टि.म.वि. पुणे | २००७ |
| केळकर न.चिं. | निबंधकार टिळक (संपादक) | व्हीनस प्रकाशन, पुणे | १९६९ |
| केळकर न.चिं. | लोकमान्य टिळक यांचे चरित्र खंड १ ते ३ | विधी एजन्सीज, पुणे | |
| केळकर न.चिं. | वृत्तपत्रमिमांसा | पुणे | १९६५ |
| कोरडे पुरूषोत्तम | मराठीतील नभोवाणी पत्रकारिता | श्रीविद्या प्रकाशन, पुणे | २००३ |
| कोहरवाल राकेश | पत्रकारिता झुठा सपना - कडवा सच | नमन, नवी दिल्ली | २००८ |
| खोले गजानन शं. | समर्थ रामदासांची पत्रकारिता | हर्षद प्रकाशन, पुणे | १९८१ |
| गर्गे स. मा. | आकांक्षा पत्रकारितेच्या | पुणे | १९८८ |
| गव्हाणे सुधाकर | पत्रकारिता विचार व व्यवहार | | |
| गुजर - गोखले | पत्रकारांसाठी मराठी | विद्या एजन्सीज, पुणे | |

| | | | |
|---|---|---|---|
| गुप्ता यु.सी. | मिडीया लेखन और प्रिंट पत्रकारिता | अर्जुन पब्लिशींग हाउस, दिल्ली | २००५ |
| गुप्ता यु.सी. | व्यवहारिक पत्रकारिता | अर्जुन पब्लिशींग हाउस, दिल्ली | २००९ |
| गोखले अरविंद | संपादन | टि.म.वि. पुणे | २००१ |
| गोखले किरण | पत्रकारिता - विद्या (संपादक) | मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई | २००३ |
| गोखले ल.ना. | पत्रकारितेचा सन्मान | पुणे | |
| जोशी श्रीपाद भालचंद्र | माध्यम पत्रकारिता आणि आपण | कौस्तुभ प्रकाशन, नागपूर | २००४ |
| जोशी श्रीपाद भालचंद्र | माध्यमांची नितीमत्ता | विजय प्रकाशन, नागपूर | २००७ |
| जोशी भालचंद्र | नभोवाणी | मुंबई | |
| जोशी वि.कृ. | वृत्तपत्रांचा इतिहास | पुणे | |
| जोशी वैजयंती | वृत्तपत्र आणि कायदा | मेहता पब्लिशींग, पुणे | १९९२ |
| ताठे विद्याधर मा. | जागतिकीकरण आणि भारतीय प्रसार माध्यमे (संपादित) | बापूराव लेले स्मृती समारोह समिती | २००६ |
| त्रिपाठी माया | हिंदी पत्रकारिता (संपादक) | जवाहर पुस्तकालय, मथूरा | २००९ |
| टिळक बा. गं. | तपस्वी मोरेश्वर | आदर्श पत्रकार | १९९१ |
| टिळक दीपक | न्यूज पेपर मॅनेजमेंट | टि.म.वि. पुणे | |
| दिवाकर वैशाली | चित्रपट, दूरदर्शन : माध्यमांचे अवलोकन | प्रतिमा,पुणे | २००६ |
| देशपांडे ए. व्ही | मराठी पत्रकारिता | सुखदा-सौरभ प्रकाशन,सातारा | २००४ |
| देशपांडे शं.ह. | वृत्तविद्येचे अंतरंग | पुणे | १९७० |
| देशमुख उषा | मराटी नियतकालिकांचा वाङमयीन अभ्यास | श्रीविद्या प्रकाशन, पुणे | |
| देशमुख ज.पा. | पत्रकार | अ.वि.गृह प्रकाशन,पुणे | |
| देशमुख ज. पा. | वृत्तपत्र कसे चालते | अ.वि.गृह प्रकाशन,पुणे | |
| नामजोशी प्रसाद | नभोवाणी आणि दूरचित्रवाणी | टि.म.वि. पुणे | २००४ |
| पवार सुधाकर | उपसंपादकाचा सोबती | दास्ताने रामचंद्र आणि कं. पुणे | १९९१ |

| | | | |
|---|---|---|---|
| पवार सुधाकर | पत्रकारितेची मूलतत्वे | कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे | २००६ |
| परांजपे प्र. ना. | पत्रकारितेची मूलतत्वे | विद्या प्रकाशन, पुणे | |
| परांजपे शि. म. | काळातील निवडक निबंध (भाग ९) (संपादक) | प्रस्तावना रा.श्री. जोग | १९४६ |
| प्रसाद गोविंद व पांडेय अनुपम | मिडीया लेखन और संपादन कला | डिस्कव्हरी पब्लिशींग, दिल्ली | २००६ |
| प्रसाद गोविंद व पांडेय अनुपम | पत्रकारिता के विविध आयाम | डिस्कव्हरी पब्लिशींग, दिल्ली | २००९ |
| पातांजली प्रेमचंद | मीडिया के पचास वर्ष | राधा पब्लिकेशन, दिल्ली | २००५ |
| पाटील प्रताप | पत्रकारिता व माहितीचा अधिकार (संपादक) | सहकार भवन, सांगली | २००६ |
| पंत एन. सी. | पत्रकारिताका अवलोकन | राधा पब्लिकेशन, दिल्ली | २००७ |
| बेणारे गोपाळ | मराठी वृत्तपत्रसृष्टी | फडके प्रकाशन ,कोल्हापूर | २००१ |
| भिडे कमलाबाई | आगरकर दर्शन (संपादक) | मॉडर्न बुक डेपो, पुणे | १९५६ |
| मेहेंदळे विश्वास | अग्रलेखकार लो. टिळक (संपादक) | केसरी - मराठा ट्रस्ट,पुणे | १९९५ |
| मेश्राम संगीता | राजकीय प्रबोधन आणि मराठी वृत्तपत्रे | विद्या बुक्स, नागपूर | २००८ |
| मंत्री माधव | वृत्तपत्र व्यवसाय | सकाळ, पुणे | १९५७ |
| लेले रा. के. | मराठी वृत्तपत्रांचा इतिहास | कॉन्टीनेंटल प्रकाशन, पुणे | १९८४ |
| वर्मा सुजाता | पत्रकारिता प्रशिक्षण | आशिष प्रकाशन, कानपूर | २००५ |
| वर्मा सुजाता | जनसंचार जनसंपर्क एवं विज्ञापन | ज्ञानोदय, कानपूर | २००७ |
| विसपूते देवेंद्र | वृत्तसंकलन लेखन आणि संपादन | प्रतिक्षा प्रकाशन, उदगीर | २००३ |
| विश्वनाथन शांती | पत्रकारिता और साहित्य | जवाहर पुस्तकालय, मथूरा | २००९ |
| वैद्य मोहन | प्रकाशन विश्व | पुणे | २००३ |
| शर्मा बेलारानी | आधुनिक पत्रकारिता - एक नजर | राधा पब्लिकेशन, दिल्ली | २००६ |
| सातोस्कर बा. द. | वृत्तपत्रविद्या | पणजी | १९७१ |
| सिंह निशांत | बदलती पत्रकारिता - गिरते मूल्य | नमन, नवी दिल्ली | २००६ |

| | | | |
|---|---|---|---|
| संगवई संजय | माध्यमवेध | अभिव्यक्ती मिडिया फॉर डेव्हलेपमेंट | २००२ |
| शिंदे मा. कृ. | मराठी वृत्तपत्र व्यवसाय | मुंबई | १९७५ |


## पाठ्यपुस्तके


| | | | |
|---|---|---|---|
| कुलकर्णी अभय | वृत्तपत्र व्यवस्थापन (संपादक) | टि.म.वि. पुणे | २००३ |
| वरखेडे रमेश | मुद्रीत माध्यमांसाठी लेखन कौशल्ये | य.च.मुक्त विद्यापीठ, नाशिक | २००२ |
| वरखेडे रमेश | लेखनाचे विविध आकृतिबंध | य.च.मुक्त विद्यापीठ, नाशिक | २००२ |
| वरखेडे रमेश | दृकश्राव्य माध्यमांसाठी लेखन कौशल्य | य.च.मुक्त विद्यापीठ, नाशिक | २००२ |


## मासिके


| | | |
|---|---|---|
| विकसित भारत पत्रकार की भुमिका | बापूराव लेले स्मृती समिती अहमदाबाद | २००४ |
| साधना | ऑक्टोबर २००७ | |
| साधना | डिसेंबर २०११ | |
| नवभारत | नोव्हेंबर २०११ | |
| हिंदुस्थान समाचार | नवोत्थान अंक २००३ | |
| केसरी शताब्दी विशेषांक | केसरी मुद्रणालय, १९८१ | |
| केसरी १२५ वर्षांची व्रतस्थ वाटचाल २००६ | शतकोत्तर रौप्य महोत्सव विशेषांक | |
| सत्याग्रही विचारधारा | फेब्रुवारी २००७-२०१० | |
| साधना | डिसेंबर २००५ | |
| अभिव्यक्ती - अनुभव शिक्षा | | |
| महाराष्ट्र इतिहास परिषद शोध निबंध संग्रह | २००९ | |
| प्रबोधन प्रकाशन ज्योती | जानेवारी २०११ | |